# माझे वाङ्मयीन जीवन




RFFBK-0008823
विषय
ग्रं. नं. 620

काव्यविहारी

गॉर्कीची आत्मचरित्रपर अमर शोककथा

# माझें बालपण

संपादक वि. वा. हडप

★

'आई' या त्रिखंडात गाजलेल्या कादंबरीचा जनक मॅक्सिम गॉर्की हा रशियातील लोकक्रांतीचा एक महान शिल्पकार होय. रशियन लोकक्रांतीचा जनक **लेनिन** याचा गॉर्की हा साहित्य-क्षेत्रातील उजवा हात होता. गॉर्कीचे जीवन व त्यांतल्या त्यांत त्याचें बालपण अत्यंत कष्टाचें व अमानुष हाल-अपेष्टांचें गेलें. त्यांतील क्षणोक्षणींचे प्रसंग एकाहून एक हृदयाचा ठाव पाहणारे – चावा घेणारे – लचका तोडणारे आहेत आपल्या अशा कष्टमय बाल-जीवनातील ह्या सर्व विदारक कटु सत्याची कलात्मक जुळणी व मांडणी करून गॉर्कीनें 'माझें बालपण' ही जागतिक कीर्तिची आत्मचरित्रात्मक अमर अशी शोककथा कथन केली आहे

मुखपृष्ठावर चित्रकार दलालाचें सुंदर दुरंगी चित्र **किंमत ५ रुपये.**

● ● ●

**स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.**

# माझें वाङ्मयीन जीवन

: लेखक :

काव्यविहारी

: प्रस्तावनाकार :

प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

९७३७८०
अनुक्रम
क्रमांक ८२०
१९५५

(२२३

आवृत्ति पहिली : १९५५

RFFBK-0008823

• स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर. •

प्रकाशक : द्‌. ना. मोघे, बी. ए.
स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

प्रकाशन क्रमांक : १११

[ या पुस्तकाच्या यापुढील सर्व आवृत्तींचे हक्क व भाषांतर, रूपांतर, उतारे घेणें वगैरे इतर सर्व हक्क श्री. धोंडो वासुदेव गद्रे, B A, LL.B यांच्या स्वाधीन ]

कव्हर : श्री. बाबूराव गोखले,
चालक, मीना आर्ट्स, सांगली.

मुद्रक : माधव कृष्णाजी सहस्रबुद्धे,
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस,
३९३ सी, शिवाजी रोड, कोल्हापूर.

# प्रस्तावना

सुप्रसिद्ध कवि काव्यविहारी यांच्या वाङ्मयीन जीवनास मीं प्रस्तावना लिहिणें म्हणजे "वळचणीचें पाणी आढ्याला" जाण्यासारखें थोडें उलटें होत आहे ! श्रीयुत काव्यविहारी हे आज आपली साठी गाठीत आहेत. वाङ्मयाच्या क्षेत्रांतही ते गेलीं कित्येक वर्षें एक प्रसिद्ध कवि म्हणून महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. सुमारें पचवीस वर्षांमागें मीं लेखनास सुरवात केली, त्यावेळीं जीं सर्वमान्य प्रसिद्ध नावें मजसारख्याला परिचित होतीं, त्यांत कवि काव्यविहारी यांचें एक नांव होतें. अशा स्थितींत मीं त्यांच्या पुस्तकास प्रस्तावना लिहिणें थोडें विचित्रच होय. तथापि हें काम पत्करण्याला कांहीं वैयक्तिक कारणें घडलीं व म्हणूनच मी हें काम पत्करीत आहें.

सुमारें सहा वर्षांमागें सांगली येथें दरसाल साजरा होणाऱ्या नाट्योत्कर्ष-दिनाचा अध्यक्ष म्हणून मी गेलों होतों. सांगलीसारख्या नाट्याच्या जन्म-भूमींत निवडक रसिक श्रोत्यांना रंगभूमीसंबंधीं कांहीं ऐकविणें म्हणजे कोंकणातील नातेवाईकास देशावरील आंब्यांचा आहेर करण्यापैकींच होय,

हें मला माहीत होतें. म्हणून अध्यक्षीय भाषणाला केवळ थोडा वेळ ठेवून माझ्यासमोरील प्रौढ व रसिक सांगलीकर मंडळींना आपल्या आवडत्या विषयावर बोलू देणें, हा मीं सभेचा कार्यक्रम ठरविला. श्रोत्यात काव्यविहारी हे एक होते. मी दरसाल सांगलीस बंधूच्याकडे जात असल्यामुळे मला काव्यविहारींचा वैयक्तिक परिचयही होता. तथापि तो कवि व रसिक म्हणून होता. पण त्यांच्या त्या दिवशींच्या भाषणानें, जीवनाचा सर्व बाजूंनीं आस्वाद घेणारे, संस्थानी वातावरणात वाढलेले, एक चतुर वक्ते या नात्यानें मला त्यांची प्रथमच ओळख झाली. अनेक नट, नाटककार, राजेरजवाडे यांच्याशीं त्यांचा दीर्घकाळ संबंध आलेला दिसला; व या अनेक वर्षांत त्यांनीं आपल्या रसिक व भेदक दृष्टीचा भरपूर उपयोग केलेला दिसला. खासगी भाषणांतही मोजक्या, मार्मिक व योग्य प्रसंगीं खमचट शब्दांत कोणत्याही व्यक्तीचें शब्दचित्र रेखाटण्यात त्यांचा हातखंडा आहे. अशा या साहित्यिकाची माहिती एक केशवसुतसंप्रदायी कवि आणि ब्राह्मणी संस्थानांतील एक ‘ रावसाहेब ’ यापलीकडे मला त्यावेळेपावेतों नव्हती, याबद्दल मला वाईट वाटलें. या मार्मिक साहित्यिकाजवळ अनुभवांचा जो अमोल सांठा आहे, तो त्यांनीं तसाच बांधून ठेवू नये, असें त्याच क्षणीं माझ्या मनांत आलें, व पुन्हां त्यांची गाठ पडताच “ आपण आपले नट, नाट्य आणि साहित्यिक यांच्यासंबंधींचे अनुभव ग्रंथरूपानें किंवा निदान लेखरूपानें महाराष्ट्रापुढें मांडणें जरूर आहे, ” असें मीं त्यांना सांगितलें. अशाप्रकारें या जीवन-वृत्तांताचा मी दत्तकपिता असल्यानेंच मजकडे त्याला प्रस्तावना लिहिण्याचें काम आलें असावें; निदान आल्यावर तें पत्करणें मला अपरिहार्य वाटलें असावें. आज हें पुस्तक लिहून झाल्यानंतर कांहीं वर्षांपूर्वी मीं काव्यविहारी यांना जी विनंति केली होती, ती किती योग्य होती, हें मजप्रमाणें वाचकांनाही कळून येईल अशी आशा आहे.

पण पुष्कळदां आत्मचरित्रलेखनाचें महत्त्व वाचकापेक्षां लेखकालाच पटविणें जरूर असतें. ज्याच्याजवळ बहुमोल आत्मचरित्राचा मसाला आहे, असे काव्यविहारी यांच्यासारखे रसिक साहित्यिक व अनुभवी सद्गृहस्थ, आत्मचरित्रासंबंधींच्या अथवा विनयासंबंधींच्या खोट्या कल्पनांनीं पछाडलेले

असतात. "ज्याच्या चरित्रात मोठाल्या घटना व मोठाले पराक्रम नाहींत, त्यानीं आत्मचरित्र कशाला लिहावें?" या कृपण शंकेनें काव्यविहारी यांच्यासारख्या शालीन साहित्यिकांना पछाडलेलें असतें. अर्थात् पराक्रम कशाला म्हणावयाचें आणि घटना मोठी कोणती, हा एक प्रश्नच आहे. तथापि काव्यविहारी यांच्यासारख्या आत्मचरित्रलेखकांच्या वैयक्तिक जीवनात नाट्यपूर्ण घटना नाहींत असें क्षणभर मानलें, तरी तेवढ्यानें आत्मचरित्र लिहिण्याचा त्यांना अधिकार पोंचत नाहीं अशी कल्पना केल्यास वाङ्मयाचें फारच मोठें नुकसान होईल, हें आमच्या समाजांतील लेखक व वाचक जितक्या लौकर लक्षांत घेतील तितकें चांगलें. आत्मचरित्रलेखनाकरितां मनुष्य स्वतः पराक्रमी, कर्तबगार व उलाढाल्या असण्यापेक्षां भोंवतालच्या उलाढालींकडे व त्या करणाऱ्या व्यक्तींकडे मार्मिकपणें पाहणारा असण्याचीच आवश्यकता अधिक आहे व श्रीयुत काव्यविहारी यांच्या ठिकाणीं मला हाच गुण प्रामुख्यानें दिसून आला. पण एवढ्या गुणावरच आत्मचरित्राची तयारी होते असें नाहीं. आत्मचरित्रलिखाणात दैवयोगाचाही भाग बराच असतो. मनुष्य स्वतः काय आहे यापेक्षाही त्याचा संबंध कोणत्या व्यक्तींशीं व कोणत्या कालाशीं आला, या गोष्टीला आत्मचरित्रलेखनाच्या तयारींत विशेष महत्त्व आहे आणि हीच गोष्ट तर दैवाधीन आहे! आणि नेमक्या याच गोष्टींत काव्यविहारी हे विशेष नशीबवान आहेत.

काव्यविहारी यांचें बाल्य कृष्णाकांठ आणि दक्षिणी संस्थानें यांच्या सानिध्यांत गेलें. इतर अनेक कर्तबगार साहित्यिकाप्रमाणें काव्यविहारी यांच्याही महत्त्वाकांक्षेला आणि ज्ञानक्षुधेला प्रतिकूल परिस्थितीनेंच प्रारंभीं धार दिली. हायस्कूलच्या शिक्षणाकरितां त्यांना सांगलीस रोज चालत जावें लागे, व कॉलेजच्या शिक्षणाकरिता त्यांना श्रीमंत बुधगावकर यांच्या आश्रयावर अवलंबून रहावें लागलें, या दोनच गोष्टींवरून त्यांच्या परिस्थितीची कल्पना येईल. पण या परिस्थितीला दुसरी बाजूही होती. कष्टात बाल्यदशा व्यतीत करणारे अनेक सापडतील, परंतु हरिपूरसारख्या निसर्गरम्य गांवांत बाल्य घालविणें आणि नाट्याचार्य देवलांसारखा नाट्यक्षेत्रांतील हिरा नित्य आपल्या घरींच पहावयास सापडणें, हें फारच थोड्यांच्या नशिबीं असेल. काव्य-विहारी यांचा जन्म नाट्याच्या जन्मभूमींत आणि त्या काळच्या सर्वश्रेष्ठ

नाटककाराच्या गांवींच झाल्यानें महत्त्वाकांक्षेबरोबरच त्यांची रसिकताही वाढूं लागली. विद्यालयें, राष्ट्रीय पुढारी आणि नाटक कंपन्या यांच्या परमोत्कर्षांचा तो काळ होता. त्यावेळचें फर्ग्युसन कॉलेज आजच्या फर्ग्युसन कॉलेजपेक्षां नक्की कोणत्या बाबतींत श्रेष्ठ होतें, हें सांगणें कठीण असलें, तरी तरुणांना स्फूर्ति देण्याचे बाबतींत त्यावेळीं त्या संस्थेला कांहींसें रोमॅंटिक वैभव प्राप्त झालेलें होतें यांत शंका नाहीं; आणि नाटककंपन्या आणि राजकीय पुढारी यांच्या बाबतींत तर महाराष्ट्राला त्यावेळचें वैभव पुन्हां लाभलेंच नाहीं. १९१५ च्या सुमारास काव्यविहारी कोल्हापूरचें राजाराम कॉलेज सोडून B. A. च्या अभ्यासाकरितां फर्ग्युसन कॉलेजमध्यें दाखल झाले. या सालचें माहात्म्य लक्षांत घेतल्यास रंगभूमी, वाङ्मय व राजकारण या तिन्ही क्षेत्रांतील उत्तमांतील उत्तम वातावरण वाट्याला येण्याच्या बाबतींत तरुण काव्यविहारी यांचें भाग्य हेवा करण्यासारखें होतें यांत शंका नाहीं. मनोरंजनसारखें मासिक, गंधर्व संगीत नाटक मंडळीसारखी नाटकमंडळी, देवल खाडिलकरांसारखे नाटककार, गडकऱ्यांसारखे सरस्वतीकंठमणि, हे सर्व त्यावेळीं परमोच्च वैभवाच्या अवस्थेंत होते. या वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींशीं आलेले संबंध काव्यविहारींनीं धावत्या पण मार्मिक लेखणीनें चित्रित केले आहेत.

हें पुस्तक म्हणजे १९१५ च्या सुमारास तरुण असलेल्या साहित्यिकाच्या समग्र काळाचें चित्र असतें तर आहे त्याहून फारच विस्तृत झालें असतें व कदाचित् आहे याहूनही रम्य झालें असतें. परंतु काव्यविहारी यांनीं आपलें क्षेत्र अगदीं मर्यादित करून घेतलें आहे. त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह याच सुमारास प्रसिद्ध होत आहे, त्याला पूरक म्हणून त्यांनीं आपलें हें वाङ्मयीन जीवन या पुस्तकांत अत्यंत अल्प अवकाशांत रेखाटलें आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या उमेदीच्या कालखंडाबरोबरच या लहानशा आत्मचरित्रांत एका तडफदार महाराष्ट्रीय साहित्यिकाचें अंतर्जीवनही चित्रित झालें आहे. स्थूलमानानें बोलावयाचें झालें तर काव्यविहारी हे केशवसुतसंप्रदायी आधुनिक कवींपैकीं एक आहेत. तथापि सर्वसामान्य कवींच्या मानानें त्यांचें जीवनही वेगळ्या वातावरणांत व्यतीत झालें आहे व मनही थोडें वेगळ्या जातीचें आहे. थोड्या ओबडधोबड

भाषेंत सांगावयाचें झालें तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात रोमँटिक कवि आणि सरस्थानी मामलेदार यांचें विचित्र मिश्रण आहे. खाजगी परिचयांत त्यांच्या अंगीं रसिकतेचा जेवढा प्रत्यय येईल तेवढाच चटवटकी उरक आणि रोख-ठोकपणा यांचाही येईल. टेबलावरील फाइली झपाझप उरकून टाकणें हा ज्यांचा प्रमुख कार्यक्रम असतो, अशा 'हपिसरा' सारखी त्यांच्या मनाची घडण अंशतः आहे. तर अंशतः ती रविकिरण मंडळाच्या पूर्वीच्या रसिक, आदरशील, आशावादी आणि प्रगतिप्रिय कवींसारखी आहे. त्यांच्या बोलण्यात, चालण्यांत, लिहिण्यात फार काय काव्यगायनातही हलुवारपणापेक्षां उरकच अधिक दिसतो. पण वाङ्मयाच्या क्षेत्रांतील 'हपिसरी' चाईची भरपाई प्रत्यक्ष जीवनाच्या क्षेत्रात प्रत्ययाला येणाऱ्या त्यांच्या रसिकतेनें केली आहे. नव्या नव्या ओळखी करणें, नव्या नव्या ठिकाणीं प्रवासास जाणें, केवळ वैचित्र्य म्हणून थोडीफार दगदग सोसूनही, चार दिवस नव्या ठिकाणीं जाऊन राहून येणें, याची त्यांना या वयातही हौस आहे. आजच्या महागतेच्या जमान्यांत मध्यम स्थितींतील साठी गांठलेल्या एका साहित्यिकानें हा उत्साह टिकवावा यात एका अर्थानें एक वेगळें काव्य आहे.

काव्यविहारी यांच्या या स्वभाववैशिष्ट्याचा परिणाम त्यांच्या काव्यावरही झाला आहे. रविकिरणपूर्व कवि, रविकिरण मंडळाचे कवि व त्यानंतरचे नवसंप्रदायी कवि या त्रिविध जातिभेदांत काव्यविहारी कोठें बसतात याचें इतरानाच काय, पण त्यांचें त्यांनाही कुतूहल वाटतें. नवकवींत तर अर्थात् त्यांना कोणीच घालणार नाहींत. तथापि ते केशवसुत संप्रदायाचे आहेत असें तरी कोणत्या अर्थानें म्हणावयाचें ?

कधींकधीं त्यांच्या स्वतःच्याच उद्गारांवरून मला स्वतःलाच असा भास होतो कीं, "पाळीव पोपटास", "जगाचा न्याय", "उकिरातले किडे" यासारख्या कविता म्हणजे त्यांच्या वैशिष्ट्यनिदर्शक कविता होत, इतकेंच नव्हे तर या कवितामुळेंच ते केशवसुतसंप्रदायी होत. माझ्या मतें हा गैरसमज होय. स्वातंत्र्य, समाजक्रांति, वगैरेंचें महत्त्व गाणाऱ्या केशव-सुतांच्या कविता चांगल्या असतील; परंतु त्या कवितांतच त्यांचें श्रेष्ठत्व किंवा विशेषत्व सांठलेलें आहे ही कल्पना बरोबर नाहीं. केशवसुतांनीं समाज-

क्रांतीची "तुतारी" फुंकली, त्याप्रमाणेंच "साध्याही विषयाचा आशय" सांगितला. केशवसुतांनीं "प्रौढत्वीं निज शैशवास" जपण्यासंबंधींही संदेश दिला. अर्थात् एखादा कवि केशवसुतसंप्रदायी आहे कीं नाहीं हें ठरवितांना तो समाजक्रांतिविषयीं गर्जना करतो कीं नाहीं, एवढेंच पाहून चालणार नाहीं. साध्या जीवनांतील सौंदर्य, मानवी मनोविकारांचा नाजुकपणा यांना काव्यांत महत्त्व देणारा कवीहि केशवसुतांचाच आधुनिक काव्यसंप्रदाय चालवीत असतो. केशवसुतांच्या कवितेंतील या तीन सुरांपैकीं क्रांतीच्या सुरालाच आमच्या टीकाकारांनीं अवास्तव महत्त्व दिल्यामुळें आधुनिक कवितेसंबंधीं चुकीचे निकष रूढ झाले.

काव्यविहारी यांनीं केशवसुतांच्या या तीन्ही सुरांत लिहिलें आहे हें खरें. तथापि त्यांच्या क्रांतीच्या कविता याच त्यांच्या विशेष प्रातिनिधिक कविता किंवा महत्त्वाच्या कविता, असा समज करून घेतल्यास, त्यांच्या कवितेचा विपर्यास केल्यासारखें होईल. व्यक्तिशः मला तर त्यांच्या "पाळीव पोपटास," "जगाचा न्याय" व "उंबरांतले किडे" या कवितांपेक्षां "मंजुळा" "माझी मैत्रीण," "बकुळीखालीं," "ती रात्र," "प्रदक्षिणा" या साध्या जीवनावरील कविताच अधिक सुंदर इतकेंच नव्हे, तर अधिक स्वभावनिदर्शक वाटतात. त्यांच्या भाषेंतील साधेपणा, चित्रणांतील प्रामाणिकपणा व दृष्टिकोनांतील शांतिप्रियता पाहून मला तर कांहीं ठिकाणीं आंग्लकवि विल्यम कौपर ( William Cowper ) याच्या एकांतप्रिय निसर्गपूजेचें स्मरण झालें. अर्थात् ही शांततेची भूक आणि रूढिभंजनाची भूक या परस्परविरुद्ध आहेत, हें सांगावयास नकोच. जिला आपण केशवसुतसंप्रदायी कविता म्हणतों किंवा जिला रोमँटिक संप्रदायी कविता म्हणणें अधिक शास्त्रशुद्ध होईल, तिजमध्यें वर सांगितलेलीं बीजें आहेत, पण त्यांतही फिरून एकेका कवीचा एकेक सूर अधिक आवडता आणि अधिक जिव्हाळ्याचा असतो. माझ्या मतें साध्याही विषयांतील आशय साध्याच भाषेंत सांगत असतां काव्यविहारी यांची प्रतिभा विशेष प्रसन्नतेनें खुलते. "खार आणि घार" ही त्यांची कविता एक प्रकारें कसोटीचें उदाहरण अथवा टेस्ट केस ( Test case ) म्हणून सांगतां येईल.

ही कविताही त्याच्या सुंदर कवितांपैकीं एक आहे. याही कवितेंत दुर्बलावर जबरदस्तांचें आक्रमण हा विषय आहे. क्रांति हाच काव्याला लायक विषय अशी कल्पना करणारानीं या कवितेची मांडणी कशी केली असती, याची सहज कल्पना करतां येईल. काव्यविहारी यानीं सृष्टींतील या हृदयस्पर्शी दृश्याचें चित्रण मात्र अगदीं वेगळ्या तऱ्हेने व म्हणूनच अधिक काव्यमयतेनें केलें आहे. एका सहृदय माणसानें काढलेलें अप्रतिम शब्दचित्र हेंच या कवितेचे मुख्य सौंदर्य होय. आक्रमणाचा निषेध हें नव्हे. काव्यविहारी यांच्या काव्याचें व व्यक्तिमत्वाचें वैशिष्ट्यही हेंच होय.

साध्या व शांत जीवनांत काव्यमयता पाहणें व जीवनातील विविध अनुभव मोठ्या उत्साहानें मिळविणें व उपभोगणें, हें काव्यविहारी यांच्या जीवनाचें सूत्र आहे, असें दिसून येईल. प्रवास, वाङ्मयीन स्नेहसंबंध व व्यवहारी व्यक्तींचें सूक्ष्म अवलोकन या तीन्ही गोष्टींत काव्यविहारी आनंदानें विहार करतांना आढळून येतील व अनुभवांतील हा आनंद हेंच आत्मचरित्राचे खरें साहित्य होय, असें म्हणतां येईल. पण या कच्च्या साहित्याला आणखी एका गोष्टीची जोड असल्याखेरीज गोडी येत नाहीं. ती गोष्ट म्हणजे आपले अनुभव दुसऱ्याला सांगण्याची उत्सुकता व ते मनमोकळेपणानें सांगण्याची तयारी. आत्मचरित्र लिहिण्यासंबंधीं आपल्या साहित्यिकांत अद्यापही कांहीं सनातनी कल्पना आहेत, हें मीं आधीं सांगितलेंच आहे. पण एकदां आत्मचरित्र लिहावयाचें ठरल्यावर त्यांत काय सांगावयाचें व लपवावयाचें हें ठरवितांना लेखकाचा सनातनीपणा आड येतोच. आत्मचरित्रांत वर्णिलेला विशिष्ट अनुभव सोवळा आहे कीं ओवळा आहे, यापेक्षां तो कथन करतानाची वृत्ति निर्मळ व कलात्मक आहे कीं नाहीं, याला अधिक महत्त्व आहे. आत्मचरित्र हें एक सिंहावलोकन आहे आणि सिंहावलोकनांत सुख आणि दुःख दोन्हीही जर गोड दिसू लागतात, तर पाप आणि पुण्य हीं दोन्हीही शुद्ध का दिसू नयेत? पण ही निर्मळ दृष्टि ठेवण्याच्या ऐवजीं आत्मचरित्र म्हणजे आत्मसमर्थनाची एक संधि असें मानण्याकडे आपल्यातील चांगल्या चांगल्या आत्मचरित्रलेखकांची प्रवृत्ति दिसून येते. काव्यविहारी यांच्या शुद्ध चरित्रात

या दृष्टीनें समर्थनाचा वा लपविण्याचा अर्थातच प्रश्न नव्हता. तथापि काव्यजीवनाच्या उषःकालीं दिसलेली एकादी 'तारा' देखील लपविण्याचा फाजील सोवळेपणा पगडीयुगांतील एखाद्या आत्मचरित्रलेखकानें केला नसता असें नाहीं! काव्यविहारी यानीं तो केला नाहीं याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों व मराठींत प्रामाणिक आत्मचरित्रलेखनाचा शुभमुहूर्त केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतों.

या आत्मचरित्रांत मला रुखरुख लागण्यासारखें एकच वैगुण्य वाटतें; व तें म्हणजे त्याचा त्रोटकपणा. काव्यविहारी यांचें शब्दचित्रणकौशल्य आणि भेदकपणा याला या त्रोटक चरित्रांत मिळावा तेवढा अवसर मिळाला नाहीं असें मला वाटतें. परंतु या कुचंबणेचें कारण पृष्ठाची मर्यादा हेंच असणार हें उघड आहे. आज काव्यविहारी साठी गाठीत आहेत. आपण अशी आशा करूं, कीं या रसिक, सुसंस्कृत आणि हौशी काव्यविहारीला त्यांच्या आवडत्या विहारार्थ यापुढें आरोग्य आणि उत्साह यानीं युक्त असें सुदीर्घ आयुष्य लाभेल व सत्तरी गांठण्याच्या सुमारास याहून विस्तृत जीवनवृत्तांत लिहिण्याचा सुयोग येईल. वाङ्मयाच्या चाहत्यांची याहून दुसरी काय इच्छा असणार?

तुकाराम आश्रम
टिळकवाडी, पुणें २
दि. १५।८।५४.

श्रीकृष्ण केशव क्षीरसागर.

माझ्यावर निर्व्याज
लोभ करणाऱ्या
आप्तांना व सुहृदांना
सप्रेम समर्पण

—काव्यविहारी

# निवेदन

जीवनमार्गावरील साठ वर्षांची सीमा ओलांडतांना माझा हा वाङ्मयीन जीवनवृत्तांत मी सादर करीत आहें. हा वृत्तांत मी केवळ माझ्या स्मृतीवर विसंबून लिहिला आहे. यामुळें त्यांतील कांहीं घटनांचा नक्कीकाल चुकला असण्याचा संभव आहे. तसें असल्यास वाचकांनीं मला क्षमा करावी. या वृत्तांतांत माझ्या परिचितांच्या व स्नेह्यांच्या ज्या स्वभावछटा मीं रेखाटल्या आहेत, त्या त्यांचें जेवढें स्वभावदर्शन मला झालें तेवढ्यापुरत्याच मर्यादित आहेत. त्या परिचितांचीं अगर स्नेह्यांचीं तीं संपूर्ण स्वभावचित्रें नाहींत, हेंही मी नमूद करूं इच्छितों. त्रोटकपणा हीहि या वृत्तांतांतील आणखी एक उणीव आहे. तथापि याचें कारण हें सर्व लेखन मला अल्पावधींत करावें लागलें आणि पृष्ठमर्यादेचा प्रश्नही माझ्यापुढें होताच. वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन वाचकांनीं या लेखनाकडे पहावें अशी त्यांना विनति आहे.

मीं माझा जीवनवृत्तांत लिहावा अशी सूचना मला माझी कन्या सौ. विमल हिनें १९४८ च्या जुलई महिन्यांत केली आणि माझे मित्र प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनीं या बाबतींत वारंवार मला प्रोत्साहन दिलें.

तथापि या ना त्या कारणानें माझें वृत्तातलेखन मागें पडत गेलें. गेल्या मार्च महिन्यात माझे जामात श्री. क. श्री. काळे, माझे मित्र डॉ. साठे व कवि सुधांशु यांच्या प्रेमळ आग्रहानें पुन्हां या प्रश्नाला चालना मिळाली आणि वाङ्मयीन जीवनवृत्तांतापुरतेंच लेखनाचें क्षेत्र मर्यादित करून मी हें कार्य हातीं घेऊन यथामति पुरें केलें आहे. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लेखक व टीकाकार प्रा. क्षीरसागर यांनीं मला प्रोत्साहन तर दिलेंच, पण माझ्या लेखनाला आपल्या सुंदर प्रस्तावनेची जोडही दिली आहे. याप्रमाणें माझ्या लेखनकार्याला बहुमोल साहाय्य केल्याबद्दल मी प्रा. क्षीरसागर, डॉ. साठे, कवि सुधांशु, श्री. काळे व सौ. विमल यांचा अत्यंत आभारी आहे. प्रा. क्षीरसागर यांची प्रस्तावना म्हणजे आम्हां उभयतामधील स्नेहभावाचें एक प्रतीक आहे असें मी मानतों.

माझे विद्यार्थी मित्र व कोल्हापूर येथील स्कूल व कॉलेज बुकस्टॉलचे मालक श्री. दा. ना. मोघे यांनीं हें प्रकाशन हौसेनें स्वीकारलें. माझे मावसबंधु व सांगली येथील 'मीना आर्टस्' चे चालक श्री. बाबूराव गोखले यांनीं कव्हरवरील सुंदर डिझाइन तयार केलें आणि कोल्हापूर येथील श्रीज्ञानेश्वर प्रेसचे मालक श्री. मा. कृ. सहस्रबुद्धे यांनीं छपाईचें काम अल्पावधींत व सुंदर केलें, याबद्दल श्री. मोघे, श्री. गोखले व श्री. सहस्रबुद्धे यांचाही मी आभारी आहें.

सांगली
दि. १० सप्टेंबर १९५४

—काव्यविहारी

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | जन्मग्रामांत | .... | .... | ३ |
| २ | महाविद्यालयीन जीवन | .... | .... | ९ |
| ३ | सेवाधर्मः परम गहनः | .... | .... | २४ |
| ४ | रंगभूमीच्या परिसरांत | .... | .... | ९४ |
| ५ | सेवानिवृत्तीनंतर | .... | .... | १२१ |
| ६ | मागें पाहतांना | .... | .... | १५१ |

★ दा. ना. मोघे — प्रकाशन, कोल्हापूर. ★

**अर्धवर्तुळें** : प्रभाकर पाध्ये, बी. ए. कि. २॥ रु.

श्री. पाध्ये यांचा वैशिष्ट्यपूर्ण तिसरा कथासंग्रह. या संग्रहांत वेडी आशा, अज्ञात बळी, एक मांजरी आणि तिचीं तीन पिलें, तुळशीचा वाडा, स्त्रीचें हृदय इत्यादि विविध प्रकारच्या कथांचा समावेश केला आहे. वृत्तपत्रांचे उत्तम अभिप्राय, सचित्र कव्हर.

**रसग्रहण — कला व स्वरूप** :

प्रा. गो. म. कुलकर्णी, एम्. ए. कि. ३॥ रु.

या प्रबंधांत रसग्रहणाच्या स्वरूपाचा व तत्राचा विचार, रसग्रहणाला लागणाऱ्या सर्व मुद्यांची सविस्तर चर्चा, रसग्रहण कसें करावें या-विषयींच्या उपयुक्त सूचना, काव्यकला, काव्याचें अंतरंग, काव्याचें बाह्यांग इत्यादि काव्यविषयक विचारांचा मार्मिक परामर्श घेतला असून शवटीं रसग्रहणाचे कांहीं नमुनेही दिले आहेत. प्रा. रा. श्री. जोग, यांची प्रस्तावना, प्रा. द. रा. बेंद्रे, कवि यशवंत, श्री. वि. स. खांडेकर, प्रा. श्री. के. क्षीरसागर इत्यादि विद्वानांचे उत्कृष्ट अभिप्राय.

**मनाचे संकल्प** : प्रा. म. ना. अदवंत. कि. २॥ रु.

प्रा. अदवंत यांनीं वेळोवेळीं लिहिलेल्या तेरा लघुनिबंधांचा संग्रह. प्रा. माटे आपल्या अभिप्रायात म्हणतात, " अपेशी कोट, पत्राची पेटी, इस्पितळाबाहेरील वेडे, नको असलेलीं पत्रें, अशासारखे अगदीं सामान्य वाटणारे विषय अदवंत यांनीं उचलले आहेत. पण त्या प्रत्येकाला फार सुंदर फुलोरा त्यांनीं आणला आहे. जी गोष्ट एरवीं आपल्याला अगत साधी वाटते तीच रसिक व कल्पक मनाला केवढ्या गूढार्थानें भरलेली दिसते याचा नमुना या पुस्तकात पहावयास सांपडतो. "

★ स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर. ★

# माझें वाङ्मयीन जीवन

6223

प्रकरण १ लें

# जन्मग्रामांत

माझ्या जीवनमार्गावरील साठ वर्षांच्या सीमेचें उल्लंघन करीत असतांना माझ्या गत जीवनाचा विस्तृत चित्रपट नजरेपुढून सरकत आहे. लौकिक जीवन आणि वाङ्मयीन जीवन असे माझ्या जीवनाचे दोन विभाग आहेत. त्यांपैकीं माझें लौकिक जीवन हें एका अगदीं सामान्य मध्यमवर्गीयाचें जीवन असल्यानें त्यात विशेष उल्लेखनीय असें कांहींच नाहीं. लक्ष्मीची कृपा माझ्यावर पूर्वीही कधीं नव्हती, यामुळें आता ती नाहीं याबद्दल मला कधींच खेद वाटत नाहीं. माझ्या अनेक स्वभावदोषाकडे दुर्लक्ष करून माझ्यावर नितांत लोभ करणारे कांहीं आप्त व स्नेही मला लाभले आहेत आणि कोणाकडे याचना न करतां मी दोन घांस सुखानें खात आहे, ही खरोखर परमेश्वरी कृपा आहे. माझें वाङ्मयीन जीवन मात्र मला अनेक दृष्टींनीं मोलाचें वाटतें. याचा अर्थ मीं निर्माण केलेलें वाङ्मय विशेष मोलाचें आहे असा मुळींच नाहीं. सुमारें चाळीस वर्षांच्या वाङ्मयीन जीवनांत कांहीं किरकोळ गद्य व सुमारें दोनशेंहे कविता मीं लिहिल्या यांत विशेष असें काय

आहे ? माझें वाङ्मयीन जीवन मला मोलाचें वाटतें याचें कारण म्हणजे या जीवनात अनेक थोर साहित्यिकांचा, प्राध्यापकांचा, संपादकांचा, गायकांचा व गायनतज्ज्ञांचा मला परिचय व सहवास घडला आहे आणि त्यांतील कांहीं माझे स्नेही झाले आहेत. अशा व्यक्तींपैकीं कांहीं दिवंगत आहेत आणि अनेक विद्यमान आहेत. अशा लहानथोर दिवंगत व विद्यमान व्यक्तींचा परिचय मला केव्हां व कसा घडला याचें निवेदन करणें, हाच या जीवनवृत्तांत-लेखनाचा हेतु आहे. या निवेदनांत कांहीं सुप्रसिद्ध साहित्यिकाप्रमाणेंच कांहीं अप्रसिद्ध व केवळ साहित्यप्रेमी व्यक्तींचाही उल्लेख आला आहे. याचें कारण म्हणजे अशा व्यक्ती मला प्रिय आहेत आणि यामुळें माझ्या वाङ्मयीन जीवनांत त्यांना निश्चित स्थान आहे.

माझ्या वाङ्मयीन जीवनाची सुरवात सामान्यतः सन १९११ च्या आरंभीं झाली. माझ्यामधील लेखनगुण अनुवंशिक आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण माझे वडील चुलते अगर कोणीही पूर्वज गद्य अगर पद्य लेखन करणारे होते असें माझ्या ऐकिवांत नाहीं. मात्र माझ्या लहानपणीं म्हणजे माझ्या वयाचीं सहा ते दहा वर्षें या काळात कै. नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल यांचा मुक्काम हरीपूर येथील आमच्या घरीं होता व त्यांचें जेवणखाणही आमचे घरींच होतें. देवल हे आमच्या घरांतील श्रीगोपालकृष्णाचे देवाल्याच्या माडीवर राहत होते. यामुळें त्यांचा निकट सहवास या चार वर्षांत मला लाभला होता. वाङ्मय म्हणजे काय हें कळण्याचें माझें वय त्यावेळीं मुळींच नव्हतें. पण देवलांच्या सहवासाचे कांहीं अज्ञात संस्कार माझ्या बालमनावर झाले असण्याचा संभव आहे. आज उध्वस्त खेडें झालेलें माझें जन्मग्राम हरीपूर, माझ्या लहानपणीं एक संपन्न, समृद्ध व निसर्गसुंदर गांव होतें. संगमनाथाच्या देवालयात सांजसकाळ होणारा गंभीर घंटानाद व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांच्या घरांघरातून ऐकू येणारा मंत्रघोष हरीपूरच्या वातावरणांत तेव्हां दुमदुमत होता. या सुंदर वातावरणाचे संस्कारही माझ्या मनावर झाले असण्याचा संभव आहे. ज्या सुंदर वातावरणात देवलांना नाट्यलेखनाची स्फूर्ति झाली त्या वातावरणानें माझेंही मन काव्यप्रवण केलें असेल.

## पहिले परिचित साहित्यिक

वाङ्मय म्हणजे काय हें कळूं लागल्यानंतर मला भेटलेले पहिले साहित्यिक म्हणजे कोरेगांवचे सुप्रसिद्ध लेखक श्रीयुत नारायण हरी आपटे हे होत. त्यांची व माझी भेट सन १९११ च्या प्रारंभीं झाली असावी. त्यावेळीं मी सांगली हायस्कुलांत इंग्रजी सातव्या इयत्तेंत शिकत होतों व शिक्षणासाठीं रोज हरीपुराहून सांगलीस जात होतों. पुढें रविकिरणमंडळाचे सदस्य झालेले श्रीयुत द. ल. गोखले हे मूळचे हरीपूरचे रहिवासी असून त्यावेळीं हरीपुरच्या शाळेंत इंग्रजी शिक्षण घेत होते. ते व त्यांच्या मातोश्री हरीपुरास आमच्या घराच्या मागील बाजूस राहत होते व नारायणराव त्यांच्याकडे कांहीं दिवस रहावयास आले होते. त्यांची 'अजिंक्यतारा' ही कादंबरी त्यावेळीं प्रसिद्ध झाली होती व 'कर्मगति' ही कादंबरी खानापुरच्या 'लोकमित्र' मासिकांत क्रमशः येत होती. त्यांच्या कांहीं गोष्टीही प्रसिद्ध झाल्या होत्या. हें सर्व लिखाण वाचून मलाही कांहींतरी लिहावें असें वाटूं लागलें. मी रोज सायंकाळीं आमची गाय घेऊन सरकारी कुरणाकडे जात असे व नारायणरावही केव्हांकेव्हां माझ्याबरोबर असत. ते मला सांगत असत कीं, "देणगी, उसनवारी, कर्ज, यांपैकीं कोणत्याही मार्गानें पैसे जमव पण उच्च शिक्षण घे." ईश्वरी कृपेनें मला पुढें मिरजमळा संस्थानातून शिष्यवृत्ति मिळाली व मी उच्च शिक्षण घेऊं शकलों म्हणूनच आजचे दिवस मी पाहत आहें. यामुळें नारायणरावांच्या तेव्हांच्या बहुमोल उपदेशाचें स्मरण मला वारंवार होतें. नारायणरावांची गोष्टी सांगण्याची पद्धत मोठी चटकदार होती. उत्तर हिंदुस्थानांतील जयपूर विभागांत स्वतः केलेल्या प्रवासाचीं वर्णनें ते करूं लागले कीं ऐकतांना आम्ही रंगून जात असूं. श्री. आपटे यांच्या कादंबऱ्या व गोष्टी वाचून मी व माझे मित्र श्रीयुत गुरुनाथ गोविंद तोरो यांनीं 'कलियुग' नांवाच्या कादंबरीचा आराखडा तयार केला व या कादंबरीचें पहिलें प्रकरण मीं लिहूनही टाकलें. या प्रकरणाचें नांव 'जुगाराचा अड्डा.' हरीपूर हा त्यावेळीं सुखवस्तूंचा गांव होता. बहुतेक ब्राह्मणमंडळी अल्पसंतुष्ट पण खाऊन पिऊन सुखी होती व सामान्यतः निरुद्योगीही होती. हरीपुरास त्यावेळीं पत्यावर पैसे लावून जुगार खेळण्याचें बंड फार होतें. वडीलधारी

मंडळी पैसे लावून खेळतच पण आम्ही शाळकरी मुलेंही पत्यावर पेन्सिलीचे तुकडे अगर कोऱ्या कागदाचे चौरस लावून खेळत असू. माझे एक चुलत-चुलते व त्यांचे मित्र आमच्या घरीच कधीकधीं हा जुगार खेळत असत. 'जुगाराचा अड्डा' या माझ्या कादंबरीच्या पहिल्या प्रकरणांत जुगार खेळणारे माझे चुलते व त्यांचे मित्र यांची यादी नावनिशीवार आली होती. कादंबरींत अगर गोष्टींत परिचित व्यक्तींचा नामनिर्देश सहसा करावयाचा नसतो हें लेखनतंत्र त्यावेळीं मला माहित नव्हतें. कोणीतरी याबद्दल माझ्या चुलत्याकडे चुगली केली आणि त्यांनीं कादंबरीचें पहिलें प्रकरण माझ्याकडून मागून घेऊन वाचलें. आपल्या नांवाचा उल्लेख जुगारी म्हणून झाल्याचें पाहून माझे चुलते व त्यांचे स्नेही यांनीं मला चांगलेंच फाइलावर घेतलें आणि मीं लिहिलेल्या प्रकरणाचे फाडून तुकडेतुकडे करून त्यांनीं ते माझ्या समक्ष चुलींत टाकले, आणि तेथेंच माझ्या कादंबरीलेखनाची इतिश्री झाली! माझ्या लेखनाची सुरवात कादंबरीच्या प्रकरणानें झाली होती आणि आपलें पुढील सर्व आयुष्य परमार्थचिंतनात विरक्तवृत्तीनें घालविणारे श्री. तोरो या कादंबरीलेखनांत माझे सहकारी होते, ही गोष्ट आज कोणाला खरीही वाटणार नाहीं. पण ही वस्तुस्थिति आहे. श्री. आपटे यांच्या व माझ्या गांठीभेटी गेल्या चाळीस वर्षांत फारशा झाल्या नाहींत; पण समाजाचें कल्याण अहर्निश नजरेपुढें ठेवून तळमळीनें लिहिणारे एक ज्येष्ठ व ध्येयवादी लेखक या नात्यानें त्यांच्याबद्दल मला नितांत आदर वाटतो.

सन १९११ च्या अखेरीस मी स्कूल फायनल ही नोकरीची परीक्षा पास झालों. घरच्या निकृष्ट आर्थिक परिस्थितीमुळें मला नोकरी करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. म्हणून मीं नोकरीसाठीं ठिकठिकाणच्या पोष्ट-खात्यांत अर्ज केले व नाशिक, सातारा व बेळगांव येथून मला नोकरीवर रुजू होण्याबद्दल हुकूमही आले. पण एवढ्या लहान वयात मीं नोकरी करावी ही गोष्ट सांगली हायस्कूलचे त्यावेळचे मुख्याध्यापक कै. वासूनाना खाडिलकर यांना मान्य झाली नाहीं. त्यांनीं व गुरुवर्य कै. देवधरशास्त्री यांनीं पुन्हां एक वर्ष अभ्यास करून मॅट्रिकचे परीक्षेस बसण्याचा मला सल्ला दिला. श्री. खाडिलकर मला म्हणाले, "मॅट्रिक झालास तर पुढील शिक्षण घेणेचा

मार्ग मोकळा होईल. मदत मिळाली तर उच्च शिक्षण घे. नाहींतर पोस्टांतील नोकरी केव्हाही आहेच." या उपदेशाप्रमाणें मी सन १९१२ सालांत मॅट्रिकचा विद्यार्थी म्हणून पुन्हां सांगली हायस्कुलांत जाऊं लागलों.

## पहिली कविता

माझ्या काव्यलेखनाचा प्रारंभ सन १९१२ मध्यें झाला. कवितेची पहिली ओळ ज्या प्रसगानें मला सुचली तो मोठा गमतीदार आहे. कै. केशवराव भोसले यांची ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी त्यावेळीं सांगलीस सदासुख थिएटरांत खेळ करीत होती. माझे एक आप्त कै. वामन नारायण जोशी हे या कंपनीच्या साहाय्यकांपैकीं एक होते व ते त्यावेळीं हरीपूर येथें आमचे घरांत राहत होते. त्यांचेकडे केशवराव भोसले व कंपनींतील इतर मंडळी वारवार येत असत. यामुळें केशवरावांच्या नाटकांना मला मुक्तद्वार होतें. नाटकें पाहण्याची हौस मला लहानपणापासून आहे. यामुळें केशवरावांचें एकही नाटक मी सोडीत नसे. एकदां सौभद्र नाटकाला मी गेलों होतों. सुभद्रेची भूमिका केशवरावांनीं केली होती व त्यांचे वडील बंधु दत्तोबा अर्जुन झाले होते. दत्तोबाचा आवाज, गायन व अभिनय बेताचेच होते, पण कोणतेंही काम ते दडपून नेत असत. त्या रात्रीं त्यांनीं गायिलेलें "कांते फार तुला मजसाठीं श्रम सखये पडले" हें अर्जुनाचें पद मला आवडलें. तें गुणगुणत नाटक संपल्यावर मी व माझा एक मित्र सांगलीहून हरीपुरास जात होतों. चांदणें सुंदर पडलें होतें व हरीपुराकडे जाणारा कृष्णेचा प्रवाह माझ्या उजव्या बाजूकडे चांदण्यात चमकत होता. मीं सहज उद्गार काढले;

"देवी, फार अम्हांसाठि तुला श्रम कृष्णे! पडले"

मीं लिहिलेली कवितेची ही पहिली ओळ. नंतर ही कविता पुरी झाली तींत महाबळेश्वरापासून बंगालच्या उपसागरापर्यंत सर्व भूगोल आलेला होता. माझी ही पहिली कविता कोठेंच छापून आली नाहीं. त्यानंतरच्या दोन तीन महिन्यांत मीं आणखी एक दोन कविता लिहिल्या व माझे त्यावेळचे वर्गबंधु श्री. बापूराव सोमण यांनीं त्या दुरुस्त करून दिल्या. त्यांही

कविता कोठें छापून आल्या नाहींत. श्री. सोमण यांना मनोरंजन, करमणूक, लोकमित्र वगैरे नियतकालिकांची व मराठी वाङमयाची बरीच माहिती होती. यामुळें कवितांच्या बाबतींत साहजिकपणेंच ते माझे मार्गदर्शक होते. शिक्षणासाठीं रोज हरीपुराहून सांगलीस खेपा घालणारा मी एक खेडवळ विद्यार्थी होतों. नवनीत हा त्यावेळीं मला माहीत असलेला महत्त्वाचा काव्यग्रंथ होता. व सांगली हेंच त्यावेळीं मला माहीत असलेलें मोठें शहर होतें. लवकरच 'फुलाची विनति' ही नवीन कविता मीं लिहिली. हरीपूर येथील आमच्या घराच्या आंगणात एक जाईचा वेल होता व त्यावरील फुलाला उद्देशून ही कविता होती. हा जाईचा वेल आजही आमचे आंगणांत आहे. हरीपुरास श्रावणांतील प्रत्येक सोमवारीं जत्रा भरते. कै. नाट्याचार्य देवल हे एकाद्या श्रावणी सोमवारीं सुद्दाम हरीपुरास येत व आम्हांला खाऊसाठीं पैसे देत असत. अशा एका सोमवारीं देवल आले असतांना मी 'फुलाची विनति' ही कविता त्यांना दाखविली व ती त्यांना आवडली. आनंदाचे संपादक कै. वासुदेवराव आपटे यांचे स्नेही हरीपुरचे कै. तैलंग मास्तर त्यावेळीं हरीपुरास आले होते. देवलांनीं माझी कविता त्यांचेकडे दिली व आनंद मासिकाकडे ती देण्यास सांगितलें. सन १९१२ च्या अखेरीस केव्हांतरी ही कविता आनंद मासिकात प्रसिद्ध झाली. नियतकालिकात प्रसिद्ध झालेली 'फुलाची विनति' हीच माझी पहिली कविता होय. 'काव्यविहार' या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहात ही कविता पहिल्या क्रमांकास छापली आहे. सन १९१२ च्या अखेरीस मी मॅट्रिकची परीक्षा चांगल्या रीतीनें पास झालों; आणि मिरजमळा संस्थानचे अधिपति कै. माधवराव बाबासाहेब पटवर्धन यांच्या उदार मदतीनें सन १९१३ च्या जानेवारी महिन्यांत कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजांत पहिल्या वर्षाचा विद्यार्थी म्हणून नाव दाखल केलें.

—*—

प्रकरण २ रें

# महाविद्यालयीन जीवन

सन १९१३ व १९१४ या दोन वर्षांत मी राजाराम कॉलेजांत विद्यार्थी होतों. तेव्हांचें कोल्हापूर आजच्या मानानें मागासलेलेंच होतें. डार्बी या नांवाचे एक युरोपियन पाद्री आमचे प्रिन्सिपाल होते. कै. प्रा. आपटे व प्रा. दस्तुर यांच्याशिवाय आम्हांस शिकविणारे प्राध्यापक राजाराम हायस्कुलांतील शिक्षकच होते. राजाराम कॉलेज त्यावेळीं गावातच राजाराम हायस्कूलच्या इमारतींत भरत होतें. यामुळें कॉलेजचें खुलें वातावरण मला त्यावेळीं मिळालेंच नाहीं. या सर्व परिस्थितीमुळें कोल्हापुरातील माझीं दोन वर्षें माझ्या काव्यलेखनास मुळींच पोषक ठरलीं नाहींत. १९१४ सालीं इंटरच्या वर्गांत असताना 'इंद्रधनुष्य' नावाची एक कविता मीं लिहिली, ती राजारामियनच्या एका अंकांत प्रसिद्धही झाली होती. बाणभट्टाच्या कादंबरीचा अभ्यास मी त्यावेळीं करीत होतों, म्हणूनच कीं काय, 'इंद्रधनुष्य' या कवितेची भाषा संस्कृतप्रचुर असून कवितेंतील कल्पनांवरही बाणभट्टाची दाट छाप आहे. या कवितेंतील

" नीलवर्णनभसरःसलिलगत शत कमलें फुललीं "

ही एकच ओळ या दृष्टीनें पाहण्यासारखी आहे. सन १९१४ च्या डिसेंबर महिन्यात मी इंटरची परीक्षा पास झालों आणि बी. ए. च्या अभ्यासासाठीं सन १९१५ च्या जानेवारींत पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजांत नांव दाखल केलें.

आमचें कॉलेज जानेवारींत सुरू झालें तरी अभ्यास मात्र नियमितपणें सुरू झाले नाहींत. कारण १९१४ सालीं झालेल्या सर्व परीक्षात अयशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसाठीं सन १९१५ च्या मार्चमध्यें एक पुरवणी परीक्षा घेतली जाणार होती आणि त्यानंतर जूनपासून कॉलेजचे सर्व वर्ग नियमित-पणें सुरू होणार होते. सन १९१५ च्या जानेवारी ते मार्च या महिन्यात मी पुणें गावातच शनिवार पेठेंत श्री. तैलंग मास्तर यांचे घरीं राहिलों होतों. सन १९१५ च्या जूनपासून मी गांवाबाहेर आवटे यांच्या बंगल्यातील खोलींत राहूं लागलों. फर्ग्युसन कॉलेजांत गेल्यापासून माझ्या वाङ्मयीन जीवनाला खरीखुरी सुरवात झाली आणि माझ्या भोंवतींचें जग खूपच विस्तारलें. माझ्या वाङ्मयीन जीवनात प्रारंभापासून माझे साहाय्यक असलेले बेळगावचे डॉ. साठे यांचा निकट परिचय मला याच काळांत झाला. वर्षारंभीं गावात व नंतर गांवाबाहेर मी राहत असतांना साठे व मी एकत्रच होतों. माझे मित्र श्री. वि. स. खांडेकर यांनीं स्फूर्तिलहरीच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें मी होतों त्या काळात फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी असणें ही एक भाग्याची गोष्ट होती. महाराष्ट्राच्या बुद्धिमत्तेची ध्वजा इंग्लंडांत फडकविणारे रॅंग्लर रघुनाथराव परांजपे आमच्या कॉलेजचे प्रिन्सिपाल होते. जर्मनींत राहून संस्कृत भाषेचा अभ्यास करून तेथील Ph D पदवी मिळविणारे विद्वान् प्रा. डॉ. गुणे हे आमचे संस्कृतचे प्राध्यापक होते. विद्वान्, रसिक व साहित्यप्रेमी प्रा. वासुदेवराव पटवर्धन हे इंग्रजीचे प्राध्यापक होते व प्रा. माटे व प्रा. रा. द. रानडे हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. बी. ए.साठीं इंग्रजी व संस्कृत हे माझे ऐच्छिक विषय असल्यानें डॉ. गुणे व प्रा. पटवर्धन यांचा मी विद्यार्थीच होतों. पण विद्यार्थ्यांपेक्षा एक नवोदित कविता लेखक

म्हणूनच मी त्याना अधिक परिचित होतों. या दोघां प्राध्यापकांनीं माझ्या काव्यलेखनाला बहुमोल साहाय्य केलें.

## कै. प्रा. डॉ. पां. दा. गुणे

डॉ. गुणे हे अत्यंत प्रेमळ, रसिक व साहित्यप्रेमी गृहस्थ होते. फुलें आणि मुलें याची त्यांना अतिशय आवड होती. मी राहत असलेल्या आवटे यांच्या बगल्याजवळच डॉ. गुणे यांचा बगला होता. सकाळीं अगर सायकाळीं मी त्यांच्याकडे गेलों तर ते बगल्यासमोरील लहानशा बागेंत तरी हिंडत असावयाचे अगर आपली कन्या मधू (डॉ. मधुमालती गुणे) हिच्याबरोबर विनोद तरी करीत असावयाचे. माझ्या कविता कॉलेजच्या त्रैमासिकांत येऊ लागतांच त्यानीं मला मुद्दाम बोलावून विचारपूस केली. कांहीं जर्मन कवींच्या काव्यांतील रम्य कल्पना त्यानीं मला समजावून दिल्या. मनोरजनच्या पहिल्या पानावर माझी 'हंसणारी कलिका' कविता पाहतांच मुद्दाम माझ्या खोलींत येऊन त्यानीं माझी पाठ थोपटली. डॉ. गुणे हे मासिक मनोरजनचे लेखक होते व मराठी कवितेचे मार्मिक टीकाकार होते. केशवसुतांच्या कवितेवर त्याचा एक उत्कृष्ट टीकालेख मनोरजनात नतर प्रसिद्ध झाला होता. १९२२ सालीं सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात मराठीचा प्राध्यापक म्हणून माझी झालेली नेमणूक त्यांच्याच शिफारसीमुळें झाली होती. डॉ. गुणे माझ्या 'काव्यविहार' या पहिल्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिणार होते. त्यातील कवितांची निवड व कांहीं दुरुस्त्याही त्यानींच केल्या होत्या, पण त्यांच्या आकस्मिक निधनामुळें हें घडून आलें नाहीं.

## कै. प्रा. वा. ब. पटवर्धन

प्रा. वासुदेवराव पटवर्धन हेही एक नामवत मराठी लेखक, टीकाकार व प्राध्यापक होते. 'सारेंच विलक्षण' नांवाची त्यांची एक कादंबरी त्या सुमारास मनोरजनात क्रमशः प्रसिद्ध होत होती. या कादंबरींत वर्णन केलेली परिस्थिति महाराष्ट्रांतील एका संस्थानाला थोडीफार लागू पडत असल्यानें

महाराष्ट्रात त्यावेळीं थोडी खळबळ उडाली होती. कवि ‘वसंत’ या नांवानें त्यांनीं कांहीं सुंदर कविताही लिहिल्या होत्या. ताजमहालवर त्यांनीं लिहिलेली कविता प्रसिद्ध आहे. मराठी कवितेचे ते मार्मिक टीकाकार होते. ‘काव्य आणि काव्योदय’ हा त्यांचा प्रबंध सुप्रसिद्ध आहे. कै. कविवर्य केशवसुत यांचे ते स्नेही होते. पटवर्धनांना उद्देशून केशवसुतांनीं लिहिलेली एक कविता प्रसिद्ध आहे. प्रा. पटवर्धन हे इंग्रजीचे उत्कृष्ट शिक्षक होते. सौंदर्यवादी इंग्रजी कवींची कविता व शेक्सपियरचीं नाटकें शिकविण्यांत त्यांचा हातखंडा होता. Palgrave's Golden Treasury Book IV मधील शेली, बायरन, वर्डस्वर्थ, कीट्स वगैरे कवींच्या कविता ते तन्मयतेनें शिकवूं लागले म्हणजे तास केव्हां संपला याचें भानही विद्यार्थ्यांना राहत नसे. शेक्सपिअरचें मॅकबेथ हें नाटक शिकवितांना त्यांच्या अभिनयामुळें व मुद्रेवरील भावदर्शनामुळें प्रवेशाचें मर्म सहज लक्षात येत असे. आगरकरांची बुद्धिवादी विचारसरणी ततोतंत आचरणात आणणारे प्रा. पटवर्धन, राहणीनें अगदीं साधे होते. मर्यादित अल्प वेतन व घरची सामान्य परिस्थिति यांमुळें दिवसांतून तीन वेळां सूट बदलणें त्यांना शक्यच नव्हतें. फिकट निळ्या अगर राखी सुती कापडाचा सूट घालून सायकलवरून रोज गांवांतून कॉलेजला येणारी, पिकलेल्या केंसांची व मिशांची त्यांची सदा हसतमुख पगडीधारी मूर्ति मला आजही नजरेसमोर दिसत आहे. फर्ग्युसन कॉलेज सोडल्यावर माझी कविता केशवसुतसांप्रदायी झाली, याला केशवसुतांच्या कवितेचा सूक्ष्म अभ्यास जसा कारणीभूत होता त्याचप्रमाणें प्रा. पटवर्धन यांची शिकवण व मार्गदर्शन हीहि कारणीभूत होती, असें मला वाटतें.

## कै प्रि. गो. चि. भाटे

प्रा. गोविंद चिमणाजी भाटे यांचा परिचय मला याच काळांत झाला होता. प्रा. भाटे हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असले तरी साहित्यप्रेमी व प्रेमळ होते. मासिक मनोरंजनचे ते एक लेखक होते. माझ्या कविता मनोरंजनांत येऊं लागतांच त्यांनीं मला अगत्यपूर्वक बोलावून उत्तेजन दिलें होतें. माझा ‘काव्यविहार’ हा संग्रह प्रसिद्ध होतेवेळीं त्यांतील कविता अगत्यपूर्वक

वाचून त्यांनीं दिलेला अभिप्राय त्या संग्रहांत समाविष्ट आहे. रँग्लर परांजपे, प्रा. डॉ. गुणे, प्रा. भाटे व प्रा. रानडे यांना भरपूर पगाराची सरकारी नोकरी मिळणें त्याकाळीं सहज शक्य होतें. ती न स्वीकारता कमी पगारावर हे सर्व विद्वान् डे. ए. सोसायटीचे तहहयात सभासद झाले हा त्यांचा अपूर्व स्वार्थत्याग होता. अलीकडे इतर वस्तूंची महगता झाली असली तरी स्वार्थत्याग हा शब्द स्वस्त झाला आहे ! अंगीं पात्रता नसतांना केवळ तंत्र आणि वशिला यांच्या जोरावर एकाद्या संस्थेंत तहहयात सभासद झालेले एकादे गृहस्थ स्वार्थत्यागाच्या गप्पा मारतांना ऐकले म्हणजे हसू येतें !

सन १९१५ च्या जूनपासून मी गावाबाहेरील आवटे यांच्या बंगल्यांत राहू लागल्यावर माझे मित्र श्री. वि. स. खांडेकर व श्री. बन्याबापू कमतनूरकर हे माझ्या समोरच्याच खोलींत राहत होते. पण आपण एक हरीपुरचे खेडवळ विद्यार्थी हा न्यूनगंड त्यावेळीं माझ्या मनात असल्यानें या दोघांचा व माझा दृढ परिचय होऊ शकला नाहीं. पुढें तो कारणपरत्वें झाला व वाढलाही.

## एक तेजस्वी तारका

याच काळांत एका आकाशस्थ तेजस्वी तारकेनें माझें लक्ष वेधून घेतलें. माझ्यासारख्या एका खेडवळ विद्यार्थ्यानें एका आकाशस्थ तारकेचा ध्यास घेणें हा केवळ वेडेपणा होता; पण मी तेव्हां होतों त्या वयांत सर्व-जणच वेडे असतात ! कोणाचें वेड शब्दांत व्यक्त होतें व कोणाचें अव्यक्त राहतें इतकेंच. या वेडाचा माझ्या काव्यलेखनावर मात्र इष्ट परिणाम झाला, तो म्हणजे कॉलेजच्या त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकांत माझी कविता आलीच पाहिजे असा मीं निश्चय केला व अखेरपर्यंत तो निष्ठेनें पाळला. कॉलेजच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेल्या माझ्या बहुतेक कविता उत्कट प्रेमाच्या अगर प्रेमभंगाच्या आहेत. त्रैमासिकाचे तेव्हाचे संपादक प्रा. द्रवीड यानीं एकदां मला विचारलें, "काय हो ! तुमचा प्रेमभंग झाला आहे काय ?" मीं अर्थात्च नकारार्थी उत्तर दिलें. कारण माझा प्रेमभंग खरोखरच झाला नव्हता. माझें वेडच मुळीं एकांगी व त्या तारकेला अज्ञात होतें, तर प्रेमभंग होणार कसा ? त्या तारकेचा मला लागलेला ध्यास

म्हणजे एक वेडी पण उत्कट भावना होती. अखेरपर्यंत ती मनांतच राहिली व शेवटीं विरून गेली. या काळांतील माझ्या सर्वच कविता प्रेमविषयक होत्या याचें कारण मीं वर उल्लेखिलेलें वेड आणि त्यावेळीं माझ्याकडून घडलेला इंग्रजी कवितांचा अभ्यास हें होतें. इंग्रजीसाठीं त्यावेळीं बायरन् कवीच्या Child Harold चा चवथा सर्ग व Palgrave's Golden Treasury Book IV हीं पुस्तकें नेमलेलीं होतीं. Golden Treasury मधील बायरन्, कीट्स्, शेली, वर्ड्स्वर्थ वगैरे कवींच्या सुंदर काव्याचा परिणाम माझ्या मनावर झाला फर्ग्युसन कॉलेजांत त्यावेळीं मायदेव, अत्रे, चौधरी, सात्राळकर वगैरे नवोदित कवी होते, व या सर्वांच्या कविता कॉलेजच्या त्रैमासिकांत येत होत्या. यापैकीं अत्रे व मायदेव यानीं साहित्यक्षेत्रात पुढे नांव मिळविलें व इतरांची कविता तेथेंच अंतर्धान पावली.

## नाट्याचार्य देवलांचें मार्गदर्शन

सन १९१५ च्या जुलई ऑगस्टच्या सुमारास माझ्या दृष्टीनें माझ्या काव्यावर परिणाम करणारी एक घटना घडून आली. सुप्रसिद्ध गंधर्व संगीत नाटक मंडळीचा मुक्काम त्यावेळीं पुण्यात होता व किर्लोस्कर थिएटरासमोरील तपकीर गल्लींत कंपनीचें बिऱ्हाड होतें. नाट्याचार्य देवल कंपनींतील नटांना अभिनयाचें शिक्षण देण्यासाठीं कंपनींत आले आहेत असें कळतांच मी एका सकाळीं गंधर्व कंपनीच्या बिऱ्हाडीं जाऊन देवलांना भेटलों. देवल त्यावेळीं कांहीं नाट्यविषयक चर्चा करीत बसले होते व एक तरुण गृहस्थ त्यांच्याशीं बोलत होते. थोडेसें औपचारिक बोलून मीं माझ्या कविता लिहिलेली वही देवलांना वाचावयास दिली. वहींत पांच सातच कविता होत्या. त्यांतील 'इंद्रधनुष्य' व 'चंद्रोदय' या कविता देवलानीं संपूर्ण वाचल्या. 'इंद्रधनुष्य' कवितेंतील "नीलवर्णनभसरः-सलिलगत शत कमलें फुललीं" व 'चंद्रोदय' कवितेंतील "अमररमणी-पादतलहत म्हणुनि विहरे गगनिं हा." या ओळी वाचून देवल हसून म्हणाले, "तू मराठी कविता लिहितोस कीं संस्कृत? केवढे लांबलांब समास घातले आहेस? कविता लिहायची तर सुबोध मराठी कविता लिहीत जा.

अवघड संस्कृत शब्द कवितेंत सहसा येऊं देऊं नको." नंतर समोरच्या गृहस्थास उद्देशून देवल म्हणाले, "हा आमच्या गावचा मुलगा. इथें कॉलेजात शिकतो आहे आणि कविता करतो. गडकऱ्यांनीं कवितांच्या व नाटकांच्या नादीं लागून शिक्षण सोडलें. तसेंच हाही करील कदाचित्." नंतर मला उद्देशून देवल म्हणाले, "शिक्षण संपेपर्यंत कवितांच्या मुळींच नादीं लागू नको. नाहींतर अभ्यासाचें खोबरें होईल. तुझी कवितांची वही माझ्याकडेच राहू दे" असें म्हणून माझी वही ठेवून घेऊन देवलांनीं मला निरोप दिला. घरीं जातांच मला तोंडपाठ असलेल्या सर्व कविता मीं पुन्हां दुसऱ्या वहींत लिहिल्या. मात्र देवलांचा कवितेच्या भाषेबद्दलचा उपदेश मीं निष्ठेनें पाळला. देवलासारखी सुबोध व प्रासादिक काव्यरचना करणें हें मीं माझें ध्येय ठरविलें व प्रसंगीं गद्यांत शिरण्याचा धोका पत्करूनही मीं तें आजवर पाळलें आहे.

१९१५ सालीं मी व माझे मित्र श्री. साठे आवटे यांच्या बंगल्यांत एकाच खोलींत राहत होतों. सन १९१६ च्या जूनपासून ते कॉलेजच्या वसतिगृहात राहावयास गेले. तरी त्यांची व माझी भेट रोज नियमानें होत असे व आम्ही काव्यविषयक खूप चर्चा करीत असू. माझ्या वाङ्मयीन जीवनांत डॉ. साठे याना महत्त्वाचें स्थान आहे. फर्ग्युसन कॉलेजांत असताना साठे यांनीं मला वारंवार सुचविलें होतें कीं, कॉलेजांत असेतोपर्यंत मीं माझ्या निवडक कविता मनोरंजन, नवयुग, चित्रमयजगत् वगैरे प्रमुख मासिकांत पाठवाव्यात. कदाचित् त्या साभार परत आल्या तरी मी विद्यार्थी असल्यानें मला त्याचें विशेष वाटणार नाहीं. पण मीं ही त्यांची सूचना मनावर घेतली नव्हती. सन १९१६ च्या ऑगस्टांत 'हसणारी कालिका' नांवाची एक कविता मीं लिहिली व ती श्री. साठे याना पहावयास दिली. मात्र ती माझी कविता म्हणून न सांगतां एका मित्रानें अभिप्रायार्थ दिलेली कविता असल्याचें सांगितलें. दुसरे दिवशीं साठे मजकडे येऊन मला म्हणाले, "कविता सुंदर आहे पण ती खात्रीनें तुझीच आहे. ती तू कोठें देणार आहेस?" मी म्हणालों, "कॉलेजच्या त्रैमासिकाच्या पुढील अंकासाठीं देईन." माझें उत्तर ऐकून साठे ती कविता आपल्याबरोबर घेऊन गेले.

ऑक्टोबरची सुटी होतांच मी नेहमींप्रमाणें हरीपुरास गेलों व सायन्सच्या प्रॅक्टिकलसाठीं श्री. साठे तेथेंच राहिले. याच वेळीं माझ्या कवितेच्या बाबतींत त्यांनीं एक धाडस केलें. 'हसणारी कलिका' या कवितेची एक नक्कल करून त्यांनीं ती पत्रासोबत मासिक मनोरंजनच्या संपादकांकडे मुंबईस पाठविली व पत्राचें उत्तर स्वतःच्या पत्त्यावर मागविलें. हेतु हा कीं, कविता साभार परत आली तर त्याबद्दल मला कळवूच नये. आठ दिवसांनीं मनोरंजनच्या संपादकांचें पत्र साठे यांना आलें त्यांत कविता चांगली असून ती स्वीकारल्याचें संपादकांनीं कळविलें होतें. श्री. साठे यांनीं तें पत्र तात्काळ हरीपुरास मजकडे पाठविलें. तें पत्र वाचून माझा आनंद गगनात मावेना! मनोरंजन हें त्या काळीं नामवंत व उच्च दर्जाचें मराठी मासिक होतें. गोविंदाग्रज, बालकवि, रेव्ह. टिळक, रेंदाळकर वगैरे पहिल्या दर्जाच्या कवींच्या कविताच या मासिकात येत असत. अशा मासिकांत मला प्रवेश मिळाल्यानें मला साहजिकच समाधान वाटलें. त्याच आठवड्यांत मी 'कृष्णाकांठीं', 'आशा निराशा', 'तरंग' या तीन कविता लिहून मनोरंजनकडे पाठविल्या व त्या सर्व स्वीकारल्या जाऊन मनोरंजनांत लागोपाठ प्रसिद्ध झाल्या. सन १९१६ च्या ऑक्टोबरांत मी मुंबईस गेलों असतां मनोरंजनच्या कचेरींत जाऊन संपादक श्री. काशिनाथ रघुनाथ मित्र यांना भेटलों. त्यांनीं माझें मनःपूर्वक स्वागत करून माझी 'हसणारी कलिका' ही कविता मनोरंजनच्या नवंबरच्या अंकात पहिल्या पानावर छापली होती तें मुद्रित मला दाखविलें. "तुम्ही व अत्रे यांच्या कविताना आम्ही मनोरंजनात यापुढें स्थान देणार आहोंत" असें मित्रांनीं मला सांगितलें. माझी आठवण बरोबर असेल तर आचार्य अत्रे याची 'चांदणी' ही कविता केशवकुमार या टोपण नावानें याच सुमारास मनोरंजनांत आली होती. 'डी. व्ही. गद्रे' या नांवानें मी त्यावेळीं कविता प्रसिद्ध करीत असे व याच नांवानें सन १९१७ च्या जूनपर्यंत माझ्या सर्व कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. ता. १० नवंबरला आमचें कॉलेज सुरू झालें व मनोरंजनचा अंक त्याच वेळा बाहेर पडला. त्यांतील पहिल्या पानावरील माझी कविता पाहून डॉ. गुणे यांनीं मुद्दाम माझ्या खोलींत येऊन माझें अभिनंदन केलें. मनोरंजनांत नवोदित कवींना सहज प्रवेश नव्हता व पहिल्या पानावर बहुधा गोविंदाग्रजांचीच सुंदर छोटी

कविता असे. ती मानाची जागा मला मिळाल्याचें पाहून, माझ्यावर लोभ करणाऱ्या डॉ. गुण्यांना कौतुक वाटणें स्वाभाविक होतें. श्री. बन्याबापू कमतनूरकर यांनींही माझें अभिनंदन केलें आणि त्यांच्या व माझ्या स्नेहाला तेथूनच प्रारंभ झाला.

सन १९१७ च्या जानेवारी महिन्यांत मनोरंजनचे संपादक श्री. मित्र पुण्यास आले असतांना मुद्दाम माझ्या खोलींत येऊन मला भेटले व मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचीं कांहीं पुस्तकें त्यांनीं मला भेट म्हणून दिलीं. महाराष्ट्राच्या प्रमुख ठिकाणीं मधूनमधून दौरा काढून तेथील मनोरंजनच्या जुन्या लेखकांना भेटून लेख मिळविणें व नवोदितांना अगत्यपूर्वक भेटून उत्तेजन देणें हा काशिनाथपंतांचा क्रम होता. त्यास अनुसरूनच ही पुण्याची भेट होती. मित्रांच्या या संग्राहक व अगत्यशील वृत्तीमुळेंच महाराष्ट्रांतील नामवंत कादंबरीकार, कथालेखक, निबंधकार, कवी व चित्रकार यांचें साहाय्य मिळवून मराठी मासिकांत मनोरंजनला पहिलें स्थान ते मिळवू शकले. वामनराव जोशांसारखे कादंबरीकार, गुर्जरांसारखे कथालेखक, गोविंदाग्रज व बालकवि यांच्यासारखे कवी व डॉ. गुणे, प्रा. भाटे व प्रा. पटवर्धन यांच्यासारखे प्राध्यापक लेखक मनोरंजनच्या लेखकवर्गांत होते. सन १९०० ते सन १९२० या काळांत महाराष्ट्रांत ललितवाङ्मयाबद्दल आवड व अभिरुचि उत्पन्न करण्याचें कार्य मित्रांच्या मासिक मनोरंजननें केलें. सन १९०० ते १९२० पर्यंत मराठी वाङ्मयाचा जो कालखंड आहे त्यांतील वाङ्मयीन कार्याचा आढावा घेतांना श्री. काशिनाथपंत मित्र यांच्या मनोरंजनचा व त्यांच्या कर्तबगारीचा अवश्य उल्लेख करावा लागेल. १९२१ सालीं काशिनाथपंतांचें देहावसान झालें. त्यानंतर त्यांचे स्मरणार्थ निघालेल्या मनोरंजनच्या 'मित्रअंकां'त 'मित्रस्मरण' ही माझी कविता आली आहे. काशिनाथपंतांच्या मृत्यूनंतर त्यांचे बंधु श्री. दामोदरपंत व कन्या श्री. मालती मित्र यांनीं सुमारें १० वर्षें मनोरंजन मासिक चालविलें होतें; पण काशिनाथपंतांच्या वेळचा मासिकाचा दर्जा पुढें राहिला नाहीं. मनोरंजन मासिक चालू होतें तोंपर्यंत कवि म्हणून या मासिकाशीं असलेले माझे ऋणानुबंध अबाधित राहिले होते. 'सवाल', 'पूर्वपश्चिम', 'चिमुकल्या संसार',

'एक मागणें', 'हरिणीप्रत', 'मंजुळा' या माझ्या कविता मनोरंजन मासिकातच प्रसिद्ध झाल्या आहेत.

सन १९१७ च्या मार्च महिन्यात मीं फर्ग्युसन कॉलेज सोडलें. तेथील रम्य व खुलें वातावरण, प्रेमळ व प्रोत्साहक प्राध्यापकांचा सहवास, कॉलेजमागील ती निवांत व सुंदर टेकडी, डोईवरील अथांग आकाश व त्या आकाशांतील ती सुंदर तारका या सर्वांचा निरोप घेताना मनाला अतिशय यातना झाल्या. कॉलेजच्या त्रैमासिकाच्या जून १९१७ च्या अंकात माझी 'निरोप' ही कविता आली आहे. त्या कवितेंत माझ्या सर्व भावना व्यक्त झाल्या आहेत. सन १९१७ च्या एप्रिल महिन्यांत 'सांत्वन' नांवाची कविता मीं लिहिली ती मनोरंजनच्या जून अंकात 'काव्यविहारी' या नावानें प्रसिद्ध झाली आहे. 'काव्यविहारी' या नावानें प्रसिद्ध झालेली 'सांत्वन' हीच माझी पहिली कविता होय. काव्यविहारी हें नाव मीं विशेष कोणत्या कारणानें घेतलें, असे मला आजवर अनेकांनीं विचारलें आहे. या बाबतींत मला एवढेंच स्मरतें कीं, यशवंतराव आपटे नावाच्या साहित्याशीं मुळींच संबंध नसलेल्या माझ्या एका परिचिताने मला हें नांव सहज सुचविले व मीं तें स्वीकारलें. 'काव्यविहारी' या नावाचा शोध लावणारे कोलंबस श्री. आपटे हल्लीं सेवानिवृत्त असून, मुंबईजवळील शीव येथील आपल्या बंगल्यात राहतात व मधूनमधून केव्हा भेटले तर माझ्या काव्यनामाचे शोधक आपण असल्याचें मला हसत सांगतात. फर्ग्युसन कॉलेजात असताना मीं फक्त प्रेमाच्या व विरहाच्या कविता लिहिल्या त्याची इतिश्री माझ्या 'सांत्वन' कवितेनें झाली. 'हृदयाचें गान' व 'एवढीच आशा' या माझ्या दोन प्रेमविषयक कविता नंतर मनोरंजनांत प्रसिद्ध झाल्या, त्या याच सुमारास लिहिल्या होत्या असें स्मरतें. मनोरंजनांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या 'सांत्वन' कवितेनें मला त्या काळच्या कवींत निश्चित स्थान मिळवून दिलें. या कवितेचा उल्लेख श्री. वि. स. खांडेकर यांनीं 'स्फूर्तिलहरी' च्या प्रस्तावनेंत अगत्यपूर्वक केला आहे. सन १९१७ च्या जून महिन्यांत मी बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झालों आणि एल्‌एल्. बी. च्या अभ्यासासाठीं मुंबईच्या लॉ कॉलेजात नांव दाखल केलें.

## मुंबईंत

मुंबईस मी सरासरी दोन वर्षे म्हणजे सन १९१९ च्या एप्रिलपर्यंत होतों. या काळांत मी गिरगावांत मोहन बिल्डिंगमधील रस्त्याकडील चाळींत खोली न. ३२ मध्यें माझे चुलते (वडिलांचे आतेभाऊ) कै. बळवंत विनायक लेले मोतीवाले यांचेकडे राहत असे. या खोलींत लेले यांची पेढी होती व त्यांचें राहण्याचें ठिकाण ठाकुरद्वारीं होतें. मी राहत असलेल्या चाळीचा उल्लेख 'चिमुकला संसार' या माझ्या कवितेंत आला आहे. मुंबईच्या मुक्कामांत 'उद्यान' व 'नवयुग' या मासिकांचे संपादक कै. गणेश विठ्ठल कुलकर्णी (कुंभोजकर) यांचा व माझा दृढ परिचय झाला. श्री. कुलकर्णी यांचें शिक्षण विशेष झालें नव्हतें, पण ते एक धडाडीचे संपादक होते. उद्यान मासिक त्यांच्या मालकीचें होतें व नवयुग मासिकाचे ते पगारी संपादक होते. हीं दोन्ही मासिकें मित्राच्या मनोरंजनशीं स्पर्धा करतील इतक्या दर्जाला नेणेचा त्यांचा इरादा होता. मनोरंजनांत माझी 'हसणारी कलिका' ही पहिली कविता येताच श्री. कुलकर्णी यांनीं उद्यानचा खास संक्रांत अंक मजकडे पाठविला होता व पत्रानें उद्यानसाठीं कवितेची मागणी केली होती. मी मुंबईस येतांच त्यांचा परिचय झाला व तो क्रमानें वाढत गेला. आमचें कॉलेज फक्त सायंकाळीं एक तासच असल्यानें सर्व दिवस मला रिकामाच असे. यामुळें गिरगाव बॅकरोडवरील उद्यानच्या कचेरींत मी बहुधा दररोज जात असे. 'परीक्षेचा बळी', 'शुभमंगल सावधान' व 'पहिले दोन सवाल' या माझ्या कविता त्यावेळीं नवयुगांत आलेल्या आहेत. 'केशवसुतांची कविता' हा काव्यसंग्रह कै. हरी नारायण आपटे यांनीं याच सुमारास प्रसिद्ध केला होता. त्यापूर्वी कविवर्य केशवसुत यांच्या स्फुट कविता कोठेंकोठें वाचावयास मिळत. पण हरीभाऊ आपटे यांनीं प्रकाशित केला तोच केशवसुतांच्या कवितांचा पहिला संग्रह होता. या नवीन संग्रहाच्या आधारें मीं केशवसुतांच्या कवितेचा सूक्ष्म अभ्यास केला. प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्या व्याख्यानांनीं समाजसुधारणेकडे व आगरकर संप्रदायाकडे मी यापूर्वीच आकर्षिला गेलों होतों. केशवसुतांची कविता वाचून ही प्रवृत्ति अधिकच बळावली आणि येथून माझ्या कवितेनें

वेगळेंच वळण घेतलें. माझी प्रेमकविता यापूर्वींच संपली होती. तिची जागा आता केशवसुतसांप्रदायी सामाजिक कवितेनें घेतली आणि ही प्रवृत्ति इतकी दृढमूल झाली कीं यानंतर आजतागायत मीं प्रेमकविता लिहिलीच नाहीं. सन १९१७।१८ या दोन वर्षांत मी मुंबईस होतों त्यावेळीं कविश्रेष्ठ गोविंदाग्रज हयात होते, पण नाट्यलेखनाकडेच त्यांचें सर्व लक्ष असल्यानें ते क्वचित्‌च कविता लिहीत. या काळांत मी, आचार्य अत्रे व कवि माधव (माधव केशव काटदरे) एवढेच नवोदित कवी प्रामुख्यानें महाराष्ट्रापुढें होतों. मुंबईस असतांना कवि माधव व कवि विठ्ठल कृष्ण नेरुरकर यांची मला वारंवार भेट होत असे. कवि माधव त्यावेळीं कस्टम खात्यांत नोकरीस असून, गिरगाव बॅकरोडवरील अमृतवाडींत राहत होते. आम्ही उभयता याच रस्त्यावरील बाळा भागवत यांच्या खाणावळींत जेवण घेत असू व सुटीच्या दिवशीं भोजनोत्तर मी माधवाच्या बिऱ्हाडीं गप्पागोष्टी करावयास जात असे. मी मुंबई सोडल्यानंतरच्या काळांत कवि माधव यांनीं वैशिष्ट्य-पूर्ण ऐतिहासिक कविता लिहून आधुनिक मराठी कवींत मानाचें स्थान मिळविलें आहे. प्राचीन भारतवर्षाच्या इतिहासाचा त्यांचा अभ्यासही खोल असून त्या विषयावर त्यांनीं अनेक अभ्यसनीय लेख लिहिलेले आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर माधवराव चिपळुणास राहत असून त्यांची स्फुट कविता अजूनही नियतकालिकांत दिसते. त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचा समारंभ दोन वर्षांपूर्वीं चिपळूण येथें साजरा झाला. कवि माधव यांची व माझी भेट गेल्या तीन तपांत झालेली नाहीं. तथापि आमची पत्रमैत्री अद्याप आहे व आमचे संबंध स्नेहभावाचे आहेत. मी मुंबईस असतांना माझे मित्र राजरत्न वा. वि. जोशी हेही कायद्याच्या अभ्यासासाठीं मुंबईस होते व भागवतांच्या खाणावळींत त्यांची व माझी बहुधा रोज भेट होत असे. मी फर्ग्युसन कॉलेजांत असतांना आवटे यांच्या बंगल्यांत माझ्या समोरच्याच खोलींत जोशी राहत होते व आम्ही दोघेही उदयोन्मुख साहित्यिक असल्यानें आमचा स्नेह जमला होता. मुंबईच्या निवासांत या स्नेहाला दृढता आली. यानंतर लौकरच ते एल्‌एल्. बी. होऊन बडोद्यास वकील म्हणून स्थाइक झाले व त्यांनीं चांगलाच लौकिक मिळविला. याच काळांत कादंबऱ्या, कथा व स्त्रियांच्या कायदेशीर हक्काबद्दल लेख लिहून त्यांनीं लेखक म्हणून चांगल

नाव मिळविलें. हिंदुस्थान सरकारनें हिंदू कायद्याच्या सुधारणेसाठीं नेमलेल्या हिंदू कोड समितीचे ते सभासद होते. त्यांनीं केलेल्या बहुमोल कामगिरीबद्दल ब्रिटिश सरकारनें त्याना 'दिवाणबहादुर' ही पदवी दिली व कै. सयाजीराव महाराजांनीं 'राजरत्न' ही बहुमानाची पदवी देऊन त्याचा गौरव केला. राजरत्न जोशी यांच्या ललित लेखनापेक्षा हिंदू स्त्रियाच्या कायदेशीर हक्कांबद्दल त्यानीं केलेलें विपुल लेखन मोलाचें आहे. सन १९४६ चे सुमारास या भागांत आल्यावेळीं ते मुद्दाम बुधगावास मजकडे आले होते. सुमारें सहा महिन्यांपूर्वी 'वेलणकर वक्तृत्वस्पर्धे'च्या बक्षिससमारभाचे अध्यक्ष म्हणून ते सांगलीस आले असतांना अगत्यपूर्वक माझ्याकडे आले होते. हल्लीं ते पुण्यास स्थाइक झाले आहेत. माझ्या कांहीं जुन्या साहित्यिक मित्रांपैकीं राजरत्न जोशी हे एक आहेत.

मी मुंबईस असतांना आणखी दोन ख्यातनाम कवींचा मला परिचय घडला. हे कवी म्हणजे नागपूरचे श्री. आनदराव कृष्णाजी टेकाडे व कै. कविश्रेष्ठ गोविंदाग्रज हे होत. श्री. टेकाडे यांचे मामा नागपूरचे जमीनदार श्री. तात्याजी गडकरी हे माझ्या चुलत्यांचे स्नेही होते. त्यांच्याकडे टेकाडे आले असतांना त्याचा व माझा परिचय झाला. टेकाडे व मी मराठी काव्याबद्दल खूप बोललों आणि त्यांनीं आपल्या कांहीं लोकप्रिय कविता मला खड्या सुरात गाऊन दाखविल्या. त्याचा आवाज भरदार व सुरेल असून कविता म्हणण्याची पद्धत ठसकेदार होती जाहीर सभांतून कविता गाऊन दाखविणारे टेकाडे हे माझ्या माहितीप्रमाणें पहिलेच मराठी कवि होते. नागपूर, वऱ्हाडकडील कवींपैकीं माझा प्रत्यक्ष परिचय झालेले श्री. आनदराव टेकाडे हे एकच कवि आहेत.

## कै. कविश्रेष्ठ गोविंदाग्रज

महाराष्ट्राचे श्रेष्ठ कवि व नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा व माझा प्रथम परिचय उद्यानचे सपादक श्री. कुलकर्णी यांचे घरीं त्यानींच करून दिला. गडकऱ्यांनीं माझ्या काव्यलेखनाबद्दल आस्थापूर्वक चौकशी

करून मनोरंजन व नवयुग मधील माझ्या कविता आवडल्याचें सांगितलें व त्यावेळीं मुंबईंत असलेल्या गंधर्व संगीत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं मला भेटावयास बोलावलें. त्याप्रमाणें एका रविवारीं सकाळीं ग्रँटरोडवरील कंपनीच्या बिऱ्हाडीं मी त्यांना भेटावयास गेलों. मी गेलों तेव्हां ८-८॥ वाजले होते तरी गडकरी मच्छरदाणींत झोंपलेले होते. माझी चाहूल लागताच ते जागे होऊन उठले व अंगावरील चादर तशीच ठेवून माझ्या समोरून खोलीबाहेर निघून गेले व थोड्याच वेळांत परत आले. आंत येतांच ते मला म्हणाले, "मी सरळ बाहेर गेलेला पाहून तुम्हाला आश्चर्य वाटलें असेल, पण सकाळीं निजून उठताच मी सर्वांआधीं गणपतराव बोडसांना भेटतों व तो सर्व दिवस मला आनंदांत जातो." गडकऱ्यांच्या भाविकपणाबद्दल मीं पुष्कळ गोष्टी ऐकल्या होत्या, यामुळें त्यांच्या या वागणुकीचें मला विशेष आश्चर्य वाटलें नाहीं. गडकऱ्यांचा चेहरा त्यावेळीं कमालीचा फिकट दिसत होता. माझ्या काव्यलेखनाबद्दल त्यांनीं पुन्हा चौकशी केली आणि कविता लिहीत असूनही एल्एल्. बी. पर्यंत मजल मारल्याबद्दल माझें अभिनंदन केलें. उद्यानांत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'गोफ' कवितेची स्तुति करून त्यांचें काव्यलेखन मंदावण्याचें कारण मीं विचारलें. नाट्यलेखनावर भरपूर पैसा मिळवून कोंकणांत आपण शेती खरेदी करणार आहोंत व नंतर पुन्हा काव्य-लेखन करणार आहोंत असें त्यांनीं सांगितलें. गडकरी हे बोलत असतांना भवितव्यतेनें भेसूर हास्य केलें असेल. कारण त्यानंतर त्यांचें क्षयाचें दुखणें बळावत जाऊन ता. २३ जानेवारी सन १९१९ रोजीं शारदेच्या कंठांतील रत्नमालेमधला हा दैदीप्यमान लाल (गडकऱ्यांचें लाडकें नांव लालजी असें होतें) गळून पडला आणि वाङ्मयीन जगांत अंधार पसरला. माझी व गडकऱ्यांची ही पहिली व शेवटचीच भेट ठरली. त्यावेळीं गंधर्व संगीत मंडळी त्यांचें 'एकच प्याला' नाटक बसवीत होती आणि मालाडला स्थापन झालेली बलवंत संगीत नाटक मंडळी त्यांचें भावबंधन नाटक बसवीत होती. गडकरी यांचीं मराठी रंगभूमीवरील हीं अत्यंत यशस्वी नाटकें त्यांच्या मृत्यू-नंतर त्यांच्या स्नेह्यांनीं केलेल्या प्रयासानें नाट्यलोलुप जनतेसमोर यावींत हा दैवदुर्विलास होय. एल्एल्. बी. साठीं मी मुंबईंत असतांना माझे मित्र श्री. साठे डॉक्टरीच्या अभ्यासासाठीं मुंबईस होते. पहिल्या वर्षी ते व मी

एकत्र राहत होतो व पुढल्या वर्षी ते मेडिकल कॉलेजजवळ डायमण्ड लॉज-मध्ये राहत होते. अभ्यासक्रमांतही आम्ही दोघांनीं एकाच ठिकाणीं असावें असा जणू योगायोगच होता. सन १९१९ च्या एप्रिल महिन्यांत माझी एल्‌एल्. बी. ची परीक्षा संपली व मी मुंबई सोडून हरीपुरास आलों. सन १९१९ च्या जून महिन्यांत माझी एल्‌एल्. बी. ची परीक्षा पास झाली व पूर्वीच ठरल्याप्रमाणें ता. १७ जून १९१९ रोजीं मिरजमळा संस्थानांतील बुधगाव तालुक्याचा मामलतदार म्हणून मी बुधगांवास जाऊन कामावर रुजू झालों.

—*—

# प्रकरण ३ रें

## सेवाधर्मः परम गहनः

बुधगांवच्या नोकरीनें माझ्या जीवनाला आर्थिक दृष्ट्या स्थैर्य आलें. १८९९ सालीं माझे वडील वारल्यानंतर मातोश्रींच्या छत्राखालीं मिळेल तें अन्न व वस्त्र यांवर गुजराण करून मीं कसातरी विद्याभ्यास पुरा केला होता. नोकरींतील जीवन या दृष्टीनें सुखाचें होतें. गरिबीमुळें पूर्वींच्या जीवनात मला मानहानि सहन करावी लागली होती. मामलतदार या नात्यानें गांवगना माझ्यावर नमस्काराचा वर्षाव होऊं लागला, पण लौकरच माझ्या प्रत्ययास आलें कीं, वैचारिक दृष्ट्या आपली कुचंबणा होत आहे; आणि ही कुचंबणा उत्तरोत्तर वाढतच गेली. बुधगाव हें केवळ राजधानी झाल्यानें खेड्याचें शहर झालेलें गाव होतें. यामुळें तेथील वातावरण सनातनी व एकंदरींत रूक्षच होतें. बुधगांवचे अधिपति व त्याची कुटुंबीय मंडळी यांना खूष ठेवून आपली नोकरी कशी सांभाळावी याकडेच कारभाऱ्यापासून खालपर्यंत सर्वांचें लक्ष असे. संस्थानची प्रजा त्यावेळीं बहुतेक अशिक्षित व राज्यकारभाराबद्दल उदासीन होती आणि लोकशाही हा

शब्दसुद्धां बुधगावांत ऐकू येत नव्हता. लेखनवाचनाची मला अतिशय आवड होती, पण बुधगावांत वाचावयासाठीं पुस्तकेंसुद्धां मिळण्याची पंचाईत होती, आणि लेखन करणें म्हणजे कालाचा अपव्यय करणें अशीच सर्वांची समजूत होती. बुधगावच्या माझ्या तीस वर्षांच्या वास्तव्यात हीच परिस्थिति कमीअधिक प्रमाणांत होती. या परिस्थितीशीं मला केव्हांच समरस होतां आलें नाहीं. कटाळून नोकरी सोडावी तर सर्व कुटुंबाचा भार माझ्या एकट्यावर होता म्हणून नोकरी करणें भागच होतें. या कुचंबणेमुळें माझें मन विटून चिडून गेलें देवलाच्या शारदेंतील भद्रेश्वर दीक्षित कोदंडाला भुजंगनाथाकडे नोकरीस ठेवताना बजावून सांगतो कीं, " कोदंड ! श्रीमताची नोकरी करताना डोळे असून पाहायचें नाहीं, कान असून ऐकायचें नाहीं आणि तोंड असून बोलायचें नाहीं ! " श्रीमंत बुधगांवकरांची नोकरी करतांना मीं डोळे आणि कान यांचा मनसोक्त उपयोग केला; फक्त तोंड असून मी उघड बोलू शकलों नाहीं ! या परिस्थितींतूनच माझ्या साम्यवादी, कठोर, टीकात्मक व रूपकात्मक कवितांचा जन्म झाला आहे. परिस्थितीमुळें कांहीं गोष्टी बोलतां येत नाहींत आणि मनातील भावना बोलल्याशिवाय अगर लिहिल्या-शिवाय राहवत नाहीं, अशाच वेळीं लेखक वा कवि रूपकाचा अवलंब करतो 'स्फूर्तिलहरीं'तील हरिणीप्रत, उंबरातले किडे, पाळीव पोपटास, मैना व 'स्फूर्तिनिनाद'मधील वाडगुळें, दिवाभीतें व कावळे, या कविता या दृष्टीनें पाहण्यासारख्या आहेत. तीस वर्षांच्या या दीर्घ काळात सुदैवानें अनेक विरगुळे मला लाभले नसते, नवीन साहित्यिकांचा परिचय व सहवास मला घडला नसता तर बुधगावच्या ' सहारा ' वाळवंटांत मी होरपळून नामशेष झालों असतों ! बुधगांवची परिस्थिति व माझें वाङ्मयीन जीवन यांच्यामध्यें एकप्रकारची रस्सीखेचच चालू होती. परिस्थिति मला गिळू पाहत होती व मी परिस्थितीवर मात करून वाङ्मयीन जगात जिवंत राहू पाहत होतों. परमेश्वरी कृपेनें परिस्थिति वितळून नामशेष झाली आणि मी वाङ्मयीन जगात आजतागायत जिवंत आहें.

सन १९१९ च्या जूनपासून माझ्याभोंवतींचें जग पालटलें. साहित्य अगर कला यांबद्दल एक शब्दही ऐकू येईनासा झाला. एकादी कल्पना

सुचली तर कविता लिहून मनोरंजनकडे मी ती पाठवीत असे. एकाद्या साहित्यिक मित्राचें पत्र आलें अगर एकादा साहित्यिक मित्र मुद्दाम वाकडी वाट करून बुधगावास माझ्याकडे आला तर तेवढाच वेळ आनंदात जाई. सन १९१९ च्या जून महिन्यांत सांगली येथें विलिंग्डन कॉलेजची स्थापना झाली आणि माझ्या वाङ्मयीन जीवनास ही गोष्ट पोषक ठरली. फर्ग्युसन कॉलेजात असताना प्रि. भाटे, प्रा. द्रवीड व प्रा. बोडाळे ही मंडळी मला चांगलीच परिचित झाली होती. विलिंग्डन कॉलेजच्या पहिल्या प्राध्यापकात हीच मंडळी प्रमुख असल्यानें त्यांच्या व माझ्या गांठीभेटी वारवार होऊं लागल्या. सन १९२० च्या फेब्रुआरी महिन्यांत प्रि. भाटे व महर्षि आण्णासाहेब कर्वे एक दिवस माझ्याकडे भोजनास आले होते. हे दोन्ही गृहस्थ कट्टर सुधारक व पुनर्विवाहित असल्यानें या उभयतांचें माझ्याकडे येणें व राहणें म्हणजे बुधगावच्या बुरसट व सनातनी जगात बॉंब पडल्या-प्रमाणेंच होतें. सतत तीन चार दिवस बुधगावांत हा एकच चर्चेचा विषय होता. पण मीं तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं व हें वादळ विरून गेलें. मात्र तेव्हांपासून मी एक सुधारक, नास्तिक व धर्मलंड गृहस्थ आहे असा माझा लौकिक झाला व तो अखेरपर्यंत कायम राहिला.

## आचार्य अत्रे

सन १९२० च्या फेब्रुआरी महिन्यात मुंबईहून आचार्य अत्रे यांचीं दोन तीन सुंदर व खेळकर पत्रें मला आलीं. अत्रे व मी दोघेही एकाच वेळीं फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी होतो. १९१५–१६ सालीं मी बी. ए. च्या वर्गांत होतों. त्यावेळीं अत्रे एफ्. वाय्. व इंटरचे विद्यार्थी होते. आम्ही दोघेही कॉलेजच्या त्रैमासिकात कविता लिहीत होतों; पण त्याचा व माझा दृढ परिचय झालेला नव्हता. पुढें मनोरंजन व उद्यान या मासिकांत आमच्या कविता येऊं लागल्यावर त्याचा व माझा दृढ परिचय झाला व पुढें या परिचयाची परिणति स्नेहात झाली. अत्रे याच्या कवितेवर त्यावेळीं गोविंदाग्रज व बालकवि यांच्या काव्याची दाट छाप होती. कल्पनांच्या बाबतींत ते गोविंदाग्रजाचे व भाषेच्या बाबतींत बालकवींचे सांप्रदायी होते.

'झेंडूच्या फुलां'चे जनक अत्रे अद्याप जन्माला यावयाचे होते. मला लिहिलेल्या पत्रांत आचार्य अत्रे यांनीं मला मुंबईतील वाङ्मयीन परिस्थिति कळविली होती. एका पत्रात उद्यानचे संपादक श्री. ग. वि. कुलकर्णी यांच्या उलाढालींचें व गोविंदाग्रजांच्या मुंबईत झालेल्या पहिल्या टोलेजंग स्मृतिदिनाचें रसाळ वर्णन होतें. दुसऱ्या पत्रात भावबंधन नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचें व त्यावेळीं थिएटरात उसळलेल्या हास्यकल्लोळांचें खेळकर वर्णन होतें. तिसऱ्या पत्रात गडकऱ्यांनीं आपणास बिडी ओढावयास शिकविली म्हणून आपण गडकऱ्यांचे शिष्य आहोंत असें सांगणाऱ्या एका भावी वकिलाचें वर्णन होतें. हीं तीन पत्रें पुष्कळ वर्षे माझ्या संग्रहीं होतीं. पण १९४५ सालीं एका वैतागाच्या क्षणांत अनेक थोर साहित्यिकाच्या बहुमोल पत्रसंग्रहाबरोबर हीं तीन सुंदर पत्रेंही मीं जाळून टाकिली. आतां मला त्याचा पश्चात्ताप होतो पण उपयोग काय?

ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं मुंबई येथील सरदारगृहांत थोर भारतीय पुढारी लोकमान्य टिळक यांचें देहावसान झालें आणि सारा भारत दुःखसागरात बुडून गेला. त्यानंतर दोन दिवसांनीं मी मुंबईस गेलों असतां आचार्य अत्रे यांना भेटलों. अत्रे त्यावेळीं माधवाश्रमाजवळील एकादशी बिल्डिंग समोरच्या इमारतींत राहत होते व कोटांतील एका हायस्कुलांत शिक्षक होते. लोकमान्यांच्या निधनावर आपण लिहीत असलेलें खंडकाव्य त्यानीं मला दाखविलें व याच विषयावर मींही एक खंडकाव्य लिहावें, असें सुचविलें. संस्थानी कामाच्या गर्दींत मी तें लिहू शकलों नाहीं व अत्रे यांचें खंडकाव्य 'अकरावा अवतार' या नावानें लौकरच प्रसिद्ध झालें. या खंडकाव्याच्या लहानशा प्रस्तावनेंत माझ्या नावाचा उल्लेख आहे. यानंतरच्या काळात आचार्य अत्रे पुणें, मुंबई येथें व मी बुधगावसारख्या आडगांवीं राहिल्यानें त्यांच्या व माझ्या भेटीचे योग वारंवार आले नाहींत. दरम्यानच्या काळात देहानें, यशानें, कीर्तीनें व व्यक्तिमत्त्वानें आचार्य अत्रे थोर झाले व मी होतों तसाच किरकोळ राहिलों; पण अत्रे मला केव्हाही विसरले नाहींत व विसरणें शक्य नाहीं. १९२९ सालीं ते मुद्दाम बुधगावास येऊन माझे घरीं राहून गेले. माझ्या 'स्फूर्तिलहरी' काव्यसंग्रहावर त्यांनीं

उत्तम अभिप्राय दिला असून सन १९३६ च्या फेब्रुआरींत पुणें येथील टिळक स्मारकमंदिरांत स्फूर्तिलहरीचा जो संस्मरणीय प्रकाशन समारंभ घडून आला त्याचें श्रेय सर्वस्वीं आचार्य अत्रे यांना आहे. १९४६ सालीं मुंबई रेडिओवर मी काव्यगायनासाठीं गेलों होतों त्यावेळीं आचार्य अत्रे यांना भेटलों होतों व त्यांनींही आपला नवयुग छापखाना स्वतः माझ्याबरोबर हिंडून मला दाखविला होता. त्यानंतर लौकरच ते सांगलीस आले असतां प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्यासह मुद्दाम बुधगांवास येऊन मला भेटून गेले होते. याच सुमारास माझी ' वीरमाता ' ही कविता अत्रे यांच्या नवयुगाच्या एका दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती. त्याचें 'नवयुग' हें माझ्या कवितांचें एक हक्काचें प्रसिद्धिस्थान आहे. अतिशय कार्यमग्न असूनही माझ्या पत्रांना त्यांचीं उत्तरें तांबडतोब येतात. उत्तर सात आठ ओळींचेंच असतें, पण स्नेहभावानें तें ओथंबलेलें असतें. माझ्या वाङ्मयीन जीवनांत जे थोडे थोर साहित्यिक मला मित्र म्हणून लाभले, त्यांत आचार्य अत्रे यांची गणना आहे.

## कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

सन १९२० च्या फेब्रुआरी महिन्यांत सुप्रसिद्ध मराठी नाटककार, विनोदी लेखक व कवि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या भेटीचा योग आला. सांगली येथें भरणाऱ्या ज्योतिष संमेलनाचे अध्यक्ष म्हणून तात्यासाहेबांची निवड झाली हें ऐकून मला आनंद झाला. त्यांचीं सर्व नाटकें विद्यार्थीदशेंत मीं वाचलीं होतीं. त्यांचे कुरकुरीत सुदाम्याचे पोहे मीं आवडीनें खाल्ले होते आणि मनोरंजनमधील ' तोतयाचें बंड ' व विविधज्ञान-विस्तारांतील ' रागिणी व तिचीं भावंडें ' हे टीकालेख मीं आवडीनें वाचले होते. यामुळें या थोर साहित्यिकाच्या भेटीविषयीं मला आतुरता वाटत होती. तो योग सहज जमून आला होता. सांगलीच्या ज्योतिष संमेलनाचा मंडप जुन्या मुरलीधराच्या देवळासमोरील मोकळ्या पटांगणांत घातला होता. या संमेलनासाठीं लोकमान्य बाळ गंगाधर टिळक मुद्दाम आले होते. जहाल आणि मवाळ अशा परस्परविरोधी प्रवृत्तींच्या दोन थोर व्यक्ती या संमेलनाच्या निमित्तानें सांगलींत एकत्र आल्या होत्या. संमेलनाच्या शेवटच्या दिवशीं

सायंकाळीं संमेलन संपल्यावर मी मंडपांत जाऊन कोल्हटकरांना भेटलों. माझ्याबरोबर माझे मित्र श्री. शंकरराव रानडे हे होते. त्यांनीच माझा व तात्यासाहेबांचा परिचय करून दिला. तात्यासाहेब माझ्याबरोबर फारच प्रेमळ-पणानें बोलले व मनोरंजनात प्रसिद्ध झालेल्या माझ्या सर्व कविता वाचल्याचें त्यांनीं सांगितलें. त्याच रात्रीं बुधगांवास माझे घरीं भोजनास व मुक्कामास येण्याचें माझें निमंत्रण त्यांनीं तात्काळ स्वीकारलें व आम्ही तिघे टांग्यानें लागलीच बुधगांवास गेलों. त्या रात्रीं विविध वाङ्मयीन विषयावर आम्ही इतक्या मोकळेपणानें बोललो कीं जणू काहीं आम्ही फार वर्षांचे स्नेही होतों. त्यानंतर कांहीं दिवसांनीं मीं त्यांना आभाराचें पत्र इंग्रजींतून पाठविलें, त्याचें उत्तर तात्काळ आलें. त्यांत आपणाबरोबरचा सर्व पत्रव्यवहार मराठींत करावा असें त्यांनीं कटाक्षानें लिहिले होतें. त्यानंतरच्या दोन तीन वर्षांत मे महिन्याच्या व नाताळच्या सुटींत तात्यासाहेबांना मी दोन तीन वेळां भेटलों होतों. पुण्यास ते सदाशिव पेठेच्या हौदासमोर राघोपंत पिंपळखरे यांचेकडे उतरत असत, व मुंबईस गिरगांव रोडवरील आपल्या आप्ताकडे उतरत असत. हे दोन्ही पत्ते त्यांनीं मला कळविले होते. मनोरंजन वगैरे मासिकात प्रसिद्ध झालेल्या माझ्या कविता वाचून ते आपला अभिप्राय मला मुद्दाम पत्रानें कळवीत असत. कवितेच्या ओळींत पुढील जोडाक्षरामुळें मागील लघु अक्षराच्या दोन मात्रा होतात आणि त्याकडें दुर्लक्ष केलें तर मात्रादोष घडतो. माझ्या कवितातील असे व इतर दोष त्यांनीं मला स्पष्टपणानें कळविले होते. ' काव्यविहार ' या माझ्या काव्यसंग्रहावरील तात्यासाहेबांचा अभिप्राय त्या संग्रहांत समाविष्ट आहे. सन १९२६ नंतर त्यांची व माझी भेट झाली नाहीं, पण आमचा पत्रव्यवहार अखेरपर्यंत होता. आयुष्याच्या उत्तरकालात त्यांना वातविकार जडला होता व त्यांच्या डोळ्यानाही अधूपणा आला होता याबद्दलचे उल्लेख त्यांच्या पत्रात वारंवार असत. माझ्या वाङ्मयीन जीवनाच्या पूर्वकालात मला भेटलेल्या थोर साहित्यिकातील तात्यासाहेब कोल्हटकर हे एक होते. ते एक थोर नाटककार तर होतेच, पण समतोलवृत्तीचे टीकाकार होते. मनोरंजन, विविधज्ञानविस्तार वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झालेले त्यांचे टीकालेख विद्वन्मान्य झाले होते. त्यांच्या सुदाम्याच्या पोह्यांनीं त्यावेळच्या सनातन्यात खूप खळबळ उडविली होती! विनोदाचें हत्यार यशस्वीपणानें

वापरून समाजातील अनिष्ट चालीरीतींवर कठोर प्रहार करणारे ते पहिले मराठी विनोदी लेखक होते आपल्या थोर वाङ्मयीन कार्यानें त्यांनीं एक स्वतंत्र संप्रदाय निर्माण केला. महाराष्ट्राचे थोर नाटककार व कवि कै. राम गणेश गडकरी हे कोल्हटकरांना गुरुस्थानीं मानीत.

" श्रीपादांची जिथें नांदते कलावती वाणी "
आणि " तात्या, ती तरवार मात्र तुमची, बाकी विळे कोयते "

या गडकऱ्यांच्या पद्यपंक्ती प्रसिद्धच आहेत. सुमारें तीस वर्षांपूर्वी मला दृढ परिचित झालेल्या कै. तात्यासाहेब कोल्हटकरांबद्दल जेव्हां मी विचार करूं लागतों तेव्हां शुभ्र कोट, शुभ्र जरीचा रुमाल व शुभ्र जरीचें उपरणें यांनीं विभूषित झालेली, पिकलेल्या मिशांची व बुद्धिमान चेहऱ्याची त्यावेळीं पाहिलेली त्यांची स्थूल मूर्ति आजही मला नजरेसमोर दिसते.

## राजकवि यशवंत

महाराष्ट्रांतील आजचे प्रसिद्ध कवि ' यशवंत ' ( यशवंत दिनकर पेंढरकर ) यांचा व माझा परिचय सन १९२० च्या शेवटीं झाला. यशवंत हे पूर्वी सांगली हायस्कुलांत विद्यार्थी होते व कै. कविवर्य ' साधुदास ' यांचे ते शिष्य होते; पण त्यांची व माझी भेट अगर परिचय त्यावेळीं झाला नाहीं. माझा परिचय झाला त्यावेळीं ' यशवंती ' व ' मित्रप्रेमरहस्य ' हे यशवंतांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले होते व त्यांच्या स्फुट कविता मधूनमधून नियतकालिकांत येत होत्या. सातारा जिल्ह्यांतील चाफळच्या दऱ्याखोऱ्यांतील या शाहिरानें शारदेच्या दरबारांत प्रवेश करून नुकताच शाहिरी मुजरा ठोकला होता व शारदेनें सहास्य मुद्रेनें या तडफदार कवीचें स्वागत केलें होतें. १९२१ सालीं बडोद्यास भरलेल्या साहित्य संमेलनात हाच शाहिरी मुजरा पद्यरूप पावला होता. माझा परिचय झाला तेव्हा यशवंत, सदाशिव पेठेच्या हौदाजवळील राममंदिराचे माडीवर राहिले होते. मीही पुण्यास गेल्यावर जवळच असलेल्या श्रीमंत मळेकरांचे वाड्यांत राहत असे, पण माझा बराचसा काळ यशवंतांकडेच जाई. मला नुकतेच परिचित

झालेले नवोदित कवि स. अ. शुक्ल हेही केव्हा केव्हां मजबरोबर असत. सन १९२१ च्या एप्रिल महिन्यांत कोल्हापुरास एक लहानसें कवि-संमेलन भरलें होतें. त्यासाठीं प्रथम कवि यशवंत बुधगावास मजकडे आले व नंतर ते व मी मिळून दुसरे दिवशीं कोल्हापुरास गेलों. या संमेलनाचें अध्यक्षस्थान मला द्यावें अशी थोडीशी वाटाघाट त्यावेळीं झाली; पण कोल्हापुरची त्यावेळची परिस्थिति लक्षात घेऊन एकाद्या रावसाहेब अगर रावबहादुर कवीला अध्यक्ष करावें, असें मीं सुचविलें आणि मुंबईचे राव. पी. बी. जोशी यांना अध्यक्ष निवडण्यात आलें. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष कै. शाहू महाराज यांचे मेहुणे कै. मामासाहेब खानविलकर हे होते, यामुळें संमेलनास सहजच राजाश्रय लाभला होता. संमेलनासाठीं बाहेरून आलेल्या कविमंडळींत मी, यशवंत, कै. विष्णू बाबाजी कुलकर्णी व श्री. कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी, सांगलीचे म. भि. कुलकर्णी, अलीबागचे वा. कृ. भावे, इचलकरंजीचे काव्यशेखर व कऱ्हाडचे कै. आनंदीरमण वगैरे होते. स्थानिक कवींपैकीं कै. राजकवि सुमंत, कै. कळंबेकर, वैद्य कापशीकर, वासुदेवसुत कारेकर वगैरे कवी संमेलनांत उपस्थित होते. प्रतिनिधींचें निवासस्थान अंबाबाईचे महाद्वारानजीक होतें व भोजनशाळेचे व्यवस्थापक कै. न. दा. सरपोतदार हे होते. संमेलन शिवाजी थिएटरात दोन दिवस थाटानें झालें. या संमेलनात मी माझे 'सवाल' म्हणून दाखविले व कवि यशवंतांनीं 'देहाचा पूल' ही कविता गाऊन दाखविली. आम्हां दोघांना काव्यगायनाबद्दल चांदीचीं पदकें व्यवस्थापक मंडळानें दिलीं. याच वर्षाच्या नवंबरात बडोदे येथें भरलेल्या साहित्यसंमेलनात कवि यशवंत हे महाराष्ट्राला प्रथम परिचित झाले. संमेलनाध्यक्ष कै. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांनीं आपला सविकल्प समाधीचा सिद्धांत याच संमेलनाचे अध्यक्षीय भाषणांत मांडला. बडोद्याच्या संमेलनाला मी जाणार होतों, पण संस्थानी कामाच्या नडीमुळें मला आयत्या वेळीं आपला बेत रहित करावा लागला. सन १९२० ते १९२५ या काळांत मी पुण्यास वरचेवर जात असे, त्यावेळीं कवि यशवंत यांची अनेक वेळां भेट होई. त्यांचा व माझा बराच पत्रव्यवहारही याच काळांत झाला होता. इतर बहुमोल पत्रसंग्रहाबरोबर हा पत्रव्यवहारही १९४५ सालीं नष्ट झाला. तो पत्रसंग्रह आज असता तर यशवंतांच्या त्यावेळच्या हळव्या व भावनाप्रधान

वृत्तीवर त्यामुळें चांगलाच प्रकाश पडला असता. सन १९२५ नंतर पुण्यामुंबईकडे माझें जाणें विशेष झालें नाहीं. यामुळें यशवंताच्या व माझ्या गांठीभेटी विशेष झाल्या नाहींत व पत्रव्यवहारही कारणापुरताच राहिला आहे. तथापि आम्हां उभयतांमधील स्नेहभाव आजही अखंडित आहे. मी केव्हाही पुण्यास गेलों तरी त्यांना अगत्यानें भेटतों व यशवंतही या भागात केव्हाही आले, तरी पूर्वी बुधगावास व हल्लीं सांगलीस अगत्यपूर्वक माझ्या घरीं येतात. १९५० सालीं यशवंतांना मुंबईच्या साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान मिळालें त्यावेळीं सांगलींतील साहित्यिकांच्या व शिक्षणसंस्थांच्या वतीनें आम्ही त्यांचा जाहीर सत्कार केला होता. आम्हा उभयतांचीं जुन्या काळातील दुर्मिळ छायाचित्रें माझ्या संग्रहीं आहेत. त्यांतील थोराड व कणखर यशवंत आज कोणाला ओळखणारही नाहींत. माझ्या फारच थोड्या साहित्यिक मित्रांत यशवंतांची गणना आहे.

## इंदूरचे सरदार किबे

सन १९२२ च्या मार्च महिन्यांत इंदूरचे सरदार माधवराव किबे व त्यांच्या पत्नी सौ. कमलाबाई किबे यांचा मला परिचय झाला. माझ्या जन्मकाळचे योगच असे आहेत, कीं कोणतीही गोष्ट माझ्या बाबतींत घडावी, असें मला उत्कटतेनें वाटलें, कीं काहींतरी घटना घडून ती गोष्ट जमून येते. घरची अत्यंत गरिबी असूनही मला मिळालेलें उच्च शिक्षण आणि बुधगांव-सारख्या आडगावीं सारी हयात जाऊनही अनेक थोर साहित्यिक व कलावंत यांचा मला घडलेला परिचय, या गोष्टी योगायोगामुळेंच घडून आलेल्या आहेत. किबे पतिपत्नींचा परिचय व स्नेह, ही अशा घटनांपैकींच एक आहे. सन १९२२ च्या मार्च महिन्यात सरदार माधवराव किबे हे प्रकृतिस्वास्थ्यासाठीं मिरज स्टेशनजवळील 'सुखनिवास' बंगल्यात सहकुटुंब राहिले होते. मीं पत्रद्वारां भेटीची इच्छा व्यक्त करतांच, त्यांनीं मला अगत्यपूर्वक भेटीस बोलावलें. पहिल्याच भेटींत उभयता पतिपत्नी माझ्याबरोबर इतक्या आपुलकीनें व मनमोकळेपणानें बोलले, कीं जणू काहीं आम्ही फार वर्षांचे स्नेही होतों. मनोरंजनमधील माझ्या सर्व कविता आवडीनें

वागल्याचें सौ. कमलाबाईंनीं मला सांगितलें. माझ्या निमन्त्रणावरून दोघेही बुधगांवास माझ्या घरीं उपाहारासाठीं अगत्यपूर्वक येऊन गेले आणि या गांठीभेटींनीं आमच्यांत गाढ स्नेहभाव निर्माण झाला. सरदार माधवराव किबे व सौ. कमलाबाई अत्यंत प्रेमळ व निगर्वी आहेत. लक्ष्मीची कृपा असूनही सरस्वतीचाही उभयतांवर लोभ आहे. मिरजेच्या भेटींत सरदार किबे यांनीं मे महिन्यांत सिंहगडावर आपल्याकडे येण्याचें मला आग्रहाचें निमन्त्रण दिलें. त्याप्रमाणें मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मी सिंहगडावर त्यांच्याकडे गेलों व तेथें सुमारे तीन आठवडे राहिलों. सरदार किबे, सौ. कमलाबाई व त्यांचीं मुलें ही सर्व मंडळी माझ्याशीं अत्यंत प्रेमानें वागल्यामुळें माझा सिंहगडनिवास सुखाचा व संस्मरणीय झाला. सिंहगडावर त्यावेळीं श्रीमंत वहिनीसाहेब विंचूरकर, श्रीमती शांताबाई हेबळीकर, बॅरिस्टर गाडगीळ, पंडित जगन्नाथ महाराज, सौ. उषाताई खेर वगैरे मंडळी होती. त्यांचाही मला सहज परिचय झाला. मे महिन्याचे अखेरीस सिंहगडाबरोबर वरील परिचितांचा निरोप घेतांना मला गहिंवरून आलें व निरोप देणारांनाही अवघड वाटलें. या सर्व भावना काव्यविहारांतील ‘ सिंहगड सोडतांना ’ या माझ्या कवितेंत व्यक्त झाल्या आहेत. सरदार किबे हे इचलकरंजी संस्थानचे अधिपति कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचे स्नेही व सल्लागार असल्यानें ते व सौ. कमलाबाई इचलकरंजीस मधूनमधून येत असत व त्या प्रत्येक वेळीं त्यांची व माझी भेट होई. केव्हांकेव्हां ते मला इचलकरंजीस बोलावीत अगर स्वतः बुधगांवास येत. यामुळें सिंहगडावरील निवासानें निर्माण झालेला त्यांच्यामाझ्यामधील गाढ स्नेहभाव अद्याप कायम आहे. ‘ स्फूर्तिलहरी ’तील ‘ भगिनीप्रत ’ व ‘स्फूर्तिनिनाद’मधील ‘ ओंवाळणी ’ या कविता मी सौ. कमलाबाईंना उद्देशून लिहिल्या आहेत. माझ्या वाङ्मयीन जीवनांत सुदैवानें मला घडलेल्या परिचयांत किबे पतिपत्नींचा परिचय व स्नेह ही एक संस्मरणीय घटना आहे.

## विलिंग्डन कॉलेजांत प्राध्यापक

सन १९२२ च्या एप्रिल महिन्यांत माझ्या वाङ्मयीन जीवनावर अत्यंत अनुकूल परिणाम करणारी एक घटना घडून आली. सन १९२१

सालापासून मुंबई विद्यापीठानें बी. ए. साठीं ऐच्छिक भाषा म्हणून मराठीला स्थान दिलें. यामुळें सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गाला मराठी विषय शिकविण्याची कांहींतरी व्यवस्था करणें जरूर होतें. विलिंग्डन कॉलेजचे प्रिन्सिपाल गो. चि. भाटे यानीं मुद्दाम पत्र पाठवून मला भेटीसाठीं बोलाविलें. त्यापूर्वीं प्रि. भाटे, प्रा. द्रवीड, प्रा. सप्रे, प्रा. चोंडाळे वगैरे मंडळी कॉलेजला देणग्या मिळविण्यासाठीं वरचेवर बुधगावास येत असत व फर्ग्युसन कॉलेजचा माजी विद्यार्थी या नात्यानें मी त्याना या कामीं शक्यतें साहाय्य करीत असे. असेंच एकादें काम असेल अशा समजुतीनें मी प्रि. भाटे याना तात्काळ भेटलों. प्रि. भाटे मला म्हणाले, "विलिंग्डन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गाला मराठी विषय शिकविण्याची सोय करावयाची आहे. मी स्वतः गद्यविभाग शिकवीन. तुम्हीं पद्य शिकवावें अशी आमची सर्वांची इच्छा आहे. बुधगावची नोकरी सांभाळून तुम्हाला हें काम सहज करता येईल. कारण आठवड्यातून फक्त तीन तास तुम्हाला घ्यावे लागतील. याबद्दल तुम्हांला सर्व टांगाभाडें व अल्पस्वल्प मानधनही मिळेल. तुम्ही हें काम जरूर करा." ही सूचना ऐकून मी चकित झालों कारण हा बहुमान मी मुळींच अपेक्षिला नव्हता. मराठी विषय घेऊन मी एम्. ए. झालों नव्हतों व आमच्या वेळीं बी. ए. ला मराठी हा विषयच नव्हता. फक्त स्फुट कवितालेखन एवढीच त्यावेळीं माझी साहित्यसेवा होती. यामुळें बी. ए. च्या वर्गाला मी कितपत शिकवू शकेन याची मला शंका होती. यामुळें "डॉ. गुणे यांना विचारून काय तें सांगतों" असें मी म्हणालों. प्रि. भाटे म्हणाले, "डॉ. गुणे यानींच तुमचें नांव सुचविलें आहे. तथापि विचार करून उद्यांपर्यंत काय तें सांगा." मी तसाच उठून डॉ. गुणे यांच्याकडे गेलों. ते त्यावेळीं शिरगावकर राममंदिराजवळील बंगल्यांत राहत होते, आणि एका दुर्धर रोगानें पछाडल्यामुळें रुग्णशय्येवरच पडून होते. मीं घडलेली हकीगत त्यांना निवेदन करताच ते म्हणाले, "मराठी काव्याचा प्राध्यापक म्हणून मींच तुमचें नांव सुचविलें आहे. तुम्ही पदवीधर व सहृदय कवि आहात. तुम्ही हें काम सहज करू शकाल व मीही तुम्हांला जरूर तें साहाय्य देईन." डॉ. गुणे यांच्या उद्गारांनीं मला धीर आला आणि मी लागलीच प्रि. भाटे यांच्याकडे जाऊन जूनपासून मराठी काव्याचा प्राध्यापक

म्हणून काम करण्याचें मान्य केलें. मात्र मी संस्थानचा नोकर असल्यानें माझ्या कामास बुधगांवच्या अधिपतींची मान्यता मिळविण्याची जबाबदारी मीं त्यांच्यावर सोंपविली व त्यानीं ती पत्करली. संस्थानच्या अधिपतींची परवानगी मिळविणें त्यांना वाटलें तितकें सोपें नव्हतें, याचा अनुभव त्यांना नंतर आला. दरम्यानच्या मुदतींत मी सिंहगडावर जाऊन आलों. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात प्रि. भाटे व प्रा. द्रवीड परवानगी मागावयास बुधगांवास आले असता कामाच्या सवडीवर बरेच अडथळे निर्माण झाले, पण त्यावेळचे कारभारी कै. राव. सरदेसाई यांच्या खटपटीनें अखेर मला परवानगी मिळाली व ता. २० जून १९२२ पासून मीं कॉलेजच्या कामाला रीतसर सुरवात केली. विलिंग्डन कॉलेज त्यावेळीं सांगलींत भाजी मंडईजवळील सरकारी इमारतींत होतें ( हल्लीं तेथें राणी सरस्वतीदेवी कन्याशाळा आहे. ) आठवड्यातील पहिले तीन दिवस पहिलाच तास मी घेत असे. बुधगावाहून कॉलेजास टांग्यानें येऊन तास घेऊन मी परत मामलतदार कचेरींत जात असे व तेथून सरकारी कामास सुरवात होई. आठवड्यातील शेवटच्या चार दिवसांत मी तालुक्यात फिरतीवर जात असे व त्याच मुदतींत पुढील आठवड्यासाठीं अभ्यास करीत असे. श्री. अ. का. प्रियोळकर ( मुंबईच्या मराठी संशोधन संस्थेचे अध्यक्ष व साहित्यसंमेलनाध्यक्ष ) व श्री. नें. न. दोशी ( सांगली हाय-स्कूलचे मुख्याध्यापक ) हे माझे मराठीचे पहिले विद्यार्थी होते. पुढील दोन वर्षांत विलिंग्डन कॉलेज हल्लींचे इमारतींत भरूं लागलें. कॉलेजांत मी सन १९२२ ते सन १९२५ तीन वर्षे काम केलें. या काळात मराठी जुन्यानव्या कवितेचा सखोल अभ्यास करण्याची संधि मला मिळाली व माझ्या वाङ्मयीन व्यासंगास या अभ्यासाचा चांगला उपयोग झाला. मराठीचा प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल माझ्या सर्व साहित्यिक मित्रांनीं माझें अभिनंदन केलें. कारण प्राध्यापक म्हणून नेमणूक झालेला मी पहिलाच आधुनिक कवि होतों. प्राध्यापक म्हणून माझें काम बऱ्या प्रकारचें होत असल्याचें प्रि. भाटे मला मधूनमधून सांगत असत. या तीन वर्षांत प्रि. भाटे गद्यविभाग शिकवीत असत, पण त्याना वारवार परगांवीं जावें लागत असल्यानें प्रा. डॉ. प. ल. वैद्य यांनीं कांहीं दिवस गद्यविभाग शिकविला होता. मीही मधूनमधून गद्याचे तास घेत असे. श्री. प्रियोळकर

माझे विद्यार्थि असताना त्यांनीं माझी एक कविता मागून घेऊन फोंडा–गोवा येथें प्रसिद्ध होणाऱ्या ‘ स्वयंसेवक ’ मासिकांत प्रसिद्ध केली होती. माझे कविमित्र यशवंत एकदा बुधगावास आले असतांना मजबरोबर कॉलेजात आले होते व ‘ अस्तंगत महाराष्ट्रास प्रणाम ’ ही आपली कविता त्यांनीं विद्यार्थ्यांसमोर तडफदार रीतीनें म्हणून दाखविली होती. काव्यगायनात पुढें रूढ झालेली हेल काढून व हुंकार देऊन काव्यगायन करण्याची पद्धत तेव्हा प्रचारांत नव्हती. विलिंग्डन कॉलेजात मराठीचा प्राध्यापक म्हणून गेलेला माझा तीन वर्षांचा काळ माझ्या लौकिक व वाङ्मयीन जीवनांत महत्त्वाचा आहे, असें मी मानतों. त्या कॉलेजातील मराठीच्या पहिल्या प्राध्यापकांपैकीं मी एक आहें, याचा मला अभिमान वाटतो. हा बहुमान मला कै. प्रि. भाटे व कै. डॉ. गुणे या दोन गुरुवर्यांच्या मजवरील लोभामुळेंच मिळालेला असल्यानें, या माझ्या दोन्ही दिवंगत साहाय्यकाचें मला नेहमीं कृतज्ञतापूर्वक स्मरण होतें.

## कै. प्रा. टिपणीस व कै प्रा. चापेकर

विलिंग्डन कॉलेजांत मी प्राध्यापकाचें काम करीत असतांना सन १९२२ च्या उत्तरार्धांत कै. प्रा. गोविंद गोपाळ टिपणीस यांचा व माझा परिचय झाला. मुंबई विद्यापीठानें बी. ए. साठीं मराठी हा विषय ठेवल्यानंतर प्रा. टिपणीस यांची नेमणूक मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत व कै. प्रा. श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर यांची नेमणूक पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक म्हणून मुंबई सरकारनें केली. रँग्लर आप्पासाहेब परांजपे त्यावेळीं मुंबई सरकारचे शिक्षणमंत्री होते. सन १९२२ चे अखेरीस प्रा. टिपणीस सांगलीस प्रि. भाटे यांचेकडे आले असतांना ते व प्रि. भाटे बुधगांवास माझ्याकडे आले व भाटे यानीं त्याचा व माझा परिचय करून दिला. मराठीच्या अभ्यासक्रमाबद्दल त्याचें व माझें खूप बोलणें झालें. प्रा. टिपणीस यांचा संत-वाङ्मयाचा अभ्यास सखोल होता आणि ‘ महाराष्ट्रवेद ’ ही त्यांची ग्रंथमाला मनोरंजक ग्रंथ–प्रसारक मंडळीनें प्रकाशित केली होती. त्यामानानें अर्वाचीन गद्यपद्यवाङ्मयाचा त्यांचा

विशेष अभ्यास असल्याचें दिसून आलें नाहीं. आधुनिक गद्याबद्दल बोलताना चिपळूणकरांपेक्षां आगरकरच श्रेष्ठ असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें. प्रा. टिपणीस यानंतर मला पुन्हा भेटले नाहींत. कै. प्रा. श्री. नी. चापेकर यांचा परिचय मला सन १९२२ च्या उत्तरार्धांत पुणें येथें झाला. त्यावेळीं ते व कै. कवि अनंततनय (दत्तात्रय अनंत आपटे) पुण्याच्या महाराष्ट्रशारदामंदिराचे प्रमुख घटक होते. बी. ए. च्या अभ्यासक्रमात नेमलेल्या वामनपंडितांच्या 'वनसुधा' व 'वेणुसुधा' या क्लिष्ट काव्यांचा अभ्यास करतांना प्रा. चापेकर यांचें मला फार साहाय्य झालें. त्यांचा व माझा परिचय पुढें क्रमाक्रमानें वाढत जाऊन त्याची परिणति स्नेहात झाली. ज्ञानेश्वरी, संतवाङ्मय व पंडित कवि यांचा सखोल अभ्यास प्रा. चापेकरांनीं केला होता आणि या कवींच्या अभ्यासास लागणारी अभिरुचि त्यांना होती; पण अर्वाचीन गद्यपद्यवाङ्मयाचें योग्य आकलन त्यांना झालें नव्हतें, असें मला दिसून आलें. अर्वाचीन गद्यपद्यवाङ्मयाच्या अभ्यासास व अध्यापनास आवश्यक असलेली सौंदर्यदृष्टि व अभिरुचि त्यांना नव्हती. यामुळें ज्ञानेश्वरी अगर पंडित कवींची कविता यांच्याविषयीं बोलतांना त्यांच्या भाषणाचा ओघ अखंड चाले आणि या कवींच्या काव्यांतील अनेक सुंदर अवतरणें त्यांच्या तोंडून बाहेर पडत असत; पण गोविंदाग्रज, बालकवि अगर रेव्ह. टिळक यांच्याबद्दल बोलतांना त्यांचें वाचन तोकडें दिसे व या कवींच्या काव्यांतील सुंदर पंक्ती त्यांना उद्धृत करतां येत नसत. यामुळें मराठी वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास एकांगी आहे, असें मला वाटे. आधुनिक विचारसरणीशीं समरस होण्याची इच्छा अगर कुवत त्यांच्यात नसल्यामुळें पुण्याच्या महाराष्ट्रशारदामंदिरातील तरुण साहित्यिकांबरोबर ते मिसळू शकले नाहींत व यामुळें ते बाजूला पडले. प्रा. बापूसाहेब चापेकर हे त्या काळात एक नाणावलेले वक्ते होते, पण त्यांच्या व्याख्यानांत भावनेपेक्षां पांडित्य व शब्दावडंबर यांचाच प्रकर्ष आढळून येई. श्रोतृसमाज हलवून सोडण्यापेक्षां त्यांतील कांहींना डोलविण्यातच ते कुशल होते. स्वभावानें बापूसाहेब अत्यंत सालस पण विसरभोळे होते. बुधगावास अनेकवेळां ते माझ्याकडे आले होते. एकदां नरसोबाचे वाडीहून बुधगांवास येतांना ते आपला चष्मा टांग्यातच विसरून

आले व ही गोष्ट बुधगावास आल्यावर त्याना कळून आली. मुंबई विद्यापीठाच्या एका परीक्षेचे ते परीक्षक असताना, पुण्याहून मुंबईस जातांना त्यांच्याजवळील कांहीं उत्तरपत्रिका वाऱ्यानें उडाल्या होत्या, अशी एक अफवा त्यावेळीं मीं ऐकिली होती. ती खरी असो वा खोटी असो, त्याच्या धादरट स्वभावामुळें असें होणें अस्वाभाविक मात्र नव्हतें. बापूसाहेबात आणखी एक दोष होता. त्यांच्या काळीं मराठी गद्यपद्यवाङ्मयांत अनेक नवेनवे प्रयोग होत होते, त्याच्याकडे सहिष्णुतेनें अगर खिलाडु वृत्तीनें त्यांनीं कधींच पाहिलें नाहीं. यामुळें योग्यता असूनही त्यांची व्हावी तितकी चीज झाली नाहीं व काहीं तरुण साहित्यिक त्यांच्याकडे उपेक्षेनें व चेष्टेच्या दृष्टीनें पाहू लागले. माझे मित्र आचार्य अत्रे यांच्या सुप्रसिद्ध 'झेंडूच्या फुलां' तील काहीं फुलें प्रा. चापेकर यांच्यावर उधळलेलीं आहेत. कै. माधव जुलियन यांच्या 'नकुलालंकार' या खंडकाव्यांतील एका व्यक्तीच्या काहीं स्वभावछटा प्रा. चापेकर याच्यावरून रेखाटल्या आहेत, अशी माझी समजूत आहे आणि माधवरावांसारख्या श्रेष्ठ कवीनें एका समकालीन विद्वानाची अशी टिंगल करावयास नको होती, असें माझें प्रांजल मत आहे. मुंबई सरकारनें डेक्कन कॉलेज बंद केल्यावर प्रा. चापेकर याची स्थिति थोडी हलाखीची झाली, पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या चालकांनीं त्याना कांहींकाळ फर्ग्युसन कॉलेजात मराठीचे प्राध्यापक नेमून त्यांना शेवटच्या दिवसात साहाय्य केलें, हें त्या संस्थेच्या थोर परंपरेला अनुरूपच होते. प्रा. चापेकर यांचे व माझे संबंध अखेरपर्यंत स्नेहभावाचे होतें. माझ्यावर व माझ्या काव्यावर त्याचा लोभ होता. 'स्फूर्तिलहरी' या माझ्या काव्यसंग्रहावर त्यांनीं दिलेला रसग्राही अभिप्राय त्या संग्रहांत समाविष्ट आहे.

## कवि गिरीश

सन १९२२ च्या गणेशचतुर्थीचे सुटींत मी पुण्यास गेलों असताना कवि गिरीश याचा परिचय मला कविमित्र यशवंतराव पेंढरकर यानीं करून दिला. पहिल्याच भेटींत गिरीश माझ्याबरोबर फार प्रेमळपणानें व पूर्वपरिचिताप्रमाणें वागले. एका रात्रीं किर्लोस्कर थिएटरासमोरील तपकीर गल्लींत मी

त्याच्याकडे भोजनास गेलों होतों. तेथेंच प्रा. माधवराव पटवर्धनही ( माधव जुलियन ) भोजनास आले होते. मी व गिरीश काव्याबद्दल खूप बोललों, पण माधवराव माझ्याशीं फारसें बोललेच नाहींत. त्यानंतर दोन दिवसांनीं न्यू इंग्लिश स्कूल बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांनीं तेथील गणपतीसमोर एका रात्रीं माझें काव्यगायन ठरविलें. माधवराव पटवर्धन त्यावेळीं बोर्डिंगचे सुपरिंटेंडट असून काव्यगायनाचे वेळीं आपल्या खोलींतच होते. पण ते माझ्या काव्यगायनास बोलावणें असूनही हजर राहिले नाहींत. यामुळें माधवराव हे एक तुसडे व घमेंडखोर गृहस्थ आहेत असा माझा ग्रह झाला व तो बरींच वर्षें राहिला. १९२२ सालीं दिवाळीच्या सुमारास कवि यशवंत व कवि गिरीश यांनीं आपला 'वीणाझंकार' हा सुंदर कवितासंग्रह ता. १८।१०।१९२२ रोजीं मला दिवाळीची भेट म्हणून दिला. दोन कवींचा संयुक्त कवितासंग्रह ही त्यावेळीं अभिनव कल्पना होती आणि 'वीणाझंकार'ची छपाई, कागद व बांधणी अत्यंत आकर्षक होती. या संग्रहांतील आपल्या कविता यशवंत व गिरीश यांनीं शाळाकॉलेजांत गाऊन दाखवून लोकप्रिय केल्या. या कवितांतील भावना सामान्यतः यौवनसुलभ असल्यानें कविता विद्यार्थीप्रिय झाल्या. आधुनिक कविता शाळाकॉलेजांत गाऊन दाखवून विद्यार्थीप्रिय करण्याचें श्रेय सर्वस्वीं यशवंत व गिरीश यांना आहे. त्यापूर्वी कवि सुमंत व कवि आनंदराव टेकाडे आपल्या कविता सभासंमेलनात गात असत, पण ते शाळाकॉलेजात फारसे गेले नाहींत. शिवाय टेकाडे यांच्या काव्यगायनात त्यांचा खडा आवाज हेंच प्रमुख अंग होतें आणि सुमंताची काव्यगायनपद्धति मुळींच आकर्षक नव्हती. यानंतर कांहीं वर्षें यशवंत व गिरीश ही जोडी काव्यगायनाच्या क्षेत्रात रामलक्ष्मणाप्रमाणें अभेद्य राहिली; पण त्यांचें यश पाहून अनेक तकलुपी काव्यगायक पुढें सरसावले. काव्यगायन करण्याइतका आवाज सुरेल असो वा नसो, अगर गावयाच्या कवितेंत काव्य असो वा नसो, सभासंमेलनात काव्यगायनाला ऊत आला आणि काव्यगायन म्हणजे एक चेष्टेचा विषय झाला. काव्यगायनाच्या या अतिरेकी प्रथेंतूनच आचार्य अत्रे यांचीं 'झेंडूचीं फुलें' जन्माला आलीं. याच सुमारास महाराष्ट्राचे तत्त्वज्ञानी कादंबरीकार व एक थोर साहित्यिक प्राध्यापक वामन मल्हार जोशी यांचा मला परिचय झाला. पुण्याच्या एका मुक्कामात

मी व माझे नवोदित कविमित्र द. अ. शुक्ल एका रात्रीं हिंगणे येथें माझे मित्र व तेथील शिक्षक श्री. गो. रा. चोळकर यांचेकडे मुक्कामास होतों. जवळच्याच खोलींत वामनराव जोशी राहत होते. त्यांचा व माझा परिचय होतांच त्यांनीं त्या रात्रीं विद्यार्थिनींसमोर माझें काव्यगायन करविलें. प्रा. जोशी हे फार प्रेमळ, सज्जन व विनोदी गृहस्थ होते. दुसरे दिवशीं सकाळीं चोळकर यांच्या घरासमोरील हिरवळीवर मी व शुक्ल विडी ओढत, गप्पा मारीत बसलों होतों. कोणाला दिसू नये म्हणून घराकडील बाजूकडे आम्ही पाठी करून बसलों होतों. मागून वामनराव आमच्याकडे केव्हा आले तें आम्हास कळलें नाहीं. माझ्याजवळ आल्यावर माझ्या पाठीवर हलकेच थाप मारून वामनराव मला म्हणाले, "कविराज, आम्हांला एक झुरका द्या कीं!" मी थोडासा खजिल झालों. कारण माझें विडी ओढणें वामनरावाना माहीत व्हावें, अशी माझी इच्छा नव्हती. कारण त्याच्याबद्दल मला फार आदर वाटत होता. पण वामनरावानीं खेळीमेळीनें ती वेळ सहज मारून नेली. मात्र माझ्या डबींतून एक लवंगी विडी काढून घेऊन ती त्यांनीं शिलगावलीच. त्यानतर मी पुण्यास केव्हांही गेलों तरी वामनरावाना अगत्यपूर्वक भेटत असे. १९३६ सालीं ते सांगलीस विलिंग्डन कॉलेजात आले असतांना बुधगांवास माझे घरीं भोजनास आले होते. तेथील शाळेंत त्यांचें एक व्याख्यानही झालें. माझ्या काव्याबद्दल बोलणें निघालें असतां 'स्फूर्तिलहरीं'त एकही प्रेमकविता नसल्याबद्दल त्यानीं आश्चर्य व्यक्त केलें. तेव्हां 'काव्यविहार' या माझ्या पहिल्या काव्यसग्रहांतील प्रेमकविता वाचण्याची मीं त्याना विनति केली. वर उल्लेखिलेल्या पुण्याच्या मुक्कामात महाराष्ट्राचे प्रथितयश कादबरीकार, सपादक व टीकाकार श्री. ग. त्र्य. माडखोलकर याच्या घरीं जाऊन मी त्यांना भेटलों होतों असें स्मरतें. माडखोलकर त्यावेळीं ज्ञानप्रकाशाच्या वाङ्मय-पुरवणीचे सपादक होते. त्यानतर त्याची व माझी भेट झालेली नाहीं. पण ते माझे एक आवडते लेखक आहेत.

## 'काव्यविहार' प्रकाशन

सन १९२३ च्या फेब्रुआरी महिन्यात 'काव्यविहार' हा माझा पहिला काव्यसग्रह प्रसिद्ध झाला व महाराष्ट्ररसिकानीं या सग्रहाचें चागलें

स्वागत केलें. संग्रहाची छपाई मनोरंजन छापखान्यांत झाली होती आणि छापखान्याचे मालक श्री. दामोदर रघुनाथ मित्र यांनीं माझे व मनोरंजनचे पूर्व ऋणानुबंध लक्षांत घेऊन छपाईचें काम सुबक व वक्तशीर केलें. या प्रकाशनाबाबत त्यावेळीं एक मजेदार हकीगत घडली, ती नमूद करणें जरूर आहे. काव्यविहारप्रकाशनाचे विचार मनांत घोळत असतांना एकदां मी पुण्यास गेलों असतां स्वतःचीं व स्वतःच्या बगलबच्चांचीं दोन तीन पुस्तकें प्रकाशित करून प्रकाशक बनलेले एक प्रकाशक मला म्हणाले, "काव्य-विहारचें प्रकाशन मी आनंदानें करीन." खर्चाची गोष्ट निघताच ते म्हणाले, "छपाई, बायडिंग, जाहिरात वगैरे सर्व खर्च तुम्ही करा. प्रकाशक म्हणून मला जी प्रतिष्ठा आहे तिच्या बळावर आम्ही पुस्तक खपवूं. खर्च वजा जातां फायदा झाला तर निम्मा तुम्ही घ्या व निम्मा मला द्या. तोटा झाला तर अर्थात् तुम्ही सोसा." मी लागलीच त्यांना म्हणालों, "सर्व खर्च मी करणेचा तर एकाद्या आंधळ्यालासुद्धां मी प्रकाशक करीन. तुमच्या प्रतिष्ठेवर माझें पुस्तक खपावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं, यापेक्षां पुस्तक न खपलें तरी चालेल. होईल तो तोटा मी हौसखात्यास खर्च लिहीन." आणि योगा-योगाची गोष्ट अशी कीं, काव्यविहारचे प्रकाशक म्हणून मी माझे मावसबंधु कै. यशवंत दत्तात्रय गोखले यांचें नांव घातलें ते गोखले प्रकाशनाचे वेळीं संपूर्ण आंधळे होते! काव्यविहारचें प्रकाशन यशस्वी झालें. बहुतेक नियतकालिकांत त्यावर चांगले अभिप्राय आले. डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें या संग्रहाला पारितोषिक दिलें आणि पुढें ना. दा. ठाकरसी विद्यापीठाच्या एका परीक्षेसाठीं तें पाठ्यपुस्तक होतें असे मला माझे मित्र कै. प्रा. बापूसाहेब चापेकर यांच्याकडून कळलें होतें. १९२९ सालीं मुंबई विद्यापीठानें मॅट्रिकसाठीं तयार केलेल्या मराठी वेच्यांत या संग्रहांतील 'धर्म बुडतो काय?' हा सवाल संपादक प्रा. गो. वि. तुळपुळे यांनीं घेतला होता. काव्यविहारचे प्रकाशनापूर्वीं कांहीं दिवस विलीन इचलकरंजी संस्थानचे अधिपति कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा व माझा परिचय कविमित्र भास्करराव चंदूरकर यांच्या प्रयत्नामुळेंच झाला होता. काव्यविहारच्या प्रकाशनास श्रीमंतांनीं थोडेसें आर्थिक साहाय्य दिलें

होतें व कवितावर अभिप्रायहि दिला होता. तो अभिप्राय ' काव्यविहार ' संग्रहांत समाविष्ट आहे.

## रविकिरण मंडळ

याच सुमारास पुणे येथें रविकिरण मंडळाची स्थापना झाली होती. प्रारभीं या मडळांत कवि माधव जुलिअन, कवि यशवंत, कवि गिरीश, श्री. ग. त्र्य. माडखोलकर, नाट्यछटाकार कै. दिवाकर, श्री. द. ल. गोखले, श्री. रानडे व कै. सौ. मनोरमाबाई रानडे एवढे सभासद होते. ही सर्व मडळी दर रविवारीं श्री. रानडे यांच्या घरीं जमत असत व चहापानाच्या वेळीं साहित्यचर्चा विशेषतः काव्यचर्चा होत असे. या मडळाचें नांव प्रारभीं सन्‌ टी. क्लब ( Sunday Tea Club ) हें होतें व यांतूनच रविकिरण मडळ जन्माला आलें. या मडळाचें सुदैव हें कीं, माधव जुलियन, यशवंत, गिरीश यांच्यासारखे पहिल्या दर्जाचे कवी, श्री. माडखोलकर याच्यासारखे प्रसिद्ध कादबरीकार व टीकाकार आणि दिवाकरांसारखे नाट्यछटाकार मडळाला सभासद म्हणून लाभले. वरीलपैकीं प्रत्येक कवीनें आपल्या कविता मडळापुढें वाचाव्यात व श्री. माडखोलकर, श्री. रानडे व सौ. रानडे यानीं त्यावर चर्चा करून सुधारणा सुचवाव्यात, असा क्रम चाले. यामुळें प्रत्येक कवीची कृति तावूनसुलाखून निघे. या मडळाचा एक विशेष म्हणजे त्यांतील कोणीही सभासद पुढें एकमेकाचे शत्रु अगर निंदक झाले नाहींत. कांहीं काळानें माडखोलकर व दिवाकर मडळातून बाहेर पडले व श्री. विठ्ठलराव घाटे मंडळात समाविष्ट झाले. पुढें या मडळानें किरण, शलाका, वगैरे लहानलहान कवितासग्रह प्रसिद्ध केले. त्यात मडळाच्याच कवींच्या कविता होत्या. या प्रकाशनांनीं साहित्यप्रांतांत खूपच खळबळ उडाली. मडळातील कवींपैकीं माधव जुलियन यांची कविता वेगळ्या वळणाची होती. वैयक्तिक प्रेमभावनेचा उघडउघड आविष्कार त्याच्या कवितेंत होता. त्याचप्रमाणें गझल वगैरे परकीय रचनाप्रकार व फारशी, उर्दू वगैरे शब्दांचा सर्रास उपयोग त्यानीं केला होता. यामुळें कै. बाळकृष्ण अनत भिडे यांच्यासारख्या त्यावेळच्या प्रमुख काव्यटीकाकारानें मडळांतील

-कवींच्या काव्यावर टीकेची झोड उठविली आणि माधव ज्युलिअन यांना 'प्रणय पढरीचा वारकरी' ही पदवी बहाल केली! माधव जुलियन यांची खाजगी वागणूक अत्यंत सोज्ज्वळ, मनमोकळी, पण तत्कालीन सामाजिक विचारांना धक्के देणारी होती. या वृत्तीचे परिणाम त्यांना पुढें कांहीं काळ भोगावे लागले व त्याची थोडीशी झळ रविकिरण मंडळालाही लागली. रविकिरण मंडळाच्या कवींपैकीं माधव जुलियन हे विक्षिप्त, लहरी, पण खरेखुरे क्रांतिवादी कवि होते. उत्कट प्रेमाची अगर विरहाची भावना उघडउघड कवितेत व्यक्त करण्याची प्रथा गोविंदाग्रजांनीं मराठी कवितेंत सुरू केली, तिचा भरपूर विकास माधवरावांनीं केला. काव्यरचनेच्या बाबतींत मंडळा-तील कवींनीं अनेक नवेनवे प्रयोग केले. माधवरावांनीं गझल, दोहा, वगैरे रचनाप्रकाराचा भरपूर वापर केला. इंग्रजींतील Sonnet या प्रकाराला सुनीत हें सुटसुटीत नाव देऊन मंडळांतील कवींनीं बरींच सुनीतें लिहिलीं व मंडळापैकीं यशवंत व गिरीश यांनीं आपल्या कविता शाळाकॉलेजांत व सभांत गाऊन दाखवून मराठी कवितेचा खूप प्रचार केला. यामुळें महाराष्ट्ररसिकांत तर खळबळ उडालीच, पण ठिकठिकाणच्या कविमंडळांतही टीकेचे सूर निघू लागले. खानदेशांत त्यावेळीं असलेले एक विक्षिप्त कवि कै. एकनाथ यादव निफाडकर यांनीं रविकिरण मंडळाच्या विरुद्ध एक आघाडी उघडण्याचा मनसुबा केला व मला पत्र लिहिलें कीं, " पुण्याचें रविकिरणमंडळ ही एक कंपूशाही आहे. इतर ठिकाणच्या कवींनीं या कंपूशाहीविरुद्ध आघाडी उघडली पाहिजे. त्याशिवाय हे किरणेकवि ( रविकिरण मंडळाचा ' किरण ' हा छोटा काव्यसंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला होता. ) वटणीवर येणार नाहींत. " त्यांनीं मला असेंही सुचविलें कीं, या आघाडीचें नेतृत्व मीं स्वीकारावें. मीं निफाडकरांना सविस्तर उत्तर पाठवून कळविलें कीं, " रविकिरण मंडळाच्या कवींनीं केलेली काव्यनिर्मिति अभिनव व मोलाची आहे. कविताविषय व रचना यांत वेगळेपणा असला तरी तो प्रयोगावस्थेंत आहे. त्याची योग्य किंमत काळच ठरवील. रविकिरण मंडळांत मला कंपूशाही मुळींच दिसत नाहीं. पुण्याच्या रविकिरण मंडळाप्रमाणें तुम्हींही एखादें चंद्रकिरण मंडळ खानदेशांत खुशाल स्थापन करा व तुमच्या कवितांचा प्रचार करा. तुम्ही म्हणतां तशी आघाडी उघडण्याची मला

मुळींच आवश्यकता वाटत नाहीं व कदाचित् तुम्हीं अशी आघाडी उघडलीत तरी तींत मी सामील होऊं शकत नाहीं. कारण रविकिरण मंडळांतील कांहीं कवी माझे स्नेही आहेत." आघाडीचें नेतृत्व स्वीकारण्याबद्दल निफाडकरांनीं मलाच कां लिहावें याचें कारण मी शोधू लागलों, तेव्हां मला दिसून आलें कीं, त्या वेळच्या विद्यमान मराठी कवींपैकीं मराठीच्या प्राध्यापकाचें काम करणारा मीच एक आधुनिक कवि होतों. पुण्याबाहेरील कवींचा हा विरोध पुढें लौकरच थंडावला, पण या विरोधाचे सूर कांहीं नियतकालिकांतूनही त्यावेळीं उमटल्याचें मला स्मरतें. रविकिरण मंडळाच्या कवींपैकीं माधव जुलियन, यशवंत व गिरीश या कवींनीं पुढें भरपूर व मोलाची काव्यरचना केली. मंडळाच्या सदस्यांपैकीं माधव जुलियन, यशवंत, माडखोलकर व वि. द. घाटे हे मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षही झाले. रविकिरण मंडळाच्या पूर्वीं व नंतर महाराष्ट्रांत अनेक कविमंडळें स्थापन झालीं व लयालाही गेलीं; पण जवळ जवळ तीस वर्षें एकजुटीनें कार्य करून मोलाची साहित्यसेवा करणारें रविकिरण मंडळ, हें एकमेव मंडळ आहे. सन १९२० ते सन १९५० या कालखंडात रविकिरण मंडळानें एक स्वतंत्र कालखंड निर्माण केला आहे. हा कालखंड सामान्यतः सन १९२३ ते १९३५ हा आहे. रविकिरण मंडळानें एक कविपरंपराही निर्माण केली आहे. त्यावेळीं उदयास आलेल्या कवींपैकीं श्री. गोपीनाथ, श्री. ग. ह. पाटील व श्री. ग. ल. ठोकळ हे कवि रविकिरण मंडळाच्या कविपरंपरेंतील आहेत, असें माझें मत आहे.

सन १९२५ च्या मार्चपर्यंत मीं विलिंग्डन कॉलेजात प्राध्यापकाचें काम केलें. त्या काळांत मी मराठी व दुसरी भाषा घेऊन एम्. ए. व्हावें व डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नोकरींत जावें म्हणून प्रि. भाटे यांनीं मला अनेक वेळा सुचविलें होतें; पण मला तें जमणें शक्यच नव्हतें. कारण मी करीत असलेली मामलतदाराची नोकरीच इतकी दगदगीची होती कीं, ती सांभाळून कॉलेजांत काम करणेंच जड जात होतें. आठवड्यातील पहिले तीन दिवस सांगलीची कॉलेजची खेप व पुढील चार दिवसात तालुक्यांतील गावीं बैलगाडींतून फिरती, हा व्याप सतत तीन वर्षें मीं केला, पण या श्रमांचा ताण मजवर अतिशय पडून, सन १९२५ च्या मार्च महिन्यांत

अपचन व रक्तक्षय यानीं माझी तब्येत बरीच बिघडली व मी माझे मित्र डॉ. साठे यांचेकडे बेळगांवास उपचारासाठीं गेलो. डॉ. साठे हे सन १९२१ मध्यें M. B. B S होऊन बेळगावात प्रॅक्टिस करीत होते. त्यांच्या उपचारानीं माझ्या प्रकृतीस पुष्कळ आराम वाटला; पण नोकरी सांभाळून पुन्हा कॉलेजात काम करणें मला शक्य वाटलें नाहीं व मी जून महिन्यात प्रि. भाटे याना तसें कळविलें. यामुळें सन १९२५ च्या जूनपासून श्री. द. ल. गोखले हे माझ्या जागीं मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले. कॉलेजच्या प्रत्यक्ष कामातून मी निवृत्त झालों तरी तेव्हापासून आजतागायत विलिंग्डन कॉलेजशीं माझे संबंध आत्मीयतेचे आहेत. सन १९२६ च्या फेब्रुवारी महिन्यांत मिरजमळा संस्थानातील गुडगेरी या कानडी तालुक्यात मामलतदार म्हणून माझी बदली झाली. तेथें मी सुमारें दहा महिने होतों. या काळांत माझ्या सभोंवतीचें मराठी वातावरण काहीं काळ नाहीसें झालें व मराठी पुस्तकाच्या वाचनात कांहीं काळ व्यत्यय आला; पण याचा मोबदला मला भावनाप्रधान व प्रेमळ कर्नाटकवासीयांच्या सहवासानें मिळाला व या अल्पकाळांत मी गुडगेरी व लक्ष्मेश्वर येथें काहीं जिवाभावाचे मित्र जोडले. सन १९२६ च्या नवबरांत मिरजमळा संस्थानचा सबजज्ज म्हणून माझी नेमणूक होऊन मी बुधगावास परत आलों.

सन १९२७ ते सन १९२९ मे या काळात माझ्याकडून विशेष कवितालेखन झालें नाहीं, पण या काळांत मीं वाचन मात्र खूप केलें. रामदासाची बहुतेक कविता मीं या काळांत वाचली. याशिवाय Count Leo Tolstoy, Thomas Hardy, Emil Zola व Hall Caine यांच्या बहुतेक कादंबऱ्या मीं वाचल्या. यामुळें माझ्या विचाराचें क्षेत्र विस्तृत झालें. तोंपर्यंत फक्त सामाजिक अन्याय हाच माझ्या बहुतेक कवितांचा विषय होता. पण नतरच्या अनेक कवितांत राजकीय पारतंत्र्य, आर्थिक विषमता, साम्यवाद व श्रमजीवि वर्गाची हीन परिस्थिति, हे माझ्या कवितेचे विषय झाले. सन १९२९ च्या मे महिन्यापासून माझें कवितालेखन जोमानें सुरू झालें. 'सदानद' व 'हरिणीप्रत' या दोन कविता मीं मे महिन्यांत लिहिल्या व त्या लौकरच मनोरंजनांत प्रसिद्ध झाल्या.

## खंडाळी

यानंतरच्या माझ्या वाङ्मयीन जीवनात 'खंडाळी' या रम्य खेड्याला महत्त्वाचें स्थान आहे. 'खंडाळी' हें गांव हल्लीं सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यांत आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें विलीन होण्यापूर्वीं मिरजमळा संस्थानांतील तें एक तालुक्याचें गांव होतें. सबजज म्हणून मला या गावाला वर्षांतून तीन वेळां जावें लागे व प्रत्येक वेळीं तेथें दहा दिवस मुक्काम असे. माझ्या मुक्कामाची व कोर्टाची इमारत खंडाळी गांवापासून पूर्वेस एक फर्लांगावर असून तेथील वातावरण निवांत व निसर्गरम्य होतें. भोंवतालच्या दोन तीन मळ्यांतील मोटांची कुरकुर, तेथील कडुलिंबाच्या गार सावलींत बसून ऐकण्यांत मला मोठी मौज वाटे व तेथेंच माझ्या कवितालेखनाला बहर येत असे. 'स्फूर्तिनिनाद' मधील 'माझी मैणीण' या कवितेंत खंडाळीचें व या रम्य ठिकाणाचें वर्णन आलें आहे. सन १९२९ ते सन १९३५ या काळातील माझ्या बहुतेक कविता याच ठिकाणीं लिहिलेल्या आहेत; आणि सन १९२९ च्या नवबर महिन्यानें तर निर्मितीचा उच्चांक गांठलेला आहे. ता. २२ ते ता. २६ नवबर या सहा दिवसांत उत्तरांतील किडे, पाळीव पोपटास, मंजुळा, इषारा, या चार कविता मीं लिहिल्या आहेत. यांपैकीं 'पाळीव पोपटास' ही कविता त्या काळात विशेष गाजली. "हे डाळिंबाचे दाणे वेड्या! घात तुझा करिती" ही या कवितेची पहिली ओळ त्यावेळीं अनेकांच्या तोंडीं होती, असें मला स्मरतें. 'केसरी' सारख्या श्रेष्ठ व वजनदार वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यामुळें 'पाळीव पोपटास' ही कविता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत घुसली होती. तो दडपशाहीचा काळ होता आणि कवितेंतील रूपक परतंत्र हिंदुस्थान व ब्रिटिश राजसत्ता यांना ततोतंत लागू पडणारें होतें. यामुळें माझ्यासारख्या एका संस्थानी नोकरानें ही कविता लिहावी व ती केसरींत प्रसिद्ध करावी याचें पुष्कळांना आश्चर्य वाटलें. माझ्या अनेक स्नेह्यांनीं, परिचितांनीं व अपरिचितांनींही मुद्दाम पत्रें पाठवून आपणास कविता आवडल्याचें कळविलें व कांहींनीं ही कविता कदाचित् जप्त होईल, अशी भीति व्यक्त केली. मला कायद्याचें चांगलें ज्ञान असल्यानें मी मात्र निश्चित होतों. 'पाळीव पोपटास'

ही कविता एक यशस्वी अन्योक्ति असल्यानें कायद्याच्या चौकटींत ती ततोतत बसणें शक्यच नव्हतें. मिरजमळा संस्थानचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब यांनीं मला एकदां मुद्दाम बोलावून, 'पाळीव पोपटास' ही कविता ऐकण्याची इच्छा दर्शविली व मी लागलीच ती कविता त्याना चालीवर गाऊन दाखविली. कविता आपणांस अतिशय आवडल्याचें श्रीमंतांनीं सांगितलें. पुन्हां दोन दिवसांनीं मला बोलावून ते म्हणाले, "ही कविता राजकीय आहे असे कारभारी म्हणतात व मलाही तसेंच वाटतें. कारण पिंजरा म्हणजे ब्रिटिश राजसत्ता व पोपट म्हणजे हिंदुस्थान असा अर्थ होऊ शकेल." हें ऐकून मी चकित झालों, पण लागलीच उत्तर दिलें कीं, "पिंजरा म्हणजे ब्रिटिश सत्ता आणि पोपट म्हणजे हिंदुस्थान हे अर्थ कोणत्याही कोशात सापडणार नाहींत, आणि तसेंच पहावयाचें तर पिंजरा म्हणजे संस्थानी सत्ता आणि पोपट म्हणजे संस्थानी नोकर असाही अर्थ होऊ शकेल आणि ही कविता कोणत्याही संस्थानी नोकराला व मलाही लागू पडेल." मी पुढें असेंही सांगितलें कीं, "कविता राजकीय आहे असें कारभारी म्हणत असतील तर तें खरें नाहीं. शिवाय मी कॉलेजात मराठीचा प्राध्यापक म्हणून काम केलेलें असल्यानें कविता राजकीय ठरवितांना सरकारला विचार करावा लागेल. शिवाय ही कविता सरकारला खरोखरच आक्षेपार्ह वाटत असली तर सरकारी काळ्या यादींत ( Black List ) माझें नांव गेलेंच असेल. या बाबतींत कोल्हापुरच्या रेसिडेंटकडून कांहीं विचारणा झालीच, तर माझा खुलासा घेऊन आपण तो रेसिडेंटकडे पाठवा. काय परिणाम होईल तो होऊदे. फारतर आपण माझा बचाव करू नका म्हणजे झालें." हें उत्तर ऐकून श्रीमंत स्तब्ध झाले व पुढेंही कवितेच्या बाबतींत काहींही न घडता, हें वादळ आपोआप शांत झालें. मात्र या वेळेपासून श्रीमंत व त्यांचे अधिकारी माझ्याकडे एका विशिष्ट दृष्टीनें पाहू लागले. याच वेळीं हेंही नमूद करणें जरूर आहे, कीं श्रीमंत बाबासाहेब यांनीं माझ्या लेखनाचे बाबतींत वाजली चौकशी कधींही केली नाहीं. माझ्या कविता सत्ताविरोधी व धनिकविरोधी आहेत असें त्याना अनेकांनीं अनेकवेळा सांगितलें, पण त्यांनीं तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. श्रीमंताना साहित्याची आवड नसल्यानें त्यांनीं मला प्रोत्साहन दिलें नाहीं, हें स्वाभाविकच होतें. पण

त्यानीं मला त्रास दिला नाहीं हेंही विशेषच होतें. माझ्या अनेक स्नेह्यानीं मला वारंवार विचारलें आहे कीं, "बुधगांवात राहून तुम्हीं 'उबरांतले किडे', 'जगाचा न्याय' अशा कविता कशा लिहू शकलां?" या बाबतींत मी नेहमीं एकच उत्तर देत आलों आहें कीं, "मी बुधगांव संस्थानांत होतों म्हणूनच अशा कविता लिहूनही नोकरींत राहूं शकलों. ब्रिटिश मुलुखांत अगर इतर कुठल्याही संस्थानात नोकरी करून अशा कविता लिहिणें शक्यच नव्हतें."

## राजरत्न मानेपाटील

याच सुमारास बडोदा संस्थानांतील नायब दिवाण व हुजूर सेक्रेटरी राजरत्न रामराव शामराव मानेपाटील याचा व माझा परिचय झाला. बुधगावाजवळ कवलापूर म्हणून एक गांव आहे तें मानेपाटील यांच्या मामाचें गाव असून, तासगाव तालुक्यातील विसापूर या खेड्यांत त्यांची शेतवाडी आहे. यामुळें दर दोन वर्षांनीं मुद्दाम रजा घेऊन ते कवलापुरास येत असत, व मुद्दाम मला भेटत असत. मानेपाटील हे कै. सयाजीराव महाराजाचे सेक्रेटरी व मोठे अधिकारी म्हणून सर्वांना परिचित आहेत; पण ते एक साहित्यप्रेमी गृहस्थ असून, लेखकही आहेत. 'सीता' या नावाची त्यांची एक मराठी कादंबरी प्रसिद्ध आहे. बडोदे राज्यात मराठी साहित्याला जो उदार पुरस्कार लाभला होता, त्याचें थोडेंसें श्रेय श्री. मानेपाटील याना होतें. स्वभावानें ते अत्यत प्रेमळ, बहुश्रुत व विनोदी गृहस्थ आहेत. अधिकाराचा ताठा त्यांच्या वागणुकींत मला केव्हाही आढळला नाहीं. बुधगावास मी असतांना त्यांच्या कवलापुरच्या मुक्कामांत त्यांच्या व माझ्या अनेक भेटी होत असत. मी सांगलीस आल्यानंतर अलीकडे सहा महिन्यापूर्वीं श्री. मानेपाटील कवलापुरास आले असताना सांगलीस मुद्दाम माझ्या घरीं येऊन गेले. माझ्याकडे ते येतील त्या प्रत्येक वेळीं माझी 'जगाचा न्याय' ही कविता मी त्यांना गाऊन दाखविणेची, हा फार वर्षांचा ठरलेला क्रम आहे. त्याप्रमाणें परवाही त्यानीं ही कविता अगत्यपूर्वक ऐकली. माझ्याबद्दल अत्यंत आपुलकी बाळगणाऱ्या माझ्या मित्रात, या रुबाबदार व दिलदार गृहस्थाची गणना आहे.

## यशवंत मासिकांत

सन १९२९ च्या नाताळात मी पुण्यास गेलों असताना आचार्य अत्रे यांची भेट झाली. अत्रे त्यावेळीं जोगेश्वरीच्या बोळांतील एका घरांत राहत होते. थोड्या गप्पागोष्टी झाल्यावर मीं माझी 'उबरातले किडे' ही नुकतीच लिहिलेली कविता त्यांना वाचून दाखविली. त्याना ती विशेष आवडल्यानें त्यानीं ती माझ्याकडून लिहून घेऊन यशवत मासिकाच्या सपादकाकडे पाठविली व लवकरच ती यशवतमध्यें प्रसिद्ध झाली. यापुढें मी यशवत मासिकांत नियमितपणें कविता देऊं लागलों. सन १९२९ ते सन १९३५ या सहा वर्षांत 'उबरातले किडे', 'जगाचा न्याय', 'मोटेवरचें गाणें', 'कृष्णेच्या पुलावरून', 'राजकन्या हिंदिया' वगैरे माझ्या कविता यशवतमध्यें आल्या आहेत. श्री. स. आ. जोगळेकर हे या काळात यशवतचे सपादक होते व श्री. वीरकर हे मालक होते; पण या उभयतांचा प्रत्यक्ष परिचय मला झाला नाहीं. यशवत हें त्या काळांत एक अग्रेसर मराठी मासिक होतें. अनेक नवोदित कवि, कथाकार व लेखक यांचा परिचय यशवतनेंच प्रथम महाराष्ट्राला करून दिला. महाराष्ट्राचे एक विख्यात कथालेखक, प्रकाशक व प्रसाद मासिकाचे सध्यांचे सपादक श्री. य. गो. जोशी याना यशवतनेंच प्रथम प्रकाशांत आणलें. यशवंतनें ठेवलेल्या एका लघुकथास्पर्धेत श्री. य. गो जोशी यांच्या 'शेवग्याच्या शेंगा' या कथेला पहिलें पारितोषिक मिळालें आणि यशवतराव एकदम प्रथितयश कथाकार झाले.

## सौ. मालतीबाई दांडेकर

सन १९२९ च्या उत्तरार्धांत बुधगांवचे विद्याधिकारी राव. दांडेकर यांच्या पत्नी या नात्यानें सौ. मालतीबाई दांडेकर बुधगांवास आल्या व थोड्याच दिवसात त्यांचा व माझा परिचय झाला. या परिचयात त्यांना मराठी वाङ्मयाची आवड व लेखनाची हौस असल्याचें मला दिसून आलें. बुधगावच्या सकुचित व सनातनी वातावरणांत आमची साहित्यचर्चा रोज

होणें शक्य नसलें, तरी त्यांची व माझी मधूनमधून भेट होई त्यावेळीं आम्ही साहित्यचर्चा करीत असूं. १९३५ सालीं त्यांचा 'कथामालती' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. महाराष्ट्रांत त्याकाळीं लेखिका विशेष नसल्यानें त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहाचें महाराष्ट्राकडून कौतुक झालें. त्यानंतरच्या गेल्या वीस वर्षांत कादंबऱ्या, लघुकथा, निबंध, बालवाङ्मय वगैरे विपुल साहित्य मालतीबाईंनीं निर्माण केलें आहे. लोकगीतांसंबंधीं त्यांचा एक ग्रंथही अलीकडे प्रसिद्ध झाला असून, एक विचारवंत व समाजहितैषी लेखिका म्हणून त्यांनीं चांगला लौकिक संपादन केला आहे. शिक्षण विशेष नसतांना व बुधगांवसारख्या रूक्ष व आडगांवीं राहूनही सौ. मालतीबाईंनीं केलेली साहित्यसेवा कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. त्यांच्या साहित्याचा विस्तार खूप आहे. विचारांची खोली जसजशी वाढेल तसेंतसें अधिकाधिक सकस साहित्य त्यांच्याकडून निर्माण होईल आणि मराठी साहित्यांत मोलाची भर पडेल. आहे त्या स्वरूपांतही त्यांनीं निर्मिलेलें वाङ्मय कमी मोलाचें नाहीं.

## प्रा. ना. सी. फडके

सन १९३० च्या एप्रिल महिन्यात मी कोल्हापुरास गेलों असतां प्रा. ना. सी. फडके यांच्या घरीं जाऊन त्यांना भेटलों. त्यांचा व माझा पूर्वपरिचय नव्हता. ते रत्नाकर मासिकाचे संपादक झाले तेव्हां रत्नाकरसाठीं कविता देण्याबद्दल त्यांनीं मला पत्र पाठविलें होतें. त्यानंतर त्यांचे लेख व रत्नाकरांत क्रमशः प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या दोन सुंदर कादंबऱ्या मीं आवडीनें वाचल्या होत्या. पण प्रत्यक्ष परिचय याच वेळीं व्हावयाचा होता. प्रा. फडके त्यावेळीं रंकाळ्याच्या रस्त्यावर चंद्रकांत मंदिराजवळील एका घरांत राहत होते. ते सहसा कोणाची भेट घेत नाहींत व भेटले तरी तुसडेपणानें वागतात, असें माझ्या कांहीं कविमित्रांनीं मला सांगितलें होतें. मी घरांत जातांच प्रथम मी आल्याचें कळवून, दबकतच त्यांच्या माडींत प्रवेश केला. त्यांनीं माझें सहास्य स्वागत करून मला अत्यंत प्रेमानें वागविलें. चहा व सिगारेट झाल्यावर ते लिहीत असलेल्या 'प्रतिभासाधन' या ग्रंथाचें पहिलें प्रकरण त्यांनीं मला वाचून दाखविलें. प्रा. फडके यांच्याबद्दल

८२२३ दा. क्र. ५१

मीं ऐकिलें होतें त्यापेक्षां अगदीं वेगळा अनुभव मला आला. त्यावरून मीं तर्क केला कीं ते कामात असतांना कोणीतरी अतिप्रसंगी माणूस अगोदर न कळवितां सरळ त्यांच्या माडींत शिरला असेल आणि साहजिकच ते त्याच्याशीं तुटकपणानें वागले असतील. यानंतरच्या ऑगस्ट महिन्यांत किर्लोस्करवाडीस भरलेल्या लेखक-संमेलनात त्यांचा व माझा अधिक परिचय झाला. नंतरच्या काळात त्यांच्या व माझ्या गांठीभेटी फारशा झाल्या नाहींत. पण त्यांचे व माझे संबंध स्नेहभावाचे आहेत. गेल्या दोन वर्षांत त्यांच्या अंजलीच्या दिवाळी व वासंतिक अंकात माझ्या दोन कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

## किर्लोस्करांचीं मासिकें

सन १९३० च्या एप्रिलचे सुमारास किर्लोस्कर मासिकाशीं कवि म्हणून माझा संबंध जमून आला. किर्लोस्करसाठीं कवितेची मागणी श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं पूर्वीच मजकडे केली होती व माझी एक कविता किर्लोस्करांत आलीही होती, पण मी त्या मासिकात नियमितपणें लिहीत नव्हतों. माझे मित्र श्री. ना. धों. ताम्हनकर हे नुकतेच किर्लोस्कर मासिकाच्या कचेरींत संपादकीय खात्यांत नोकर झाले होते. ते व मी सांगली हायस्कुलांत वर्गबंधु असल्यानें त्यांचा व माझा चांगला परिचय होता. ताम्हनकरांचें मला एकदा पत्र आलें कीं, " तुमच्या कविता किर्लोस्करवाडी-वरून पुणेंमुंबईकडे जातात, त्यांतील कांहीं किर्लोस्करवाडीस उतरतील तर आभारी होऊं. " त्यांची ही आपुलकीची मागणी मीं तात्काळ मान्य केली. ता. १६।१७ ऑगस्ट १९३० रोजीं किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं किर्लोस्करच्या लेखकांचें व कवींचें एक स्नेहसंमेलन भरविलें होतें. त्या संमेलनास मी गेलों होतों. प्रा. ना. सी. फडके, सौ. मनोरमाबाई फडके, सौ. शांताबाई नाशिककर, श्री. बाबूराव पेंटर, श्री. वामनराव देशपांडे, श्री. गोपीनाथपंत तळवलकर, श्री. र. कृ. चिंचलीकर, प्रा. सत्यबोधराव हुदलीकर वगैरे साहित्यिक या संमेलनास हजर होते. प्रा. फडके यांनीं प्रतिभासाधनचीं पहिलीं तीनचार प्रकरणें

उपस्थितांना वाचून दाखविली. सायंकाळीं मासिकाच्या धोरणाबद्दल चर्चा झाली व रात्रीं प्रा. ना. सी. फडके यांचें समाजमंदिरांत व्याख्यान झालें. अशा रीतीनें हें संस्मरणीय स्नेहसमेलन पार पडलें. वर उल्लेखिलेल्या साहित्यिकांचा मला साहजिकच परिचय झाला. सन १९३० च्या किर्लोस्करच्या दिवाळी अंकात 'मान्यांच्या मुलखा' ही माझी कविता प्रसिद्ध झाली. यानंतर किर्लोस्कर व स्त्री या मासिकांत मी नियमितपणें कविता-लेखन करूं लागलों व इतर मासिकांशीं असलेले माझे संबंध क्रमाक्रमानें कमी होऊं लागले. किर्लोस्कराच्या मासिकांत मी कविता देऊं लागल्यावर पुणें मुंबई-कडील माझ्या कांहीं मित्रांनीं पत्रद्वारां मला विचारलें कीं, "उद्योग, उत्साह व आत्मोन्नति यांचा प्रचार करणाऱ्या या लोखंडी मासिकांत तुम्ही कविता कां लिहितां ?" मीं त्यांना कळविलें कीं, "खडबडीत महाराष्ट्राचाच मी कवि आहे आणि खडबडीत सातारा जिल्ह्यात माझा जन्म आहे. चिंचा, कवठें, वांगी व मक्याचीं कणसें हीं आमचीं फळें आहेत आणि बाभळ, लिंब व वड हीं आमचीं झाडें आहेत. या झाडाप्रमाणें व फळाप्रमाणें माझी कविताही दणकट आहे! तिला लोखंडी किर्लोस्कर मासिकेंच योग्य आहेत !" यानंतर गेल्या पंचवीस वर्षांत किर्लोस्करांच्या मासिकानीं क्रमाक्रमानें लोकप्रियता मिळविली असून, किर्लोस्कर, स्त्री व मनोहर हीं मासिकें आज मराठी मासिकांच्या आघाडीवर आहेत. महाराष्ट्राचे प्रथितयश कादंबरीकार, लघुकथालेखक, निबंधकार व कवि आज या मासिकाना हौसेनें लेखनसाहाय्य करीत आहेत. किर्लोस्कर मासिकांचे व माझे संबंध सन १९३० पासून आजतागायत ऋणानुबंधाचे आहेत. किर्लोस्करांच्या तिन्ही मासिकांत मीं कांहीं किरकोळ गद्यलेखन केलें असलें तरी प्रामुख्यानें मी या मासिकाचा कवीच आहे. गेल्या पंचवीस वर्षांत अनेक कवींनीं व कवयित्रींनीं किर्लोस्करांच्या मासिकांत काव्यलेखन केलें असलें तरी सतत पंचवीस वर्षें कवि म्हणून या मासिकाशीं संबंध असलेला मीच आहें, अशी माझी समजूत आहे. बुधगांवसारख्या एका खेडेवजा बाजूच्या गांवीं एकाद्या स्थानबद्धा-प्रमाणें माझी उमेदीची हयात गेली असूनही बृहन्महाराष्ट्रांतील व परदेशां-तीलही हजारों वाचकांना मी नांवानें परिचित आहें, याचें श्रेय सर्वस्वीं

किर्लोस्करांच्या तीन्ही मासिकाना आहे. या मासिकांचे व माझे संबंध केवळ व्यवहारापुरते नाहींत. ते आपुलकीचे आहेत व ते तसेच राहतील.

## कै. प्रा. माधवराव पटवर्धन

सन १९३२ च्या आरंभास कै. प्राध्यापक माधवराव पटवर्धन (माधव जुलियन) यांचा दृढ परिचय माझे कविमित्र गिरीश यांच्यामुळें घडून आला. माधवराव हे एक तुसडे व घमेंडखोर गृहस्थ आहेत, असा तोंपर्यंत माझा समज होता. फर्ग्युसन कॉलेजचा संबंध सुटल्यावर कांहीं काळ खानदेशांत शिक्षकाची नोकरी करून सन १९२७ च्या सुमारास माधवराव कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजात इंग्रजी व पर्शियनचे प्राध्यापक म्हणून आले होते. ता. ६।११।१९३१ रोजीं बुधगाव येथील इंग्रजी शाळेच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कवि गिरीश माझ्याकडे बुधगावास दोन दिवस आले होते. माझ्या कांहीं कविता त्यांनीं माझ्या तोंडून ऐकल्या व माझ्या कविता गेय नसल्या तरी माझें काव्यवाचन परिणामकारक होतें, असें त्यांनीं मला सांगितलें. गिरीश म्हणाले, “कोल्हापुरास माधवराव पटवर्धन यांनीं रसिक व कवि यांचें एक मंडळ जमविलें आहे. तुम्ही माधवरावांकडे जरूर जा.” मी त्याला नकार देऊन म्हणालों, “माधवराव घमेंडखोर व तुसडे आहेत त्यांचें व माझें मुळींच जमणार नाहीं.” गिरीश म्हणाले, “माधवरावाबद्दल तुम्हीं विनाकारण गैरसमज करून घेतला आहे. तुम्ही जरूर त्यांच्याकडे जा. मी त्यांना लिहितों. मग तुमचा अनुभव मला कळवा.” गिरीश फक्त एवढें बोलूनच थांबले नाहींत; बुधगांवाहून परत गेल्यावर त्यानीं लागलीच माधवरावांना पत्र लिहिलें आणि सन १९३२ च्या मार्च महिन्यात माधवरावांनीं मला आग्रहपूर्वक पत्र लिहून कोल्हापुरास आपलेकडे बोलाविलें. त्याप्रमाणें एका शनिवारीं सायंकाळीं मी त्यांच्याकडे गेलों. माधवराव त्यावेळीं वरुणतीर्थ वेशीजवळ नाडगौडा यांचे घरीं राहत होते. या दोन दिवसांच्या मुक्कामांत माधवराव माझ्याबरोबर अत्यंत प्रेमळपणानें व मोकळेपणानें वागले. आपले कविमित्र विरागी व डॉ. रा. चिं. श्रीखंडे यांच्याकडे ते मला मुद्दाम घेऊन गेले व त्यांचा व माझा परिचय करून

दिला. तेथील शाहूपुरी पोस्टाचे पोस्टमास्तर श्री. खंडोपंत कुलकर्णी, त्यांचे काव्यगायक जामात श्री. नणदीकर व त्यांची काव्यप्रेमी कन्या सौ. लीला नणदीकर यांचाही माधवरावांनीं मला परिचय करून दिला. रविवारीं रात्रीं माधवरावांच्या घरीं माझें काव्यगायन झालें. त्यावेळीं खंडोपंत कुलकर्णी, त्यांचे बंधु चिंतोपंत, जामात, कन्या व खंडोपंतांच्या पत्नी एवढी मंडळी हजर होती. श्री. खंडोपंत कुलकर्णी यांचा व माझा परिचय पुढें क्रमाक्रमानें वाढत जाऊन त्याची परिणति आतां स्नेहांत झाली आहे. खंडोपंत कोल्हापुरास शाहूपुरी पोस्टांत असताना मी अनेक वेळां त्यांच्याकडे गेलों होतों. प्रत्येक वेळीं माझें खासगी काव्यगायन त्यांच्या घरीं होई व त्यांचे सर्व कुटुंबीय तें प्रेमानें ऐकत असत. अशाच एका काव्यगायनाचे प्रसंगीं श्री. बापूराव शालिग्राम यांचा व माझा परिचय झाला होता. खंडोपंतांचें घर म्हणजे माझें हक्काचें घर असें त्यावेळीं मला वाटे आणि अजूनही वाटतें. हल्लीं सेवानिवृत्त होऊन पुण्यास ते आपले चिरंजीवाकडे राहत आहेत. यामुळें त्यांची व माझी भेट पुष्कळ वर्षांत झालेली नाहीं. पोस्टखात्यात सारी हयात घालवूनही साहित्यप्रेमी व साहित्यिक असलेले गृहस्थ म्हणजे राव. र. छ. जोशी, श्री. खंडोपंत कुलकर्णी, मिरजेचे कवि वि. गो. साठ्ये व कै. आनंदीरमण हर्षे हे होत.

सन १९३२ ते सन १९३९ या काळांत माझा व प्रा. माधवराव पटवर्धन यांचा स्नेह उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला आणि त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू मला अगदीं जवळून पाहता आले यामुळें त्यांच्याबद्दल माझ्या मनात असलेले गैरसमज नाहींसे झाले. पुढेंपुढें तर मला कळून आलें कीं, माधवराव कोणाबरोबर तुसडेपणानें वागत असले तर ते तुसड्या वृत्तीमुळें नसून, स्वाभिमानाच्या तीव्र जाणिवेमुळें होय. उज्ज्वल प्रतिभा, अविश्रांत व्यासंग आणि जाज्वल्य तत्त्वनिष्ठा यांचा सुंदर संगम माधवरावांत झाला होता. याच्याच जोडीला अत्यंत साधी व निगर्वी वागणूक हाही त्यांचा एक स्वभावविशेष होता. त्याचाही मला एकदां अनुभव आला. सन १९३५ च्या सप्टेंबरांत मी एकदां माधवरावांच्या बोलावण्यावरून कोल्हापुरास गेलों होतों. लौकरच प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या 'स्फूर्तिलहरी' या काव्य-

संग्रहातील कांहीं कवितांच्या जातींचीं व चालींचीं नांवें मला माधवरावांकडून घ्यावयाचीं होतीं व माधवरावांनीं मला हस्तलिखितें घेऊन बोलाविलें होतें. त्याप्रमाणें त्यांना आगाऊ पत्र पाठवून मी एका सायंकाळच्या गाडीनें कोल्हापुरास गेलों. कोल्हापुरच्या स्टेशनवर हसतमुख माधवरावांना पाहून मी चकित झालों. स्टेशनवर मुद्दाम येण्याचें कारण विचारतां माधवराव म्हणाले, "तुम्ही शाहूपुरींत उतरणार आहात व उद्यां सकाळीं आठ वाजतां ट्रेनिंग कॉलेजांत तुमचें काव्यगायन आहे. रात्रीं मला वेळ आहे. तेव्हां रात्रीं तुमच्या कविता वाचून जातींचीं व चालींचीं नांवें लिहीन आणि सकाळीं सहज फिरत शाहुपुरींत तुमचे बिऱ्हाडीं येऊन तुमची वही परत करीन. म्हणजे तुमचा गांवांत येण्याचा हेलपाटा वाचेल." माधवराव बोलल्याप्रमाणें अक्षरशः वागले व सकाळीं मी निजून उठण्याच्या आंत शाहुपुरींत येऊन त्यांनीं माझी वही परत दिली. वहींतील जरूर त्या कवितांवर त्यांनीं जातींचीं व चालींचीं नांवें लिहिलीं होतीं. या काळांत माधवराव अनेक वेळां बुधगावास माझ्याकडे आले होते व मीही त्यांच्याकडे गेलों होतों. एकदा हुरड्याच्या मोसमांत ते माझ्याकडे आले असतांना, एका रविवारीं सायंकाळीं मी त्यांना हरीपूर येथील एका मळींत मक्याचा हुरडा खाण्यास घेऊन गेलों. मळींतील सुंदर हिरवळीवर हिरव्या-गार कणसांचा ढीग पडलेला होता व जवळच पेटलेल्या शेवरीच्या व काट्यांच्या फेसांवर कांहीं कणसें भाजलीं जात होतीं हें दृश्य पाहून माधवरावांना आनंद झाला. त्यांनीं भाजलेलीं बरींच कणसें आवडीनें खाल्लीं. मंडईंतून मोजकीं पांच सहा शिळीं कणसें विकत घेऊन घरांत भाजून खाणाऱ्या शहरी माधवरावांना मळींतील तें दृश्य विलोभनीय होतें. त्यांना बेकल्याच्या (पाण्यांत भिजवून काढलेले जोंधळे) कण्या फार आवडत असत. केव्हांही बुधगावास येण्यापूर्वीं ते मला पत्रानें कळवीत कीं, "तुमच्या मातोश्रींना कण्या करावयास सांगा." सन १९३६ ते १९३९ या काळांत माधवरावांचें कवितालेखन मंदावलें होतें व भाषाशुद्धि व पांडित्य यांकडे ते अधिक झुकूं लागलें होते. 'छंदोरचना' हा त्यांचा विद्वन्मान्य ग्रंथ याच काळांतील असून, मुंबई विद्यापीठाची डी. लिट्. पदवीही त्यांना याच काळांत मिळाली होती. याच काळांत ते एका कविसंमेलनाचे व साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले होते.

सन १९३९ च्या जुलई ऑगस्टांत लिव्हरच्या विकारानें त्यांची तब्येत एकाएकी बिघडून ते विश्रांतीसाठीं व उपचारासाठीं रजा घेऊन पुण्यास गेले होते व देक्कन जिमखान्यावरील आपल्या ' निवांत ' बंगल्यांत राहत होते. सन १९३९ च्या आक्टोबरअखेरीस मी पुण्यास गेलों असतां, एका सकाळीं ' निवांत ' बंगल्यांत जाऊन त्यांना भेटलों. दारातच महाराष्ट्राचे धन्वंतरी डॉ. भडकमकर मला भेटले. माधवरावांचें दुखणें असाध्य असल्याचें त्यांनीं सांगतांच मला धक्काच बसला ! मी आंत गेलों. तेथें खिडकीजवळील कॉटवर माधवराव पडलेले होते व त्यांच्या पत्नी सौ. लीलाबाई स्पंजानें त्यांचें अंग स्वच्छ करीत होत्या. एकाकाळीं गुबगुबीत असलेलें त्यांचें शरीर त्यावेळीं केवळ अस्थिपंजर उरलेलें होतें व शरीराची कांति फिकट व पिवळी दिसत होती. साऱ्या आयुष्यभर संकटांशीं बेडरपणें झगडणारा वीर आतां शरपंजरीं पडला होता. मला पाहताच माधवराव क्षीणपणानें हसून म्हणाले, " मुद्दाम भेटायला आलात. आभारी आहे. " मींही थोडेसें बोलून त्यांना धीर दिला. " थोडें बरें वाटताच हवा पालटण्यासाठीं तुमच्याकडे धारवाडला येईन " असें माधवराव म्हणाले व मींही होकार दिला. अत्यंत व्याकुळ चित्तानें मीं त्यांची शेवटची भेट घेतली व परतलों. त्यानंतर सुमारें एक महिन्यानें मी गुडगेरी तालुक्यांत फिरतीवर गेलों असतां ता. २९ नवंबर १९३९ रोजीं माधवरावांचें देहावसान झाल्याचें मीं वृत्तपत्रांत वाचलें व सर्व दिवसभर मला चैन पडलें नाहीं. माधवरावांच्या मृत्यूनें मराठी वाङ्मयाची विशेषतः काव्य-वाङ्मयाची अपरिमित हानि झाली. माधवराव रविकिरण मंडळाचे रवि होते व सूर्याप्रमाणेंच ते तेजस्वी व प्रखर होते. ते हाडाचे खरे कवि होते. कितीही परिश्रम निरलसपणानें करण्याची त्यांची प्रवृत्ति होती. पण जगाच्या दृष्टीनें व्यवहारी होणें त्यांना कधींच जमलें नाहीं. यामुळें त्यांना अतिशय मनस्ताप सहन करावा लागला. आंतरिक भावना कोणतीही असली तरी व्यवहारासाठीं कांहीं वेळां हंसावें लागतें व कांहीं वेळा डोळ्यांत खोटीं आसवेंही आणावीं लागतात. माधवरावांना व्यवहाराच्या नांवाखालीं दडलेला हा दंभ मान्य नव्हता. जगाबद्दलच्या त्यांच्या कांहीं भावना ' तेथें चल राणी ' या त्यांच्या सुप्रसिद्ध कवितेंत व्यक्त झाल्या आहेत.

## कोल्हापुरचें साहित्यसंमेलन

सन १९३२ च्या डिसेंबर अखेरीस कोल्हापुरास ' महाराष्ट्र साहित्य-संमेलन ' भरलें होतें. त्या संमेलनास मी गेलों होतों. माझ्या एकांतप्रिय स्वभावामुळें सभासंमेलनें मला फारशीं मानवत नाहींत व शक्यतों तीं टाळण्याचाच मी प्रयत्न करतों. यामुळें कोल्हापुरच्या संमेलनात मी फारसा मिसळू शकलों नाहीं. या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड हे होते, पण ते स्वतः संमेलनास हजर राहणार नसून, त्याचें भाषण त्यांचे हुजूर सेक्रेटरी व माझे मित्र राजरत्न मानेपाटील हे वाचणार होते व मानेपाटलांच्या आग्रहामुळेंच मी या संमेलनास गेलों होतों. संमेलनासाठीं माझे मित्र सरदार किबे, सौ. कमलाबाई किबे, आचार्य अत्रे, कवि यशवंत, कवि गिरीश, कवि भास्करराव तांबे वगैरे प्रमुख साहित्यिक उपस्थित होते. स्थानिक कवींपैकीं कवि माधव जुलियन व कवि विरागी उपस्थित होते. या संमेलनास जोडून एक कविसंमेलनही भरविलें होतें व त्याचे अध्यक्ष कविवर्य तांबे हे होते. संमेलन दरबारी थाटात पार पडलें. मात्र गावात त्यावेळीं प्लेग असल्यामुळें संमेलनाचा मंडप व सर्व प्रतिनिधि निवास गावाबाहेर नवीन राजवाड्याच्या बाजूस होते. संमेलनाच्या वेळात माझा व कविवर्य तांबे यांचा परिचय आचार्य अत्रे यांनीं उभाउभी करून दिला, पण त्यांचा व माझा दृढ परिचय अखेरपर्यंत झाला नाहीं. इच्छा असूनही ज्यांचा व माझा दृढ परिचय अखेरपर्यंत झाला नाहीं, असे गेल्या पिढींतील कै. कविवर्य तांबे हे एकमेव कवि होत. सन १९४३ च्या नवंबरात सांगलीस भरलेलें साहित्यसंमेलन वगळलें, तर मी हजर होतों असें कोल्हापुरचेंच एकमेव साहित्यसंमेलन होय.

सन १९३२ सालीं कोल्हापुरच्या कांहीं पूर्वपरिचित कवींचा निकट परिचय व काहींचा नवीन परिचय मला घडला व या परिचयाची स्नेहांत परिणति झाली. हे कवी म्हणजे कवि विरागी, डॉ. रा. चिं. श्रीखंडे व कवि वासुदेवसुत कोरेकर हे होत. कवि विरागी ( प्रा. ग. श्री. हुपरीकर ) व डॉ. श्रीखंडे यांचा परिचय पूर्वींच प्रा. माधवराव पटवर्धन यांनीं करून

दिला होता. पुढें माझे विद्यार्थीमित्र श्री. ने. न. दोशी हे कागल हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना हा परिचय दृढ झाला. प्रा. हुपरीकर हे संस्कृतचे खोल अभ्यासक असून, त्याच विषयाचे नामवंत प्राध्यापक आहेत. ज्ञानेश्वरीचा त्यांचा व्यासंग फार वर्षांचा आहे. त्यांची कविताही भावपूर्ण व सरस आहे. 'मधुसंभार' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. अलीकडे त्यांचें कवितालेखन स्थगित झालेलें दिसतें. भिडस्त स्वभाव व प्रसिद्धि-पराङ्मुख वृत्ति यांमुळें कवि म्हणून महाराष्ट्राला ते विशेष परिचित झाले नाहींत. स्वभावानें ते अत्यंत प्रेमळ व आतिथ्यशील आहेत. कवि विरागी यांच्याप्रमाणेंच डॉ. रा. चिं. श्रीखंडे हेही प्रेमळ व आतिथ्यशील गृहस्थ आहेत. त्यांचा कविता-व्यासंग फार वर्षांचा आहे. त्यांची स्वतंत्र कविता 'वाङ्मय-श्रीखंड' या श्रीखंडे कुटुंबीयांच्या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झाली आहे. सुश्लोक-मेघ, सुश्लोकगोविंद, सुश्लोककुमार हीं त्यांचीं संस्कृत महाकाव्यांचीं रूपांतरें प्रसिद्ध असून, रसिकमान्य आहेत. मराठी वृत्तें व भाषा यांच्यावरील त्यांचें प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. तुलसी रामायणाचीं रूपांतरें ते अलीकडे खंडशः प्रसिद्ध करीत असून, तींही रसिकमान्य झालेलीं आहेत. पेशानें डॉक्टर असून साहित्यसेवा करणारे बेळगांवचे डॉ. साठे व मुंबईच्या साहित्य-संघाचे कर्णधार डॉ. भालेराव यांच्याप्रमाणेंच डॉ. श्रीखंडे हेही एक साहित्यिक डॉक्टर आहेत. कवि वासुदेवसुत कारेकर यांचा व माझा प्रथम परिचय माझे विद्यार्थीमित्र श्री. दोशी यांनीं करून दिला. श्री. दोशी कागल हायस्कूलचे मुख्याध्यापक असतांना श्री. कारेकर त्याच शाळेंत शिक्षक होते. त्यांचें शिक्षण विशेष नसलें तरी त्यांना साहित्याची चांगली आवड आहे. कारेकरांची कविता साधी व सुबोध आहे. स्फुट कवितालेखन ते अद्याप करीत असून, 'शतोपदेश' हें त्यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. प्रथमपासून त्यांचा व माझा घरोबा आहे व त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें आजही तो अबाधित आहे. इचलकरंजीचे कवि काव्यशेखर यांचा व माझा विशेष परिचय याच सुमारास झाला. त्यांचीही कविता सुबोध असून, त्यांचा एक काव्यसंग्रहही प्रसिद्ध झाला आहे. अलीकडे त्यांनीं काव्यलेखन केलेलें पहावयास मिळालें नाहीं.

वर उल्लेखिलेल्या कोल्हापुरच्या कवींचा विशेष परिचय ज्यांच्यामुळें झाला ते श्री. ने. न. दोशी हे विलिंग्डन कॉलेजांतील माझे पहिले विद्यार्थी होते. सन १९३३ च्या सुमारास कागल हायस्कुलात ते मुख्याध्यापक झाल्यावर त्यांच्या निमंत्रणावरून मी मुद्दाम कागलास गेलों होतों १९४०।४१ सालीं कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील ट्रेनिंग कॉलेजात ते प्राध्यापक असतांना मी त्यांच्याकडे गेलों होतों. त्यांच्या पत्नी कै. सौ. फुलबाई या साहित्यप्रेमी व पुरोगामी विचारसरणीच्या आतिथ्यशील गृहिणी होत्या. यामुळें श्री. दोशी यांच्या घरीं मला स्वतःच्या घरीं असल्याप्रमाणें मोकळेपणा वाटत असे. श्री. दोशी हे सध्यां सांगली हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत. माझ्याबद्दल व माझ्या काव्याबद्दल त्यांना अत्यंत आपुलकी वाटते. विलिंग्डन कॉलेजातील माझ्या विद्यार्थ्यांपैकीं आजतागायत माझा स्नेह असलेले श्री. दोशी हे एकमेव विद्यार्थी आहेत. कविमित्र महादेव भिमाजी कुलकर्णी यांचा विशेष परिचय मला सन १९३४ च्या प्रारंभास झाला. सन १९२१ सालीं कोल्हापुरास भरलेल्या कविसंमेलनात ते मला प्रथम परिचित झाले. त्यानंतर त्यांचीं अनेक ठिकाणीं स्थित्यंतरें होऊन सन १९३४ चे प्रारंभीं ओगलेवाडीच्या शाळेंत शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. ता. २९।४।१९३४ रोजीं मी व माझे मित्र श्री. दोशी व श्री. कारेकर मिळून त्यांच्या निमंत्रणावरून ओगलेवाडीस गेलों होतों. तेथें रात्रीं माझें काव्यगायन झालें व श्री. कुलकर्णी यांनींही आपल्या कांहीं कविता म्हणून दाखविल्या. त्यापैकीं 'ओझेवाला' व 'मानधनाची व्याकुलता' या कविता मला विशेष आवडल्या. श्री. कुलकर्णी यांचा आवाज सुरेल असून त्यांची कविता म्हणण्याची पद्धति आकर्षक आहे, यामुळें त्यांचें काव्यगायन परिणामकारक होतें. त्यांचें काव्यलेखनही विपुल आहे. पण त्यांच्या कविता अद्याप एकाद्या संग्रहांत एकत्रित झालेल्या नाहींत यामुळें व त्यांच्या प्रसिद्धिविन्मुख स्वभावामुळें महाराष्ट्राला ते कवि म्हणून व्हावे तितके परिचित झालेले नाहींत. श्री. कुलकर्णी स्वभावानें गोड, मितभाषी व आतिथ्यशील आहेत. त्यांचा आणखी एक विशेष म्हणजे पत्रव्यवहारात ते अत्यंत व्यवस्थित आहेत व आपली दैनंदिनी ते रोज नियमानें लिहितात. माझा हा जीवनवृत्तांत

लिहितांना त्यांच्या दैनंदिनीचा व त्यांच्याकडील पत्रांचा मला थोडासा उपयोग झालेला आहे. सुमारें दोन वर्षांपूर्वी त्यांचा षष्ठ्यब्दिपूर्तिसमारंभ माझे कविमित्र माधवराव मगसुळीकर यांच्या प्रयत्नामुळें खासगी रीतीनें सांगलींत साजरा झाला. त्यावेळीं मी, गिरीश, कऱ्हाडचे बाबूराव गोखले, कवि बाबूराव घाटे, कवि बुधकर, कवि विष्णुसुत उंब्रजकर व कवि माधवराव मगसुळीकर वगैरे साहित्यिक उपस्थित होते. श्री. कुलकर्णी हल्लीं पुणें येथें स्थायिक झाले आहेत.

सन १९३४ च्या ऑगस्ट महिन्यात कऱ्हाडच्या रसिकांना माझा प्रथम परिचय माझे मित्र श्री. बाळासाहेब पाठक यांच्यामुळें झाला. श्री. पाठक हे फर्ग्युसन कॉलेजांत माझे वर्गबंधु होते. पण त्यांचा निकट परिचय त्यावेळीं झाला नव्हता. श्री. पाठक हे थोडेसे लेखक व कवि असले तरी एक साहित्यप्रेमी व कलाप्रेमी रसिक शिक्षक म्हणूनच ते कऱ्हाड-वासीयांना परिचित आहेत. सन १९३४ च्या ऑगस्टात प्रथम मी त्यांच्याकडे गेलों आणि या पहिल्याच मुक्कामांत त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या प्रेमळ व अगत्यपूर्ण वागणुकीमुळें मला त्यांचें घर आपले घराप्रमाणें वाटू लागलें. याच मुक्कामात श्री. पाठक हे शिक्षक असलेल्या टिळक हायस्कुलात माझें काव्यगायन झालें. एका रात्रीं श्री. पाठक यांच्या घरींही माझें काव्यगायन झालें. त्यावेळीं कऱ्हाडचे समाजभूषण बाबूराव गोखले, श्री. बाबूराव घाटे, आमदार गणपतराव आळतेकर यांचा व माझा परिचय झाला. कऱ्हाडवासीयांनीं आजवर माझ्याबद्दल व माझ्या काव्याबद्दल जी आपुलकी ठेविली आहे तिचें श्रेय श्री. पाठक यांना आहे. माझे आणखी एक साहित्यप्रेमी मित्र श्री भय्याशास्त्री वाटवे हे हल्लीं कऱ्हाडास वास्तव्य करून आहेत. ते एक उत्कृष्ट हिंदी भाषातज्ज्ञ व हिंदीचे शिक्षक आहेत. माझ्या काहीं कवितांचीं त्यांनीं हिंदींत केलेलीं रूपांतरें हिंदी नियतकालिकांत प्रसिद्ध झालीं आहेत.

माझ्या वाङ्मयीन जीवनांत सन १९३५ हें वर्ष अनेक घडामोडींचें गेलें. माझा पहिला काव्यसंग्रह ‘ काव्यविहार ’ प्रकाशित होऊन बारा वर्षें होऊन गेलीं होतीं. सन १९३२ ते १९३५ या काळात पुणें, सोलापूर,

पंढरपूर, कोल्हापूर, कागल, कऱ्हाड, चिकोडी, बेळगांवे, हुबळी, धारवाड, गदग, इस्लामपूर, सांगली व मिरज या ठिकाणीं माझीं काव्यगायनें झालीं होतीं व यांपैकीं प्रत्येक ठिकाणच्या रसिकांनीं व स्नेह्यांनीं माझ्या नवीन काव्यसंग्रहाबद्दल पृच्छा केली होती. मनोरंजन, यशवंत व विशेषतः किर्लोस्कर व स्त्री या मासिकांतून माझ्या कविता प्रसिद्ध होत होत्या व माझें नाव बृहन्महाराष्ट्रांत परिचित झालें होतें यामुळें महाराष्ट्रांतून अनेक ठिकाणाहून माझा नवीन काव्यसंग्रह केव्हा प्रकाशित होणार याबद्दलचीं पत्रें मला आलीं होती. यामुळें 'स्फूर्तिलहरी' नावाचा दुसरा काव्यसंग्रह स्वतःच प्रकाशित करण्याचें मीं ठरविलें. माझ्या पहिल्या काव्यसंग्रहाला कोणाचीच प्रस्तावना नव्हती यामुळें स्फूर्तिलहरीला कोणातरी सुप्रसिद्ध साहित्यिकाची प्रस्तावना घ्यावी असें मला वाटलें. याच सुमारास माझे विद्यार्थीमित्र श्री. दोशी बी. टी. च्या अभ्यासासाठीं कोल्हापुरास राहिले होते त्यांच्याकडे मी गेलों असतांना त्यांनीं प्रस्तावनालेखक म्हणून श्री. वि. स. खांडेकर यांचे नांव सुचविलें व तें मला तात्काळ मान्य झालें.

## श्री. वि. स. खांडेकर

श्री. वि. स. खांडेकर त्यावेळीं रत्नागिरी जिल्ह्यांतील शिरोडे येथील शाळेचे चालक व शिक्षक होते. कादंबरीकार, टीकाकार व लघुकथालेखक म्हणून त्यांनीं थोड्याच अवधींत चांगलें नाव मिळविलें होतें. खांडेकर व मी दोघेही सांगलीच्याच परिसरात लहानाचे मोठे झालों होतों. ते सांगलीस राहत होते व मी हरीपुरास राहत होतों व आम्ही दोघेही एकाच वेळीं सांगली हायस्कूलचे विद्यार्थी होतों. यामुळें त्यांच्याबद्दल मला अत्यंत आपुलकी वाटत होती. त्यांचा व माझा विशेष स्नेह त्यावेळीं नव्हता. सन १९२७ च्या सुमारास 'रंकाचें राज्य' हें त्यांचें नाटक कुरुंदवाडच्या नाट्यकलाप्रसारक मंडळीनें बसविलें होतें. त्याचा प्रयोग सांगलीच्या सदासुख थिएटरांत झाला त्या प्रयोगास त्यांच्या निमंत्रणावरून मी गेलों होतों. या पूर्वपरिचयामुळें खांडेकरांची प्रस्तावना माझ्या नवीन काव्यसंग्रहास घेऊन आम्हां उभयतांमधील स्नेहभाव वृद्धिंगत करावा असें मीं ठरविलें.

त्याप्रमाणें त्याना पत्र लिहितांच प्रस्तावना लिहिण्याचें त्यानीं मान्य केलें व मी नवीन काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाच्या तयारीस लागलों.

## पंडित सातवळेकर

सन १९३५ च्या मार्च महिन्यात मी औंध येथें पंडित सातवळेकर यांच्याकडे त्यांच्या निमंत्रणावरून गेलों होतों. औंधास माझा दोन दिवस मुक्काम होता. वैदिक वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन करणाऱ्या महाराष्ट्राच्या या थोर महर्षींनीं मला अत्यंत प्रेमळपणानें वागविलें. तेथील सरकारी अन्नाबाईचे देवालयांत एका सायंकाळीं माझें काव्यगायन झालें. त्यावेळीं श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, श्री. सौ. राणीसाहेब, राजकुमार आप्पा-साहेब पंत, अधिकारीवर्ग व विद्यार्थी बहुसंख्येनें उपस्थित होते. माझे मित्र श्रीयुत शंकरराव किर्लोस्कर या काव्यगायनास हजर होते. रात्रीं श्रीमंत बाळासाहेब यानीं मला वाड्यांत अगत्यपूर्वक बोलावून माझ्या 'उंबरातले किडे' व 'जगाचा न्याय' या कविता आपणांस विशेष आवडल्याचें सांगितलें. याच वेळीं 'स्फूर्तिलहरी' हा माझा आगामी कवितासंग्रह स्वतःला अर्पण करून घेण्याची व काव्यसंग्रहावर अभिप्राय देण्याची मीं श्रीमंत बाळासाहेब याना विनंति केली, ती त्यानीं मान्य केली. पंडित सातवळेकर यांच्यासारख्या तेजस्वी व कलावंत महर्षींचा दोन दिवसांचा सहवास मला स्फूर्तिदायक वाटला. पुढें त्याच वर्षीच्या गणेशोत्सवात व्याख्यान देण्यासाठीं पंडितजी माझ्याकडे बुधगांवास आले होते. श्रीमंत बाळासाहेबां-सारख्या साहित्यप्रेमी व कलाप्रेमी संस्थानाधिपतींचा परिचय व पुरस्कार मला केवळ पंडितजींच्या कृपेमुळेंच लाभला होता. याच सुमारास बदलापुरचे ज्येष्ठ साहित्यिक श्रीयुत नानासाहेब चापेकर यांचा परिचय मला औंध येथें घडला. नानासाहेब त्यावेळीं औंध संस्थानच्या हायकोर्टाचे न्यायाधीश होते. यामुळें त्यांच्या अनेक गाठीभेटी होऊन साहित्यविषयक बोलणेंही झालें होतें. बुधगांवचे डॉ. बापट यांच्याकडे नानासाहेब अनेक वेळां आले त्या त्या प्रत्येक वेळीं मला मुद्दाम बोलावून घेऊन त्यांनीं माझ्या लेखनाबद्दल चौकशी केली होती. अलीकडे सन १९४७ नंतर त्यांची व माझी भेट

झालेली नाहीं. सन १९३५ च्या एप्रिल महिन्यांत इस्लामपूर येथील शारदा मंडळाची स्थापना माझ्या हस्तें झाली. श्री. खान नावाचे एक विद्वान मुसलमान गृहस्थ त्यावेळीं इस्लामपूरचे सबजज्ज होते. श्री. खान हे साहित्यप्रेमी होतेच, पण ते एक नामवंत उर्दू लेखक व कवि होते. त्यांच्या प्रोत्साहनामुळें शारदा मंडळाची चांगलीच वाढ त्या काळांत झाली होती. श्री. ज. पां. चिटणीस व श्री. गाडगीळ हे तरुण वकील शारदा मंडळाचे उत्साही कार्यवाह होते. सन १९३५ ते १९४० या काळांत इस्लामपुरच्या शारदा मंडळांत माझीं अनेक काव्यगायनें झालीं होतीं. माझे मित्र श्री. कृ. भा. बाबर यांचा प्रथम परिचय मला इस्लामपुरच्या शारदा मंडळातच झाला.

## कै. गीतावाचस्पति भिडेशास्त्री

सन १९३५ च्या ऑगस्ट महिन्यात पुण्याच्या गीताधर्ममंडळाचे चालक गीतावाचस्पति व वेदांतवाचस्पति कै. सदाशिवशास्त्री भिडे यांचा व माझा निकट परिचय घडून आला. शास्त्रीबुवा मूळचे तासगाव तालुक्यातील सोनी गांवचे रहिवासी होते. व्याकरण व वेदांत यांचें अध्ययन करण्यासाठीं ते लहानपणींच हरीपुरास येऊन राहिले व तेथेंच देवी येऊन त्यांच्या दोन्ही डोळ्यांना संपूर्ण अंधत्व आलें. तथापि केवळ श्रवणेंद्रियाचा उपयोग करून अचाट बुद्धिमत्तेच्या बळावर शास्त्रीबुवांनीं गीता व उपनिषदें यांचा गाढ अभ्यास करून त्यांत पारंगतता मिळविली. हरीपुरास असतांना आमच्या कुटुंबीयांशीं त्यांचा घरोबा होता. पुढें शास्त्रीबुवांनीं पुण्यास जाऊन गीताधर्ममंडळाची स्थापना केली व अनेक दूरदूरच्या ठिकाणीं दौरे काढून गीताधर्ममंडळासाठीं द्रव्यसाहाय्य मिळविलें. कै. लोकमान्य टिळक यांचा 'गीतारहस्य' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर त्यांची व लोकमान्यांची चर्चा झाली होती, असें मीं ऐकिलें होतें. कै. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर हे शास्त्रीबुवांचे स्नेही, चाहाते व गीताधर्ममंडळाचे साहाय्यक होते. शास्त्रीबुवांचा व माझा परिचय झाला त्यावेळीं गीताधर्ममंडळाची कचेरी सदाशिव पेठेंतील हौदासमोरील इमारतींत होती व तेथेंच शास्त्रीबुवा राहत होते.

सन १९३५ मधील गणेशोत्सवांत बुधगांवचे अधिपति श्रीमत बाबासाहेब यांच्या निमंत्रणावरून शास्त्रीबुवा बुधगांवास पांच दिवस प्रवचनासाठीं आले होते व माझ्या घरींच राहिले होते. माझ्या मातोश्रींचा व त्यांचा पूर्वपरिचय असल्यानें त्यांना आमच्या घरीं मुळींच परकेपणा वाटला नाहीं. शास्त्रीबुवांची वाणी अस्खलित, ओघवती व प्रासादिक होती, यामुळें त्यांचें प्रवचन ऐकत असतांना श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध होत असे. बुधगांवच्या या मुक्कामांत त्यांनीं माझ्या बहुतेक कविता माझ्या तोंडून ऐकल्या. त्याच गणेशोत्सवांत सांगली येथील सिटी हायस्कुलांत शास्त्रीबुवांच्या अध्यक्षतेखालीं माझें जाहीर काव्यगायन झालें. काव्यगायनांत "मान्यांच्या मुलास" ही माझी कविता मीं शेवटीं म्हणावी, असें शास्त्रीबुवांनीं सुचवून ठेविलें होतें. अध्यक्षीय भाषणांत याच कवितेचें त्यांनीं सुंदर रसग्रहण केलें आणि, भाषणाच्या ओघांत कवितेच्या अनेक ओळी बरोबर उद्धृत केल्या. शास्त्रीबुवांची अचाट स्मरणशक्ति पाहून श्रोत्यांना अचंबा वाटला. केसरीच्या संपादक-वर्गांपैकीं श्री. तात्यासाहेब करंदीकर यांचा व शास्त्रीबुवांचा चांगला स्नेह होता. पुढें लौकरच गीताधर्ममंडळांत श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं माझें काव्यगायन झालें व त्यांच्या हस्तें एक जरीचें वस्त्र व श्रीफल मंडळाचा प्रसाद म्हणून मला शास्त्रीबुवांनीं दिलें या काव्यगायनास केसरीचे बहुतेक संपादक, संगीत चुडामणि विनायकराव पटवर्धन व त्रिकाळकार शि. ल. करंदीकर वगैरे हजर होते. स्फूर्तिलहरींतील सर्व कविता माझ्या तोंडून ऐकून भिडेशास्त्री यांनीं दिलेला अभिप्राय त्या काव्यसंग्रहांत समाविष्ट आहे. पुण्याच्या याच मुक्कामांत त्यावेळचे नवोदित कवि श्री. गोपीनाथपंत तळवलकर व 'रानजाई'कर्ते श्री. ग. ह. पाटील यांचा मला विशेष परिचय झाला. याच सुमारास विलिंग्डन कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक असलेले श्री. रा. श्री. जोग यांचाहि मला परिचय झाला. आपल्या 'अर्वाचीन मराठी कविता' या पुस्तकांत माझ्या कवितेचा योग्य परामर्श त्यांनीं घेतला आहे. सन १९३० ते १९४० या दहा वर्षांत प्रा. पारसनीस व प्रा. जोग हे दोन मराठीचे प्राध्यापक विलिंग्डन कॉलेजांत एकामागून एक होते आणि त्या कॉलेजांतील मराठी शाखेच्या वाढीस या उभयतांचें फार साहाय्य झालेलें आहे. सन १९३५ च्या आक्टोबरांत मी पुण्यास

गेलों असतां प्रा. गो. वि. तुळपुळे यांचा व माझा विशेष परिचय झाला. मी फर्ग्युसन कॉलेजांत विद्यार्थी असताना गोपाळराव त्याच कॉलेजांत इंग्रजीचे प्राध्यापक होते. विलिंग्डन कॉलेजात मी मराठीचा प्राध्यापक असतांना ते फर्ग्युसन कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक होते. त्याचा व माझा विशेष परिचय याच सुमारास झाला. सन १९२९ सालीं मुंबई विद्यापीठानें मॅट्रिकसाठीं नेमलेल्या मराठी वेच्यांचे संपादक प्रा. तुळपुळे हे होते व त्यांनीं माझी "धर्म बुडतो काय" ही कविता वेच्यात घेतली होती. ग्रीक पौराणिक कथा, हरीभाऊ आपट्यांच्या मी कादंबरीची संक्षिप्त शालेय आवृत्ति व सामराज कवीचें रुक्मिणीहरण वगैरे पुस्तकें त्यांनीं लिहिलेलीं व संपादिलेलीं आहेत. सन १९३५ च्या सुमारास 'मतिविकास' नावाचें एक मासिक त्यांनीं कांहीं वर्षे चालविलें होतें. 'स्फूर्तिलहरी' या माझ्या काव्यसंग्रहावर त्यांनीं लिहिलेलें विस्तृत व रसग्राही परीक्षण चित्रशाळेच्या ध्रुव मासिकाच्या सन १९३६ आक्टोबरच्या अंकांत प्रसिद्ध झालें होतें. हल्लीं चित्रमयजगतचे संपादक असलेले श्री. रा. प्र. कानिटकर हे त्यावेळीं ध्रुव मासिकाचे संपादक होते व त्यांच्याच विनंती-वरून प्रा. तुळपुळे यांनीं हे परीक्षण लिहिलें होतें. मराठीच्या प्राध्यापक परंपरेतील प्रा. गोपाळराव तुळपुळे हे एक ज्येष्ठ प्राध्यापक आहेत.

## स्फूर्तिलहरी

स्फूर्तिलहरीच्या छपाईचें काम कविमित्र गिरीश यांच्या शिफारसीवरून मी पुणें येथील 'आर्यसंस्कृति मुद्रणालया' कडे सोपविलें होतें. सुबक व वक्तशीर काम करणारा साहित्यिकांचा छापखाना, अशी या मुद्रणालयाची त्यावेळीं ख्याति होती आणि स्फूर्तिलहरीचें काम पाहून गिरीशाची शिफारस योग्य होती, असें माझ्या प्रत्ययास आलें. सन १९३५ च्या डिसेंबर अखेर-पर्यंत संग्रहाची छपाई पुरी झाली होतीच. श्री. वि. स. खांडेकर यांची विस्तृत व विवेचक प्रस्तावना घेऊन हातीं आली आणि ता. १० जानेवारी १९३६ ला 'स्फूर्तिलहरी' हा काव्यसंग्रह तयार झाला. ता. १४ जानेवारी १९३६ रोजीं औंध येथील राजवाड्यात मकरसंक्रमणानिमित्त भरलेल्या

दरबारात सदर संग्रह श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांना मीं स्वतः अर्पण केला. यासाठीं मी मुद्दाम औंधास गेलों होतों व विशाल बागेंतील बंगल्यात दरबारी पाहुणा म्हणून माझा मुक्काम होता. श्रीमंत बाळासाहेब यांनीं मला भरजरीची शाल देऊन माझा गौरव केला. त्यावेळीं केलेल्या लहानशा भाषणांत श्रीमंतांनीं माझ्या काव्याचा त्रोटक व गौरवपूर्ण परामर्श घेतला व 'बाजीराव आणि मस्तानी' या विषयावर मीं एखादें खंडकाव्य लिहावें, असें सुचविलें. या बाबतींत मला आरंभापासून साहाय्य करणारे पंडित सातवळेकर या दरबारात हजर होते. पंडितजींची व माझी भेट त्यानंतर झालेली नाहीं; पण त्यांनीं मनःपूर्वक केलेल्या साहाय्याचें मला नेहमीं स्मरण होतें.

सन १९३६ च्या फेब्रुआरीच्या पहिल्या आठवड्यात स्फूर्तिलहरीचा प्रकाशनसमारंभ महाराष्ट्र शारदा मंदिराच्या वतीनें पुणें येथील 'टिळक स्मारकमंदिरां'त आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. पुणें येथें प्रकाशनसमारंभ करण्याची सूचना आचार्य अत्रे यांनींच मला केली होती आणि त्या कामीं पुढाकार घेण्याचें त्यांनीं मान्य केलें होतें. आचार्य अत्रे त्यावेळीं महाराष्ट्र शारदा मंदिराचे अध्यक्ष होते व श्री. गोपीनाथपंत तळवलकर कार्यवाह होते. स्फूर्तिलहरीचा प्रकाशनसमारंभ अत्यंत थाटानें पार पडला. हा समारंभ म्हणजे पुण्याच्या थोर साहित्यिकांनीं व रसिकांनीं केलेला माझा जाहीर गौरवच होता. या समारंभासाठीं पुण्यातील बहुतेक साहित्यिक व वृत्तपत्रप्रतिनिधि हजर होते. या समारंभात आचार्य अत्रे व श्री. वि. स. खांडेकर यांचीं प्रमुख भाषणें झालीं. श्री. खांडेकर त्यावेळीं छाया बोलपटाचें लेखनासाठीं पुण्यात राहिले होते. त्यांचा लाभ समारंभाला अनायासें मिळू शकला. दुसऱ्या दिवशीं या प्रकाशनसमारंभाची सविस्तर हकीगत बहुतेक प्रमुख वृत्तपत्रात आल्यानें महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत स्फूर्तिलहरीचें नाव घुमलें. या काव्यसंग्रहाचें प्रकाशन प्रारंभापासून अखेर-पर्यंत यशस्वी झालें आणि या यशाचें श्रेय श्री. खांडेकरांची प्रस्तावना व आचार्य अत्रे यांनीं घडवून आणलेला टोलेजंग प्रकाशनसमारंभ यांना आहे. स्फूर्तिलहरीची प्रस्तावना लिहिल्यापासून श्री. खांडेकर यांचे व माझे स्नेह-संबंध घनिष्ठ झाले. त्यानंतरच्या १७।१८ वर्षांत हा स्नेहभाव उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत आला आहे.

स्फूर्तिलहरीच्या प्रकाशनानें तत्कालीन मराठी कवींत मला निश्चित स्थान मिळवून दिलें. बुधगावसारख्या आडगावीं राहूनही माझें नाव बृहन्महाराष्ट्राला परिचित झालें. सन १९३६ च्या पूर्वार्धांत दक्षिण महाराष्ट्रातील बहुतेक प्रमुख ठिकाणीं माझीं काव्यगायनें झालीं. काव्य-गायनाबद्दलच्या माझ्या कल्पना पूर्वीपासून ठरलेल्या आहेत. काव्यगायनात काव्यालाच महत्त्व असतें. गायन असलेंच तर फक्त साथी-पुरतें असतें. भावपूर्ण कवितेचा योग्य वाचनानेंही परिणाम होतो. जी कविता गेय असेल ती गाताना कवीनें अगर काव्यगायकानें गायन बेसूर न होईल एवढी खबरदारी घेतली म्हणजे पुरे. काव्यगायनांत तानबाजी केली तर ती काव्याला हानिकारक होते. भावनाविष्काराला काव्यगायनांत अतिशय महत्त्व आहे. मी काव्यगायन करीत असे अगर अद्यापही करतों त्यावेळीं एक कविता सुरावर गाणेची व नतरची कविता स्पष्ट वाचणेची असा क्रम बहुधा असतो. मला माझ्या सर्वच कविता मुखोद्गत आहेत. यामुळें काव्यगायनांत पुस्तकाचीं अगर वहीचीं पानें चाळताना होणारा विलंब सहज टळतो व एकतानता येते. प्रत्येक कवितेंतील भावनेशीं समरस होऊन मी कविता म्हणत असल्यानें ते ते भाव माझ्या चेहऱ्यावर उमटतात व याचा इष्ट परिणाम श्रोत्यावर होतो, असा माझा अनुभव आहे. माझे कविमित्र यशवंत व गिरीश हे यशस्वी काव्यगायनप्रथेचे आद्य प्रवर्तक आहेत. जुन्या पिढीचे कवि टेकाडे व कै. सुमत यांचीं नांवें जमेस धरून मी हें विधान करीत आहें. कै. तात्या-साहेब कोल्हटकर व कै. माधव जुलिअन हे आपल्या कविता परिणामकारक रीतीनें वाचून दाखवीत असत, पण ते पांच दहा मडळींच्या खासगी बैठकींत. जाहीर सभात या दोघांनीं कधींच काव्यगायन केलें नाहीं. यशवत व गिरीश या दोघाचींही काव्यगायनें यशस्वी होतात याचें कारण काव्यगायनात भावनाविष्काराला असलेलें महत्त्व ते ओळखतात. मात्र या दोघाचें फक्त अनुकरण करणारे कवि अगर काव्यगायक गायनालाच महत्त्व देतात, यामुळें त्यांचीं काव्यगायनें कंटाळवाणीं होतात. भावनाविष्कार न करता केवळ अवास्तव हुंकार देणें अगर माना वेळून हावभाव करणें, हें काव्यगायनाला मारक होतें, हें अशा नकली काव्यगायकाच्या लक्षांत येत नाहीं. मध्यंतरीं अशीं बेंगरूळ काव्यगायनें इतकीं बोकाळलीं होतीं, कीं काव्यगायन हा

चेष्टेचा विषय झाला होता. अलीकडे रेडिओवर भावगीत गायनें सुरू झाल्यापासून गोड गळ्याला काव्यगायनात अवास्तव महत्त्व मिळालें आहे; पण लौकरच काव्यगायनाच्या नांवावर होणारीं हीं गायनें बंद पडतील, अशी आशा वाटू लागली आहे. काव्यगायनांतील भावनेचें महत्त्व कवि यशवंतांनीं बरोबर ओळखलें आहे. यामुळें त्यांच्या ऐन उमेदींत त्यांचीं काव्यगायनें भावनोत्कट होत असत, तशींच तीं आजही होतात. अलीकडे प्रा. विंदा करंदीकर व प्रा. वसंत बापट हे प्रथितयश कवी आपली कविता फक्त ठसकेदार रीतीनें म्हणतात आणि गायनाच्या अभावींही त्यांचें काव्यदर्शन यशस्वी होतें. गोड गळ्यावर कविता म्हणून भावनाचा आविष्कार योग्य रीतीनें करणाऱ्या सौ. संजीवनी मराठे या एकच काव्यगायिका व कवयित्री मला परिचित आहेत.

ता. १९।२० डिसेंबर १९३६ रोजीं वाळवे तालुक्यांतील बागणी या गावीं अष्टभाग पद्यसमेलन भरलें होतें व त्याच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड झाली होती माझे मित्र श्री. कृ. भा. बाबर यांच्याकडे या समेलनाचें नेतृत्व होतें. अष्टे विभागातील सुमारें पाऊणशें शिक्षक व शिक्षिका या समेलनात उपस्थित होत्या. समेलनाची जागा बागणीचे इनामदार श्रीमान् मंत्री यांच्या वाड्यात होती. समेलनाचे सर्व कार्यक्रम आटोपशीर व वक्तशीर झाले यामुळें माझे दोन दिवस आनंदात गेले व एका वेगळ्या जगात वावरल्याचें समाधान मला लाभलें. त्या भागांतील अनेक नामवंत शिक्षक मला या निमित्तानें परिचित झाले व त्यावेळीं जडलेले ऋणानुबंध कांहीं शिक्षकांनीं अद्यापही अबाधित ठेविले आहेत. श्री. बाबर यांचा परिचय इस्लामपुरच्या शारदा मंडळातच मला झाला होता. त्यांचीं व माझीं शिक्षणविषयक व सामाजिक मतें सामान्यतः जुळतीं होतीं. यामुळें बागणींतील दोन दिवसांच्या सहवासानें आम्ही एकमेकाचे स्नेही झालों. केवळ स्वतःच्या कर्तबगारीवर एका सामान्य शिक्षकापासून ट्रेनिंग कॉलेजातील प्राध्यापकाच्या पदापर्यंत गेलेले श्री. कृ. भा. बाबर हे एक आदर्श शिक्षक आहेत. बागणीच्याच समेलनात त्यावेळीं भिलवडीस शिक्षक असलेले श्री. व्यंकटराव कुलकर्णी यांचा मला विशेष परिचय झाला आणि त्यांच्या आग्रहाच्या

निमन्त्रणावरून सन १९३७ च्या फेब्रुआरींत मी दोन दिवस भिलवडीस गेलों होतों. तेथील प्रशस्त कृष्णाघाटावरील ओवरींत माझें जाहीर काव्य-गायन झालें. त्यास आसपासचे शिक्षक, विद्यार्थी व साहित्यिक बहुसंख्येनें उपस्थित होते. त्यावेळीं नवोदित असलेले कवि ह. न. जोशी ( सुधांशु ) व कथालेखक म. भा. भोसले यांचा प्रथम परिचय मला याच संमेलनांत झाला.

सन १९३७ च्या नवबरांत प्रकृतिस्वास्थ्यासाठीं रजा घेऊन मी कोल्हापुरास लक्ष्मीपुरींतील बागी याच्या बंगल्यात राहिलों होतों. या काळात कविमित्र प्रा. माधवराव पटवर्धन हे माझ्याकडे बहुधा दर दोन दिवसांनी येत असत. त्यावेळचा एक गमतीदार प्रसंग मला आठवतो. साधेपणा-बरोबरच विक्षिप्त वागणुकीबद्दल माधवराव प्रसिद्ध होते. एका सकाळीं बाजारातून घराकडे जातांना ते नेहमींप्रमाणें माझ्याकडे आले. अंगात कोट, हरकाची विजार, डोकीवर सनहॅट व पायांत चप्पल असा त्यांचा वेष होता. एका हातांत लहानशी भरलेली पिशवी होती व काखोटीस दोन हिराच्या केरसुण्या होत्या. हा अवतार पाहून मीं हसून माधवरावांना विचारलें, " केरसुण्या घेण्यासाठीं एखादा पोऱ्या कां केला नाहीं ?" माधवराव मला तात्काळ म्हणाले, " हमाल करण्याइतक्या केरसुण्या कांहीं जड नाहींत. शिवाय माझ्या घरच्या केरसुण्या मी घरीं नेतों आहे. यात कसली आली आहे लाज ? " माधवरावांचा प्रत्येक शब्द खरा होता. पण व्यवहाराच्या दृष्टीनें हा विक्षिप्तपणा होता; आणि अशा विक्षिप्तपणामुळेंच त्यांच्याबद्दल अनेक गैरसमज पसरले होते. कोल्हापुरच्या याच मुक्कामांत सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटील यांचा विशेष परिचय मला झाला. त्यांचा प्रथम परिचय सन १९३५ मध्यें माझे विद्यार्थीमित्र श्री. दोशी याच्या घरीं झाला होता. या मुक्कामातील गाठीभेटींनीं हा परिचय वाढला. तेव्हांपासून माझ्यावर व माझ्या काव्यावर बाळासाहेबाचा लोभ आहे. सन १९४२ सालीं माझा स्फूर्तिलहरी हा काव्यसंग्रह मुंबई विद्यापीठानें M A. साठीं नेमला होता त्यावेळीं श्री. पाटील यानीं माझा परिचयलेख मुद्दाम सत्यवादींत प्रसिद्ध करून माझें अभिनंदन केलें होतें. सत्यवादी त्यावेळीं साप्ताहिक होतें. अलीकडे त्याचें रूपांतर दैनिकांत करून बाळासाहेबांनीं तें धडाडीनें चालविलें आहे.

स्फूर्तिलहरींच्या प्रकाशनानंतर मी प्रायः किर्लोस्करांच्या मासिकांतच कविता लिहूं लागलों. सन १९३६ ते १९३८ या काळांत किर्लोस्करचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर व श्री. ना. धों. ताम्हनकर यांचे व माझे स्नेहसंबंध घनिष्ठ झाले होते. या काळात मी वारंवार किर्लोस्करवाडीस जात असे व मासिकांच्या धोरणाबद्दल व सर्वसामान्य साहित्याबद्दल आमची बरीच चर्चा होई. कोर्टांतील वादी प्रतिवादींच्या कटकटींतून एवढाच विरंगुळा मला मधूनमधून मिळत असे. सन १९३८ च्या डिसेंबरांत चिपळूण, गणपतीपुळें व रत्नागिरी या कोंकणभागात मीं आठ दिवस स्वतंत्र मोटारीनें प्रवास केला. मला प्रवासाची अतिशय हौस आहे. पण संस्थानी नोकरीच्या काचणीमुळें मला मनमुराद प्रवास करतांच आला नाहीं. लहान संस्थानांत नोकरवर्ग कमी व अधिकारी तर मोजकेच असावयाचे, यामुळें एका अधिकाऱ्याला तीन तीन वेगवेगळीं कामें करावीं लागत. नोकरांना हक्काची रजा असते याची लहान संस्थानिकांना कल्पनाच नव्हती. यामुळें इच्छा असूनही मला प्रवासासाठीं रजा कधींच मिळाली नाहीं. फक्त १९२२ सालीं सिंहगडावर जाण्यासाठीं मला रजा मिळाली होती. पण ती मी सरदार किबे यांच्याकडे जाणार होतों म्हणूनच मिळाली होती. मला कधीं कधीं हक्काची रजा मिळाली ती मी आजारी पडलों तेव्हांच. यामुळें कोंकण विभागात मीं वर उल्लेखिलेला प्रवास केला त्यामुळें माझी अनेक दिवसाची हौस भागली व चित्तवृत्ति उल्हसित झाल्या.

## म. म. दत्तोपंत पोतदार

१९३७ सालीं मी भिलवडीस गेलों होतों त्यावेळीं श्री. सदानंद सामंत नांवाचे एक साहित्यप्रेमी तरुण औदुंबर येथें राहत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं कांहीं साहित्यप्रेमी तरुणांनीं एक वाचनालय औदुंबरास स्थापन केलें होतें. नंतर थोडक्याच दिवसांत श्री. सदानंद सामंत यांचें देहावसान झालें आणि त्यांच्या स्मरणार्थ ‘ सदानंद मंडळ ’ नांवाची संस्था औदुंबरच्या तरुणांनीं स्थापन केली होती. ता. १४ जानेवारी १९३९ रोजीं या सदानंद मंडळाचें पहिलें स्नेहसंमेलन औदुंबरास भरलें त्यास मी चालकांचे निमंत्रणा-

वरून मुद्दाम गेलों होतों. या समेलनाचे अध्यक्ष म. म. दत्तो वामन पोतदार हे होते. त्यांच्या व औदुंबरवासी स्नेह्यांच्या सहवासांत माझे दोन दिवस आनंदात गेले. दत्तोपंतांचा व माझा पूर्वीचा थोडा परिचय होता तो या समेलनामुळें विशेष झाला. प्रा. पोतदार यांची वागणूक अगदीं साधी व कोणत्याही समाजांत सहज समरस होण्याची त्यांची वृत्ति यामुळें औदुंबरचें समेलन यशस्वी झालें. दत्तोपंतांच्या व माझ्या गाठीभेटी पुढें अनेकवार झाल्या. बुधगांवासही ते दोन वेळा माझ्याकडे आले होते. सन १९४१ च्या गणेशचतुर्थी उत्सवात सातारच्या आर्यांग्ल वैद्यक शाळेंत माझें काव्यगायन झालें त्यास दत्तोपंत हजर होते. अलीकडे मी सांगलीस स्थायिक झाल्यावर माझें मित्र श्री. शंकरराव शेंडें यांच्या प्रयत्नामुळें सांगलीस शिरगणती परिषद भरली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष म्हणून दत्तोपंत सांगलीस आले असताना अगत्यपूर्वक माझ्या घरीं आले होते व सांगलीच्या साहित्य सभेतर्फें त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता. जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या रद्दींतून रत्नें हुडकून काढणारे व पुण्याचा तेजस्वी ब्राह्मण या पदवीनें आचार्य अत्रे यांनीं भूषविलेले म. म. दत्तोपंत पोतदार यांच्याबद्दल मला नेहमींच आदर वाटत आला आहे.

## मिरजेचें दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलन

सन १९३९ च्या फेब्रुआरी महिन्यांत मिरज येथें दक्षिण महाराष्ट्र साहित्यसमेलन भरलें होतें. हें समेलन भरविण्यांत माझे मित्र डॉ. गोसावी, श्री. तात्याबुवा सहस्रबुद्धे, पंडित महादेवशास्त्री दिवेकर, कवि विनायकराव साठ्ये व श्री. गोविंदराव खासगीवाले यांचा पुढाकार होता. पहिलें दक्षिण महाराष्ट्र साहित्यसमेलन मिरजेंत भरावें यात औचित्य होतें. मिरजेची साहित्यिकांची परंपरा तशीच मोठी आहे. विख्यात इतिहाससंशोधक, कवि व नाटककार कै. वासुदेवशास्त्री खरे यांची सर्व हयात मिरजेंत गेली. कै. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांचे व मिरजेचे संबंध ऋणानुबंधाचे होते. नंतरच्या पिढींतील पंडित महादेवशास्त्री दिवेकर हे अलीकडे मिरजेस स्थायिक झाले असून, ते एक पुरोगामी विचारसरणीचे शास्त्री आहेत.

किर्लोस्कर मासिकानें उघडलेल्या बुवाबाजी विध्वंसक आघाडीचे ते प्रमुख होते. त्यांची हिंदुत्वनिष्ठा जाज्वल्य असून त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. श्री. तात्याबुवा सहस्रबुद्धे हे एक कवि असून, 'हरुप' व 'दहिता' हे त्याच दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. श्री. सहस्रबुद्धे यानीं अलीकडे छंदःशास्त्रविषयक अनेक लेख लिहिलेले आहेत. श्री. विनायकराव साठ्ये हेही एक कवि असून त्याचीं कांहीं खंडकाव्यें प्रसिद्ध आहेत. त्याची कविता जुन्या पाडिती वळणाची पण सरस आहे. मिरज येथें निष्ठेनें साहित्यविषयक कार्य करणाऱ्या स्नेहसंवर्धक सभाचे श्री. सहस्रबुद्धे व श्री. साठ्ये सभासद आहेत. श्री. गोविंदराव खासगीवाले हेही एक कवि व नाटककार आहेत. त्यांची कविता व पद्यें कै. देवलांच्या पद्याप्रमाणें सुबोध व प्रासादिक आहेत. डॉ. गोसावी हे मधूनमधून कविता लिहीत असले तरी एक साहित्यप्रेमी डॉक्टर म्हणूनच ते सर्वांना अधिक परिचित आहेत. मिरजेंतील अनेक साहित्यविषयक कार्यांना त्यानीं सढळ हातानें मदत केली आहे. वर उल्लेखिलेल्या सर्व हौशी व साहित्यप्रेमी मंडळींनीं भरविलेलें मिरजेचें संमेलन यशस्वी झालें यांत नवल नाहीं. महाराष्ट्राचे विख्यात कादंबरीकार प्रा. ना. सी. फडके हे या संमेलनाचे अध्यक्ष होते व मूळचे मिरजेचे पण त्यावेळीं जमखंडीस नोकर असलेले श्री. भास्करराव महाबळ हे स्वागताध्यक्ष होते. या संमेलनास प्रा. माधवराव पटवर्धन, श्री. गोविंदराव टेंबे, श्री. ना. ह. आपटे, श्री. ह. रा. महाजनी, राव. र. लु. जोशी व श्री. शंकरराव किर्लोस्कर वगैरे थोर गृहस्थ हजर होते. मिरज व बुधगाव संस्थानचे अधिपतीही पहिल्या दिवशीं उपस्थित होते. साहित्यचर्चा, काव्य-गायन, ठराव वगैरे सर्वच दृष्टींनीं हें संमेलन गाजलें. या संमेलनात उपस्थित असलेले श्री. गोविंदराव टेंबे यांचा विशेष परिचय एका गमतीदार प्रसंगानें झाला. माझी कन्या सौ विमल त्यावेळीं सांगलीच्या कन्याशाळेंत विद्यार्थिनी होती व तिला नुकतेंच एक काव्यगायनाचें पारितोषिक मिळालें होतें. मिरजेच्या संमेलनात ठरावाची चर्चा होत असताना मधून मधून काव्यगायन ठेवण्याचें चालकांनीं ठरविलें आणि माझ्या कन्येनें काव्यगायन करावें असें त्यांनीं सुचविलें. याच वेळीं संमेलनाध्यक्ष प्रा. फडके यानीं उठून सांगितलें कीं, " संमेलनांत होणाऱ्या काव्यगायनांत काव्यही नसतें आणि गायनही नसतें

म्हणून काव्यगायनें कंटाळवाणीं होतात, हें आज काव्यगायन करणारानीं लक्षात ठेवावें." अध्यक्षांच्या मागेंच मी बसलों होतों. मीं त्याना चिठी लिहून कळविलें कीं, "माझी कन्या आज काव्यगायन करणार होती, पण आपल्या भाषणामुळें तिनें काव्यगायन करण्याचें रहित केलें आहे." यावर पुन्हां अध्यक्षांनीं उठून खुलासा केला कीं, "काहीं भगिनी काव्यगायन करणार होत्या, पण माझ्या भाषणामुळें त्या नाराज झाल्या आहेत असें कळतें. पण त्यानीं नाउमेद होऊं नये. त्यानीं जरूर काव्यगायन करावें." यानतर परीक्षेचीच वेळ आली. बेळगावच्या सौ. लेले यांनीं प्रथम एक कविता गाऊन दाखविली, पण ती तितकीशी परिणामकारक झाली नाहीं. यानतर माझी कन्या सौ. विमल कविता म्हणावयास मायक्रोफोनजवळ गेली. प्रा. माधवराव पटवर्धन जवळच होते ते तिला उत्तेजन देऊन म्हणाले, "ताई! परीक्षेची वेळ आहे, न घाबरता सरळ म्हण." नतर सौ विमलनें 'माझा देव' ही माझी कविता गाऊन दाखविली. तिचा आवाज सुरेल व म्हणण्याची पद्धति आकर्षक असल्यानें श्रोत्याना तिचें काव्यगायन आवडल्याचें त्यानीं टाळ्या वाजवून दर्शविलें. अध्यक्ष प्रा. फडके यानीं मुद्दाम भाषण करून माझ्या कन्येचें अभिनंदन केलें. श्री. गोविंदराव टेंबे यानींही लहानसें भाषण करून सौ. विमलच्या काव्यगायनाची प्रशसा केली. या समेलनांत मिळालेल्या जाहीर उत्तेजनानें माझ्या कन्येच्या काव्यगायनांत उत्तरोत्तर प्रगति होत गेली. श्री. गोविंदराव टेंबे मला थोडे परिचित होतेच. मिरजेच्या समेलनांत त्याचा व माझा विशेष परिचय झाला व त्याची परिणति क्रमाक्रमानें स्नेहांत झाली. माझ्या कन्येनें यापुढें काव्यगायनाचा व्यासग चालूच ठेविला आणि १९५० सालीं मुंबईस भरलेल्या साहित्यसमेलनात 'तुझा देव' ही माझी कविता गाऊन तिनें काव्यगायनाचें पहिलें पारितोषिक मिळविलें. मिरजेच्या साहित्य-समेलनांत आणखी एक उपक्रम सुरू झाला. समेलनाध्यक्ष प्रा. फडके यांनीं पुढील सालात परीक्षकांच्या मतें सर्वांत उत्तम ठरणाऱ्या मराठी कादबरीस पाचशेंहे रुपयाचें स्वतःचें पारितोषिक जाहीर केलें व दरसाल याप्रमाणें वेगवेगळ्या साहित्यप्रकारास पारितोषिक दिलें जावें म्हणून एक समितीही स्थापन करण्यांत आली. या समितींत प्रा. फडके, श्री. शकरराव किर्लोस्कर, डॉ. गोसावी, प्रा. गगूनाना कानेटकर व मी असे सभासद होतों.

प्रा. गगूनाना हे या समितीचे कार्यवाह होते. या समितीनें दक्षिणेंतील संस्थानिक व कारखानदार यांचें साहाय्य मिळवून तीन चार वर्षें पारितोषिकें दिलीं. प्रा. फडके यांचें पारितोषिक श्री. दिघे यांच्या 'पाणकळा' या कादंबरीस मिळालें. उत्तेजनाच्या अभावीं पुढें ही समिति विसर्जन करण्यांत आली. मिरजेच्या संमेलनानंतर दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचीं अधिवेशनें जमखडी व कऱ्हाड येथें भरलीं होतीं. जमखडीच्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. वि. स. खांडेकर हे होते व कऱ्हाडच्या संमेलनाचे अध्यक्ष कै. कविवर्य साधुदास हे होते. पुढें बदललेल्या जागतिक परिस्थितीमुळें हीं संमेलनें होऊं शकलीं नाहींत.

## कै. कविवर्य साधुदास ( गो. गो. मुजुमदार )

कविवर्य साधुदास व मी एकाच पंचक्रोशींत राहणारे असल्यानें त्यांचा व माझा निकट परिचय होता. वयानें व अधिकारानें ते माझ्याहून थोर असल्यानें मी त्यांचा मित्र होतों असें मी म्हणू शकत नाहीं. मी नेहमीं त्यांच्याकडे जात असे व तेही बुधगावास अनेक वेळां माझ्याकडे आले होते. आधुनिक मराठी कवितेंतील नवीन विचारप्रणाली त्यांना अमान्य नव्हती, पण पंडित कवींचें रचनाप्रभुत्व व भाषाप्रभुत्व आधुनिक कवितेंत आलें पाहिजे व यासाठीं ज्ञानेश्वरी व पंडित कवींचीं काव्यें यांचा अभ्यास आधुनिक कवींनीं करणें जरूर आहे, असें ते म्हणत असत. साधुदासाची कविता प्रसन्न, प्रगल्भ, प्रासादिक व पंडित कवींच्या वळणावर आहे. 'वनविहार', 'रणविहार' व 'गृहविहार' हीं त्यांचीं खंडकाव्यें योग्यतेच्या दृष्टीनें संस्कृत महाकाव्यांच्या तोडीचीं आहेत. हीं तीन्ही काव्यें विद्वन्मान्य व विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत समाविष्ट झालेलीं आहेत. 'मराठीची सजावट' भाग १।२ हीं त्यांचीं पुस्तकेंही मराठी भाषेच्या अभ्यासास अत्यंत उपयुक्त असून, तींही मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. पेशवाईच्या उत्तरकालावर आधारलेल्या 'पौर्णिमा', 'प्रतिपदा' व 'द्वितीया' या त्यांच्या तीन ऐतिहासिक कादंबऱ्याही सरस आहेत. ही कादंबरीमाला पेशवाईच्या अखेरीपर्यंत गुंफण्याचा त्यांचा मानस होता. 'राजसेवा' नांवाचें

त्यांचें एक नाटकही नाट्यकलाप्रवर्तक नाटकमंडळीनें रंगभूमीवर आणलें होतें. साधुदास जसे एक थोर कवि होते तसेंच ते एक नामवंत व विद्यार्थी-प्रिय शिक्षक होते. मी त्यांचा विद्यार्थी नव्हतों, पण सांगली हायस्कुलातील त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांकडून मला कळलें होतें कीं, तास सुरू झाल्यावर आपल्या रसाळ वाणीनें ते बोलू लागले कीं तास केव्हां संपला याचें भान विद्यार्थ्यांना राहत नसे. असामान्य बुद्धिमान माणूस कोणत्याही व्यवसायांत पडला तरी त्यांत तो प्राविण्य मिळवितो. साधुदासाचें तसेंच होतें. यामुळें काव्यरचनेंत प्रवीण असलेले साधुदास बुद्धिबळें खेळण्यांतही प्रवीण होते. साधुदासांच्या अंगीं शीघ्रकवित्वाचा गुणही प्रकर्षानें होता. आयत्या वेळीं दिलेल्या विषयावर कोणत्याही वृत्तांत ते तेथल्यातेथें कविता करून दाखवीत. मात्र ही त्यांची कविता ठोकळेबाज न होतां तींत लालित्य व प्रसाद भरपूर असे. साधुदासांची वृत्ति भाविक व संसाराविषयीं काहींशी बेफिकीर होती. कै. संत हणमंतरावजी कोटणीस यांचा व साधुदासांचा चांगला घरोबा होता. साधुदास हे अखेरपर्यंत सांगली संस्थानचे राजकवि होते व सांगलीचे राजे श्रीमंत आप्पासाहेब यांचा त्यांच्यावर अतिशय लोभ होता. सन १९४८च्या एप्रिल महिन्यांत सांगलीच्या या थोर सुपुत्राचें कॅन्सरच्या विकारानें देहावसान झालें. साधुदासाची वाङ्मयीन योग्यता फार मोठी आहे. राजकवि यशवंत यांच्यासारखे महाराष्ट्राचे पहिल्या दर्जाचे कवि स्वतःला साधुदासाचे शिष्य म्हणविण्यांत भूषण मानतात. पण साहित्याच्या दृष्टीनें बाजूस असलेल्या सांगलीसारख्या संस्थानी शहरांत साधुदासाची सारी हयात गेल्यानें व त्यांच्या बेफिकीर व प्रसिद्धिविन्मुख वृत्तीमुळें योग्यता असूनही ते व्हावे तितके महाराष्ट्राला परिचित झाले नाहींत. मराठीचा अभ्यास करणाऱ्या आजच्या पिढीला तर त्यांच्या नांवाचें मुद्दाम स्मरण करून द्यावें लागेल.

सन १९३१ च्या आक्टोबरांत मी आठ दहा दिवस पुण्यास गेलों होतों. या मुक्कामांत सुप्रसिद्ध कादंबरीकार दत्त रघुनाथ कवठेकर व कवि शांताराम आठवले यांचा मला परिचय झाला. याच मुक्कामांत कवि मायदेव यांच्या बंगल्यांत एका सायंकाळीं मी त्यांच्या निमंत्रणावरून गेलों होतों. फार वर्षांनीं झालेल्या या कविमित्राच्या भेटीनें मला आनंद झाला. फर्ग्युसन

कॉलेजांत मी व मायदेव समकालीन विद्यार्थी होतों व आमच्या कवितालेखनास त्याच काळांत सुरवात झाली होती. व्यवसायभिन्नतेमुळें आम्ही फार वर्षांत एकमेकांना भेटलों नव्हतों. मायदेव मला भेटले त्यावेळीं प्रौढ वयांतही त्यांची खेळकर वृत्ति पाहून मला समाधान वाटलें. त्यानीं आपलीं दोन सुंदर अभिनयगीतें मला गाऊन दाखविलीं. मींही माझी एक कविता त्यांच्या आग्रहावरून म्हणून दाखविली. यानंतर दोन दिवसांनीं माझे मित्र श्री. य. गो. जोशी यांच्या घरीं एका रात्रीं माझें काव्यगायन झालें. त्यावेळीं हजर असलेल्या मंडळींत प्रा. श्री. म. माटे होते. त्यांचा प्रथम परिचय मला याच वेळीं झाला. ' मंजुळा ' ही माझी कविता आपणास विशेष आवडल्याचें प्रा. माटे यानीं मला मुद्दाम सांगितलें. महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यांतील ग्रामीण जीवन प्रा. माटे यांनीं बारकाईनें पाहिलें व अभ्यासलें आहे. ' उपेक्षिताचे अंतरंग ' अचूक ओळखणाऱ्या प्रा. माट्याना माझी ' मंजुळा ' ही कविता आवडली हें स्वाभाविक होतें. श्री. य. गो. जोशी यांचाही विशेष परिचय मला त्याच मुक्कामांत झाला. त्यानंतर त्याची वादविवेचनमाला प्रसिद्ध झाल्यावर एकदां ते बुधगांवास माझ्या घरीं दोन दिवस आले होते. या भेटीमुळें आमचा परिचय अधिक दृढ झाला. महाराष्ट्राच्या मध्यमवर्गीय समाजाचें वास्तव चित्रण आपल्या लघुकथांत करणारे श्री. य. गो. जोशी हे जुन्या पिढीचे एक थोर लघुकथालेखक आहेत. ' शेवग्याच्या शेंगा ' ही त्याची सुप्रसिद्ध लघुकथा या दृष्टीनें उल्लेखनीय आहे. श्री. जोशी यांची वागणूकही त्याच्या लघुकथेप्रमाणेंच साधी व स्नेहाळ आहे.

## कवि सुधांशु व श्री म. भा. भोसले

ता. १४ जानेवारी १९४० रोजीं औदुंबर येथील सदानंद मंडळानें भरविलेल्या दुसऱ्या संमेलनाचा अध्यक्ष म्हणून मी औदुंबरास गेलों होतों. तेथें कवि सुधांशु व श्री. म. भा. भोसले यांचा मला अधिक परिचय झाला. कवि सुधांशु व श्री. भोसले यांच्यासारख्या खेडेगांवीं राहणाऱ्या व विशेष शिक्षण न झालेल्या तरुणांची साहित्यसेवा व साहित्यप्रेम पाहून मला

आरंभापासूनच कौतुक वाटत आलें होतें. साहित्यसंमेलनांतील दोन दिवसांच्या निवासात त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू मला अगदीं जवळून पाहतां आले. कवि सुधांशु यांच्या 'कौमुदी' या पहिल्या काव्यसंग्रहाला त्यांच्या विनंतिवरून मीं प्रस्तावना लिहिली होती. त्या संग्रहाचें प्रकाशनही याच संमेलनांत झालें. औदुंबरच्या मुक्कामात सुधांशु व भोसले यांच्याशिवाय श्री. ग. न. जोशी, दिगंबरशास्त्री व राजाराममास्तर या साहित्यप्रेमी गृहस्थांचाही मला परिचय झाला. अलीकडे मौज प्रकाशनसंस्थेनें प्रकाशित केलेल्या प्रा. रा. भि. जोशी यांच्या 'वाटचाल' या प्रवासवर्णनपर पुस्तकात औदुंबरचें सुंदर वर्णन आहे. त्यात दिगंबरशास्त्री यांचा नामनिर्देश न करता त्याचें उत्कृष्ट शब्दचित्र प्रा. जोशी यांनीं रेखाटलें आहे. तेव्हांपासून आजतागायत वरील सर्व औदुंबरवासीयांचे व माझे संबंध लोभाचे आहेत. गेल्या १३।१४ वर्षांत सुधांशु यांनीं कवि म्हणून व श्री. भोसले यांनीं कादंबरीकार, कथालेखक व बोलपट कथालेखक म्हणून चांगलें नांव मिळविलें आहे. कवि सुधांशु यांचे 'कौमुदी' व 'विजयिनी' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध असून त्यांचें कवितालेखन प्रगतिमार्गावर आहे. त्यांचें कांहीं गद्यलेखनही प्रसिद्ध झालें आहे. श्री. भोसले यांच्याही 'समरांगण' वगैरे दोन तीन कादंबऱ्या व लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. सुधांशु व भोसले या दोन तरुण साहित्यिक मित्रांनीं औदुंबरसारख्या खेड्यांत सदानंद मंडळाची स्थापना करून व मधूनमधून संमेलनाच्या निमित्तानें थोरथोर साहित्यिकांचें दर्शन औदुंबरच्या पंचक्रोशीला घडवून चालविलेलें साहित्यविषयक कार्य कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. गेल्या १६।१७ वर्षांत औदुंबरचा व माझा घनिष्ठ संबंध झाला आहे. कवि सुधांशु हे वयानें माझ्या मुलाच्याच वयाचे असल्यानें ते मला मुलाप्रमाणें वाटतात व त्यानाही माझ्याबद्दल व माझ्या काव्याबद्दल आपुलकी व आदर वाटतो. कवि सुधांशु, त्यांच्या मातोश्री, पत्नी व मुली हें एक संतोषीवृत्तीचें व म्हणूनच सुखी कुटुंब आहे. सुधांशूंच्या मातोश्री जुन्या वळणाच्या परंतु पुरोगामी विचारसरणीच्या आहेत; आणि रूढार्थानें त्या सुशिक्षित नसल्या तरी शंभर टक्के सुसंस्कृत आहेत. कवि सुधांशु हे जसे साहित्यिक आहेत तसेच एक निष्ठावान समाजकार्यकर्ते आहेत. औदुंबरच्या पंचक्रोशींत त्यांचें चांगलें वजन आहे. औदुंबरच्या

निसर्गरम्य वातावरणांत व कवि सुधांशु यांच्या प्रेमळ सहवासात दोन दिवस घालविणें हा अलीकडे मला एक विरंगुळा वाटतो. धकाधकीच्या नागरी जीवनाचा मला कंटाळा आला, कीं औदुंबर हें माझ्या आवडीचें व हक्काचें विश्रांतिस्थान आहे.

ता. १५ जानेवारी १९४० रोजीं वाळवे तालुक्यातील बहे-बोरगांव या गावीं तेथील बालदिनसमारंभाचा अध्यक्ष म्हणून मी गेलों होतों. बोरगावच्या नागरिकांनीं यापूर्वी एकदां चिटणिसांच्या इतिहासप्रसिद्ध वाड्यांत झालेलें माझें काव्यगायन ऐकिलें होतें व त्या वर्षाच्या बालदिन-समारंभाचा अध्यक्ष म्हणून त्यांनींच माझें नाव अगत्यपूर्वक सुचविलें होतें. या बालदिनसमारंभात शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून सुमारें ५०० मंडळी उपस्थित होती. त्यावेळीं अध्यक्षीय भाषणाशिवाय माझें काव्यगायनही झालें वाळवे तालुक्यातील नरसिंगपूर, बहे व बोरगाव, हा टापू कृष्णा नदीच्या सानिध्यामुळें निसर्गरम्य आहे. नरसिंगपूर येथील भगवान नारसिंहाचे भुयारातील देवालय प्रेक्षणीय आहे. बहे या गावाजवळ कृष्णा नदीच्या दोन फाट्यांनीं बनलेल्या बेटावर समर्थ रामदासांनीं स्थापन केलेला प्रसिद्ध मारुती आहे, आणि बोरगाव येथें मराठी स्वराज्यासाठीं देह झिजविलेल्या स्वामिभक्त खंडो बल्लाळ चिटणीसाच्या वंशजांचा वाडा आहे. समर्थ रामदासाच्या पदचिन्हांनीं पुनीत झालेला वाळवे तालुक्यातील हा निसर्गरम्य भाग मला फार आवडतो.

सन १९४० च्या एप्रिल महिन्यांत मिरजमळा संस्थानच्या डि. जज व हुजूरसेक्रेटरी या जबाबदारीच्या जागेवर माझी नेमणूक राजेसाहेबांनीं केली. पगार व अधिकार या दृष्टीनें ही जागा वरच्या दर्जाची होती व राजेसाहेबांचा माझ्यावरील विश्वासही या नेमणुकीमुळें व्यक्त झाला होता. पण या जागीं आल्यावर माझी फारच कुचंबणा होऊं लागली. पूर्वी सबजज असतांना शनिवारीं व रविवारीं मला परवानगीशिवाय खुशाल कोठेंही जातां येत असे. परंतु हुजूरचिटणीस या नात्यानें शनिवारी रविवारींही श्रीमंताच्या परवानगीशिवाय मला कोठेंही जाता येईना. कारण राजेसाहेबांना माझी केव्हां जरूरी लागेल याचा नियम नव्हता. राजेसाहेबांनीं मला केव्हांच

परवानगी नाकारली नाहीं. पण प्रत्येक वेळीं परवानगी विचारावी लागणें ही मोठीच अडचण होती. माझ्या लेखनाच्या बाबतींत त्यांनीं मला कधींच विचारलें नाहीं. शिकार, कुत्रीं, कुस्त्या, टेनीस व रेसीस यांची आवड असलेल्या राजेसाहेबांना साहित्यातले कांहींच कळत नव्हतें; पण आपणांस कांहीं कळतें असें ढोंग त्यानीं कधींच केलें नाहीं. कोणत्याच बाबतींत काहींच कळत नसतांना सर्वच बाबतींत सर्व कळतें अशी शेखी मिरविणारे काहीं श्रीमत मीं पाहिले आहेत. यामुळें साहित्यातले आपणांस काहींच कळत नाहीं असें प्राजलपणानें कबूल करणाऱ्या राजेसाहेबाबद्दल मला कौतुक वाटे. काव्यलेखनाबद्दल बाहेर माझा थोडासा बोलबाला होत होता. तो सहन न होणारे कांहीं 'उंबरांतले किडे' बुधगावात होते. त्यानीं पुष्कळ वेळा श्रीमतांना माझ्याविरुद्ध चिथावणी दिली, पण राजेसाहेबानीं तिकडे कधींच लक्ष दिलें नाहीं. मी नेहमीं राजेसाहेबांजवळ असल्यानें त्यांची माझ्यावर बहाल मर्जी आहे असें बाहेरच्या कांहीं लोकाना वाटे. पण संस्थानिकाची बहाल मर्जी व्हावयास आवश्यक असलेले सद्गुण माझ्या अंगीं कधींच नव्हते, यामुळें माझ्यावर राजेसाहेबाची बहाल मर्जी असणें शक्यच नव्हतें. मी फक्त त्याची गैरमर्जी होऊ नये एवढीच दक्षता घेत असें. कारण गैरमर्जी झाली तर नोकरीच सोडावी लागली असती. पण राजेसाहेबांचा प्रथमपासून माझ्यावर लोभ व विश्वास होता व माझा फटकळ स्वभाव त्याना पूर्ण परिचित होता. यामुळें सन १९४८ च्या मार्च महिन्यांत मी सेवानिवृत्त होईपर्यंत मला नोकरींत मुळींच त्रास झाला नाहीं, हें मुद्दाम कृतज्ञतापूर्वक नमूद करणें जरूर आहे. माझ्या वाङ्मयीन जीवनात बुधगांवात माझी कुचंबणा झाली हा परिस्थितीचा दोष होता. राजेसाहेबांनीं अखेरपर्यंत मला प्रेमानेंच वागविलें.

सन १९४० च्या जून महिन्यांत माझे कविमित्र प्रा. श. के. कानेटकर (गिरीश) यांची नेमणूक सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात मराठीचे प्राध्यापक म्हणून झाली व ते मला अधिक जवळ आले. १९२२ सालीं गिरीशांचा व माझा प्रथम परिचय झाला. तेव्हांपासून मी, ज्या ज्या वेळीं पुण्यास गेलों त्या त्या प्रत्येक वेळीं गिरीशाच्या घरीं जाऊन त्याच्या प्रेमळ आतिथ्याचा लाभ घ्यावयाचा व त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना माझ्या कांहीं

कविता ऐकवावयाच्या, हा माझा ठरलेला क्रम होता. गिरीश फलटण हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना मी त्यांच्या निमंत्रणावरून मुद्दाम चार दिवस त्यांच्याकडे गेलों होतों व हायस्कूलच्या स्नेहसंमेलनात माझें काव्य-गायन झालें होतें. फलटणचे साहित्यिक व साहित्यप्रेमी, कर्तबगार दिवाण श्री. के. वि. गोडबोले याचा प्रथम परिचय मला फलटणच्या याच मुक्कामांत झाला होता. सन १९३१ च्या नवबरांत बुधगांवच्या इग्रजी शाळेच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून गिरीश दोन दिवस माझ्याकडे आपले चिरजीव मधुराव याच्यासह आले होते व माझ्या कांहीं कविता ऐकून माझें काव्य-वाचन परिणामकारक होतें हें त्यांनींच मला सांगितलें होतें. यानतर दक्षिण महाराष्ट्रातील बहुतेक प्रमुख शहरांत माझीं जाहीर काव्यगायनें होऊन माझ्या काव्याचा प्रसार झाला याचें बरेचसें श्रेय गिरीशांना आहे. या पूर्वपरिचयामुळें गिरीश सांगलीस राहावयास आल्यानें मला विशेष आनद वाटला. सन १९४० च्या मनोहर मासिकाच्या नवबर अकांत माझा सचित्र परिचय प्रसिद्ध झाला आहे. तो परिचय गिरीशानीं लिहिलेला असून त्यांत त्याचा माझ्याबद्दलचा जिव्हाळा व्यक्त झाला आहे. कवि गिरीश हे व्यवहारदक्ष, प्रेमळ व आतिथ्यशील आहेत. स्नेह्यांसाठीं घस सोसण्याची त्याची प्रवृत्ति आहे. जीवनाबद्दलचा त्याचा दृष्टिकोन नेहमींच आशावादी आहे. यामुळें काव्यात अगर वागणुकींत वैतागलेले गिरीश केव्हांही दिसणार नाहींत. त्याची साहित्यविषयक कामगिरीही थोर आहे. रविकिरण मडळाची कल्पना मूळ कोणाचीही असो, मडळाला चाळेंस आणण्याची बरीचशी कामगिरी गिरीशाची आहे असें माझें मत आहे. मत्र आणि तत्र याचा सुदर संगम गिरीशात झाला आहे. लौकिक जीवन व वाङ्मयीन जीवन यशस्वी झालेले जे फार थोडे साहित्यिक मला परिचित आहेत त्यात गिरीशाची गणना आहे. माझ्याप्रमाणेंच माझी कन्या सौ. विमल व कनिष्ठ पुत्र चि. शशी यांच्यावर गिरीशांचा लोभ आहे. विलिंग्डन कॉलेजात त्यांची नेमणूक झाल्यापासून कॉलेजातील मराठी शाखेची प्रतिष्ठा निश्चितपणें वाढली आहे. त्यांच्या पूर्वीचे प्राध्यापक पारसनीस व जोग यानीं परिश्रमपूर्वक जोपासलेली विलिंग्डन कॉलेजांतील मराठी शाखालता गिरीशांच्या अमदानींत सुदर फुलांनीं नटलेली आहे. विलिंग्डन कॉलेजांतून

गिरीश नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. तरीही कॉलेजांतील मराठी शाखेला त्याचें साहाय्य सदैव होत राहीलच.

ता. २ मे १९४२ रोजीं माझी प्रिय कन्या सौ. विमल हिचा विवाह-समारंभ सांगली येथें झाला. या समारंभासाठीं श्रीमंत इचलकरंजीकर, श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, सरदार किबे व अनेक थोर साहित्यिक मित्रांचे शुभसंदेश आले होते. माझे जामात श्री. क. श्री. काळे M. A., B. T., Dip. Ed. हे तासगाव येथील काळे फडणीस या इतिहासप्रसिद्ध घराण्यातील आहेत. हल्लीं ते सांगली एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य असून, साहित्य व कला यांची त्याना आवड आहे. शारीरिक शिक्षणाचे ते तज्ज्ञ असून त्यांनीं थोडेसे लेखनही केलेलें आहे. साहित्य व कला याची आवड असणारा व त्याना प्रोत्साहन देणारा पति सुदैवानें लाभल्यामुळें माझ्या कन्येच्या लेखनकलेची वाढ होण्यास चांगली मदत झाली आहे. नाटिका, कथा व कविता याचें लेखन व काव्यगायन यात माझ्या कन्येनें जें थोडेसें यश मिळविलें आहे त्याचें बरेंच श्रेय माझे जामात श्री. काळे यांना आहे.

सन १९४२ च्या ऑगस्टपासून मी किर्लोस्कर मासिकांत नियमानें काव्यलेखन करूं लागलों. १९३९ सालीं सुरू झालेल्या महायुद्धाची झळ सन १९४१ पर्यंत हिंदुस्थानला फारशी लागलेली नव्हती. सन १९४१ च्या अखेरीस जर्मनीच्या बाजूनें जपाननें या महायुद्धांत पदार्पण केलें आणि सन १९४२ पासून या जागतिक महायुद्धाची झळ हिंदुस्थानला चांगलीच लागू लागली. इकडे भारतातही सन १९४२ च्या ऑगस्ट महिन्यात ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध ' चले जाव ' चळवळ सुरू झाली आणि सरकारनें म. गांधी आणि इतर अखिल भारतीय पुढारी यांना अज्ञात स्थळीं तुरुंगांत ठेवलें. यामुळें भूमिगतांच्या घातपाती चळवळींना ऊत आला. या सर्व परिस्थितीचे परिणाम माझ्या वाङ्मयीन जीवनावरही झाले, हें माझ्या त्या काळांत लिहिलेल्या अनेक कवितावरून दिसून येईल. माझ्या कवितातील कांहीं ओळी भूमि-गतांच्या बुलेटिनमध्यें आलेल्या पाहून माझ्या वरिष्ठांनीं मला त्याबद्दल खुलासा विचारला. मीं उत्तर दिलें कीं, " माझ्या कविता किर्लोस्करमध्यें

प्रसिद्ध झाल्यानंतर कोणीही आणि कोठेंही त्यांतील उतारे घेतले तर त्याला मी काय करणार ? " याच काळात किर्लोस्कर मासिकात प्रसिद्ध झालेली 'नव्या जगात' ही माझी कविता श्री. वेणू चितळे यांनीं लंडन बी. बी. सी. रेडिओवर म्हटली होती असें मला स्मरतें.

## डॉ. के वा. साठे

सन १९४२ च्या जून महिन्यात मी बेळगावास माझे मित्र डॉ. के. वा. साठे यांच्याकडे गेलों असतां, तेथील वाङ्मयचर्चा मंडळांत काव्यगायनाच्या चढाओढीसाठीं माझ्या नावें एक चांदीची फिरती ढाल मीं ठेवावी असें डॉक्टरांनीं सुचविलें व मीं ती सूचना मान्य केली. डॉ. साठे व मी बालपणापासून स्नेही आहोंत. आमचें नातें रक्ताचें नसून हृदयाचें आहे. रक्ताचीं नातीं प्रसंगीं स्वार्थी होतात व स्वार्थापायीं केव्हांकेव्हा भंगही पावतात. हृदयाचें नातें अभंग असतें. आम्हा उभयतांमधील नातें असें अभंग आहे व तें अभंगच राहील. कॉलेजात शिक्षण घेत असतांना आम्ही बहुधा एकत्रच होतों. पुढें मी बुधगावास नोकर झाल्यावर मधून मधून बेळगावास डॉ. साठे यांच्याकडे जात असे व हल्लींही जातो. डॉ. साठे साहित्यप्रेमी आहेतच, पण साहित्यिकही आहेत. सन १९१८ च्या सुमारास ते व त्यांचे काहीं मित्र यांनीं 'मित्रमंडळ' नांवाची एक संस्था बेळगांवास स्थापन केली. मंडळाच्या सदस्यांनीं लिहिलेलीं काहीं पुस्तकेंही या मंडळानें प्रसिद्ध केलीं होतीं. डॉ. साठे व माझे आतेबंधु प्रा. स. वा जोशी यांनीं महाराष्ट्र नाटककार गडकरी व किर्लोस्कर हीं टीकापर पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं असून तीं विद्वन्मान्य आहेत व विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. डॉ. साठे व त्यांचे स्नेही यांच्या मित्रमंडळानें १९२९ सालीं बेळगावास महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अधिवेशन भरविलें होतें. या संमेलनाचे अध्यक्ष कै. काळकर्ते शिवराम महादेव परांजपे हे होते. या मित्रमंडळांतूनच हल्लींच्या वाङ्मयचर्चामंडळाचा जन्म झाला आहे. साहित्यिकांच्या तरुण पिढीला कदाचित् या गोष्टी अज्ञात असतील. कारण डॉ. साठे अलीकडे लिहीत नाहींत. वाङ्मयचर्चामंडळासाठीं डॉ. साठे यांनीं

अविश्रांत परिश्रम केलेले आहेत व हल्लींही करीत आहेत. हल्लीं वयोमाना-प्रमाणें डॉक्टरांची वृत्ति पालटली आहे आणि सामाजिक व साहित्यविषयक कार्यांतून त्यांनीं अंग काढून घेतल्यासारखें केलें आहे. पण त्यांचा मूळचा पिंड साहित्यिकाचा आहे तो त्यांना स्वस्थ बसू देणार नाहीं. हे सर्व विचार मनांत आले म्हणजे वाङ्मयचर्चामंडळात काव्यगायनासाठीं मीं ठेविलेली ढाल म्हणजे मी व डॉ. साठे यांच्यामधील अकृत्रिम स्नेहाचें तें प्रतीक आहे असे मला वाटतें. मीं ढाल ठेवल्यापासून वाङ्मयचर्चामंडळाच्यावतीनें काव्य-गायनस्पर्धा बहुधा दरसाल होत आल्या आहेत. या स्पर्धांत दूरदूरच्या शाळाकॉलेजांतील विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येनें भाग घेतात. काव्य-गायन कोणत्या पद्धतीनें व्हावें याबद्दल माझ्या ज्या कल्पना आहेत, त्यांना अनुसरूनच या काव्यगायनस्पर्धा होत असतात.

सन १९४३ च्या जून महिन्यात माझा 'स्फूर्तिलहरी' हा काव्यसंग्रह मुंबई विद्यापीठानें M A साठीं नेमल्याचें जाहीर झालें. वृत्तपत्रात ही वार्ता जाहीर झाली ती इचलकरंजी संस्थानचे अधिपति कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनीं पाहताच मुद्दाम पत्र पाठवून त्यांनीं माझें अभि-नंदन केलें आणि काव्यगायनासाठीं इचलकरंजीस येण्याचें मला निमंत्रण दिलें. त्याप्रमाणें ऑगस्ट महिन्यातील गोकुळ अष्टमीस मी इचलकरंजीस माझे मित्र व तेथील हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. गो. रा. चोळकर यांच्या-कडे गेलों व माझ्या आगमनाची वर्दी श्रीमंत बाबासाहेबांना कळविली. त्यांनीं माझ्या कवितांची वही व मी म्हणणार असलेल्या कवितांची यादी माझ्याकडून मागविली व सायंकाळीं पांच वाजता वाड्यांत मला चहाचें निमंत्रण दिलें. त्याप्रमाणें सायंकाळीं मी गेल्यावर श्रीमंत बाबासाहेब मला म्हणाले, "आज तुम्ही म्हणणार असलेल्या कवितांपैकीं 'उंबरांतले किडे' व 'जगाचा न्याय' या कविता तुमच्या राजेसाहेबांनीं वाचल्या आहेत काय?" मी म्हणालों, "आमच्या राजेसाहेबांना कवितेची आवड नाहीं. त्यांनीं त्या वाचल्या नसाव्यात." बाबासाहेब म्हणाले, "तुमच्या राजेसाहेबांना या दोन्ही कविता मुळींच आवडणार नाहींत. मला मात्र त्या फार आवडल्या." असें म्हणून श्रीमंत किंचित् हसले. मी मात्र बुचकळ्यांत पडलों. कारण

वरील दोन्ही कविता संस्थानिकांना मुळींच आवडण्यासारख्या नाहींत. तेव्हां बाबासाहेबाना त्या खरोखर आवडल्या किंवा ते विनोदानें तसें म्हणाले हें मला कळेना. मात्र सायकाळच्या काव्यगायनांत या दोन्ही कविता म्हणावयाच्या नाहींत असा मीं निश्चय केला. सायकाळीं सहा वाजतां राजवाड्यातील दरबार हॉलमध्यें माझें जाहीर काव्यगायन झालें. त्यावेळीं श्रीमत बाबासाहेब, श्रीमत सौ. राणीसाहेब, अधिकारी, आश्रित व गावातील सभ्य गृहस्थ हजर होते. काव्यगायनांत वरील दोन कविता मीं ठरल्याप्रमाणें वगळल्या. श्रीमंतानीं आपल्या चिटणिसाकडून मला निरोप पाठविला कीं वगळलेल्या दोन्ही कविता मीं जरूर म्हणाव्यात. त्याप्रमाणें मीं दोन्ही कविता आवेशानें म्हटल्या व बाबासाहेबांनींच प्रथम टाळ्या वाजवून आपली पसती व्यक्त केली. काव्यगायनानतर एक चांदीची सरस्वतीची मूर्ति श्रीमतानीं स्वतः माझ्या आसनाजवळ येऊन मला दिली. मी सकोचित झालेला पाहून श्रीमत म्हणाले, “हा मान तुमचा नव्हे. तुम्ही ज्या आसनावर आहात त्या आसनाचा हा मान आहे.” सायकाळीं माझी कवितांची वही श्रीमतांनीं वाचावयास ठेवून घेतली व दुसऱ्या दिवशीं सकाळीं हायस्कुलचे विद्यार्थ्यांसमोर माझें काव्यगायन ठेवावें, असें श्री. चोळकर मुख्याध्यापक यांना सांगितलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं गोविंदराव हायस्कुलांत माझें काव्यगायन झालें. चार दिवसानीं एका स्वाराबरोबर एका पत्रासोबत श्रीमंतानीं माझी कवितांची वही परत केली. माझी ‘उत्तरेकडे’ ही कविता आपणास अतिशय आवडल्याचें बाबासाहेबांनीं पत्रांत लिहिलें होतें व सदर कवितेंत मीं व्यक्त केलेली उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाची इच्छा सफल व्हावी म्हणून प्रवासास मदत म्हणून दोनशेंहे रुपयांचा एक चेक पत्रासोबत पाठविला होता. घोड्याच्या टापावर, पैलवानाच्या कुस्त्यावर अगर नायकिणींच्या नाचगाण्यावर हजारों रुपये उधळणारे सस्थानिक मला माहीत होते, पण कवीच्या एखाद्या कवितेवरून त्याची इच्छा ओळखून स्वयंस्फूर्तीनें त्या इच्छेच्या पूर्ततेसाठीं साहाय्य देणारे श्रीमत बाबासाहेब हे एकच सस्थानिक मला आढळले. मला त्यावेळीं परिचित असलेल्या सस्थानिकात दोनच सस्थानिक साहित्याचे, कलाचे व शिक्षणाचे पुरस्कर्ते आढळले. त्यापैकीं एक इचलकरजी सस्थानचे

अधिपति कै. श्रीमत बाबासाहेब घोरपडे हे होते व दुसरे औंध संस्थानचे अधिपति कै. श्रीमत बाळासाहेब पंतप्रतिनिधि हे होते. सांगलीचे अधिपति श्रीमत आप्पासाहेब यांचा थोडासा परिचय अलीकडे मी सांगलीस राहू लागल्या-वर मला झाला आहे. तेही साहित्य, शिक्षण, कला व विशेषतः अध्यात्म-विद्या यांचे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या आश्रयाखालील सांगलीचें 'अध्यात्म-विद्यामंदिर' चांगलें सांस्कृतिक कार्य करीत आहे. अनेक अखिल भारतीय कीर्तीचे विद्वान् गृहस्थ श्रीमतांचे स्नेही असल्यानें त्यांच्या ज्ञानाचा लाभ श्रीमतांच्या कृपेनें सांगलीवासीयांना मिळतो. श्रीमत बाबासाहेब घोरपडे यांची व माझी वर उल्लेखिलेली भेट झाल्यावर तीनच महिन्यांनीं त्यांचें आकस्मिक देहावसान झालें. त्यांच्या मृत्यूमुळें शिक्षण, साहित्य व कला यांचा एक उदार पुरस्कर्ता नाहींसा झाला. श्रीमत बाबासाहेब यांची सर्व हयात कौटुंबिक व राजकीय आपत्तींशीं झगडण्यांत खर्च झाली. अशा स्थितींतही त्यांनीं शिक्षण, साहित्य व कला यांचा केलेला पुरस्कार पाहिला म्हणजे त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतें. भारत स्वतंत्र झाल्यावर बाबासाहेब हयात असते तर त्यांना मनःस्वास्थ्य लाभलें असतें व त्यांच्या औदार्याचा फायदा शिक्षण, साहित्य व कला यांना अधिक प्रमाणांत मिळाला असता.

## सांगलीचें साहित्यसंमेलन

ता. ५।६ नवबर रोजीं नाट्यशताब्दि महोत्सव, महाराष्ट्र साहित्य-समेलन व नाट्यसमेलन यांचें सयुक्त अधिवेशन सांगली येथें भरलें होतें. तीन मोठे समारंभ एकत्र केल्यामुळें व्यवस्थेच्या बाबतींत थोडासा गोंधळ उडाला, पण असें होणें स्वाभाविक होतें. बाहेरील वृत्तपत्रांनीं मात्र या गैरव्यवस्थेबद्दल टीकेची झोड उठविली, पण कांहीं काळानें ती शमली. नाट्यशताब्दिमहोत्सवाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर हे होते. साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष प्रा. श्री. म. माटे हे होते आणि नाट्यसमेलनाचे अध्यक्ष कै. ना. वि. कुलकर्णी हे होते. या सयुक्त अधिवेशनाचे कार्याध्यक्ष माझे मित्र प्रा. गगूनाना कानेटकर हे होते. साहित्यसमेलनांतील काव्यगायनाचा अध्यक्ष मी होतों. याच अधिवेशनांत जुन्या नामवंत नटांनीं कामें केलेला

संगीत 'शारदा' नाटकाचा प्रयोग झाला. त्यात नटसम्राट बालगंधर्व, नटवर्य बोडस, नटवर्य दाते, नटवर्य कोल्हटकर यांनीं भूमिका केल्या होत्या. या प्रसिद्ध नटाच्या भूमिका पूर्वी कधीं न पाहिलेल्यांना हा प्रयोग प्रेक्षणीय वाटला असला तरी या सर्व नटाच्या ऐन उमेदीच्या काळात त्यांच्या उत्कृष्ट भूमिका पाहिलेल्या माझ्यासारख्याचा मात्र त्या दिवशीं विरस झाला. मात्र सर्व नटांनीं व विशेषतः श्री. चिंतुबुवा दिवेकर यांनीं आपल्या भूमिका उत्तम वठविल्या हें नमूद केलेंच पाहिजे. नाट्यमहोत्सवाच्या अधिवेशनांत सांगलीस एक नाट्यविद्यामंदिर स्थापन करण्याची कल्पना निघाली आणि सांगली संस्थानचे नाट्यप्रेमी अधिपति श्रीमंत आप्पासाहेब यांनीं या कार्यासाठीं सांगलींतील एक मध्यवर्ती व प्रशस्त जागा देणगीदाखल दिल्यामुळें या कार्याची मुहूर्तमेढ रोविली गेली. या कार्यासाठीं एक समिति नेमण्यात आली असून, आद्य-नाटककार विष्णुदास भावे यांचे पौत्र राव. भावे इंजिनिअर हे या समितींतील प्रमुख कार्यकर्ते आहेत.

सन १९४५ च्या ऑगस्ट महिन्यांत मी बेळगावास डॉ. साठे यांचे-कडे गेलों असता प्रा. डॉ. ग. ब. ग्रामोपाध्ये व प्रा. डॉ. वि. म. कुलकर्णी या दोन कविप्राध्यापकांचा मला परिचय झाला. डॉ. ग्रामोपाध्ये त्यावेळीं बेळगावच्या लिंगराज कॉलेजात मराठीचे प्राध्यापक व मराठी विभागाचे प्रमुख होते. डॉ. ग्रामोपाध्ये माझ्याशीं फारच मोकळेपणानें वागले. टिळकवाडींतील त्यांच्या निवासस्थानीं मी व डॉ. साठे त्यांच्या निमंत्रणावरून दोन तीन वेळा गेलों होतों. अलीकडे बेळगांव सोडून मुंबईच्या एका कॉलेजांत ते प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत. सन १९५० च्या मे महिन्यात माझी व त्यांची भेट डॉ. साठे यांच्या घरीं पुन्हां झाली. त्यावेळीं त्यांच्याबरोबर मुंबईचे श्री. वा. रा. ढवळे, प्रा. वा. ल. कुलकर्णी व प्रा. अरविंद मंगरूळकर हे होते. त्यांचाही अल्प परिचय मला सहज झाला. डॉ. ग्रामोपाध्ये हे नवकाव्याचे कट्टर पुरस्कर्ते असून त्यांची स्फुट कविता 'निळावती' या संग्रहात प्रसिद्ध झाली आहे. बेळगांवास विशेष परिचित झालेले प्रा. वि. म. कुलकर्णी यांचा व माझा परिचय १९३८ सालापासून आहे. बुधगावजवळच्या मणेराजुरी गावीं त्यांची शेतवाडी असून त्यांचें बरेंच

शिक्षण सांगलीस झालें आहे. १९३८ सालीं ते मुद्दाम बुधगावास माझ्याकडे येऊन गेले होते. त्याची व माझी बेळगावास भेट झाली त्यावेळीं ते बेळगांवच्या लिंगराज कॉलेजात मराठीचे प्राध्यापक होते. सध्यां ते सोलापूर येथील डी. ए. व्ही. कॉलेजात मराठीचे प्राध्यापक व मराठी विभागाचे प्रमुख आहेत. 'पहाटवारा' व 'कमळवेल' हे त्याचे दोन प्रकाशित काव्यसंग्रह रसिकमान्य आहेत. नवकाव्याच्या युगांत काव्यलेखन करीत असूनही त्यांची कविता दुर्बोध अगर विफलतावादी नाहीं. ती सुबोध व रसाळ आहे. सामान्यतः रविकिरणमंडळातील कांहीं कवींच्या कवितेप्रमाणें त्याची कविता आत्मनिष्ठ व घरगुती वातावरणावर आधारलेली आहे. त्यांनीं कांहीं मुक्तछंदही लिहिले आहेत. पण तेही सुबोध आहेत. सन १९४९ च्या डिसेंबर महिन्यात सिटी हायस्कुलातील एका कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते सांगलीस आले असतांना अगत्यपूर्वक माझ्या घरीं आले होते. सन १९४० नतर प्रसिद्धीस आलेल्या मराठी कवींत त्याना मानाचें स्थान आहे. बडोद्याचे प्रा. डॉ. वि. पां. दाडेकर यांचा व माझा प्रथम परिचय सन १९४५ च्या अखेरच्या सुमारास कोल्हापूर येथें झाला. कोल्हापुरचे श्री. बापूराव शाळिग्राम यांच्या उपाध्येबुवाच्या गल्लींतील घरांत एका रात्रीं त्याची कन्या पद्मा शाळिग्राम हिचें गायन ऐकण्यास बापूरावांच्या निमत्रणा-वरून मी गेलों होतों. त्या बैठकींत प्रा. दाडेकर मला भेटले. नवीन परिचय असूनही त्यांनीं माझ्या काव्यलेखनाबद्दल आस्थापूर्वक चौकशी केली. यानतर अलीकडे मी सांगलीस राहूं लागल्यावर सन १९४८ च्या डिसेंबर महिन्यांत ते श्री. दत्त नारायण आपटे याच्याकडे आले असतांना त्यांची व माझी पुनः भेट झाली. जवळच असलेल्या, माझी कन्या सौ. विमल हिच्या घरीं ते आले होते तेथेंच मीही होतों. याही भेटींत त्यांनीं माझ्या लेखनाबद्दल चौकशी करून माझी 'उत्तरेकडे' ही कविता माझ्या तोंडून ऐकली. अगदीं अलीकडे गेल्या मे महिन्याचे अखेरीस ते सांगलीस आले असतांना मुद्दाम माझे घरीं आले होते. माझे मित्र राजरत्न मानेपाटील हे दाडेकराचे स्नेही आहेत. माझा वाङ्मयीन जीवनवृत्तांत मी लिहीत आहें असें कळतांच त्यांतील मानेपाटील याच्याबद्दलचा मजकूर त्यांनीं मुद्दाम वाचून पाहून त्यात

उल्लेखिलेली ‘ जगाचा न्याय ’ ही कविता माझ्या तोंडून अगत्यपूर्वक ऐकली व जीवनवृत्तांत लेखनाच्या बाबतींत काहीं उपयुक्त सूचनाही केल्या. प्रा. दाडेकर यांचा खेळकर व मनमोकळा स्वभाव त्याच्या खेळकर लघुनिबंधाप्रमाणेंच मला आवडतो.

## सौ. संजीवनी मराठे

सन १९४६ च्या डिसेंबर महिन्यात सुप्रसिद्ध मराठी कवयित्री व काव्यगायिका सौ. सजीवनी मराठे यांचा व माझा प्रथम परिचय बेळगाव येथें झाला. बेळगांवच्या वाङ्मयचर्चामंडळांत काव्यगायनस्पर्धांसाठीं मीं ठेविलेल्या ढालीसाठीं त्यावर्षी माझी कविता ठेविली होती व पारितोषिकवितरणसमारंभाचा अध्यक्ष म्हणून मी बेळगांवास गेलों होतों. समारंभ आटोपल्यावर एका सकाळीं मी, डॉ. साठे व प्रा. डॉ. ग्रामोपाध्ये मिळून सौ. सजीवनी मराठे यांच्या टिळकवाडींतील निवासस्थानीं जाऊन त्यांना भेटलो. पूर्वपरिचय असल्याप्रमाणें त्यांनीं आमचें मनमोकळेपणानें स्वागत केलें व मुलासाठीं आणून ठेवलेलीं चॉकोलेटस् चहाबरोबर आम्हांस खावयास दिलीं. पहिल्याच भेटींत इतका मनमोकळेपणा क्वचित् दिसतो. १९३२ सालच्या डिसेंबरांत कोल्हापुरास भरलेल्या साहित्यसमेलनात मीं सौ. सजीवनी मराठे यांना प्रथम पाहिलें होतें. त्याचे वडील कै. ग. स. मराठे ॲक्चुअरी (पालीपीठकर्ते) त्यांना मुद्दाम घेऊन आले होते. त्यावेळीं त्यांचें कवितागायनही झालें. त्या काव्यगायनात काव्यापेक्षां गायनच अधिक होतें तरी गोड गळ्याच्या या नवोदित कवयित्रीनें श्रोतृवर्गावर चांगलीच छाप पाडली. अलीकडे त्यांच्या काव्यलेखनांत चांगलीच प्रगति झालेली असून, त्यांचे चार काव्यसंग्रह रसिकमान्य आहेत. त्याच्या काव्यविषयांचें क्षेत्रही विस्तृत झालें असून, विचारांना सखोलता आली आहे. काव्यगायनाच्या क्षेत्रात तर त्या अग्रेसर काव्यगायिका आहेत. भावनाविष्कार व आकर्षक गायनपद्धति यांचा सुंदर संगम त्यांच्या काव्यगायनांत दिसून येतो. त्यांच्याइतकें परिणामकारक काव्यगायन करणारा एकही काव्यगायक अगर काव्यगायिका महाराष्ट्रांत नाहीं.

## महर्षि अण्णासाहेब कर्वे

सन १९४७ च्या जानेवारींत महर्षि धोंडो केशव कर्वे हे सांगलीस गजानन मिलचे श्रीमान् विष्णुपंत वेलणकर यांच्या सुवर्णतुलेसाठीं आले असतां मला अगत्यपूर्वक पत्र पाठवून बुधगांवास एक दिवस माझ्याकडे आले होते. अण्णासाहेबांचा व माझा परिचय सन १९२० पासून आहे. अनेक महत्त्वाच्या कार्यांत अविरत मग्न असूनही माझ्यासारख्या सामान्य माणसाचें स्मरण ठेवून ते आपण होऊन मजकडे आले याबद्दल मला धन्यता वाटली. त्यांच्या एकच दिवसाच्या निवासातील अनेक गोष्टी स्मरणीय आहेत. रोज सकाळीं दोन मैल तरी फिरण्याचा अण्णासाहेबांचा क्रम आहे. ते माझ्याकडे सकाळींच टांग्यानें आले यामुळें त्या दिवशीं त्यांचें फिरणें चुकलें. माझ्याकडे आल्यावर माझ्या प्रशस्त माडींत हिंडून त्यांनीं पावलें मोजलीं. मीं कारण विचारतांच अण्णासाहेब म्हणाले, "आज माझें फिरणें झालें नाहीं. माझ्या रोजच्या फिरण्यांत किती पावलें अदाजे होतात तें मला माहीत आहे. तितकीं पावलें तुमच्या प्रशस्त माडींत हिंडून मी सकाळचें फिरणें पुरें करणार आहे." माझ्याकडे आले तेव्हां अण्णासाहेबांना नव्वद वर्षें पुरीं झालीं होतीं. म्हणून "जेवणात कांहीं विशिष्ट मऊ पदार्थ तयार करवूं काय?" असें मीं विचारलें. अण्णासाहेब म्हणाले, "मी फक्त कमी खातों, पण जेवणांत कोणताही पदार्थ मला वर्ज नाहीं." भोजनोत्तर आम्ही दोघे बोलत बसलों असतां नवीनच स्थापन केलेल्या समतासंघाची माहिती त्यांनीं मला दिली व त्याच्या प्रचारार्थ आपण रोज हिंडतों असें ते म्हणाले. तेव्हा मी हळूच म्हणालों, "अण्णासाहेब! आपलें आता विश्रांतीचें वय आहे. उगीच हिंडण्याची दगदग कां करतां?" माझ्या प्रश्नाला अण्णासाहेबांनीं दिलेल्या उत्तराचा सारांश माझ्या 'महर्षि' या कवितेच्या खालील पद्यपक्तींत आला आहे:—

कुडींत आहे प्राण तोंवरी, मानवतेची करीत सेवा
सतत कार्यरत रहावयाचें हाच आवडे मला विसांवा.
हवी वाटली जरी विश्रांती मरणोत्तर ती मिळे चिरंतन
म्हणुनि सारखें कार्य करावें, जगीं जोंवरी लाभे जीवन.

अण्णासाहेबांचें उत्तर ऐकून माझ्या मनात आलें कीं, मानवतेची अहर्निश सेवा करीत असतांना जें आत्मिक बल लाभतें त्यामुळेंच अण्णासाहेबांसारखे महर्षि दीर्घायुषी होतात. या भेटीनंतर दोन वर्षांनीं मी सांगलीस राहू लागल्यावर श्री. अंबूताई मेहेंदळे यांच्या प्रसूतिगृहाच्या इमारतीच्या अनावरण समारंभासाठीं महर्षि कर्वे सांगलीस आले असतां मुद्दाम माझ्या घरीं येऊन गेले. अण्णासाहेबांनीं नुकतेंच सत्याण्णवाव्या वर्षांत पदार्पण केलें आहे आणि अद्यापही त्यांचे सर्व व्यवहार पूर्ववत् चालू आहेत असें मीं ऐकलें आहे. सन १९४७ च्या मार्च महिन्यांत गजानन मिलचे धनी श्रीमान् विष्णुपंत वेलणकर यांनीं आपल्या सुवर्णतुलेनिमित्त १०१ रुपयांची देणगी माझ्या उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाच्या साहाय्यार्थ मला दिली. "हरद्वारच्या घाटावर बसून एक कविता लिहून आणा" असें विष्णुपंत म्हणाले. त्यांच्या ही गोष्ट कदाचित् स्मरणांतही नसेल; पण मला या देणगीचें कृतज्ञतापूर्वक स्मरण होतें. महाराष्ट्रात केवळ स्वतःच्या कर्तबगारीवर वैभवास चढलेले जे फार थोडे महाराष्ट्रीय कारखानदार आहेत, त्यांत श्रीमान् विष्णुपंत वेलणकर अग्रगण्य आहेत. साहित्यावर त्यांचा लोभ आहे व कांहीं पुस्तकेंही त्यांनीं लिहिलेलीं आहेत, पण केवळ कल्पनासौंदर्यानें नटलेल्या ललितवाङ्मयापेक्षां तरुणांना कर्तृत्वशाली बनवील अशाच साहित्याचे ते अधिक भोक्ते आहेत. उत्तर हिंदुस्थानच्या माझ्या प्रवासासाठीं कै. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे व श्रीमान् विष्णुपंत वेलणकर यांनीं द्रव्यसाहाय्य दिलें आहे पण गेल्या ६।७ वर्षांतील अस्थिर परिस्थितीमुळें व कांहीं कौटुंबिक अडचणीमुळें मी हा प्रवास अद्याप करूं शकलों नाहीं, पण या प्रवासाचा विचार सदैव माझ्या मनात घोळत आहे. हा प्रवास जेव्हां माझ्याकडून पुरा होईल तेव्हांच मला समाधान वाटेल.

ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारतातून ब्रिटिश राजसत्तेचें उच्चाटण होऊन भारत स्वतंत्र झाला. हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे. त्यापूर्वीं कांहीं दिवस संस्थानिकांची सत्ता संपुष्टात येऊन लोकशाहीचें वारें संस्थानी वातावरणातही वाहूं लागलें होतें. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानिकांनीं आपला एक संघ बनविण्याचा प्रयत्न

चालू केला होता. पण ब्रिटिशांच्या संरक्षणाखालीं असतांना फारच थोडे संस्थानिक प्रजाहितदक्ष असल्यानें व बहुतेकांची प्रवृत्ति चैनीकडे व स्वार्थाकडे असल्यानें असे संस्थानिक आपल्या प्रजेंत अप्रिय होते. यामुळें संघाची कल्पना बारगळली आणि सन १९४७ च्या डिसेंबरांत मुंबई प्रांतात विलीन होण्याचा शहाणपणाचा निर्णय दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानिकांनीं घेतला.

सन १९४८ च्या जानेवारी महिन्यात पुण्याच्या सर परशरामभाऊ कॉलेजांतील मराठीचे प्राध्यापक व संस्कृत भाषेचे एक पंडित प्रा. डॉ. के. ना. वाटवे यांचा व माझा निकट परिचय झाला. सन १९४७ च्या जूनपासून बुधगांवच्या इंग्रजी शाळेचें रूपांतर हायस्कुलांत झालें होतें व माझे एक शिक्षणतज्ज्ञ मित्र श्री. दत्तोपंत ताम्हनकर हे बुधगांव हायस्कूलचे मुख्याध्यापक झाले होते. त्यांचा व प्रा. वाटवे यांचा स्नेह असल्यानें बुधगांव हायस्कूलच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. वाटवे बुधगांवास आले होते. त्यांचा व माझा थोडासा पूर्वपरिचय होता तो त्यांच्या या बुधगांवच्या मुक्कामात दृढ झाला. डॉ. वाटवे माझ्या घरीं आल्यावेळीं मराठी साहित्य, विद्यापीठांतील अभ्यासक्रम व कॉलेजातील मराठीचें शिक्षण यांबद्दल त्यांची व माझी मनमोकळी चर्चा झाली. प्रा. वाटवे यांनीं माझ्या-बद्दलचा स्नेहभाव अद्याप ठेवला आहे. मी सांगलीस राहू लागल्यावर दोन वर्षांपूर्वीं सिटी हायस्कूलच्या त्रितपोमहोत्सवांत संमेलनाध्यक्ष म्हणून ते सांगलीस आले असतांना आग्रहपूर्वक माझ्या घरीं येऊन गेले.

## पत्रपंडित द. वि. ताम्हनकर

लंडन येथें स्थायिक झालेले महाराष्ट्रीय पत्रपंडित व लंडनमधील केसरीचे प्रतिनिधि श्री. द. वि. ताम्हनकर यांचा व माझा परिचय याच सुमारास बुधगांव हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. दत्तोपंत ताम्हनकर यांच्या घरीं झाला. पत्रपंडित ताम्हनकर हे मुख्याध्यापक ताम्हनकरांचे चुलतबंधु असून ते त्यावेळीं हिंदुस्थानांत दौऱ्यावर आले होते व त्यांचा मुक्काम बुधगांवास २।३ दिवस होता. या दोन दिवसांत माझ्या व त्यांच्या अनेक भेटी झाल्या आणि साहित्य व राजकारणविषयक खूप बोलणेंही झालें. बुधगांव

हायस्कुलांत एक सार्वजनिक व एक खास स्त्रियांसाठीं अशीं त्यांचीं दोन व्याख्यानेंही झालीं. बुधगांवच्या राजेसाहेबांनींही त्याना मुद्दाम अल्पोपाहारासाठीं बोलावलें होतें. ताम्हनकराचें बोलणें, माहितीपूर्ण व प्रेमळ असल्यानें आपल्या दोन तीन दिवसाच्या निवासांत ते बुधगांववासीयांना प्रिय झाले होते. बुधगांवसारख्या एका चिमुकल्या संस्थानच्या राजधानींत पत्रपंडित ताम्हनकरांचें आगमन हा एक शुभयोगच होता. माझे मित्र श्री. पुरुषोत्तमशास्त्री दत्तवाडकर यांचा व माझा परिचयही याच सुमारास झाला. बुधगांव हायस्कुलांत संस्कृतचे अध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली व त्यांचा व माझा सहजच परिचय झाला. संस्कृत भाषेचा गाढ अभ्यास, प्रेमळ व सात्त्विक वृत्ति, हिंदी भाषेंतील पांडित्य आणि मराठी साहित्याची आवड या त्यांच्या गुणांमुळें त्यांचा व माझा परिचय वाढला व हल्लीं ते माझे स्नेही झाले आहेत. हल्लींही ते बुधगाव हायस्कुलांत संस्कृत व मराठी या विषयाचे शिक्षक असून माधवनगर येथें राहतात. मधूनमधून माधवनगरास त्यांच्याकडे जाऊन काव्यशास्त्रविनोदात एकादा दिवस घालविणें हा मला एक विरंगुळा वाटतो.

सन १९४७ च्या अखेरीस घेतलेल्या निर्णयानुसार दक्षिण महाराष्ट्रांतील इतर संस्थानाबरोबर बुधगाव संस्थानही ता. ७ मार्च १९४७ रोजीं मुंबई प्रांतात विलीन झालें व त्याच वेळीं सुमारें तीस वर्षांच्या दीर्घ नोकरीनंतर मीही सेवानिवृत्त झालों बुधगावच्या विलीनीकरणाशीं माझ्या वाङ्मयीन जीवनाचा फारसा संबंध नाहीं. पण संस्थानी नोकर असूनही ज्या स्वातंत्र्याचा व लोकशाहीचा पुरस्कार व हुकुमशाहीचा तिरस्कार मी करीत होतों, तें स्वातंत्र्य मिळालें व ती बेगडी हुकुमशाही लयाला गेली यामुळें मला अत्यंत समाधान वाटलें. व्यक्तिशः श्रीमंत बाबासाहेब व त्यांचे कुटुंबीय यांच्याबद्दल मला सहानुभूति वाटली व त्यांची सत्ता गेल्यानें थोडें वाईटही वाटलें. श्रीमंत बाबासाहेब यांच्या कृपेनें मला उच्च शिक्षणाचा लाभ झाला होता. त्यांचें साहाय्य झालें नसतें तर पोस्टातील कारकून म्हणूनच माझें आयुष्य गेलें असतें आणि काव्यलेखन कदाचित् माझ्याकडून झालेंही नसतें. श्रीमंत बाबासाहेबांच्या उदार धोरणामुळेंच धनिकविरोधी व स्वातंत्र्यवादी कविता लिहूनही माझी नोकरी टिकली होती. संस्थान विलीन होतेवेळीं संस्थानच्या

कुवतीप्रमाणें थोडेंसें जादा पेन्शनही त्यांनीं मला दिलें होतें. यामुळें व्यक्तिशः श्रीमत बाबासाहेब यांच्याबद्दल मला नेहमींच आदर वाटत होता. सुमारें तीन वर्षांपूर्वी श्रीमंत बाबासाहेब यांचें कॅन्सरच्या दुर्धर रोगानें देहावसान झालें. श्रीमत बाबासाहेबांनीं मला माझ्या उच्च शिक्षणासाठीं दिलेल्या साहाय्याबद्दल व नोकरीच्या काळात माझ्यावर विश्वास व लोभ ठेवल्याबद्दल त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण मला यावज्जन्म होत राहील. बुधगांवचे हल्लींचे राजे श्रीमंत बाळासाहेब हे साहित्यप्रेमी व विशेषतः गायनकलाप्रेमी आहेत. त्यांच्या राणीसाहेब श्रीमत सौ. लीलाराजे याही साहित्यप्रेमी असून, या उभयतांचा माझ्यावर व माझ्या काव्यावर लोभ आहे. यामुळें हल्लीं मी सांगलींत राहत असलों तरी माझे व बुधगांवचे पूर्वीचे ऋणानुबंध अबाधित राहिले आहेत.

—*—

प्रकरण ४ थें

# रंगभूमीच्या परिसरांत

माझ्या वाङ्मयीन जीवनांत मराठी रंगभूमीला महत्त्वाचें स्थान आहे. नाटकें पाहण्याचा आणि वाचण्याचा मला लहानपणापासून नाद आहे. माझी रंगभूमीविषयक आवड माझ्या साहित्यविषयक आवडीच्याही पूर्वीची असून, मीं लिहिलेली पहिली कविता सौभद्र नाटकांतील अर्जुनाच्या एका पदांतील पहिल्या ओळीवरून मला स्फुरलेली होती, याबद्दलचें निवेदन पूर्वी आलेंच आहे. सन १९०५।१९०६ च्या सुमारास माझे एक मावसबंधु घरातून पळून जाऊन सामाजिक नाटक मंडळींत शिरले. त्याचें वय फार तर १३।१४ वर्षांचें असेल. सामाजिक नाटक मंडळी ही त्यावेळीं दक्षिण महाराष्ट्रांत गाजलेली गद्य नाटक मंडळी होती. सांगली, मिरज, गणेशवाडी वगैरे गांवांतील हौशी नट या कंपनींत होते. कै. विनायकराव कानिटकर व कै. रामभाऊ गोखले हे या कंपनींतील प्रमुख नट होते. ही कंपनी करीत असलेल्या 'तुकाराम' नाटकांत तुकारामाचीं मुलें महाद्या व काशी यापैकीं महाद्याची भूमिका माझे मावसबंधु करीत असत. त्यांच्या ओळखीनें मीं

सामाजिक नाटक मंडळीचीं बहुतेक नाटकें अनेक वेळा फुकट पाहिलीं होतीं. महाद्याच्या वशिल्यानें खुर्ची मिळणें शक्यच नव्हतें व ती मला नकोही होती. पिट ही माझी ठरलेली जागा होती आणि एखाद्या वेळीं मला ओट्यावर जागा मिळाली तर फारच मेहेरबानगी झाली असें मला वाटे. विद्यार्थीदशेंत माझी आर्थिक परिस्थिति हलाखीचीच असल्यानें नाटक कंपन्यातील नटांचे ओळखीनेंच त्यावेळीं मीं बहुतेक गद्य व संगीत नाटकें पाहिल्याचें स्मरते. प्रारंभीं किर्लोस्कर व नंतर गंधर्व या प्रख्यात नाटक कंपन्यात मात्र विद्यार्थीदशेंत माझ्या ओळखीचा कोणीही नट नव्हता. नाट्याचार्य देवल मला चांगले परिचित होते, पण त्यांच्या ओळखीनें नाटकें पाहण्याची माझी छाती नव्हती. यामुळें या दोन कंपन्यांचीं नाटकें पाहण्यासाठीं मला अनेक युक्त्या योजाव्या लागल्या. यासबंधींची एक आठवण मजेदार आहे. कै. नानासाहेब जोगळेकर यांच्या मृत्यूनंतर किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीचीं काहीं नाटकें सांगलीच्या सदासुख थिएटरांत झालीं होतीं. त्यांपैकीं प्रेमशोधन नाटकाचे रात्रीं मी व माझा एक स्नेही थिएटराबाहेर घोटाळत होतों. माझ्या आठवणीप्रमाणें त्या रात्रींच्या प्रेमशोधनांत नंदनची भूमिका श्री. पेठे यांनीं केली होती व नटवर्य गणपतराव बोडस कदन झाले होते. नायिकेची भूमिका अर्थातच नटसम्राट बालगंधर्व यांच्याकडे होती. नाटक सुरू झालें व नमनाचें पद चालू असतानाच आमचीही चुळबुळ सुरू झाली. रंगभूमीसमोरील पिटच्या मागील बोळात मी व माझा मित्र होतों. जवळील भिंतींत गजाच्या दोन खिडक्या होत्या व त्या फार उंचीवर नव्हत्या. आम्ही दोघे वर चढून खिडक्यांच्या गजाना धरून उभे राहिलों व पहिला सर्व अंक आम्हीं खिडकींतूनच पाहिला. मला वाटतें याबद्दल कोणीतरी कंपनीचे मॅनेजर श्री. शंकर बापूजी मुजुमदार यांच्याकडे चुगली केली असावी. दुसरा अंक सुरू होताच आम्ही पुन्हा पूर्वीच्याच खिडक्यातून नाटक पाहूं लागलों. मागून शंकरराव मुजुमदार केव्हां आले तें आम्हांला कळलें नाहीं. त्यांनीं आम्हां दोघांना खालीं उतरविलें व मला विचारलें, "खिडकींतून फुकट नाटक पाहणें चांगलें कां रे?" मी म्हणालों, "आम्हांला नाटक पहावयाचें होतें व जवळ पैसे नव्हते म्हणून खिडकींतून नाटक पाहिलें." शंकरराव अनपेक्षितपणे म्हणाले, "तुम्हांला नाटक पहावयाचे आहे काय? चला,

आंत बसवितों " असें म्हणून शंकररावांनीं आम्हांला ओट्याच्या दारावर नेलें व आम्हांला ओट्यावर बसवून शंकरराव निघून गेले. आज सुमारें चेचाळीस वर्षांनंतर हा प्रसंग आठवला म्हणजे शंकररावांच्या रुबाबाप्रमाणेंच त्याची सहृदय वृत्तीही मनांत येते. शंकरराव मुजुमदारानंतर अनेक मराठी नाटक मंडळ्यांचे अनेक मॅनेजर झाले व त्यांपैकीं पुष्कळांचा मला परिचयही घडला; पण शंकररावांचा रुबाब अगर कर्तृत्व त्यांपैकीं एकातही मला आढळलें नाहीं. नाटक कंपनीचा मॅनेजर म्हटला, कीं शंकर बापूजी मुजुमदार हें नाव तात्काळ पुढें येतें. माझ्या विद्यार्थीदशेंत मी फर्ग्युसन कॉलेजात असतांना व पुढें मुंबईस असताना गंधर्व कंपनीचीं नाटकें पाहण्यासाठीं मी खाणावळींत जेवणाचे खाडे करून पैसे जमविल्याचे अनेक प्रसंग मला आठवतात. मराठी रंगभूमीशीं लहानपणापासून दृढ परिचय झाल्यामुळें अनेक नाटककार, नट, गायक व संगीतज्ञ मला परिचित झाले व कांहींचा व माझा स्नेहही जमला. गेल्या चारपांच वर्षांत " मीं पाहिलेले दहा धैर्यधर, " " विसाव्या शतकांतील चार तुकाराम, " " मराठी रंगभूमीवरील नामवंत सुभद्रा ", " मानापमान तेव्हां—आणि आता " वगैरे नाट्यविषयक लेख मीं लिहिले ते वर उल्लेखिलेल्या रंगभूमीच्या दृढ परिचयामुळेंच होत. मराठी रंगभूमीशीं माझ्या वाङ्मयीन जीवनांत माझा दृढ संबंध आल्यामुळें मला परिचित झालेले लहानथोर नाटककार, नट, गायक व संगीतज्ञ मला केव्हां, कोठें व कसे परिचित झाले, हें या जीवनवृत्तांतांत नमूद करणें माझें कर्तव्य आहे.

## कै. नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल

मला परिचित झालेले पहिले नाटककार म्हणजे कै. गोविंद बल्लाळ देवल, हे होत. माझ्या काव्यलेखनाला त्यांनीं दिलेल्या प्रोत्साहनाचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. देवल माझ्या लहानपणीं हरिपूर येथील आमच्या घरांतील राधाकृष्ण मंदिराच्या माडीवर राहत असत. आपल्या कांहीं नाटकांतील कांहीं प्रवेश त्यानीं याच माडीवर लिहिले होते. मराठी रंगभूमीवर अमर झालेल्या त्याच्या " शारदा " नाटकाची उभारणी सांगली, हरिपूर व मिरज

या पचक्रोशीवर आधारली आहे. मीं लहानपणीं पाहिलेली देवलांची गोरीपान, ठेंगणी, घाऱ्या डोळ्यांची, डोईवर टक्कल असलेली, किंचित् स्थूल मूर्ति आज माझ्या नजरेसमोर दिसते आहे. देवलाच्या मालकीचें पडिक घर आजही हरिपूर येथील लागू यांच्या वाड्यासमोर उभें आहे. पण याची दखलगिरी फारच थोड्या साहित्यभक्तांना असेल. नाटकांच्या उत्पन्नांतून देवलांनीं खरेदी केलेला मळा सांगली येथील विलिंग्डन कॉलेजच्या शेजारीं आहे. या मळ्यांत देवल अनेक वर्षे मधूनमधून राहत असतांना माझ्या विद्यार्थीदशेंत मी त्यांच्याकडे अनेक वेळां राहिलों होतों. लहानपणीं या मळयाला आम्ही ' शारदा मळा ' म्हणत होतों. देवल पाश्चात्य देशांत जन्मले असते तर त्यांचा हा ' शारदा मळा ' नानादेशीय नाट्यभक्तांचें यात्रास्थान झाला असता. विलिंग्डन कॉलेजला लागून असलेला हा मळा देवलांचा म्हणून मराठीचा अभ्यास करणाऱ्या विलिंग्डन कॉलेजांतील किती विद्यार्थ्यांना माहीत असेल कोण जाणे ! देवलांना मधुमेहाचा विकार होता. त्यांतच केलेल्या ऑपरेशन-मुळें महाराष्ट्राचा हा थोर नाटककार सन १९१६ चे सुमारास दिवंगत झाला. साधी, घरगुती पण खटकेदार व पात्रानुकूल भाषा व प्रासादिक सुबोध पद्यें हे देवलांचे विशेष आहेत. शारदा व संशयकल्लोळ हीं त्यांचीं नाटकें मराठी रंगभूमीवर अमर आहेत. एक श्री. गोविंदराव टेंबे वगळले तर देवलांच्या पद्यासारखी सुबोध व प्रासादिक पद्यरचना कोणत्याही मराठी नाटककारानें केलेली नाहीं. महाराष्ट्राचे थोर नाटककार कै. राम गणेश गडकरी यांनीं "वंदन नाट्यमिलिंदा गोविंदाच्या पदारविंदांना" या प्रसिद्ध पद्यपंक्तींत देवलांचा योग्य गौरव केला आहे. देवलांचीं सामाजिक मतें प्रागतिक होतीं व राजकीय मतें गोखलेपंथीय म्हणजे मवाळ होतीं. शारदा नाटकांतील

> जो लोककल्याण साधावया जाण
> घेई करीं प्राण त्या सौख्य कैंचें ?

हें कोदंडाचें पद कै. लोकमान्य टिळकांना उद्देशून होतें अशी सार्वत्रिक समजूत आहे, पण मला घडलेल्या देवलांच्या परिचयावरून मला तसें वाटत नाहीं. देवलांच्या काळांत हरिपूर क्षेत्र हें एक सनातनी मताचें गाव होतें.

माझे चुलते कै. बळवंतराव लेले व देवल हे दोनच मवाळ सुधारक त्यावेळीं हरिपुरांत होते, असें मला स्मरतें. देवलाचीं धार्मिक मतें थिऑसफीकडे झुकतीं होतीं. नाट्याचार्य देवल हे जसे एक उत्तम नाटककार होते तसेच ते एक कुशल अभिनयशिक्षकही होते. किर्लोस्कर व गंधर्व या नाटक मंडळ्यांत देवलमास्तर याच नांवानें ते विशेष परिचित होते. माझे मित्र नटवर्य गणपतराव बोडस यानीं नाट्यशिक्षणाचे धडे देवलांकडूनच घेतलेले होते.

## कै. तात्यासाहेब कोल्हटकर व कै. राम गणेश गडकरी

देवलांनंतर मला परिचित झालेले नाटककार म्हणजे कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व कै. राम गणेश गडकरी हे होत या दोघांचा परिचय मला केव्हां व कसा झाला याचा उल्लेख या जीवनवृत्तांतात पूर्वीं आलेलाच आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर व नाट्याचार्य देवल यांच्यानंतर कोल्हटकर उदयाला आले. अण्णासाहेबांचीं नाटकें पौराणिक आहेत व त्यांतील पद्यरचना लालित्यपूर्ण आहे. त्यांच्या पदांच्या चाली व राग कानडी पद्धतीचे आहेत. देवलांच्या नाटकांपैकीं एक 'शारदा' नाटक वगळलें तर त्याचीं इतर नाटकें संस्कृत व इंग्रजी वाङ्मयातून रूपांतरित आहेत. कोल्हटकरांच्या नाटकांचीं कथानकें सर्वस्वीं स्वतंत्र आहेत व पूर्वींच्या नाटकांतील सूत्रधार नटी व पारिपार्श्वक यांना त्यांच्या नाटकांत फाटा मिळालेला आहे. देवलांची पद्यरचना सुबोध व प्रासादिक आहे, पण कोल्हटकरांची पद्यरचना त्यामानानें क्लिष्ट आहे. त्यांतल्या त्यांत मूकनायक नाटकांतील पद्यें कांहींशीं सोपीं आहेत. विनोदाच्या बाबतींत किर्लोस्कर व देवल यांच्याहून कोल्हटकर सरस आहेत. शाब्दिक कोट्यांवर आधारलेला बुद्धिगम्य विनोद कोल्हटकरांनींच प्रथम रंगभूमीवर आणला. पारशी नाटकांतील पदांच्या धर्तीवर झगडेवजा पद्यें व द्वंद्वगीतें कोल्हटकरांनींच प्रथम रंगभूमीवर आणलीं. कोल्हटकरांच्यानंतर सुमारें दहा वर्षांनीं उदयास आलेले नाटककार कै. राम गणेश गडकरी हे अफाट, चमकदार व भव्य कल्पनांचे कुबेर होते. त्यांच्या प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव व राजसंन्यास या तीन नाटकांत जेवढ्या रम्य, चमकदार व नाविन्यपूर्ण

अनुक्रम
विभाग

कल्पना आहेत तेवढ्या इतर सर्व नाटककारांत मिळून आहेत कीं नाहीं याची शंका आहे. गडकऱ्यांचीं आरंभींचीं दोन नाटकें भाषेच्या दृष्टीनें वास्तवपूर्ण वाटत नाहींत. त्यांतील लहानथोर पात्रांची भाषा कविश्रेष्ठ गोविंदाग्रज बोलत आहेत असें वाटतें. यामुळें त्यांच्या प्रेमसंन्यास व पुण्यप्रभाव या दोन नाटकांतील काव्यकल्पना पिट व ओटा यावरील प्रेक्षकांना कळत नाहींतच, पण खुर्च्यांवरील श्रोत्यांपैकीं किती जणांना कळत असतील याची मला शंका आहे. या दोन नाटकांतील गोकुळमथुरेचे व कंकणकिंकिणीचे प्रवेश मात्र पिटओट्यावरील श्रोत्यांनाही मनमुराद हसवितात. हे प्रवेश सोडले तर गडकऱ्यांचीं पहिलीं दोन नाटकें रंगभूमीवर प्रेक्षणीय होण्यापेक्षा, वाचनीय व अभ्यसनीयच अधिक आहेत. या नाटकांच्या मानानें पुढील एकच प्याला व भावबंधन हीं नाटकें अधिक वास्तवपूर्ण व म्हणूनच रंगभूमीवर यशस्वी ठरलीं आहेत. गडकरी हे एक अव्वल दर्जाचे कवि असूनही, त्यांची पद्य-रचना सरस नाहीं. किर्लोस्कर व देवल यांचीं अनेक पद्यें आजही लोकांच्या तोंडीं आहेत, तशीं गडकऱ्यांचीं नाहींत. ' एकच प्याला ' नाटकांतील अनेक पद्यें सुबोध आहेत व बालगंधर्वांनीं गायिल्यामुळें तीं अनेकांच्या तोंडींही आहेत, पण तीं पद्यें गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे मित्र श्री. वि. सी. गुर्जर यांनीं लिहिलेलीं आहेत. ' एकच प्याला ' व ' भावबंधन ' हीं गडकऱ्यांचीं यशस्वी व लोकप्रिय नाटकें त्यांच्या मृत्यूनंतर रंगभूमीवर यावींत व त्यांतील पद्यरचना त्यांच्या स्नेह्यांकडून केली जावी हा दारुण दैवदुर्विलास आहे.

## कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

महाराष्ट्राचे एक युगप्रवर्तक नाटककार कै. काकासाहेब खाडिलकर यांचा व माझा चांगला परिचय होता व माझ्या पत्नीकडून ते माझे आप्तही होते. पण त्यांच्या व माझ्या अनेकवार गांठीभेटी झाल्या असूनही आमचें साहित्यविषयक बोलणें कधींच झालें नाहीं. काकासाहेबांबद्दल मला एक प्रकारची आदरयुक्त भीति वाटत असे. यामुळें मी कविता लिहितों हें त्यांना माहीत असलें तरी मी होऊन त्यांच्याशीं माझ्या कवितेबद्दल कधींच बोललों नाहीं. त्यांच्याबद्दलचा एक मजेदार प्रसंग मला आठवतो. सन १९३५ च्या

मे महिन्यांत माझ्या वडील मुलाचा व्रतबंध बुधगांवास झाला. समारंभासाठीं काकासाहेब खाडिलकर व गीतावाचस्पती भिडेशास्त्री मंडपांत हजर होते. बुधगांवचे अधिपति श्री. बाबासाहेब पटवर्धन हेही सहकुटुंब व दरबारी लवाजम्यासह हजर होते. राजेसाहेबांच्या बैठकीसमोरच खाडिलकर व भिडेशास्त्री यांची बैठक होती. समारंभ आटोपल्यावर मी वाड्यात गेल्यावेळीं राजेसाहेब मला म्हणाले, "माझ्यासमोर आज काकासाहेब खाडिलकर व सदाशिवशास्त्री भिडे हे दोघे ज्ञानसूर्य बसले होते. त्यांच्यासमोर आम्ही अगदींच फिके आहोत असें मला त्यावेळीं वाटलें." मी हसून श्रीमतांना म्हणालों; "नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते असें भगवान श्रीकृष्णाचें वचनच आहे." यानतर काकासाहेब बरींच वर्षे हयात होते व हा बहुतेक काल आध्यात्मिक उपासनेतच त्यांनीं घालविला. नाटककार या दृष्टीनें उत्तरवयांत पूर्वीसारखें ओजस्वी नाट्यलेखन त्यांच्याकडून झालें नाहीं. 'द्रौपदी' नंतरच्या त्यांच्या नाट्यकृती त्या मानानें नीरसच आहेत. महात्माजींचें सत्य अहिंसेचें राजकारण प्रचारी पद्धतीनें नाट्यकृतींत घुसडण्याचा तो परिणाम असू शकेल अगर ऐन उमेदींतील त्यांच्या बुद्धीची प्रखरता व तेजस्विता उतार वयांत मंद झाली असेल. सन १९४५ नंतर काकासाहेबांची प्रकृति उत्तरोत्तर खालावत गेली. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारत स्वतंत्र झालेला पाहून डोळ्याचें पारणें फिटल्याचें समाधान त्यांना लाभलें. ता. २६ ऑगस्ट १९४८ रोजीं रात्रीं बाराचे सुमारास काकासाहेबांचें प्राणोत्क्रमण झालें. मराठी रंगभूमीवरील तेज अनंतात विलीन झालें आणि मराठी रंगभूमी पोरकी झाली! ओजस्विता हा खाडिलकरांच्या नाटकांतील प्रमुख गुणविशेष आहे. ऐतिहासिक अगर पौराणिक कथानकाच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन राजकीय परिस्थितीचें ओजस्वी चित्रण करावयाचें, ही त्यांना साधलेली आकर्षक किमया होती. नाट्यगुण त्यांच्या नाटकांत भरपूर प्रमाणात आढळतो, त्यामानानें त्यांच्या संगीत नाटकांतील पद्यें काव्यमय व प्रासादिक नाहींत. "नाट्यकला कवि कृष्णा माला घाली" ही त्यांची उक्ति शभर टक्के सार्थ आहे. मात्र यांतून कवि शब्द वगळावा लागेल. विनोद मात्र काकासाहेबांना कधींच जमला नाहीं आणि त्यांच्या उग्र स्वभावाच्या दृष्टीनें असें होणें स्वाभाविकही होतें. खाडिलकरांचीं नाटकें

बालगंधर्वांमुळें यशस्वी झालीं असें म्हणणारांच्या हें लक्षांत येत नाहीं, कीं कीचकवध, भाऊबंदकी व सत्त्वपरीक्षा या नाटकांत बालगंधर्व असूनही तीं रंगभूमीवर गाजलीं. खाडिलकरांच्या मृत्यूनें मराठी रंगभूमीच्या इतिहासांतील एक ओजस्वी युग समाप्त झालें.

८२२३

## कै ना. वि. कुलकर्णी

माईसाहेब नाटकाचे कर्ते कै. ना. वि. कुलकर्णी हे माझे स्नेही होते. ते मूळचे कऱ्हाडजवळील सुरली गांवचे राहणारे. सन [illegible] चे सुमारास त्यांचें माईसाहेब हें नाटक लोकमान्य नाटक मंडळीनें रंगभूमीवर आणलें व काहीं वर्षें तें चांगलेंच गाजलें. महाराष्ट्राचे एक उत्कृष्ट गद्य नट कै. नानबा गोखले हे या नाटकांतील अमृतमामाची भूमिका उत्कृष्ट रीतीनें करीत असत. या नाटकाचे अनेक प्रयोग सांगलीच्या सदासुख थिएटरांत त्यावेळीं झाले. त्यांपैकीं दोन तीन प्रयोगांना श्री. कुलकर्णी यांच्या निमंत्रणावरून मी मुद्दाम गेलों होतों. श्री. कुलकर्णीही बुधगांवास माझ्या घरीं बरेच दिवस राहिले होते. त्यानंतर त्यांनीं महाराष्ट्रकुटुंबमाला या नावाची एक प्रकाशनसंस्था पुणें येथें स्थापन केली व स्वतःच्या अनेक कादंबऱ्या या मालेंतून प्रसिद्ध केल्या. या मालेंतील त्यांची 'माणिक' कादंबरी मुंबई विद्यापीठानें मराठीच्या अभ्यासक्रमांत नेमली होती. श्री. कुलकर्णी हे पहिल्या दर्जाचे कादंबरीकार अगर नाटककारही नव्हते. श्री. खाडिलकरांची कल्पकता व ध्येयवाद अगर प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यातील सहजसुंदरता श्री. कुलकर्ण्यांच्या कादंबऱ्यांत नाहीं. पण सुटसुटीत सामाजिक कथानकें व साधी घरगुती भाषा यांमुळें त्यांच्या कादंबऱ्या व नाटकें लोकप्रिय झालीं. सन १९३०।३१ चे सुमारास 'कान्होपात्रा' हें त्यांचें नाटक गंधर्व संगीत नाटक मंडळीनें रंगभूमीवर आणलें आणि त्यानें नारायणराव कुलकर्ण्यांना पैसा व प्रतिष्ठा मिळवून दिली. युगप्रवर्तक नाटककार होण्याइतकी प्रतिभा अगर ताकद त्यांच्याजवळ नव्हती आणि याची त्यांना पूर्ण जाणीव होती. नारायणराव अनेक वेळां मला म्हणाले होते कीं, "माझीं नाटकें कितीही लोकप्रिय असलीं तरी माझ्या मर्यादा मी जाणतों." नारायणराव स्वभावानें अत्यंत प्रेमळ व हळवे होते. 'एकच प्याला'

नाटकांतील शेवटच्या करुण प्रवेश चालू असतांना थिएटरांत त्यांना एकदां भोंवळ आल्याचें मला माहीत आहे. १९४३ सालीं सांगलीस भरलेल्या नाट्यसंमेलनाच अध्यक्षस्थानीं त्यांची निवड झाली होती. त्याच सुमारास कोल्हापूर येथील फेरिस मार्केट जवळील एका छापखान्याजवळ ते मला भेटले. मी त्यांचें अभिनंदन करताच गाडींवरून जाऊन नारायणरावांनीं भररस्त्यांत मला कडकडून मिठी मारली होती. महाराष्ट्राच्या या सोज्ज्वळ व प्रेमळ नाटककाराचें पुढें लौकरच देहावसान झालें. 'अडला नारायण' नावाचें एक नाटक त्यांनीं लिहिलें होतें. 'संत तुकाराम' नांवाचें एक नाटक गंधर्व मंडळीसाठीं त्यांनीं लिहिल्याचें व नटसम्राट बालगंधर्व त्यांत तुकारामाची भूमिका करणार असल्याबद्दल मीं ऐकलें होतें. पण अद्याप तें घडून आलेलें दिसत नाहीं. विद्वत्ता व बुद्धिमत्ता मर्यादित असूनही नाटककार, कादंबरीकार आणि लघुकथालेखक म्हणून नारायणराव कुलकर्णी यांनीं मिळविलेलें यश प्रशंसनीय आहे.

## श्री. भा. वि. वरेरकर

महाराष्ट्राचे एक ज्येष्ठ साहित्यिक व नाटककार श्री. मामासाहेब वरेरकर यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय अगदीं थोडा आहे. १९२३ सालचे सुमारास मी विलिंग्डन कॉलेजांत प्राध्यापक असतांना काव्यविहार या काव्यसंग्रहाच्या छपाईचे कामासाठीं मुंबईस मनोरंजन छापखान्यांत गेलों होतों. तेथें जवळच्याच इमारतींत ललितकलादर्श नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं एका दुपारीं मी मामासाहेबांना भेटलों. मुंबई विद्यापीठाच्या मराठीच्या अभ्यासक्रमाबद्दल त्यांचें व माझें थोडेसें बोलणें झालें. 'सत्तेचे गुलाम' हें त्यांचें नाटक त्यावेळीं रंगभूमीवर चांगलेंच गाजलें होतें. सन १९३५–३६ च्या सुमारास कोल्हापूर येथील पॅलेस थिएटरांत 'सोन्याचा कळस' या त्यांच्या लोकप्रिय नाटकाच्या प्रयोगास मी एका शनिवारीं रात्रीं गेलों होतों. मामासाहेबांचा मुक्काम तेथेंच आहे हें कळतांच मी नाटक चालू असतांनाच आंत जाऊन त्यांना भेटलों ललितकलादर्श नाटक मंडळीचे मालक श्री. बापूराव पेंढारकर यांचा परिचय मामासाहेबांनीं मला करून दिला. श्री. केशवराव

भोसले यांच्या पश्चात् नवीन पद्धतीचीं सामाजिक नाटकें रंगभूमीवर आणून करीत असलेल्या नाट्यविषयक कार्याबद्दल मी पेंढारकरांचें अभिनंदन केलें. पेंढारकरांच्या निमन्त्रणावरून मी रविवारीं दुपारीं असलेल्या ' पुण्यप्रभाव ' नाटकाच्या प्रयोगास गेलों होतों. त्यावेळींही वरेरकराची पुन्हां भेट झाली. माझ्यासारख्या अनेक सामान्य साहित्यिकांची भेट वरेरकराना नेहमींच होत असल्यानें वर उल्लेखिलेल्या माझ्या भेटींचें त्यांना स्मरण असणें शक्य नाहीं. पण मला मात्र वरील दोन्ही भेटी अद्याप आठवतात. १९४३ सालीं सांगलीस भरलेल्या नाट्यशताब्दि महोत्सवास मामासाहेब हजर होते. पण अनेक कार्यक्रमांच्या गडबडींत मी त्यांना भेटूं शकलों नाहीं. श्री. वरेरकरांची साहित्यसेवा मोलाची आहे. ' कुंजविहारी ' या लोकप्रिय नाटकानें ते महाराष्ट्राला नाटककार म्हणून प्रथम परिचित झाले. त्यांचीं हाच मुलाचा बाप, सत्तेचे गुलाम, सोन्याचा कळस वगैरे नाटकें ललितकलादर्श नाटक मंडळीच्या रंगभूमीवर एकाकाळीं चांगलींच गाजलीं होतीं. ' विधवाकुमारी ', ' गोदू गोखले ', ' धावता धोटा ' वगैरे त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. अनेक बंगाली कादंबऱ्यांचीं सुंदर रूपांतरें मराठींत करून मराठी वाङ्मय त्यानीं समृद्ध केलें आहे. हिंदुस्थान सरकारनें भारतीय साहित्य अकॅडमीवर सभासद म्हणून नेमणूक करून, या ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकाचा योग्य गौरव केला आहे. मामासाहेबांची व माझी भेट फार वर्षांत झालेली नाहीं, ती लवकरच व्हावी अशी माझी उत्कट इच्छा आहे.

## श्री. नरहर गणेश कमतनूरकर

सांगलीच्या नाटककारांची थोर परंपरा चालविणारे नामवंत नाटककार श्री. बन्याबापू कमतनूरकर हे माझे फार वर्षांचे स्नेही आहेत. मी फर्ग्युसन कॉलेजांत विद्यार्थी असतांना गांवाबाहेरील आवटे यांच्या बंगल्यांत ते माझ्या समोरच्याच खोलींत राहत होते. आमच्या प्रथम परिचयाचा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. बन्याबापू व मी अनेक वर्षें मनोरंजन मासिकाचे लेखक असल्यानें व सांगलीच्या पंचक्रोशींत आम्हां दोघांचें बालपण व तरुणपण गेलें असल्यानें आमच्या परिचयाची परिणति साहजिकपणेंच स्नेहांत झाली.

सांगलीच्या नाट्यपूर्ण वातावरणांत बन्याबापूंचें बालपण गेलें असून, कै. नाट्याचार्य देवलांचा व बन्याबापूंच्या वडिलांचा स्नेह व घरोबा होता. विद्यार्थीदशेंत कविश्रेष्ठ गोविंदाग्रज यांच्या निकट सहवासाचा लाभ झाल्यामुळें बन्याबापूंच्या बुद्धिमत्तेला सुंदर व चमकदार पैलू पडले व त्यांच्या सुंदर नाट्यकृतींच्या रूपानें ते महाराष्ट्राला दिसले. 'सरस्वतीकुमार' या टोपण नांवानें त्यांनीं कांहीं लघुकथा व कांहीं कविताही पूर्वी लिहिल्या आहेत. 'श्री' हें त्यांचें एक यशस्वी नाटक ललितकलादर्श नाटक मंडळीच्या रंगभूमीवर एकाकाळीं गाजलें होतें. या नाटकांतील भाषा व संवाद यांच्यावर गडकऱ्यांची छाप दिसून येते. 'श्री' शिवाय त्यांचीं आणखी दोन नाटकें रंगभूमीवर आलेलीं आहेत. सांगली येथें १९४३ सालीं भरलेल्या नाट्यसंमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. गेल्या एप्रिल महिन्यांत पुणें येथें झालेल्या नाट्यसंमेलनाचें व सोशल क्लबच्या महोत्सवाचें अध्यक्षपद देऊन महाराष्ट्रानें त्यांचा गौरव केला होता. सांगली येथें स्थापन व्हावयाच्या नाट्यविद्यामंदिराच्या कार्यकारिणीचे ते एक सभासद असून, त्या कार्यास त्यांचा महत्त्वाचा हातभार लागेल, अशी आशा आहे. मराठी रंगभूमीच्या आजच्या विपन्नावस्थेंत तिच्या पुनरुज्जीवनासाठीं बन्याबापूंसारख्या अनुभवी कार्यकर्त्यांची फार जरुरी आहे.

## आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

माझे मित्र आचार्य प्र. के. अत्रे हे एक महाराष्ट्राचे यशस्वी नाटककार आहेत. कवि या नात्यानें त्यांच्या व माझ्या परिचयाबद्दलचा सविस्तर उल्लेख यापूर्वी आलाच आहे. मराठी रंगभूमीच्या पडत्या काळांत तिला सावरण्याचें महान् कार्य आचार्य अत्रे यांनीं केलें आहे. 'गुरुदक्षिणा' या विद्यार्थीदशेंत लिहिलेल्या नाटकानें आचार्य अत्रे यांनीं मराठीच्या नाट्यसृष्टींत प्रवेश केला आणि हें त्यांचें पहिलेंच पाऊल जोमदार ठरलें. मध्यंतरीं सन १९३४–३५ पर्यंतच्या काळांत त्यांचें लेखन कवितेपुरतेंच मर्यादित होतें आणि एक शिक्षणतज्ज्ञ या नात्यानें त्यांनीं मोठा लौकिक महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात संपादन केला होता. विडंबनकवि केशवकुमार याच काळांतील

आहेत. यानतर अत्र्यांचें लक्ष पुन्हा रंगभूमीकडे वळलें आणि श्री. दामुआण्णा जोशी यांच्या बालमोहन संगीत नाटक मंडळीनें त्यांचीं विनोदप्रधान अनेक सरस नाटकें रंगभूमीवर आणलीं. साधी पात्रानुकूल सुबोध भाषा व खटकेबाज संवाद या बाबतींत अत्रे हे कै. नाट्याचार्य देवल यांच्या परंपरेतील असून, विनोदाच्या बाबतींत ते गडकरी सांप्रदायी आहेत. छोटा गंधर्व व बापूराव माने या दोन नामवंत नटांना अत्र्यांच्या नाटकांनींच महाराष्ट्रापुढें आणलें. आचार्य अत्रे यांचीं कांहीं नाटकें विनोदप्रधान असलीं तरी, 'घराबाहेर' व 'उद्याचा संसार' हीं त्यांचीं उत्कृष्ट नाटकें गडकऱ्यांच्या 'एकच प्याल्या'-प्रमाणे अमर राहतील.

## श्री. स. अ. शुक्ल

महाराष्ट्राचे एक नाटककार, कवि व लेखक श्री. स. अ. शुक्ल यांचा व माझा फार वर्षांचा स्नेह आहे. बुधगांवच्या युवराजांचे एक शिक्षक श्री. पंडित नांवाचे ग्वाल्हेरकडील गृहस्थ होते. त्यांच्याकडे श्री. शुक्ल आले असताना १९२० सालीं त्यांचा व माझा प्रथम परिचय झाला. शुक्ल त्यावेळीं हळव्या स्वभावाचे एक नवोदित कवि होते. ते अनेकवार बुधगांवास माझ्या घरीं राहिले होते व पुण्यासही अनेक वेळां माझ्याबरोबर आले होते. त्यावेळचा एक मजेदार प्रसंग मला आठवतो. शुक्ल एकदां मला म्हणाले, 'काव्यविहारी' हें सुंदर टोपणनांव तुम्हीं पटकावलें आहे. मला एखादें चांगलें टोपणनांव सुचवा. मी हसून त्यांना म्हणालों, "तुम्ही 'व्रजवासी' हें नांव घ्या. चांगल्या कविता लिहिल्यात तर व्रजवासी म्हणजे श्रीकृष्ण असें लोक म्हणतील आणि वाईट कविता लिहिल्यात तर व्रजवासी शब्दाचा वाच्यार्थ लोक घेतील." यानतर 'कुमुदबांधव' हें नांव शुक्लांनीं घेतलें. त्या नांवानें अनेक चांगल्या कविता त्यांनीं लिहिल्या असून, त्यांचे दोन कविता-संग्रह प्रसिद्ध आहेत. नाटककार म्हणूनही शुक्लांनीं चांगलें नाव मिळविलें आहे. 'सौभाग्यलक्ष्मी' हें त्यांचें नाटक श्री. शंकरराव सरनाईकांच्या यशवंत संगीत मंडळीनें सन १९२५ च्या सुमारास रंगभूमीवर आणलें होतं.

'स्वर्गावर स्वारी' वगैरे त्यांचीं कांहीं नाटकें बालनटाच्या आनंद संगीत मंडळीनें रंगभूमीवर आणिलीं होतीं. श्री. शुक्ल हे एक यशस्वी पद्यकारही आहेत. कांहीं प्रसिद्ध बोलपटातील पद्यें त्यांनीं लिहिलेलीं असून, ध्वनिमुद्रिकांमुळें महाराष्ट्रांत लोकप्रिय झालेल्या गाण्यातील अनेक गाणीं शुक्लांचीं आहेत. केवळ साहित्यावर जगणाऱ्या साहित्यिकांपैकीं ते एक आहेत. त्यांची व माझी भेट १९३७ सालापासून झालेली नाहीं. पण मधूनमधून येणारीं त्यांचीं पत्रें प्रेमादराच्या भावनेनें पूर्ण असतात. आपल्या नाटकांपैकीं मला भेट म्हणून दिलेल्या एका पुस्तकावर त्यांनीं लिहिलें आहे, "आपल्याला हें पुस्तक भेट म्हणून देणें म्हणजे गंगेच्याच पाण्यानें गंगेला अर्घ्य देण्यासारखें आहे." यांत वास्तवतेपेक्षा लोभाचाच भाग अधिक आहे, हें उघड आहे.

## कै. गणेशशास्त्री फाटक

कुरुंदवाडचे नाटककार व लेखक श्री. गणेश कृष्ण फाटक हे माझे स्नेही होते. त्यांचे वडील कै. पैलू-शास्त्री हे मिठास वाणीचे पुराणीक श्रीमंत कुरुंदवाडकरांचे आश्रित होते. श्री. गणेशशास्त्री यांनाही मिठास वाणीचा वारसा वडिलांकडून मिळाला होता. त्यांचा व माझा प्रथम परिचय १९१४ सालीं हरिपूर येथें झाला व परिचयाची परिणति स्नेहांत होऊन हा स्नेह शास्त्रीबुवांच्या मृत्यूपर्यंत अबाधित होता. १९३५ सालीं श्रीमंत डॉवेजर राणीसाहेब कुरुंदवाड यांच्या निमंत्रणावरून सरकारी उत्सवांत काव्य-गायनासाठीं मी कुरुंदवाडास गेलों होतों त्यावेळीं माझी व शास्त्रीबुवांची मनमुराद भेट व बोलणें झालें होतें. शास्त्रीबुवा बुधगांवास अनेक वेळां माझ्याकडे आले होते. त्यांच्या कांहीं लघु कादंबऱ्या त्यांनीं स्वतःच काढलेल्या प्रकाशनमालेंतून प्रसिद्ध झाल्या आहेत. पण गद्यलेखकापेक्षा एक नाटककार म्हणूनच ते महाराष्ट्राला अधिक परिचित होते. 'पंतांची सून', 'माझी जमीन' वगैरे त्यांचीं नाटकें प्रभात संगीत नाटक मंडळीच्या रंगभूमीवर एकाकाळीं गाजलीं असून, या नाटकांच्या तीन तीन आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

## कांहीं परिचित नट

माझ्या वाङ्मयीन जीवनांत महाराष्ट्रांतील कांहीं नामवंत नट मला परिचित झाले असून, त्यांपैकीं कांहीं माझे स्नेही आहेत. नाटकें पाहण्याची व वाचण्याची माझी हौस फार जुनी आहे. त्याबद्दलचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. हल्लीं वयोमानाप्रमाणें ही हौस मावळत चालली आहे. तरीही मधूनमधून ती उसळी घेतेच. अलीकडे नाटकें न पहाण्याचें आणखी एक कारण म्हणजे पूर्वी मराठी रंगभूमीच्या ऐन उत्कर्षकाळात अनेक नाटकें अनेक वेळा अगदीं जवळून पाहून माझ्या डोळ्याचें पारणें फिटलें आहे. त्यामानानें हल्लींचीं नाटकें मला बेचव वाटतात व तीं अखेरपर्यंत पाहवतच नाहींत. 'कुलवधू' सारखें एखादेंच नाटक त्यांतील सौ. ज्योत्स्ना भोळे यांच्या भूमिकेसाठीं पहावेंसें वाटतें. श्री. शांता मोडक व श्री. छोटा गंधर्व यांच्या भूमिका असलेलीं कांहीं संगीत नाटकें मीं अलीकडे पाहिलीं आणि मला थोडेंसें समाधान वाटलें. तरी पूर्वीच्या मानानें त्यांचीं नाटकें फिकींच वाटलीं. गायनहिरा सौ. हिराबाई बडोदेकर यांच्या संयुक्त नाट्यसंघाचीं कांहीं संगीत नाटकें मीं मुद्दाम पाहिलीं आणि त्यांतील सौ. हिराबाईंचें गोड गायन व नटवर्य नानासाहेब फाटक यांचा सुंदर अभिनय यामुळें मला समाधान वाटलें. अलीकडच्या संयुक्त नाट्यप्रयोगाबद्दल माझी मुख्य तक्रार अशी आहे कीं, अशा नाटकांतील पात्रांचीं भाषणें पाठ नसतात आणि सर्व पात्रें तालमीच्या अभावीं आयत्या वेळीं पकडून आणल्याप्रमाणें बेफिकीरपणानें कामें करतात, यामुळें नाटकांना रंगच भरत नाहीं. सुशिक्षितांनीं भूमिका केलेलीं नाटकें त्यामानानें सरस वठतात. गेल्या दोन तीन वर्षांत सांगलीच्या सिटी हाय-स्कुलांतील शिक्षकांच्या नाट्यसंघानें रंगभूमीवर आणलेल्या 'बेबंदशाही' व 'दुसरा पेशवा' या नाटकाचे प्रयोग मीं पाहिले आणि पूर्वी मीं पाहिलेल्या धंदेवाईक गद्य नाटक मंडळ्यांच्या प्रयोगाइतकेंच मला ते सरस वाटले. श्री. कृ. ग. मराठे या शिक्षकांनीं केलेल्या 'संभाजी' व 'बाजीराव' या भूमिका पाहून मला नटवर्य केशवराव दाते व कै. रामभाऊ गोखले यांचें स्मरण झालें.

## कै. केशव विठ्ठल भोसले

मला परिचित झालेले पहिले नट म्हणजे महाराष्ट्राचे ख्यातनाम गायकनट कै. केशवराव भोसले हे होत. सन १९०६।०७ च्या सुमारास स्वदेश हितचिंतक नाटक मंडळींतून बाहेर पडलेल्या केशवरावानीं हुबळी येथील महाराष्ट्रीयाच्या मदतीनें खास लोकाश्रयाखालील ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीची स्थापना केली. या कंपनीच्या साहाय्यकांत माझे एक आप्त कै. वामन नारायण जोशी हे होते. १९१० सालीं केशवरावांची कंपनी सांगलीच्या मुक्कामास आली त्यावेळीं माझे आप्त वामनराव जोशी हे रेल्वे कंपनीची नोकरी सोडून हरिपुरास आमचे घरांत बिऱ्हाडानें राहिले होते. यामुळें केशवराव व त्यांच्या कंपनींतील नट अनेक वेळां हरिपुरास आमच्या घरीं येत असत. आमच्या घरातील गोपालकृष्णमंदिरात केशवरावांचें गाणेंही त्यावेळीं अनेक वेळां झाल्याचें स्मरतें. या परिचयामुळें केशवरावांच्या नाटकांना मला मुक्तद्वार होतें. प्रत्येक नाटकाचे दिवशीं हरिपुराहून पांजरपोळांतील कंपनीच्या बिऱ्हाडीं जावयाचें, तेथून जेवण करून नाटकास जावयाचें व नाटक संपल्यावर लागलीच अगर दुसऱ्या दिवशीं हरिपुरास परत जावयाचें, हा माझा ठरलेला क्रम होता. केशवराव मला नेहमीं एकेरी नांवानें हांक मारीत व प्रत्येक नाटकाचे वेळीं मला भेटत. केशवराव नायिकांच्या भूमिका करीत असत व त्याचे वडील बंधु दत्तोबा नायकाचीं कामें करीत असत. दत्तोबा व इतर पात्रें गायन व अभिनय या दृष्टीनें बेताचींच होतीं, पण एकट्या केशवरावांच्या गाण्यामुळें सारीं नाटकें रंगत असत. केशवरावांचें शरीरसौष्ठव व रूप साधारणच होतें, पण त्याचे नाकडोळे रेखीव होते आणि आपल्या तडफदार गाण्यानें ते आपल्या भूमिका यशस्वी रीतीनें पार पाडीत. सन १९१३।१४ च्या सुमारास वीर वामनराव जोशी यांचें 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हें नाटक केशवरावांनीं रंगभूमीवर आणलें आणि तेथून ललितकलादर्श नाटक मंडळीच्या भाग्याला सुरवात झाली व तें भाग्य केशवरावाच्या मृत्यूपर्यंत चढतेंच राहिलें. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' नाटकांत केशवराव मृणालिनीची भूमिका करीत असत. मानापमानांतील पदांच्या सुंदर व ढंगदार चालींवर मृणालिनीचीं सर्व पदें होतीं, तीं गातांना केशवराव

व्यवहार करीत असत. केशवराव व बालगंधर्व यांच्या भूमिका असलेला संयुक्त मानापमानाचा प्रयोग म्हणजे केशवरावांच्या उत्कर्षाचा कळस होता. या प्रयोगांत केशवरावांची धैर्यधराची भूमिका बालगंधर्वांच्या भामिनीच्या भूमिकेपेक्षां वरचढ ठरली असेंच मत रसिकांनीं प्रदर्शित केलें. केशवरावांच्या या भूमिकेला कोणाची तरी दृष्ट लागली असावी. कारण लौकरच त्यांचें देहावसान झालें आणि मराठी रंगभूमी एका कर्तबगार गायक नटाला मुकली. केशवराव जसे उत्कृष्ट गायकनट होते तसेच ते एक व्यवहारदक्ष व्यवस्थापक होते. यामुळें खास लोकाश्रयाखालील ही नमुनेदार कंपनी केशवरावांनीं अखेरपर्यंत उत्तम रीतीनें चालवून निष्कर्जी अवस्थेंत पैदारकराच्या स्वाधीन केली. रंगभूमीवरील चित्रांकित दर्शनी पडद्याऐवजीं मखमलीचा पडदा मराठी रंगभूमीवर प्रथम आणण्याचें श्रेय केशवरावांना आहे. केशवरावांच्या व माझ्या वयात बरेंच अंतर होतें व त्यांच्या ऐन उमेदींत मी विद्यार्थी होतों, यामुळें त्यांचा व माझा बराच परिचय होता तरी स्नेह कधींच नव्हता. अखेरपर्यंत ते मला एकेरी नांवानें संबोधीत असत. केशवरावांना वाङ्मयाभिरुचि बेताचीच असल्यानें माझ्या काव्यलेखनाबद्दल मी त्यांना कधींच बोललों नाहीं आणि त्यांनींही कधीं चौकशी केली नाहीं. 'मानापमाना' तील धैर्यधर, 'राक्षसी महत्त्वाकांक्षे' तील मृणालिनी, 'हाच मुलाचा बाप' मधील डॉ. गुलाब व 'संन्याशाचा संसार' मधील डेव्हिड या केशवरावांच्या गाजलेल्या भूमिका होत्या. कोणत्याही पदाला हुकमी वन्समोअर घेण्याइतकी आकर्षक व तडफदार गायकी आणि व्यवहारदक्षता यांचा दुर्मिळ संगम अंगीं असलेले कै. केशवराव भोसले हे माझ्या माहितीप्रमाणें एकमेव मराठी नट होते.

## श्री. रामभाऊ गुळवणी

सन १९१३ च्या सुमारास आजचे नामवंत गायक श्री. रामभाऊ गुळवणी यांनीं केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श नाटक मंडळींत प्रवेश केला. त्यावेळीं त्यांचें वय १३।१४ वर्षांचें होतें यामुळें केशवराव व कंपनींतील इतर मंडळी 'रामा गुळवणी' या एकेरी व लाडक्या नावानें त्यांना

हाक मारीत. केशवरावांबरोबर रामा गुळवणीही हरिपुरास आमचे घरीं बरेच वेळा येत असे. आम्ही दोघे जवळजवळ सारख्याच वयाचे असल्यानें, रामाचा व माझा लौकरच स्नेह जमला. आम्ही घरींच तयार केलेल्या गांवठी टेबलावर मी व रामा गुळवणी अनेक वेळां पिंगपाँग खेळलों आहे. शारदा, सौभद्र व मृच्छकटिक या नाटकांत रामाला बालशारदा, बालसुभद्रा व बाल-वसंतसेना या भूमिका दिल्या जात व केशवराव नायकाच्या भूमिका करीत असत. रामच्या गायनशिक्षणाची केशवराव अतिशय काळजी घेत असत आणि रामच्या साऱ्याच भूमिका गायन व अभिनय या दृष्टींनीं तडफदार होत असत. 'सन्याशाचा संसार' मधील रामभाऊंची दुलारीची भूमिका त्यावेळीं चांगलीच गाजली होती. केशवरावांच्या मृत्यूनंतर रामभाऊंनीं ललितकलादर्श कंपनी सोडली आणि ते व केशवरावांचे वडील बंधु दत्तोबा यांनीं केशव संगीत मंडळीची स्थापना केली, पण व्यवहारदक्षतेच्या अभावीं ही कंपनी लवकरच खलास झाली. आमच्याकडील नटांत एक मोठा दोष आहे. लोकांत थोडीशी वाहवा झाली कीं सामान्य नटालाही सवतासुभा उभारून नवीन कंपनी स्थापन करण्याचे व तिचा मालक होण्याचे डोहाळे लागतात व याचा परिणाम व्हावयाचा तोच होतो, म्हणजे कंपनीच्या स्थापनेनंतर लौकरच कंपनी कर्जबाजारी होऊन तिचे बारा वाजतात! यानंतर रामभाऊ, गंधर्व व नाट्यकलाप्रसारक या कंपन्यांत गेले व त्यांनीं नट म्हणून चांगला लौकिक मिळविला. सन १९३२।३३ च्या सुमारास ते पुन्हां गंधर्व नाटक मंडळींत गेले. स्वयंवरातील भीष्मकाची भूमिका ते गायन व अभिनय या दृष्टींनीं सुंदर वठवीत असत. पुढें रंगभूमीचा पडता काळ सुरू झाल्यावर त्यांनीं नाटक कंपनी सोडून गायनाचा अभ्यास केला व ग्वाल्हेर येथें ते दरबार गवई झाले. हल्लीं त्यांची गायनाची तयारी चांगलीच असून रेडिओवर त्यांचें गायन मधूनमधून ऐकावयास मिळतें. बृहन्महाराष्ट्रांत त्यांनीं आपले अनेक चाहते निर्माण केले आहेत. एकाद्या संयुक्त नाट्यसंघात गायकनट म्हणून पुन्हां जाणेबद्दल मीं परवां त्यांना एकदां सुचविलें, पण त्यांनीं त्याबद्दल नाखुषी दर्शविली. रामभाऊंना माझ्याबद्दल व माझ्या काव्याबद्दल आपुलकी व आदर आहे. सांगलीस ते केव्हाही आले तरी मला अगत्यपूर्वक भेटतात. रामभाऊंचा स्वभाव प्रसिद्धिविन्मुख व स्वाभिमानी आहे. महाराष्ट्रीय

रसिकांनीं या गुणी गायकाला उत्तेजन दिलें पाहिजे. परवां त्याचा एक सुंदर जलसा मुंबईस झाल्याचें लोकसत्तेंत वाचलें तेव्हां चाळीस वर्षांचा रामभाऊचा इतिहास डोळ्यापुढें उभा राहिला.

## नटवर्य गणेश गोविंद बोडस

महाराष्ट्राचे एक विख्यात नटवर्य गणेश गोविंद बोडस हे माझे फार वर्षांचे स्नेही आहेत. त्यांचा व माझा प्रथम परिचय सन १९२३ च्या सुमारास झाला. गंधर्व नाटक मंडळींत असतांनाच मिरज, पंढरपूर रस्त्यावरील बोरगांव या गांवीं त्यानीं कांहीं जमीन खरेदी केली. या कामीं बोडसाचे श्वशुर कै. कृष्णाजीपंत काळे यांनीं त्यांना प्रोत्साहन दिलें. बोरगांव हें गांव मी नोकर असलेल्या मिरजमळा संस्थानातील असल्यानें मामलतदार या नात्यानें मला नेहमीं बोरगांवास जावें लागे. यामुळें बोडसांचा व माझा परिचय वाढला व क्रमाक्रमानें त्याची परिणति स्नेहांत झाली. १९२९ सालीं बोडस पुन्हा गंधर्व नाटक मंडळींत गेले. पुढें दोन तीन वर्षांत बोडसांनीं गंधर्व कंपनी सोडली व ते सांगलीस स्थायिक झाले. यानंतर ते व त्यांचे स्नेही क. एस्. ए. कुलकर्णी व श्री. गणपतराव गोडबोले यांनीं देवल क्लबची स्थापना करून क्रमाक्रमानें ती संस्था चांगलीच नांवारूपास आणली. या कामीं देवलांचे चिरंजीव श्री. रामभाऊ देवल यांचें चांगलें साहाय्य झालें आहे. मीं एक नाटक लिहावें असें बोडसांनीं मला अनेकदां सुचविलें व जरूर तें साहाय्य देण्याचें कबूल केलें, पण तें मला जमलें नाहीं. बोरगावची त्यांची शेती पुढेंपुढें तोट्याची होऊं लागली. सन १९४५ च्या सुमारास दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांत लोकशाहीच्या नांवाखालीं गुंडशाही माजली आणि देशभक्तीच्या नांवावर रयतांना सतावणारे अनेक गुंड गांवोगाव निर्माण झाले. बोरगांवांतही अशा गुंडांचा बोडसांना बराच त्रास झाला व अखेर त्यांना बोरगाव सोडावें लागलें. सरकारला न जुमानणें हें त्यावेळीं गुंडांचें ब्रीद होतें आणि कमकुवत संस्थानिक त्याचा बंदोबस्त करण्यास असमर्थ होते. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें १९४८ सालीं मुंबई प्रांतांत

विलीन झाल्यावर बोडसांनीं आपल्या शेतीची व्यवस्था कोर्ट ऑफ वॉर्डकडे सोपविली आहे. सन १९४० च्या मार्च महिन्यात नाशिक येथें भरलेल्या नाट्यसंमेलनाचे बोडस अध्यक्ष होते. त्याच प्रसंगानें प्रसिद्ध झालेलें 'माझी भूमिका' हें त्याचें आत्मचरित्र रंगभूमीच्या गेल्या ६० वर्षांतील इतिहासावर प्रकाश टाकणारें आहे. बोडसांनीं अलीकडे एक शेतीपुराण लिहिलें आहे आणि तें मीं वाचलें आहे. या अद्याप अप्रसिद्ध असलेल्या शेतीपुराणात बोडसांनीं आपले शेतीविषयक सर्व अनुभव प्रांजलपणें नमूद केले आहेत. हें शेतीपुराण वाचणें मोठें उद्बोधक आहे. जो आपला विषय नाहीं त्यांत चुकून अगर कोणाच्या तरी सदसल्ल्यानें एखादा इसम पडला तर त्याचे कसे हाल होतात, हें बोडसाच्या शेतीपुराणावरून चांगलेंच कळून येतें. बोडसाच्या रंगभूमीवरील सर्व भूमिका मी माझ्या विद्यार्थीदशेपासून पहात आलों आहें. लहानपणीं घरांतून पळून जाऊन किर्लोस्कर कंपनींत एक सामान्य नट म्हणून शिरलेले गणपतराव बोडस, नटश्रेष्ठ म्हणून महाराष्ट्रांत गाजले, हा केवळ योगायोग खास नव्हे. अभ्यास, परिश्रम, व्यवहारदक्षता, चिकाटी आणि विद्वानांचा सहवास यांमुळेंच ते उत्कर्षाला चढले. बोडसाना केवळ विनोदी नट म्हणणारांना खरे बोडस कळलेच नाहींत असें म्हणावें लागतें. ते एक अष्टपैलू नटवर्य आहेत. शकार, लक्ष्मीधर, सुधाकर, कांचनभट व फाल्गुनराव या भिन्न स्वभावाच्या भूमिका ते सारख्याच कुशलतेनें वठवितात. व्यवहाराच्या बाबतींत गणपतराव हिशेबी व अत्यंत काटेकोर आहेत, असा एक आक्षेप त्यांच्याबद्दल केव्हांकेव्हां घेतला जातो; पण मला वाटतें कीं, या हिशेबीपणामुळेंच सुखाचा संसार करून दोन घांस वृद्धापकाळांत ते सुखानें खाताहेत. वयाची सत्तरी उलटली असूनही रंगभूमीबद्दल बोलतांना बोडसांचा उत्साह पाहिला आणि पुण्यामुंबईसारख्या दूरच्या गांवीं जाऊन अद्यापही त्यांना रंगभूमीवर भूमिका करतांना पाहिलें म्हणजे या नटश्रेष्ठ मित्राबद्दल माझा आदर दुणावतो. ता. १० जुलई १९५४ रोजीं बोडसांच्या वयाला ७५ वर्षें पूर्ण झालीं आणि रंगभूमीवर त्यांचें पदार्पण होऊन त्याच दिवशीं ६० वर्षें पूर्ण झालीं. या निमित्तानें बोडसाचा जाहीर सत्कार सांगलींत करण्यांत आला.

## नटसम्राट बालगंधर्व ( नारायण श्रीपाद राजहंस )

नटसम्राट बालगंधर्व यांचा व माझा प्रथम परिचय सन १९२९ च्या डिसेंबर अखेरीस झाला व तो माझे मित्र नटवर्य बोडस यांनीं करून दिला. त्यावेळीं गंधर्व नाटक मंडळीचा मुक्काम पुण्यास होता व नटवर्य बोडसांनीं पुण्यांत बिऱ्हाड केलें होतें. बोडसांच्या निमंत्रणावरून सन १९२९ च्या नाताळचे सुटींत मी पुण्यास गेलों होतों. गंधर्व नाटक मंडळीच्या ' एकच प्याला ' नाटकाच्या प्रयोगास मी गेलों असता बोडसांनीं माझा व बालगंधर्वांचा परिचय करून दिला. नारायणराव फारच प्रेमळपणानें माझ्याबरोबर वागले आणि मी काव्यलेखन करीत असल्याचें कळतांच त्यांनीं आनंद व्यक्त केला. यानंतर १९३२ सालीं गंधर्व नाटक मंडळीचा मुक्काम मिरजेस असतांना माझ्या व बालगंधर्वांच्या अनेक गांठीभेटी झाल्या व परिचय वाढला. गंधर्व नाटक मंडळीचें बिऱ्हाड मिरजेंतील श्रीमंत मळेकर यांचे वाड्यात होतें व कांहीं दिवस बालगंधर्व आपले कुटुंबीयांसह बुधगावकरांच्या मिरजमळ्यांत राहत होते. हे सुंदर ठिकाण मिरजेपासून सुमारें अर्धा मैल अंतरावर असून रम्य आहे. याही ठिकाणीं मी अनेक वेळां गेलों होतों. याच मुक्कामात बालगंधर्वही एकदां बुधगांवास माझ्याकडे आले होते. गंधर्व कंपनी पुढें मे महिन्यात बेळगांवला गेली तेथेंही मी गेलों असतांना डॉ. साठे व बालगंधर्व यांचा परस्पर परिचय मीं करून दिला. गंधर्व कंपनीचा मुक्काम सातारा येथें असतांना कंपनीचें बिऱ्हाड श्री. नानासाहेब माजगावकर यांच्या वाड्यात होतें. साताऱ्यासही मी आठ दिवस गेलों होतों. याच मुक्कामात गंधर्व नाटक मंडळींतील गायकनट श्री. विनायकराव पटवर्धन व संगीत-कलानिधि मास्तर कृष्णराव यांचा व माझा परिचय झाला. यानंतर मराठी रंगभूमीला कठिण दिवस आले आणि गंधर्व नाटक मंडळी स्थगित करून नटसम्राट बालगंधर्व कांहीं काळ बोलपटांत शिरले. बालगंधर्वांच्या एकनाथाच्या भूमिकेमुळें प्रभात फिल्म कंपनीचा ' धर्मात्मा ' हा बोलपट चांगलाच गाजला. पण बोलपटातील यांत्रिक जीवन या थोर गायकाला व नटाला मानवलें नाहीं. पुढें कांहीं वर्षे तग धरून गंधर्व नाटक मंडळी कांहीं काळ विराम पावली. महाराष्ट्राच्या या अग्रेसर नाटक मंडळीचें मधूनमधून पुनरुज्जीवन होतें, व

आपल्या पूर्वकालीन सहकाऱ्यांच्या मदतीनें बालगंधर्व जुनीं लोकप्रिय नाटकें रसिकांना दाखवितात. बालगंधर्वांच्या जीवनाचा पूर्वकालीन उत्कर्ष आणि केवळ गरज म्हणून हल्लीं होणारें रंगभूमीवरील त्याचें पदार्पण या दोन्ही गोष्टी नजरे-समोर आल्या म्हणजे जगाच्या व्यवहाराचा काटेकोरपणा मनाला जाणवतो व वाईट वाटतें. १९४६ सालीं मुंबईच्या रेडिओवर मी काव्यगायनासाठीं गेलों असताना रेडिओच्या इमारतींत बालगंधर्व मला भेटले आणि त्यांचा उदास चेहरा पाहून मला भडभडून आलें. एकाकाळीं लक्ष्मी या नटश्रेष्ठाच्या पायावर लोळण घेत होती. बालगंधर्वांनीं गंधर्व नाटक मंडळीचे मालक म्हणून अक्षरशः लाखो रुपये कमावले आणि मराठी रंगभूमीचें वैभव वाढविण्यात कमावलेली सारी संपदा खर्च करून महाराष्ट्राचा हा लाडका नटसम्राट अखेर कफल्लकच राहिला. बालगंधर्वांना व्यवहार समजत नाहीं आणि गंधर्व कंपनीचा व्यवहार पाहत असतांना ते फार उधळेपणानें व गैरहिशेबी वागले, असा प्रवाद केव्हांकेव्हां ऐकू येतो; पण जातिवंत कलावंतांना व्यवहारी होणें कधींच जमत नाहीं. यामुळें हिशेबीपणाची अपेक्षा त्यांच्याकडून करणेंच चुकीचें आहे. या दृष्टीनें बालगंधर्वांच्या चाहत्यांनीं व स्नेह्यांनीं त्यांना ठराविक मासिक वेतन देऊन कंपनीचा कारभार एकाद्या व्यवहारदक्ष व हिशेबी गृहस्थाकडे सोपविला असता तर गंधर्व नाटक मंडळीचा इतिहास वेगळाच झाला असता; पण तसें व्हावयाचें नव्हतें आणि यामुळेंच मराठी रंग-भूमीच्या या एकनिष्ठ व दिलदार सेवकाला आयुष्याचा उत्तरकाल हालअपेष्टांत काढावा लागत आहे. बालगंधर्वांच्या गायन अभिनयादि गुणांवर मी प्रारंभापासून बेहद्द खूष असलेला गृहस्थ आहे. त्यांना मी नटसम्राट तर मानतोंच, पण स्वरसम्राटही मानतों. रेडिओवर कधीं त्यांचें गाणें अगर भजन लागलें तर तें मी एकतानतेनें ऐकतों. त्यांचा व माझा थोडासा परिचय घडून आला याबद्दल मला धन्यता वाटते. बालगंधर्वांचे समकालीन कै. केशवराव भोसले, कै. सवाईगंधर्व, कै. दीनानाथ मंगेश-कर व श्री. शंकरराव सरनाईक वगैरे विख्यात गायकनट रंगभूमीवर चमकले व यापैकीं प्रत्येकाचें कांहींतरी गुणवैशिष्ट्य होतेंच; पण स्वरूप-सुंदरता, गायन व अभिनय, या संगीत नटाला आवश्यक असलेल्या गुणांचा सुंदर संगम बालगंधर्वांइतका इतर कोणत्याही गायकनटांत मला आढळून

आलं नाहीं. बालगंधर्वांवर महाराष्ट्राचा पूर्वीइतकाच आजही अपार लोभ आहे, हें त्याच्या ठिकठिकाणीं होत असलेल्या जाहीर सत्कारावरून दिसून येत आहे.

## कै. नटवर्य मामा भट

नुकतेच दिवंगत झालेले सांगलीचे जुन्या जमान्यांतील एक प्रसिद्ध नट कै. मामा भट यांचा व माझा ऋणानुबंध फार वर्षांपासून होता व ते माझे आप्तही होते. मरणापूर्वी बरेच दिवस रुग्ण शय्येवर असलेल्या या नटानें मराठी गद्य रंगभूमी एका काळीं गाजविली होती. जुन्या काळच्या बहुतेक नटांप्रमाणें घरांतील वडील मंडळींच्या इच्छेविरुद्ध मामा नाटक मंडळींत गेले. तरुण वयांत त्यांना कुस्तीचा व कबुतराचा फार नाद होता, असें त्यांनींच मला परवां सांगितलें. प्रथम ते महाराष्ट्र नाटक मंडळींत कांहीं वर्षे राहून नंतर कै. गणपतराव जोश्यांच्या शाहूनगरवासी नाटक मंडळींत गेले व या कंपनींतून पुन्हां महाराष्ट्र नाटक मंडळींत गेले. प्रारंभीं दुय्यम स्त्रीभूमिका करणारे 'मामा' चिकाटी, परिश्रम व अभ्यास यांच्या जोरावर महाराष्ट्र नाटक मंडळींत लौकरच प्रमुख स्त्रीभूमिका करूं लागले. सत्वपरीक्षेंतील तारामती आणि तारामंडळांतील भामिनी या त्यांच्या भूमिका महाराष्ट्रांत त्यावेळीं गाजलेल्या होत्या. 'शिवसंभव' नाटकांत व नंतर 'माझा मुलगा' या बोलपटांत त्यांनीं पुरुषभूमिकाही यशस्वी रीतीनें करून दाखवून नांव मिळविलें. रंगभूमीवरून निवृत्त झाल्यावर त्यांनीं अत्तरें, तेलें, पाक व दागिने वगैरे जिनसांचा व्यापार करणारी भट आणि कंपनी स्थापन करून ती चांगली नांवारूपाला आणली. जुन्या काळीं नाटक मंडळींत शिरूनही अखेरपर्यंत निर्व्यसनी राहिलेले व रंगभूमीवरून निवृत्त झाल्यावर अन्य व्यवसाय करून व्यवस्थित संसार केलेले जे थोडे नट महाराष्ट्रांत माझ्या परिचयाचे आहेत त्यांत कै. श्री. मामा भट यांची गणना केली पाहिजे. भट आणि कंपनीची सांगलीची शाखा चालविणारे त्यांचे पुत्रही मराठी रंगभूमीचे एक हौशी सेवक आहेत.

माझ्या वाङ्मयीन जीवनवृत्तांतात कांहीं नटांचा व माझा झालेला परिचय व स्नेह मीं मुद्दाम समाविष्ट केला आहे. कारण नाट्यवाङ्मय व नट यांचा अतिनिकट संबंध आहे, असें माझें मत आहे. परवांच एका व्याख्यानांत श्री. मामासाहेब वरेरकर यानीं सांगितल्याप्रमाणें नाटक हें वाङ्मय आहे. नाटककाराचे विचार व भावना रंगभूमीवर विशद करणारा नट हा नाटककार व प्रेक्षक यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा आहे. काव्य आणि काव्यगायक यांचा जो संबंध आहे, तोच संबंध नाटक व नट यांचा आहे. नाटक हें रंगभूमीवरील दृश्य काव्य असल्यानें नाटकें आणि नट यांचा संयुक्त अभ्यास ज्याला घडेल त्यालाच रंगभूमीचा यशस्वी टीकाकार होतां येईल. माझ्या विद्यार्थीदशेपासून रंगभूमीशीं माझा अतिनिकट संबंध आला आहे. याचाच परिपाक म्हणून कांहीं मराठी रंगभूमीविषयक लेख मीं गेल्या चार पांच वर्षांत लिहिले आहेत आणि असे लेख यापुढेंही लिहिण्याचा माझा विचार आहे.

## कांहीं परिचित संगीतज्ञ व गायक

नाटककार आणि नट यांच्याप्रमाणेंच काहीं नामवंत संगीतज्ञ व गायक यांचाही परिचय व काहींचा स्नेह मला सुदैवानें लाभला आहे. नाटकाप्रमाणेंच संगीताचीही मला विद्यार्थीदशेपासूनच अतिशय आवड आहे. विद्यार्थी असताना कै. बाळकृष्णबुवा चंदूरकर, मरहूम रहिमतखांसाहेब यांचीं गाणीं मीं ऐकलीं होतीं. त्याचप्रमाणें सांगलीचे राजवैद्य कै. आबासाहेब साभोर यांच्याकडील गणेशोत्सवात मरहूम अल्लादियाखांसाहेब व इतर नामवंत गायकगायिका यांचीं गाणीं मीं मनमुराद ऐकलीं होतीं. मी बुधगांवास नोकर झाल्यावर तेथील सरकारी गणेशोत्सवांत मरहूम अब्दुलकरीमखांसाहेब, कै. रामकृष्णबुवा वझे, श्री. शिवरामबुवा वझे, श्री. नानाबुवा कुरुंदवाडकर यांचीही गाणीं मला ऐकावयास मिळालीं. याशिवाय पुणें व मुंबई या ठिकाणीं कै. भास्करबुवा बखले, कै. बाई गोहरजान, संगीतचूडामणि विनायकबुवा पटवर्धन, संगीतकलानिधि मास्तर कृष्णराव, श्री. नारायणराव व्यास, श्री. अनंत मनोहर जोशी व त्यांचे चिरंजीव

श्री. गजाननबुवा यांचींही गाणीं मीं मनसोक्त ऐकलीं आहेत. श्रीमती केसरबाई केरकर, श्रीमती मोघूबाई कुर्डीकर व श्रीमती लक्ष्मीबाई जाधव या ख्यातनाम गायिकांचीं गाणींही मला ऐकावयास मिळालीं आहेत. वरील गायकगायिकांशिवाय मराठी रंगभूमीवरील गायकनटांचीं गाणीं मी आज-तागायत ऐकत आलों आहें, तीं वेगळींच. वर उल्लेखिलेल्या गायक-गायिकांपैकीं अगदीं थोड्या गायकांचा मला प्रत्यक्ष परिचय घडलेला आहे.

## श्री गोविंदराव टेंबे

अशा गायकांत व संगीततज्ञांत पहिलें स्थान अर्थातच माझे मित्र व एक ख्यातनाम हार्मोनियम वादनपटु श्री. गोविंदराव टेंबे यांचें आहे.

श्री. गोविंदराव टेंबे यांचा प्रथम परिचय १९३६ सालीं कोल्हापुरचे श्री. गोपाळराव श्रीखंडे यांनीं मला करून दिला. त्यापूर्वी त्यांचें श्रुति-मनोहर पेटीवादन मीं अनेक वेळां ऐकलें होतें. गंधर्व नाटक मंडळीच्या रंगभूमीवर व नंतरच्या कांहीं बोलपटांत त्यांच्या भूमिकाही मीं पाहिल्या होत्या आणि त्यांचे कांहीं संगीतविषयक लेखही मीं वाचले होते. वर उल्लेखिलेल्या प्रथम परिचयाच्या वेळीं कोल्हापूर येथील माझ्या मुक्कामांत श्री. गोपाळराव श्रीखंडे व मी मंगळवार पेठेंतील गोविंदरावांच्या घरीं एका सायंकाळीं गेलों व त्याच वेळीं माझ्या स्फूर्तिलहरी काव्यसंग्रहाची प्रत त्यांना मी भेट म्हणून दिली व माझ्या कांहीं कविता त्यांना म्हणून दाखविल्या. त्यानंतर सन १९३९ च्या फेब्रुआरी महिन्यांत मिरज येथें भर-लेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनांत त्यांचा परिचय दृढ झाला. त्याबद्दलचा वृत्तांत पूर्वी आलाच आहे. याच संमेलनात माझी कन्या सौ. विमल हिचें खासगी अभिनंदन करताना गोविंदराव तिला म्हणाले होते, " काव्यविहारीसारखे वडील लाभल्याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों व तुझ्यासारखी गोड गळ्याची कन्या लाभल्याबद्दल मी काव्यविहारींचें अभिनंदन करतों." या प्रसंगानें व्यक्त झालेला जिव्हाळा गोविंदरावांनीं अजूनपर्यंत ठेवला आहे. सन १९५० च्या ऑगस्ट महिन्यांत माझी कन्या सौ. विमल हिच्या ' भूमीचा भार ' या पहिल्या नाटिकेचा प्रकाशन समारंभ झाला. त्या

समारंभाचे अध्यक्ष म्हणून गोविंदराव माझ्याकडे आले होते. गोविंदराव केव्हाहि सांगलीस आले तरी अगत्यपूर्वक मला भेटतात आणि मी कोल्हापुरास केव्हांही गेलों तरी त्यांना भेटल्यावाचून राहत नाहीं. गोविंदराव हे एक थोर संगीतज्ञ साहित्यिक असून, त्यांचें संगीतज्ञान खोल आहे. ‘माझा संगीत व्यासंग’ हें त्यांचें पुस्तक विद्वानांनीं व रसिकांनीं एकमुखानें वाखाणलेलें एक मनोरम गद्य-काव्य आहे. गेल्या वर्षी लोकसत्तेंत क्रमशः प्रसिद्ध झालेली त्यांची रागरागिणी-वरील लेखमाला व ‘संगीत कलाविहार’ मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झालेलें मरहूम अल्लादियाखांसाहेब यांचें चरित्र यावरून त्यांचा संगीताचा गाढ अभ्यास प्रत्ययास येतो. श्री. टेंबे हे एक नामवंत नाटककार असून ‘पटवर्धन’, ‘तुलसीदास’ वगैरे त्यांचीं नाटकें रंगभूमीवर आलीं आहेत. त्यांची पद्यरचना सुबोध व प्रासादिक आहे. कै. नाट्याचार्य देवल यांच्या-नंतर इतकी सोपी, सुंदर व प्रासादिक पद्यरचना कोणत्याही नाटककारानें केलेली नाहीं. कै. रामकृष्णबुवा वझे, पंडित विनायकराव पटवर्धन व मास्तर कृष्णराव यांनीं काहीं संगीतविषयक पुस्तकें व लेख लिहिलेले आहेत; पण श्री. टेंबे यांच्या लेखनातील सुबोधता, लालित्य व गोडवा वरीलपैकीं एका-च्याही लेखनांत नाहीं. श्री. टेंबे यांची मुंबई रेडिओवर प्रकाशित झालेली ‘महाश्वेता’ ही संगीतिका तर अपूर्व आहे. गोविंदरावांचें हार्मोनियम-वादनपटुत्व तर विख्यातच आहे. सुमारें तीन वर्षांपूर्वी मीं त्यांचें ऐकलेलें अगदीं अलीकडील पेटीवादन तर चिरस्मरणीय आहे. सांगली येथील वखारभागातील गाडगीळ, जोशी आणि कंपनीच्या माडीवरील दिवाण-खान्यांत एका रात्रीं गोविंदरावांचें पेटीवादन झालें. हा योग माझे मित्र श्री. वालचंदशेटजी यांनीं घडवून आणला होता व सर्व व्यवस्था त्यांनींच केली होती. शेटजींच्या व गोविंदरावांच्या निमंत्रणावरून मी या कार्यक्रमास मुद्दाम गेलों होतों. कविमित्र गिरीश व त्यांचे संगीततज्ञ व गायक चिरंजीव मधुरावही हजर होते. त्या रात्रीं सुमारें तीन तास झालेल्या पेटी-वादनानें गोविंदरावांनीं बहार केली व उपस्थित श्रोत्यांना डोलविलें. पेटी-वादनाच्या वेळचा गोविंदरावांचा उत्साह पाहून हा गृहस्थ सत्तरी उलटलेला आहे, हें सांगूनही खरें वाटलें नसतें. या पेटीवादनानंतर गोविंदरावांना चांगलाच शीण आला. दुसरे दिवशीं गोविंदराव भेटल्यावर मी त्यांना

म्हणालों, " इतकें उत्तार वय झालें असूनही तुम्ही सतत तीन तास पेटी कशी वाजवू शकता, याचा मी रात्रभर विचार करीत होतों व सकाळीं त्याचा उलगडा झाला. ज्यावेळीं तुम्ही एकतानतेनें रंगून पेटी वाजवितां त्यावेळीं पवित्र अशा एका समाधिअवस्थेंत तुम्ही असतां. संगीताची देवता त्यावेळीं तुमच्या भोंवतीं एक वर्तुळाकार रेषा मारून ठेवते. त्या रेषेच्या आंत वार्धक्य, थकवा वगैरे उपाधि शिरूंच शकत नाहींत. ही समाधि उतरून पेटीवादन संपलें कीं थकवा तुम्हाला स्पर्श करूं शकतो." गोविंदराव हसून म्हणाले, " तुम्ही कविलोक काय म्हणाल तें खरें." हें स्मरणीय पेटीवादन ऐकून तीन वर्षें होऊन गेलीं आहेत, पण काल ऐकल्याप्रमाणें ते गोड स्वरालाप अद्याप माझ्या कानांत घुमत आहेत असें वाटतें !

## कै. रामकृष्णबुवा वझे

महाराष्ट्राचे एक नामवंत गायक कै. गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे यांचा व माझा प्रथम परिचय बेळगांव येथें सन १९३५ च्या सुमारास झाला. बुवा त्यावेळीं मारुतीच्या देवळाजवळील एका गल्लींत राहत होते. पहिल्याच भेटींत बुवांनीं आपला पूर्ववृत्तांत मला मनमोकळेपणानें सांगितला. वझेबुवा हे मूळचे गोव्याकडले. गायनकला हस्तगत करण्याच्या ईर्षेनें बुवा उत्तर हिंदुस्थानांतील अनेक ठिकाणीं हिंडले व गुरूची खडतर सेवा करून त्यांनीं गायनविद्या संपादन केली. नंतर महाराष्ट्रांत आल्यावर बुवांनीं अनेक शिष्य व शिष्यिणीही तयार केल्या. कै. केशवराव भोसले यांच्या ललितकलादर्श नाटक मंडळीच्या कांहीं नाटकांतील पदांच्या चाली वझेबुवांनीं दिल्या होत्या. कै. पेंढारकर व कै. दीनानाथ मंगेशकर हे बुवांचे शिष्य होते. वझेबुवांच्या-जवळ चिजांचा संग्रह मोठा होता. बुधगांवचे हल्लींचे राजे श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांना गायनाची चांगली आवड असून, ते स्वतः चांगले गातात. गायनाचा नाद असल्यामुळें कांहीं चांगले गायक व गायिका हल्लीं त्यांचे पाहुणे म्हणून बुधगांवास येतात. सुमारें १२।१३ वर्षांपूर्वीं श्रीमंत बाळा-साहेब हे युवराज असतांना वझेबुवा त्यांना गायन शिकविण्यासाठीं बुधगांवास दोन तीन महिने राहिले होते. त्यावेळीं बुवांची व माझी बहुशः रोज गांठ

पडत असे व संगीतविषयक बोलणेंही होत असे. या बोलण्यांत माझी भूमिका फक्त श्रोत्याचीच असे. स्वतः लिहिलेल्या संगीतविषयक लेखाचें एक बाड वझेबुवांनीं त्यावेळीं मला दाखविलें होतें. तसेंच स्वतः लिहिलेल्या संगीत-विषयक आठवणीही बुवांनीं मला दाखविल्या होत्या. बुवांच्या सर्व लेखनांत व्यवस्थितपणा नव्हता व भाषेचें लालित्य तर मुळींच नव्हतें. वझेबुवांना त्यावेळीं मधुमेह व ब्लडप्रेशरचा विकार होता व खाण्यापिण्यांत व्यवस्थित-पणा ठेवण्याबद्दल व संपूर्ण विश्रांति घेण्याबद्दल डॉक्टरांनीं त्यांना बजावलें होतें; पण हें पथ्य बुवांनीं कधींच पाळलें नाहीं. बुधगांवच्या राजवाड्यांत एका भोजनप्रसंगीं बुवांनीं साखरभातावर खूप हात मारला. मधुमेहाला साखर व भात हीं दोन्हीही वर्ज्य असल्यामुळें भोजनोत्तर घरीं जातांना मी बुवांना म्हणालों, "तुम्हांला मधुमेह आहे तर इतका साखरभात कशाला खाल्लांत बुवा ?" वझेबुवा त्यावर हसून म्हणाले, "गाण्याची मेहनत करायची तर गोडधड खाल्लेंच पाहिजे. "गाना और खाना" हा आमचा खाक्या आहे!" हा खाक्यांच पुढें बुवांच्या अंगशीं आला आणि ब्लडप्रेशरच्या विकारानें पुढें लौकरच बुवांचें देहावसान झालें. बुवांच्या मृत्यूनें महाराष्ट्राचा एक जुन्या पिढीचा थोर गायक नाहींसा होऊन, गायनकलेचें अपरिमित नुकसान झालें. संगीतचूडामणि विनायक-बुवा पटवर्धन व संगीतकलानिधि कृष्णराव फुलंब्रीकर यांचा व माझा थोडासा परिचय सन १९२३ च्या सुमारास गंधर्व नाटक मंडळींत झाला होता. १९२५ सालीं मी पुण्यास गेल्या वेळीं पटवर्धनबुवांच्या निमंत्रणावरून त्यांच्या गांधर्व विद्यालयास भेट दिली होती. १९४६ सालीं मी मुंबई रेडिओवरील काव्यगायनासाठीं जात असतां पुणें-मुंबईच्या गाडींत मास्तर कृष्णरावांची व माझी गांठ पडली होती व पूर्वपरिचय आठवून आमचें बरेंच बोलणेंही झालें होतें. अलीकडे पुष्कळ वर्षांत या दोघा गायनपंडितांची मला भेट झालेली नाहीं.

---*---

प्रकरण ५ वें

# सेवानिवृत्तीनंतर

ता. ७ मार्च १९४८ रोजीं दक्षिण महाराष्ट्रांतील इतर संस्थानांबरोबर मिरजमळा संस्थानही मुंबई प्रांतात विलीन झालें. त्याच वेळीं मीहि सेवानिवृत्त झालों व तेव्हांपासून आजतागायत सांगली येथें गांवभागांत राव. भावे इंजिनीअर यांच्या वाड्यांत राहत आहे. राव. भावे हे आद्य मराठी नाटककार कै. विष्णुदास भावे यांचे पौत्र आहेत. यामुळें साहजिकपणेंच एका थोर आद्य नाटककाराच्या वास्तूमध्येंच माझा निवास आहे. राव. भावे हे साहित्यप्रेमी असून साहित्यिकही आहेत. विष्णुदास भावे यांचें चरित्र व 'संगीत नरमेध नाटक' हीं पुस्तकें त्यांनीं लिहिलेलीं प्रसिद्ध आहेत. माझ्या घराचे ग्याल्रींतून जवळच वाहत असलेल्या अघनाशिनी कृष्णा नदीचें रोज दर्शन घडतें. कृष्णेपलीकडे विस्तरलेलीं हिरवींगार शेतें दृष्टिपथात येतात. पलीकडे दूर झाडींत माझें जन्मग्राम हरिपूर दृग्गोचर होतें व त्यापलीकडील दानोळीचा निळसर डोंगर दृष्टिपथांत येतो. हा सर्वच देखावा रम्य व स्फूर्तिदायक आहे. सध्यां मी सेवानिवृत्त आहें, पण मला कंटाळवाणें कधींच वाटत

नाहीं. स्वतःचा वेळ जात नसल्याची तक्रार करणारे अनेक पेन्शनर मला माहीत आहेत; पण नोकरी करीत असतानाच वाङ्मयाभ्यासाचा व वाचनाचा व्यवसाय मीं स्वीकारलेला असल्यामुळें, त्याच व्यवसायात निवृत्त आयुष्यातही माझी कालक्रमणा सुखानें चालली आहे.

सन १९४८ च्या जून महिन्यात माझे जामात श्री. क. श्री. काळे यांची बदली सांगलीच्या सिटी हायस्कुलांत शिक्षक म्हणून झाली. त्यापूर्वीं ते तासगांव हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. निवृत्त आयुष्यात माझे साहित्यप्रेमी जामात व कन्या- सौ. विमल पुन्हा जवळ झाल्यानें मला स्वभाविकपणेंच आनंद झाला. सन १९४८ च्या सप्टेंबर आक्टोबरच्या सुमारास महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध सौंदर्यवादी टीकाकार प्रा. श्री. के. क्षीरसागर यांचा व माझा प्रथम परिचय माझी कन्या सौ. विमल हिचे घरीं झाला.

## प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

प्रा. क्षीरसागर यांचें 'राक्षसविवाह' हें पुस्तक व काहीं स्फुट लेख मीं पूर्वीं वाचले होते व त्याचा सामाजिक व जीवनविषयक दृष्टिकोन मला आवडला होता. सन १९४५ च्या अखेरीस त्यांचें 'सुवर्णतुला' हें पुस्तक मीं वाचलें व त्यातील काहीं लोकोत्तर विभूतींचीं व्यक्तिपरीक्षणें मला फार आवडलीं. त्यांतील महाराष्ट्रीयाच्या व्यक्तिपरीक्षणावरील प्रबंध मला क्षीरसागरांच्या तर्कशुद्ध, निर्भय व मूलग्राहीं प्रज्ञेचा द्योतक वाटला. सुवर्णतुला पुस्तक मला आवडल्याचें मीं त्याना मुद्दाम पत्र लिहून कळविलें व त्यांनींही अगत्यपूर्वक उत्तर पाठवून बुधगांवसारख्या आडगांवीं राहत असूनही, पुस्तक वाचून मुद्दाम मत कळविल्याबद्दल माझे आभार मानले. तेव्हां-पासून त्याच्या लेखांचा मी नियमित व आस्थेवाईक वाचक झालें आहे. सन १९४८ च्या सप्टेंबर-आक्टोबरच्या सुमारास सांगलीचे कै. कविवर्य साधुदास याच्या तैलचित्राचें अनावरण नगरवाचनालयात झालें. त्या समारंभाचे अध्यक्ष म्हणून प्रा. क्षीरसागर सांगलीस आले होते. याच मुक्कामांत सांगलीच्या सिटी हायस्कुलास त्यानीं भेट दिली व तेथूनच ते व मी मिळून माझे जामात श्री. काळे यांच्या घरीं गेलों. या पहिल्याच

भेटींत क्षीरसागर माझ्याशीं अत्यंत मनमोकळेपणानें बोलले. माझा वाङ्मयीन जीवनवृत्तांत मी लिहिणार आहें, असें माझ्या कन्येनें सांगतांच तो अगत्य लिहिण्याबद्दल त्यांनीं मला आग्रहपूर्वक सांगितलें. गेल्या पांचसहा वर्षांत बहुधा दरसाल ते आपल्या वडील बंधूकडे सांगलीस येतात व माझी व त्यांची अनेक वेळा भेट होते व मनमोकळें बोलणेंही होतें. या काळांत त्यांच्या व माझ्या परिचयाची स्नेहांत परिणति झाली आहे. गेल्या पांचसहा वर्षांत लोकसत्तेंत व इतरत्रही प्रसिद्ध झालेले त्यांचे बहुतेक लेख मीं आवडीनें वाचले आहेत. कै. आहिताग्नि राजवाडे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासंबंधीं प्रा. क्षीरसागर यांनीं लोकसत्तेंत लिहिलेला सुखसंवाद त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनाचा उत्तम नमुना आहे. १९५२ सालीं अमळनेर येथें भरलेल्या साहित्य संमेलनांत टीकाविभाग संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं केलेलें भाषण अभ्यसनीय आहे. अलीकडे त्यांच्या टीकेचें क्षेत्र साहित्यापुरतेंच मर्यादित राहिलेलें नसून साहित्य, संगीत, नाट्य, सामाजिक चालीरीति वगैरेंचा परामर्श ते आपल्या निर्भीड व चोखंदळ टीकापद्धतीनें घेऊं लागले आहेत.

## श्री. वि. स. पागे

काँग्रेसचे एक थोर व निष्ठावंत कार्यकर्ते श्री. वि. स. पागे वकील यांचा परिचय सन १९४८ च्या अखेरीस माझे जामात श्री. काळे यांच्या घरीं झाला. श्री. पागे व माझे जामात दोघेही तासगांवचे राहणारे असून उभयतांचा दीर्घकालीन स्नेह आहे. बहुतेक लोक श्री. पागे यांना काँग्रेसचे थोर कार्यकर्ते म्हणूनच ओळखतात व तसे ते आहेतही. मी मात्र त्यांना कविहृदयाचे व रसाळ वाणीचे एक तत्त्वज्ञ म्हणून ओळखतों. श्री. पागे हे ज्ञानेश्वरी व संतवाङ्मयाचे गाढ अभ्यासक आहेत, आणि त्यांचा अभ्यास केवळ सांप्रदायी पद्धतीचा नाहीं. त्यांचें वाचन विविध, सखोल व विपुल आहे. काँग्रेसचें कार्य करीत असतांना त्यांची नजर दुर्मिळ व बहुमोल ग्रंथांना शोधित असते आणि असे ग्रंथ ते विकत घेऊन वाचतात व अभ्यासतात. श्री. पागे हे साहित्यिक व कवीही आहेत. 'अमरपक्षी' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. संस्कृत व मराठी कवींप्रमाणेंच उर्दू, हिंदी व बंगाली कवींचाही

त्यांनीं सखोल अभ्यास केलेला आहे. त्यांची वाणी ओघवती व रसाळ आहे. माझे जामात श्री. काळे याच्या घरीं एकाद्या रात्रीच्या प्रशांत वेळीं त्यांची भेट मधूनमधून होते. अशा वेळीं प्रसंगानुसार निघालेल्या काव्यविषयावरील अगर ज्ञानेश्वरीवरील त्यांचें वक्तृत्वपूर्ण विवेचन ऐकणें म्हणजे मला एक वैचारिक मेजवानी वाटते.

## श्री. सय्यद अमीन

याच सुमारास सांगलीचे एक कॉंग्रेसनिष्ठ साहित्यिक व कार्यकर्ते श्री. सय्यद अमीन यांचा मला निकट परिचय झाला. श्री. अमीन व मी दोघेही सांगलीच्याच पंचक्रोशींत राहणारे, पण ते सांगलींत व मी बुधगांवात, यामुळें त्यांची मधूनमधून गांठ पडे इतकेंच. अलीकडे पांचसहा वर्षांत मात्र ते माझे स्नेही झाले आहेत. श्री. अमीन हे जातीनें मुसलमान आहेत, पण कांहीं कडव्या मुसलमानांप्रमाणें इतर धर्मांविषयीं त्यांना कधींच अनादर वाटत नाहीं. हिंदुधर्म आणि संस्कृति याबद्दल त्यांना आदर वाटतो. महमद पैगंबर यांचें चरित्र, ' इस्लाम आणि नीतिशास्त्र ' व ' इस्लाम आणि संस्कृति ' वगैरे त्यांनीं लिहिलेले ग्रंथ रसिकमान्य आहेत. सांगलीच्या कोणत्याही साहित्यविषयक व सामाजिक कार्यांत ते आस्थापूर्वक भाग घेतात. सांगलीचें नाट्यविद्यामंदिर, देवलस्मारकमंदिर वगैरे संस्थांच्या कार्यकारी मंडळाचे ते सभासद असून, साहित्यसभेच्या कार्यांत मला त्यांचें चांगलें साहाय्य होत आहे. चालू वर्षापासून सांगलीस सुरू झालेल्या वसंतव्याख्यानमालेच्या कार्यांतही त्यांचा पुढाकार आहे.

सन १९४९ च्या जानेवारीपासून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सांगली शाखेचा अध्यक्ष म्हणून मी काम करीत आहें. या कामीं कविमित्र गिरीश, साहित्यसभेचे माझ्या पूर्वींचे अध्यक्ष प्रा. गंगूनाना कानेटकर व साहित्यसभेचें कार्यकारी मंडळ यांचें मला चांगलें साहाय्य होत आहे.

## प्रा. गं. गो. कानेटकर

प्रा. गंगूनाना कानेटकर यांचा व माझा प्रथम परिचय १९३६ सालीं माझे वकीलमित्र कै. विसूभाऊ कानेटकर यांनीं करून दिला. क्रमाक्रमानें

झा परिचय वाढत जाऊन आज ते माझे स्नेही आहेत. गंगूनानाची साहित्याची आवडच या स्नेहाला कारण आहे. गगूनाना साहित्यिक नाहींत, पण ते एक निष्ठावंत साहित्यप्रेमी आहेत. अनेक लहानथोर साहित्यिक गंगूनानांचे स्नेही असून, त्यांच्या आतिथ्यासाठीं गगूनानाचें घर सदैव उघडें आहे. मिरजेच्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनांत स्थापन झालेल्या साहित्यपुरस्कारसमितीचे ते कार्यवाह होते. १९४३ सालीं सांगलीस झालेल्या नाट्यशताब्दिमहोत्सवाचे ते कार्याध्यक्ष होते. सांगली येथील नाट्यविद्यामंदिर, देवलस्मारकमंदिर वगैरे संस्थांच्या कार्यकारिणीचे ते सभासद आहेत. १९४३ सालीं सांगलीस स्थापन झालेल्या साहित्य परिषदेच्या सांगली शाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं चांगलें कार्य केलें असून, साहित्य-सभेच्या त्यांनीं उभारलेल्या भक्कम पायावरच मी आज काम करीत आहें. वयाची सत्तरी उलटली असूनही कोणतेंही साहित्यविषयक अगर सामाजिक कार्य तरुणाच्या उत्साहानें करणारे प्रा. गगूनाना कानेटकर हे सांगलीचे एक आदर्श नागरीक आहेत.

सन १९५० च्या ऑगस्टांत माझी कन्या सौ. विमल काळे हिच्या ‘ भूमीला भार ’ या पहिल्या नाटिकेचा प्रकाशनसमारंभ माझे मित्र श्री. गोविंदराव टेंबे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. १९४९ सालीं कोल्हापुरच्या एका नाट्यसंस्थेनें ठेवलेल्या स्पर्धेत ‘ भूमीला भार ’ या नाटिकेला दुसरें पारितोषिक मिळालें होतें आणि सांगली सरस्वती समाजातील भगिनींनीं ही नाटिका प्रयोगरूपानें रंगभूमीवरही आणली होती. प्रकाशन-समारंभासाठीं श्री. टेंबे कोल्हापुराहून अगत्यपूर्वक आले होते; आणि बाहेरच्या माझ्या अनेक थोर साहित्यिक मित्रांचे शुभसंदेश या समारंभासाठीं आले होते. हे सर्व संदेश म्हणजे माझ्या कन्येच्या साहित्यसेवेला थोरांचे शुभाशीर्वादच होते. समारंभात कविमित्र गिरीश यांचे सुंदर रसग्राही भाषण झालें. श्री. टेंबे यांचें अध्यक्षीय भाषणही विचारपरिप्लुत व मार्ग-दर्शक झालें. या निमित्तानें मिळालेल्या प्रोत्साहनानें माझ्या कन्येच्या नाट्यलेखनास साहाय्य होऊन ‘ छाया ’ नावाची तिची दुसरी नाटिका सन १९५२ च्या जानेवारींत सिटी हायस्कुलच्या विद्यार्थिनींनीं संमेलन-

प्रसंगीं रंगभूमीवर आणली व या नाटिकेचेंही महाराष्ट्ररसिकांकडून चांगलें स्वागत झालें.

सन १९५१ च्या जुलई महिन्यांत 'स्फूर्लिंगनिनाद' हा माझा तिसरा काव्यसंग्रह मुंबईचे ख्यातनाम प्रकाशक श्री. के. भि. ढवळे यांनीं प्रकाशित केला आणि महाराष्ट्ररसिकांनीं याही संग्रहाचें चांगलें स्वागत केलें. पूर्वीच्या दोन्ही संग्रहाप्रमाणें याही काव्यसंग्रहास डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरव केला. या संग्रहाच्या प्रकाशनानंतर थोड्याच दिवसांत नागपूर, वऱ्हाडकडील एक प्रथितयश मराठी कवि प्रा. भ. श्री. पंडित यांचा व माझा पत्रपरिचय झाला व क्रमाक्रमानें त्याची परिणति पत्र-मैत्रींत झाली. प्रा. पंडित यांचा 'उन्मेष आणि उद्रेक' आणि माझा 'स्फूर्तिंनिनाद' हे दोन्ही काव्यसंग्रह श्री. के. भि. ढवळे यांनीं एकाच सटांत प्रसिद्ध केले. या निमित्तानें पंडितांच्या व माझ्या पत्रपरिचयास सुरवात झाली. प्रा. पंडित हे तांबेसंप्रदायी कवि असून त्यांच्या कांहीं कविता केशवसुती वळणाच्या आहेत व कांहीं कवितांतील विचारसरणी समाजसत्तावादी आहेत आणि या सर्वच कविता सरस आहेत. त्यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय मुळींच नाहीं पण आम्हां उभयतांचा पत्रव्यवहार पाहिला तर आम्ही फार वर्षांचे स्नेही आहोंत असेंच कोणासही वाटेल. माझ्या स्फूर्लिंगनिनाद या काव्यसंग्रहाचें विस्तृत रसग्राही परीक्षण त्यांनीं नागपूरच्या 'सुषमा' मासिकांत लिहिलेलें आहे. हल्लीं नाशिक येथें असलेले महाराष्ट्राचे अग्रेसर कवि व नाटककार 'कुसुमाग्रज' (वि. वा. शिरवाडकर) यांचा व माझा असाच पत्रपरिचय आहे. त्यांच्या 'जान्हवी' या कादंबरींतील कांहीं विधानांबद्दल त्यांचा परिचय नसूनही मीं त्यांना पत्र लिहिलें. त्याचें उत्तर अगत्यपूर्वक पाठवून कुसुमाग्रजांनीं त्यांत माझ्या काव्याबद्दल लोभ व आदर व्यक्त केला आहे. वर उल्लेखिल्याप्रमाणें मला फक्त पत्रपरिचित असलेले प्रा. भ. श्री. पंडित व कविवर्य कुसुमाग्रज यांच्या भेटीची मला उत्कट इच्छा आहे.

माझ्या काव्यसंग्रहाच्या निमित्तानेंच कोल्हापूर येथील गर्जना साप्ता-हिकाचे संपादक श्री. गणपतराव पाध्ये यांचा व माझा प्रथम पत्रपरिचय झाला व क्रमाक्रमानें हा परिचय वाढून ते आतां माझे स्नेही झाले आहेत.

## गर्जनाकार श्री. ग. ह. पाध्ये

माझा स्फूर्तिनिनाद काव्यसंग्रह गर्जना पत्राकडे अभिप्रायार्थ गेल्याबद्दल मला प्रकाशकांचें पत्र येताच परिचय नसतांनाही मी संपादक श्री. पाध्ये यांना सविस्तर अभिप्राय देण्याबद्दल पत्र लिहिलें. या पत्राचें उत्तर ताबडतोब पाठवून उत्तरांत माझ्या काव्याबद्दल त्यांनीं आपुलकी व्यक्त केली. गर्जनाच्या वार्षिक अंकात मीं एक कविता द्यावयाचीच, असा एक अलिखित करार आम्हा उभयतांत झाला आहे. श्री. पाध्ये यांचें गर्जनेंतील सडेतोड लिखाण मी फार पूर्वीपासून वाचत आलों असून, त्यांतील प्रामाणिक मताविष्कार मला आवडतो. सन १९५२ च्या मार्च महिन्यांत माझी व त्यांची प्रत्यक्ष भेट झाली आणि त्यांनीं मला फारच प्रेमळपणानें वागविलें. श्री. पाध्ये हे एक स्पष्टवक्ते पण प्रेमळ गृहस्थ आहेत. तोंडदेखलें बोलण्याचा त्यांना तिटकारा आहे. गर्जनेंत व्यक्त झालेलीं त्यांचीं सर्वच मतें सर्वांना पटतील असें नाहीं. पण तीं त्यांचीं प्रामाणिक मतें असतात, हें कोणालाही कबूल करावें लागेल. कोल्हापुरास मी केव्हांही गेलों तरी श्री. पाध्ये यांना भेटतों व तेही माझें मोकळ्या मनानें स्वागत करतात. माझा कनिष्ठ मुलगा चि. शशीकांत याच्यावर पाध्ये यांचा फार लोभ आहे. दांभिकपणावर प्रहार करून सत्याचा पुरस्कार करण्याची प्रवृत्ति, प्रामाणिक मतें मांडण्यात दिसून येणारी बेडर वृत्ति आणि साठी उलटली असूनही कोणतेंही काम करताना दिसून येणारी तडफ, या श्री. पाध्ये यांच्यामध्यें दिसून येणाऱ्या गुणाचा मी चाहता आहें.

## कवि सी. म. बापट

याच सुमारास शहापूरचे कवि श्री. सी. म. बापट यांचा व माझा परिचय एका निमित्तानें घडून आला. 'फुलांचे अश्रू' व 'रानगुलाब' हे बापटांचे दोन कवितासंग्रह मला आवडले होते. बालकवींच्या धर्तीवर स्वप्नाळू व गोड कविता लिहिणारे कवि म्हणून मी त्यांना ओळखीत होतों. त्यांचा तिसरा काव्यसंग्रह 'गोड विसावा' याला मीं प्रस्तावना लिहावी,

अशी विनति बापटांनीं मला केली, ती मान्य करून मीं प्रस्तावना लिहिली. यामुळें त्यांचा व माझा प्रत्यक्ष व निकट परिचय झाला. श्री. बापट हे प्रेमळ पण भिडस्त आहेत. त्यांची कविता गोड आहे, पण विचारांच्या दृष्टीनें ती गतकालातील वाटते व त्यांच्या कवितेंत वास्तवता त्यामानानें कमी आहे. शहापूरसारख्या आडगांवीं राहिल्यानें व त्यांच्या प्रसिद्धिपराङ्मुख वृत्तीमुळें बापटांची कविता महाराष्ट्राला व्हावी तितकी परिचित झाली नाहीं.

याच सुमारास 'सुषमा' व 'संगम' या मासिकांशीं कवि म्हणून माझा संबंध घडून आला. सुषमा हें नागपुरास प्रसिद्ध होणारें मासिक वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे संपादक श्री. कुंडलराय मोहेकर यांनीं मला अगत्यपूर्वक पत्र पाठवून सुषमेसाठीं कविता देण्याची विनति केली आणि तेव्हापासून माझ्या कविता सुषमांत मधूनमधून प्रसिद्ध होतात. या मासिकांतील 'तटस्थाचे तरंग' हें चटकदार सदर मला फार आवडतें. मुंबईच्या संगम मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. लंबोदरपंत पटवर्धन हे मला पूर्वीपासून परिचित आहेत. ते व त्यांच्या पत्नी सौ. प्रतिभा पटवर्धन यांनीं हें मासिक आस्थापूर्वक चालविलें आहे. मराठी लेखिकांच्या लघुकथांचीं परीक्षणें, कोणातरी प्रथितयश साहित्यिकाकडून करवून मूळ लघुकथा, तें परीक्षण व परीक्षणावरील लेखिकेचें मत एकाच संगमच्या अंकांत प्रसिद्ध करण्याची त्यांची कल्पना अभिनव आहे. मुंबईच्या 'हंस' मासिकाशीं लेखक म्हणून माझा संबंध १९५१ सालीं एकदांच आला. या वर्षाच्या पूर्वार्धांत खाडिलकरांच्या कीचकवध नाटकावर माझे मित्र प्रा. क्षीरसागर यांचा एक टीकालेख प्रसिद्ध झाला. तत्कालीन राजकीय वातावरणाच्या पार्श्वभूमीमुळें कीचकवध नाटकास त्यावेळीं अवास्तव लोकप्रियता मिळाली, असा या लेखाचा आशय होता. या लेखानंतर श्री. मामासाहेब वरेरकर यांचे दोन टीकालेख हंस मासिकांत प्रसिद्ध झाले व त्यांत श्री. वरेरकरांनीं प्रा. क्षीरसागर यांच्या मताचें खंडन करण्याचा प्रयत्न केला. याच विषयावर प्रा. निरंतर यांचाही एक टीकालेख लागलीच प्रसिद्ध झाला. माझा व मराठी रंगभूमीचा दृढ परिचय प्रा. क्षीरसागर यांना परिचित होता. यामुळें त्या सालच्या मे महिन्यांत नित्याप्रमाणें ते सांगलीस आले असतांना

वरील सर्व लेखांचा परामर्श घेणारा कीचकवधावर एक लेख मीं लिहावा, असें त्यांनीं मला सुचविलें. या बाबतींत मी हसचे संपादक श्री. अनंत अंतरकर यांना पत्र लिहितांच त्यांनीं वरील लेख असलेले ' हंस 'चे सर्व अंक लागलीच माझ्याकडे पाठविले. " कीचकवध नाटकाचे टीकाकार " हा माझा विस्तृत लेख ' हंस ' मासिकाच्या सन १९५१ च्या ऑक्टोबर अंकांत प्रसिद्ध झाला आहे. पुण्याच्या महाराष्ट्र व माधुरी या मासिकांशीं लेखक म्हणून माझा संबंध गेल्या तीन चार वर्षांत आला आहे. " विसाव्या शतकांतील चार तुकाराम " व " मराठी रंगभूमीवरील नामवंत सुभद्रा " हे माझे दोन नाट्य-विषयक लेख महाराष्ट्र मासिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

ता. १४ जून १९५२ रोजीं कै. नाट्याचार्य देवल यांच्या स्मृति-दिनाच्या निमित्तानें सांगलीच्या नगरवाचनालयांत देवलांच्या छायाचित्राचें अनावरण माझे मित्र श्री. वि. स. खांडेकर यांच्या हस्तें झालें व याच मुक्कामांत त्यांची व माझी फार वर्षांनीं भेट झाली व मनमोकळें बोलणेंही झालें. यानंतर त्यांची व माझी भेट तीन चार वेळां झाली आहे. एकाद्या तहानलेल्या गृहस्थाला निर्मळ निर्झराच्या जलपानानें जें समाधान लाभतें तें समाधान श्री. खांडेकरांचा थोडाही सहवास घडला तरी मला लाभतें. खांडेकरांचा व माझा परिचय व स्नेह चाळीस वर्षांचा आहे. सांगलीच्याच पंचक्रोशींत आम्ही लहानाचे मोठे झालों आहोंत. खांडेकर वयानें माझ्या-हून लहान असल्यानें मीं त्यांच्याहून अधिक पावसाळे पाहिले आहेत, पण कोंकणांत राहिल्यामुळें त्यांनीं पाऊस माझ्याहून अधिक पाहिला आहे आणि त्यांचा वाङ्मयीन अधिकार माझ्याहून फार मोठा आहे. शारदेचा वरदहस्त डोईवर असलेल्या या थोर साहित्यिकाला प्रतिभा, बुद्धिमत्ता व सहृदयता यांचें उमाप दान परमेश्वरानें दिलें आहे. कै. साने गुरुजींप्रमाणेंच श्री. खांडेकर हे मानवतेचे सहृदय व ध्येयनिष्ठ पुजारी आहेत. ' जीवनासाठीं कला ' या तत्त्वाचे ते कट्टर पुरस्कर्ते आहेत.

याच सुमारास महाराष्ट्राच्या प्रथितयश कवयित्री व काव्यगायिका सौ. संजीवनी मराठे या आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं सांगलीस रहावयास आल्या व त्यांची व माझी भेट माझी कन्या सौ. विमल हिच्या घरीं वारंवार

होऊं लागली. महाराष्ट्राच्या विद्यमान कवयित्रींत श्री. इंदिरा संत व सौ. पद्मा गोळे यांच्या तोडीचें सौ. संजीवनी मराठे यांचें स्थान आहे. स्वभावानें त्या अत्यंत मनमोकळ्या व आनंदी आहेत. वयानें त्या आता प्रौढ आहेत. पण "प्रौढत्वीं निज शैशवास जपणें" हा केशवसुतप्रणीत कवीचा बाणा सौ. संजीवनी मराठे यांनीं ठेवला आहे. माझी कन्या सौ. विमल हिच्या वाङ्मयीन विकासाला त्यांचें बहुमोल साहाय्य होत आहे.

१९५२ सालांतील गणेशचतुर्थीच्या उत्सवात उगार शुगर वर्क्स मधील एस्टेट मॅनेजर व माझे मित्र श्री. के. श. काळे यांच्या निमन्त्रणावरून माझ्या कन्येसह मी उगारास गेलों होतों. श्री. काळे हे एक कृषितज्ज्ञ आहेतच, पण गायनांतले दर्दी, साहित्यप्रेमी व मराठी पद्यलेखक आहेत. उगार शुगर वर्क्सच्या वतीनें गणेशचतुर्थी उत्सव अत्यंत थाटानें दहा दिवस साजरा होतो व त्यांत गायन, व्याख्यानें, नाटक वगैरे विविध कार्यक्रम होतात. सन १९५२ च्या उत्सवांत श्री. काळे यांनीं लिहिलेला "महाराष्ट्राची भागीरथी कोयना" हा मुलींचा संगीत संवाद साभिनय होणार होता व हायस्कुलांतील विद्यार्थ्यांच्या भूमिका असलेले 'माझी शाळा' हें नाटक व्हावयाचें होतें. या नाटकाच्या समारंभाचा अध्यक्ष म्हणून माझी योजना झाली होती. मी व माझी कन्या सौ. विमल उत्सवांतील नियोजित दिवशीं दुपारीं तीन वाजतां उगार शुगर वर्क्सच्या सुंदर पाहुणेगृहांत दाखल झालों. आदल्या दिवशीं मुंबईचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. अनंत काणेकर यांचें तेथील गणेशोत्सवात व्याख्यान होतें व तेही पाहुणेगृहातच उतरले होते. आम्ही गेलों तेव्हा प्रा. काणेकर तेथील मुक्काम संपवून कोल्हापुरास जावयास निघण्याच्या तयारींत होते. यामुळें त्यांची व माझी फक्त पंधरा मिनिटेंच धूळभेट झाली.

## प्रा. अनंत काणेकर

प्रा. काणेकर यांची व माझी भेट तर तोंपर्यंत नव्हतीच, पण पत्रपरिचयही नव्हता. पण त्यांच्या कविता, लघुनिबंध मीं पूर्वी आवडीनें वाचले होते व त्यांतील पुरोगामी दृष्टिकोन, जीवनविषयक निरोगी दृष्टि व खिलाडू

वृत्ति यांचा माझ्या मनावर चांगला परिणाम झाला होता. यामुळें त्यावेळीं झालेल्या त्याच्या अनपेक्षित भेटीनें मला फार आनंद झाला. ते निघण्याच्या गडबडींत होते तरी त्यांचें व माझें साहित्यविषयक थोडेसें बोलणें झालें. पण तें अगदींच अल्पकाळ झालें, याची मला चुटपुट लागून राहिली. पण त्याची व माझी सुमारें दीड वर्षानें पुन्हां भेट व्हावी, असा योग होता. ता. ३० मे १९५४ रोजीं सांगली येथें नवीनच सुरू झालेल्या वसतव्याख्यान-मालेतर्फे त्यांचे व्याख्यान झालें. व्याख्यानापूर्वी माझ्या निमन्त्रणावरून ते माझ्या घरीं आले होते. त्यावेळीं झालेल्या परिचयांत प्रा. काणेकर हे आचार्य अत्रे याच्याप्रमाणेंच थोराड देहाचे, निरोगी दृष्टीचे व खिलाडू वृत्तीचे साहित्यिक आहेत, असें माझ्या अनुभवास आलें. सायंकाळीं 'काव्यानंद' या विषयावर झालेल्या त्याच्या सुश्राव्य व्याख्यानांत हेच गुण आढळले. प्रा. काणेकर यांची भाषणपद्धतिसुद्धां आचार्य अत्रे यांच्या-प्रमाणेंच खुसखुशीत व विनोदगर्भ आहे. मराठी साहित्यसृष्टींत आचार्य अत्रे व प्रा. काणेकर यांचीं नांवें एकत्र कां घेतलीं जातात, याचा उलगडा मला त्या दिवशीं झाला.

## प्रा. विंदा करंदीकर

याच सुमारास नवीन पिढींतील ख्यातनाम कवि विंदा करंदीकर यांचा परिचय माझे जामात श्री. काळे याच्या घरीं झाला. त्यापूर्वीं त्यांचा 'स्वेदगंगा' हा काव्यसंग्रह मीं वाचला होता व त्यांतील कांहीं कविता मला फार आवडल्या होत्या. श्री. विंदा करंदीकर हे केशवसुतसांप्रदायाचे कवि आहेत व त्यांच्या समाजसत्तावादी विचारांच्या कविता ओजस्वी आहेत; अलीकडे मात्र ते नवकवितेच्या वळणावर कवितालेखन करू लागले आहेत. यामुळें त्यांच्या अशा कविता मला तरी दुर्बोध वाटतात. त्यांचें कवितावाचन मीं रेडिओवर कधींकधीं ऐकलें आहे व तें मला परिणामकारक वाटलें. दुधोंडी येथील नवोदित कवि श्री. गोपाळ लक्ष्मण जमदाडे ( कवि प्रताप ) यांचा परिचय मला याच सुमारास झाला. त्याची कविता प्रगतिमार्गावर असून, किर्लोस्कर वगैरे नियतकालिकात त्यांच्या कविता प्रसिद्ध होतात.

त्यांचें एक खंडकाव्यही प्रकाशनाच्या वाटेवर आहे. सांगलीस येतील तेव्हां ते मला अगत्यपूर्वक भेटतात.

## वेंगुर्लें डाकबंगल्यांतील ती रात्र

सन १९५२ च्या डिसेंबरअखेरीस वेंगुर्लें, सावंतवाडी, मालवण या निसर्गरम्य कोंकण प्रदेशांत मीं सुमारें आठ दिवस प्रवास केला. या प्रवासाची प्रेरणा मला साथी ना. ग. गोरे यांच्या 'साधना' साप्ताहिकाच्या एका दिवाळी अंकांतील लेखानें दिली. या लेखांत साथी गोरे यानीं वेंगुर्लें येथील सागरतीरावरील डाक बंगल्याचें सुंदर वर्णन केलें होतें आणि कविमनाच्या प्रत्येक व्यक्तीनें या बंगल्यांत एकादी चांदणी रात्र घालवावी, असें आग्रहपूर्वक सुचविलें होतें. मीं तात्काळ या प्रवासाचा निश्चय केला. वेंगुर्लें येथें माझा कोणाशीं परिचय नव्हता म्हणून तेथील 'किरात' साप्ताहिकाचे संपादक श्री. बाबा मराठे यांना पत्र पाठवून तेथील सोईबद्दल मीं विचारपूस केली व त्यांनींही ताबडतोब उत्तर पाठवून वेंगुर्लें येथें माझी कोणतीही गैरसोय होणार नाहीं, असें मला कळवून वेंगुर्ल्यांस अगत्य येण्याचें निमन्त्रण दिलें. ता. २९।१२।१९५२ रोजीं मी बेळगांवाहून एस्. टी. नें निघून सावंतवाडी-वरून वेंगुर्ल्यांस सायंकाळीं पांच वाजतां पोंचलों. स्टँडवर बाबा मराठे हजर होतेच. त्यांनीं तेथील नगरपालिकेच्या सुंदर 'प्रवासी-निवासां'त आमची सर्व सोय केली. या प्रवासांत माझा कनिष्ठ मुलगा चि. शशीकांत माझ्याबरोबर होता. ता. ३० रोजीं सकाळीं मीं तेथील वाचनालयास भेट दिली व रात्रीं १० वाजतां तेथील थिएटरांत माझें जाहीर काव्यगायन झालें. त्यावेळीं सर्व पेशाचे नागरीक शिक्षका, शिक्षिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मिळून सुमारें ६००।७०० जनसमुदाय हजर होता. त्याच रात्रीं बंदरावरील सुप्रसिद्ध डाक बंगल्यांत मी मुक्कामास गेलों. ती शुद्ध चतुर्दशीची रात्र होती. समुद्रांत घुसलेल्या खडकावरील डाक बंगल्यासमोर अफाट व अथांग दरिया पसरला होता. खडकाजवळ लहरींचें नर्तन सुरू होतें आणि आकाशांतून या निसर्गरम्य भूभागावर व सागरावर चंदेरी बरसात सुरू होती. त्या रात्रीं मीं पाहिलेलें मनोरम दृश्य मी केव्हांही विसरणार

नाहीं. सुरम्य चांदण्यांत चाललेलें सागरसंगीत ऐकत मी, माझा मुलगा शशी आणि आमच्याबरोबर असलेले नवोदित कवि श्रीकृष्ण माइणकर व श्री. वि. गो. नाईक रात्रीं दोन वाजेपर्यंत खडकावर बसलों होतों, तरीही मनाची तृप्ति झाली नाहीं. त्या रात्रीच्या स्मृतीवर आधारलेली "ती रात्र" ही माझी कविता लवकरच किर्लोस्कर मासिकांत प्रसिद्ध झाली आणि 'स्फूर्तिविलास' या माझ्या नवीन कवितासंग्रहांत ती समाविष्ट आहे. माझ्या वेंगुर्ले येथील मुक्कामांत किरातचे संपादक श्री. बाबा मराठे, त्यांचे सहकारी श्री. वि. गो. नाईक, श्री. नी. ल. माइणकर व श्रीकृष्ण माईणकर यांचें मला फार साहाय्य झालें. तेव्हां जमलेला ऋणानुबंध माईणकर बधूंनीं अद्याप पत्रव्यवहारानें कायम ठेवला आहे. ता. ३१ डिसेंबर १९५२ रोजीं दुपारीं वेंगुर्ल्याहून मी सावंतवाडीस गेलों. तेथें माझा मुक्काम वैनतेय साप्ताहिकाचे संपादक श्री. आबासाहेब शिरोडकर यांच्याकडे होता. माझा व त्यांचा परिचय नव्हता. केवळ ते श्री. वि. स. खांडेकर यांचे स्नेही म्हणूनच मी त्यांच्याकडे गेलों होतों. परंतु पूर्वपरिचय नसतांनाही श्री. शिरोडकरांनीं आमचें अगत्यपूर्वक स्वागत केलें. माझा मुलगा चि. शशी हा तर एकच दिवसाच्या मुक्कामात शिरोडकरांना प्रिय झाला. श्री. शिरोडकरांनीं मुद्दाम आमच्याबरोबर हिंडून सावंतवाडींतील सर्व प्रेक्षणीय स्थळें आम्हांला दाखविलीं आणि त्यांच्याच खटपटीमुळें तेथील पार्वतीदेवी कन्याशाळेंत रात्रीं माझें जाहीर काव्यगायन झालें.

## सिंधुदुर्गदर्शन

ता. १ जानेवारी १९५३ रोजीं सकाळीं आम्ही सावंतवाडीहून एस्. टी. नें मालवणला गेलों. तेथील बालसन्मित्रचे संपादक श्री. पा. ना. मिसाळ यांना मी पूर्वीच येणार असल्याचें कळविलें होतें. यामुळें मालवणात आमची कोणतीच गैरसोय झाली नाहीं. तेथील वझे यांच्या विश्रांतिगृहांत आमचा मुक्काम होता. प्रा. ना. सी. फडके व श्री. माडखोलकर पूर्वी याच निवासांत मुक्काम करून गेल्याचें श्री. वझे यांनीं सांगितलें. यामुळें मला विशेष आनंद वाटला. मालवणचे साहित्यप्रेमी डॉ. आजगावकर यांचाही

मला परिचय झाला. मी उतरलेल्या निवासांत डॉक्टर आजगावकर मुद्दाम माझ्याकडे आले होते व आमचें साहित्य व रंगभूमी याविषयीं बरेंच बोलणें झालें. श्री. मिसाळ गुरुजी यांनीं तेथील काहीं पुरोगामी विचारसरणीच्या तरुणांशीं माझा परिचय करून दिला. ता. २ रोजीं सकाळीं आम्ही सिंधुदुर्ग हा इतिहासप्रसिद्ध जलदुर्ग पहावयास गेलों. सिंधुदुर्गांतील श्री. सकपाळ नांवाच्या तरुणानें आम्हास नेणेस स्वतःची होडी आणली होती. आम्ही मालवण बंदरावरून सिंधुदुर्गास गेलों त्यावेळीं सुकतीची ( ओहोटी ) वेळ होती. यामुळें सिंधुदुर्गापासून फक्त एक फर्लांग अंतरापर्यंत आम्हाला वाळूं-तून चालत जातां आलें. तेथून सुमारें एक फर्लांगभर श्री. सकपाळ यांच्या होडींतून आम्ही गेलों व सिंधुदुर्गाच्या भव्य प्रवेशद्वाराजवळ आम्ही होडीं-तून उतरलों. सिंधुदुर्गांतील आवारात काहीं घरें आहेत. श्री शिवरायाचें एक पुरातन देवालय आहे. गोड्या पाण्याच्या दोन विहिरी आणि इतर तट वगैरे भाग पडिक अवस्थेंत आहे. श्री. सकपाळ यांनीं सर्व सिंधु-दुर्ग आमच्याबरोबर हिंडून आम्हास दाखविला आणि आतिथ्य म्हणून शहाळ्यातील गार व मधुर पाणी आम्हांस घ्यावयास दिलें. मालवणला परतण्यासाठीं आम्ही सिंधुदुर्गाच्या भव्य प्रवेशद्वाराजवळ आलों तेव्हां भरतीची वेळ सुरू झाली होती आणि मालवणच्या बंदरापर्यंत समुद्राचें पाणी पसरलें होतें. " आतां १॥ मैल आपणाला होडींतून गेलें पाहिजे " असें श्री. सकपाळनीं सांगतांच माझ्या छातींत धडधड सुरू झाली. कारण आमची होडी फारतर आठदहा हात लांब व दोनच हात रुंद होती आणि केवळ हात दीड हात आवल्यावर सकपाळ आम्हाला बंदरापर्यंत नेणार होते. समुद्राचें फुगीर पाणी खालवर हेलावत होतें. तें पाहून मी सकपाळनां म्हणालों, " आम्हांला होडीची सवय नाहीं. होडी बेतानें न्या. " सकपाळ हसून म्हणाले, " ऐन भरतीच्या वेळीं बाळतीण आणि मूलसुद्धा आमच्या होडींतून मी मालवणला नेतों. तुम्ही मुळींच काळजी करूं नका. " यावर मीं धीर आल्याचें दर्शविलें खरें, पण दरम्यानचा हेलावणारा समुद्र ओलांडून बंदराजवळील वाळवटांत पाऊल टेवीपर्यंत माझ्या जिवांत जीव नव्हता. त्याच दिवशीं सायंकाळीं टोपीवाला हायस्कूलच्या दिवाणखान्यांत श्री. मिसाळ यांच्या अध्यक्षतेखालीं माझें जाहीर काव्यगायन

झालें. त्यावेळीं मालवणच्या अनेक साहित्यप्रेमी व्यक्तींचा मला परिचय करून देण्यांत आला. ता. ३ जानेवारी १९५३ रोजीं सकाळच्या S. T नें मी कोल्हापुरात आलों व तेथून सांगलीस आलों. या आठ दिवसांच्या प्रवासात कोंकणची रम्य वनश्री आणि ठिकठिकाणचें प्रेमळ आतिथ्य यांमुळें मला मुळींच त्रास झाला नाहीं.

## पंडित महादेवशास्त्री जोशी

सन १९५३ च्या जानेवारी महिन्यांत सुप्रसिद्ध मराठी लघुकथालेखक व सोज्वळ लेखणीचे साहित्यिक पंडित महादेवशास्त्री जोशी यांची व माझी प्रत्यक्ष भेट झाली. शास्त्रीबुवांच्या लघुकथा व प्रवासवर्णनें मीं यापूर्वीच वाचलीं होतीं व मला तीं फार आवडलीं होतीं. त्यांचा व माझा बराच पत्र-व्यवहार यापूर्वी झाला होता व त्यात त्यांनीं व्यक्त केलेल्या आपुलकीमुळें त्यांची व माझी पत्रमैत्री जमली होती. वर उल्लेखिलेल्या पहिल्याच भेटींत आम्ही एकमेकाचे स्नेही झालों. शास्त्रीबुवा मूळचे गोमतकचे रहिवासी आहेत. यामुळें गोमतकीय लेखकांच्या लेखनात आढळणारें अभिजात सौंदर्य त्यांच्या लेखनात आहेच, पण या सौंदर्याच्या जोडीला सोज्वळपणा हा दुर्मिळ गुण शास्त्रीबुवांच्या साहित्यांत आहे. कांहीं गोमतकीय लेखकांच्या लेखनांत पोर्तुगीज वाङ्मयाच्या परिचयामुळें आलेला उन्माद व भोगलोलुपता आढळते. शास्त्रीबुवांचें लेखन या दोहोंपासून सर्वस्वीं अलिप्त आहे. शास्त्रीबुवांनीं केलेला गीता, उपनिषदें, ज्ञानेश्वरी यांचा अभ्यास याला कारण असेल किंवा शास्त्रीबुवांना विद्यार्थीदशेंत घडलेलें सांगलींतील कृष्णाकांठचें वास्तव्यही याचें कारण असू शकेल. गीता, उपनिषदें व संस्कृत वाङ्मय यांचा सखोल अभ्यास शास्त्रीबुवांनीं केलेला असून संस्कृत भाषेवर त्यांचें प्रभुत्व आहे. अखिल भारतीय संस्कृत लघुकथांच्या स्पर्धेत शास्त्रीबुवांच्या कथेला दुसरें पारितोषिक मिळालें आहे. गोमतकीय पार्श्व-भूमीवर बहुशः आधारलेल्या त्यांच्या लघुकथा वैशिष्ट्यपूर्ण व रसाळ आहेत. त्यांचीं प्रवासवर्णनेंही सुंदर असून त्यांनीं काहीं संस्कृत शालेय पुस्तकेंही लिहिलेलीं आहेत. शास्त्रीबुवांच्या लेखणीप्रमाणेंच त्याची वाणीही ओघवती,

रसाळ आणि प्रासादिक आहे. केवळ साहित्योपजीवी असे जे थोडे सोज्वळ साहित्यिक महाराष्ट्रांत आहेत, त्यांत शास्त्रीबुवांना मानाचें स्थान आहे. शास्त्रीबुवा कधींही सांगलीस आले तरी ते मला भेटल्याशिवाय जात नाहींत आणि त्यांचीं मधूनमधून येणारीं पत्रें स्नेहभावानें ओथबलेलीं असतात. अलीकडे शास्त्रीबुवांनीं लोकगीतांचें संशोधन व अभ्यास चालविला असून, याबद्दलचे त्यांचे लेख मधूनमधून नियतकालिकांत येतात.

## प्रा. वसंत बापट

सन १९५३ च्या मे महिन्यांत मुंबईचे प्रथितयश कवि प्रा. वसंत बापट यांची व माझी अल्पकाळ भेट झाली व त्यामुळें मला समाधान वाटलें. कलापथकाच्या कार्यक्रमासाठीं प्रा. बापट सांगलीस आले होते आणि श्री. माधवराव आठवले यांच्याकडे त्यांचा मुक्काम होता. मीं भेटीची इच्छा व्यक्त करतांच जवळच असलेल्या माझ्या कन्येच्या घरीं येऊन ते मला अगत्यपूर्वक भेटून गेले. या भेटींत आमचें थोडें बोलणेंही झालें, पण त्यांना लागलीच परगावीं जावयाचें असल्यानें ती भेट मला अपुरी वाटली. नवकवींच्या काळात लिहीत असूनही प्रा. बापटांची कविता सुबोध व आवेशपूर्ण आहे. 'बिजली ' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कलापथकाच्या कार्यक्रमांत 'झेलमचे अश्रू ' ही आपली कविता त्यांनीं साभिनय वाचून दाखविली व यथार्थ भावदर्शनामुळें ती फारच परिणामकारक झाली. काव्यगायनांत फक्त काव्याला व भावदर्शनाला प्राधान्य असतें हें जनतेला पटविण्यासाठीं प्रा. विंदा करंदीकर, प्रा. वसंत बापट यांच्यासारख्यांचीं काव्यवाचनें वरचेवर झालीं पाहिजेत. काव्यामागें लागलेला हा गायनाचा भुंगा हळूहळू सुटू लागला आहे, हें काव्याला अत्यंत उपकारक आहे.

## 'दाजी'चे जनक

सन १९५३ च्या डिसेंबर महिन्यांत माझे जुने स्नेही श्री. ना. घों. ताम्हनकर सांगलीस आले असतां मला अगत्यपूर्वक भेटून गेले आणि फार

दिवसांनीं झालेल्या त्याच्या आकस्मिक भेटीनें मला अत्यानद झाला. ते किर्लोस्कर वाडीस असतांना त्यांच्या व माझ्या गाठीभेटी वारवार होत असत. सन १९५३ च्या ऑगस्टांत ते सेवानिवृत्त होऊन नाशिक येथें गेल्यामुळें ते मला दुरावले आहेत. ताम्हनकरांचें सर्वच लेखन सुबोध, मार्मिक व चुरचुरीत आहे आणि त्यांचा असा एक विशिष्ट वाचकवर्ग त्यांनीं महाराष्ट्रांत निर्माण केला आहे. त्यांचीं अनेक पुस्तकें व नाटिका प्रसिद्ध असल्या तरी 'दाजी'चे जनक म्हणूनच महाराष्ट्राला ते विशेष परिचित आहेत. दाजी हें एक मराठी वाङ्मयांतील अविस्मरणीय स्वभावचित्र आहे, आणि या स्वभावचित्रणांतील कांहीं तुरळक छटा ताम्हनकरांच्या स्वभावात आहेत. इचलकरंजीसारख्या सनातनी वळणाच्या गावांत सारें बालपण व तारुण्यातील काहीं काळ गेला असूनही ताम्हनकरांचीं सामाजिक मतें सर्वस्वीं पुरोगामी आहेत. आचारविचारांतील भोंगळपणा अगर पायघोळपणा त्यांना मुळींच मान्य नाहीं आणि त्यांवर लेखणीनें अगर वाणीनें प्रहार करावयास त्यांनीं केव्हांही माघार घेतली नाहीं. किर्लोस्कर मासिकांतून बुवाबाजीविरुद्ध उघडलेल्या आघाडींत ताम्हनकर सक्रिय सामील होते, हें मला माहीत आहे. ते व त्याच्या सौ. पत्नी दोघेही आतिथ्यशील असल्यामुळें माझ्याप्रमाणेंच अनेक लहानथोर साहित्यिकांनीं त्यांच्या घराचा पाहुणचार घेतलेला आहे.

## श्री. विठ्ठलराव घाटे

महाराष्ट्राचे एक थोर साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी श्री. विठ्ठलराव घाटे यांचा व माझा विशेष परिचय गेल्या फेब्रुआरींत झाला. सन १९२३ च्या सुमारास ते तासगांव विभागात शिक्षणाधिकारी असतांना एकदां बुधगावास माझ्या घरीं आले होते. त्यानतर त्यांची भेट मधूनमधून झाली असली तरी दिलखुलास बोलणें बसणें झालेलें नव्हतें. अहमदाबाद येथें भरलेल्या साहित्यसमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं मींच त्यांचें नाव सुचविलें होतें. माझे कविमित्र गिरीश याचा योग्य पाठिंबा मिळाल्यामुळें श्री. घाटे अध्यक्ष म्हणून निवडून आले, साहजिकच ते व मी अधिक जवळ आलों.

फेब्रुआरी महिन्याचे अखेरीस ते, त्याची कन्या व श्री. श्रीधरपंत रानडे हे विलिंग्डन कॉलेजांत आले असताना माझ्या निमंत्रणावरून गिरीश या सर्वांना घेऊन माझ्याकडे एका सायंकाळीं आले होते. आणि त्याच सायंकाळीं येथील साहित्यसभेच्या वतीनें श्री घाटे यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला.

## किर्लोस्करचे कर्तबगार संपादक " शं. वा. कि. "

किर्लोस्कर मासिकांचे कर्तबगार संपादक आणि माझे जुने स्नेही श्री. शंकरराव किर्लोस्कर यांची भेट अलीकडे दुर्मिळ झाली आहे. पण मधूनमधून जेव्हां ती होते तेव्हां त्यांचें मनमोकळें हास्य आणि हस्तांदोलन मनाला प्रसन्नता आणतें. शंकररावांची अशीच एक भेट मला नुकतीच झाली. भारत सरकारच्या संगीत आणि नाट्य अकॅडमीच्या कार्यवाह कुमारी निर्मला जोशी या ता. २६।५।१९५४ रोजीं सांगलीस आल्या असतांना सांगलींतील अनेक नाट्य व संगीत संस्थांच्या वतीनें त्यांचें स्वागत सांगली अर्बन बँकेच्या भव्य दिवाणखान्यांत करण्यांत आलें. या स्वागतसमारंभास मीही हजर होतों. सदर समारंभांत महाराष्ट्र–नाट्यविद्यामंदिराचे अध्यक्ष या नात्यानें शंकररावांनीं केलेलें स्वागतपर भाषण म्हणजे सुंदर इंग्रजी भाषणाचा नमुना होता. वयाची साठी उलटली असूनही महाराष्ट्राच्या सामाजिक व औद्योगिक उन्नतीसाठीं शंकररावांनीं केलेला संचार पाहिला म्हणजे उद्योग, उत्साह आणि आत्मोन्नति यांचा वस्तुपाठच ते स्वतःच्या उदाहरणावरून देत आहेत, असें वाटतें. कर्तृत्ववान संपादक, उत्तम चित्रकार आणि कर्तबगार उद्योगपति असलेले श्री. शंकरराव किर्लोस्कर महाराष्ट्रीय तरुणांना उत्तम आदर्श आहेत.

गेल्या ५।६ वर्षांत प्रा. श्री. के. क्षीरसागर यांची भेट वर्षांतून दोनदां बहुधा होते. सन १९५४ च्या मे महिन्यात आमच्या विशेष गांठी-भेटी झाल्या व मनमोकळें बोलणेंही झालें. याच मुक्कामात मी व ते नटवर्य बोडस यांच्याकडे मिरजेस गेलों होतों आणि बोडसांशीं झालेल्या संभाषणात आमचे दोन तास मजेंत गेले. प्रा. क्षीरसागर यांच्याशीं थोडा वेळ बोललें तरी कांहींतरी नवीन शिकल्यासारखें वाटतें. जीवन, साहित्य व कला वगैरेविषयींचा त्यांचा दृष्टिकोनच वैशिष्ट्यपूर्ण आहे. मूलग्राही,

तर्कनिष्ठ व समतोल विचारसरणी आणि तिचा प्रामाणिक आणि निर्भय आविष्कार हे प्रा. क्षीरसागरांचे गुणविशेष आहेत. त्यांच्या लेखनाप्रमाणेंच त्यांचीं व्याख्यानेंही सौंदर्यवादी दृष्टिकोनाचींच द्योतक असतात. सांगली येथील यंदाच्या वसतव्याख्यानमालेंत उद्घाटनाचें भाषण करताना त्यांनीं संस्कृतीची सुटसुटीत व्याख्या केली. ते म्हणाले, “ To live, to behave and to die beautifully म्हणजेच संस्कृति. ” त्यांच्यासारख्या सौंदर्यवादी टीकाकाराला साजेशीच ही व्याख्या आहे.

१९१२ सालीं सांगली हायस्कुलात मी मॅट्रिकचा विद्यार्थी होतों, तेव्हापासून माझे मित्र असलेले श्री. बापूराव सोमण मला हल्लीं दिवसांतून दोन वेळां नियमितपणें भेटतात. मध्यतरीं बापूराव थोडेसे साहित्यिक झाले होते. त्यांचें ‘ साध्यसाधन ’ हें नाटक कै. भालेराव काणे यांच्या कंपनीनें रंगभूमीवर आणलें होतें. हल्लीं त्यांचें लेखन स्थगित झालें असून, ते फक्त साहित्यप्रेमी उरलेले आहेत. सोमण व मी यांच्यांत कोणत्याच बाबतींत साम्य नाहीं. यामुळें त्यांचा व माझा स्नेह पाहून अनेकांना आश्चर्य वाटतें. पण त्यांना हें कळत नाहीं, कीं जेथें दोन मनें जमलेलीं असतात, तेथें इतर कोणत्याही उपाधी त्याना दूर करू शकत नाहींत. पुष्कळ वेळां स्वार्थच मैत्रीच्या आड येतो. तो स्वार्थ आम्हा उभयतांतही नसल्यामुळें त्यांची व माझी मैत्री आजवर टिकली आहे व पुढेंही ती खात्रीनें टिकेल.

## पुण्यनगरींत

ता. १३ जुलई १९५४ रोजीं पुणें येथील रेडिओ केंद्रावर माझें काव्यवाचन झालें. या निमित्तानें पुण्यात मी पधरा दिवस राहिलों होतों. माझे एक आप्त श्री. जी. एम्. आपटे, इंजिनीअर यांच्या माडीवाले कॉलनींतील ‘ प्रगति ’ बंगल्यात माझा मुक्काम होता. श्री. आपटे हे साहित्य-प्रेमी व कलाप्रेमी गृहस्थ असून, कांहीं साहित्यिकांचे व कलावंतांचे ते इंजिनीअर आहेत, यामुळें कांहीं साहित्यिक व कलावंत यांचे नवीन परिचय त्यांनीं मला करून दिले. सन १९१५ व १९१६ या दोन वर्षांत फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी म्हणून पुण्यात माझें वास्तव्य होतें. या दोन वर्षांत मी

पुण्यात मनसोक्त हिंडलों फिरलों होतों. त्यानंतरच्या सुमारें तीस वर्षांत बुधगांवांत मी नोकर असतांना अनेक वेळा पुण्यास गेलों असलों, तरी रजेचें बंधन मला नेहमींच असे, यामुळें मला पुण्यांत फार दिवस राहतां येत नसे व मोकळ्या मनानें हिंडतां येत नसे. या खेपेस मी पुण्यांत असताना रजेचें अगर नोकरीचें बंधन मला नव्हतें म्हणून मी मोकळ्या मनानें हिंडू फिरूं शकलों. मी विद्यार्थी होतों तेव्हांचें पुणें व सध्यांचें पुणें यांत जमीन अस्मानाचें अंतर मला दिसून आलें.

## पुणें-तेव्हां आणि आतां

माझ्या विद्यार्थीदशेंत ब्रिटिश राजसत्ता हिंदुस्थानांत दिमाखानें वावरत होती. या सत्तेचे कट्टर विरोधक कै. लोकमान्य टिळक यांचें वास्तव्य पुण्यात असल्यानें पुण्याला त्यावेळीं अखिल भारतीय राजकीय महत्त्व होतें. जहाल व मवाळ हे प्रमुख राजकीय पक्ष भारतांतील इतर ठिकाणांप्रमाणें पुण्यांतही होते. लोकमान्यांचा गायकवाडवाडा हा जहालांचा बालेकिल्ला होता आणि लकडी पुलापलीकडील फर्ग्युसन कॉलेजचा आसमंत ही मवाळांची गढी होती. यापैकीं गायकवाडवाडा हें आम्हां विद्यार्थ्यांचें स्फूर्तिस्थान होतं. सन १९१५ च्या फेब्रुआरी महिन्यात पुण्याचे मवाळाग्रणी नामदार गोखले यांचें देहावसान झालें. त्यांच्या पश्चात्‌ही फर्ग्युसन कॉलेजचा आसमंत हीच मवाळांची गढी राहिली. याच काळांत पुणें ही मुंबई इलाख्याची पावसाळी राजधानी होती आणि मुंबई इलाख्यांतील तें एक महत्त्वाचें शिक्षण-केंद्र व लष्करी केंद्र होतें. पुण्याचा विस्तार त्यावेळीं पर्वतीच्या बाजूला सदाशिव व शुक्रवार या पेठांपलीकडे नव्हता. लकडी पुलापलीकडील भागांत डेक्कन जिमखाना, पी. वाय्. सी. जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज, त्या कॉलेजचीं विद्यार्थी वसतिगृहें आणि बाहेरील कांहीं विद्यार्थी वसतिगृहें, सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी व नामदार गोखल्यांचा बंगला एवढ्याच इमारती प्रामुख्यानें होत्या. शहरांतील स्वच्छतेच्या दृष्टीनें पाहिलें तर डास व रस्त्यांतील खांचखळगे व भरपूर चिखल हें त्यावेळच्या पुण्याचें पावसाळी वैभव होतें.

गेल्या जुलई महिन्यांत मीं पाहिलेल्या पुण्याचें स्वरूप सर्वस्वीं बदललेलें दिसलें. स्वतंत्र भारताच्या मुंबई प्रांतातील एक महत्त्वाचें लष्करी व शिक्षणकेंद्र म्हणून पुण्याचें महत्त्व पूर्वीच्या मानानें वाढलें आहे; आणि खडकवासल्याचें लष्करी कॉलेज सुरू झाल्यानंतर लष्करी दृष्टीनें पुण्याला अखिल भारतीय महत्त्व येणार आहे. पूर्वींचें राजकीय महत्त्व मात्र हल्लींच्या पुण्याला राहिलेलें नाहीं. कै. लोकमान्य टिळकांच्या तोडीचा पुढारी सांप्रत महाराष्ट्रांत नसल्यानें असें होणें साहजिकही आहे. पुणें महानगरपालिकेच्या अविश्रांत परिश्रमामुळें चारी बाजूंनीं पुण्याची सुंदर वाढ झाली आहे व होत आहे. सुंदर व प्रशस्त डांबरी रस्ते, त्यांच्या दोन्ही बाजूंना असलेले विविध बांधणीचे भव्य निवास व रमणीय उद्यानें यांनीं पुण्याला आकर्षक शोभा आली आहे. शहरातील स्वच्छतेच्या दृष्टीनें पाहिलें तर दाट वस्तीनें गजबजलेलें असूनही, पूर्वीच्या मानानें आजचें पुणें पुष्कळ स्वच्छ आहे. डासांची वस्ती आतां अगदीं तुरळक झाली असून, पुण्यात चिखल फक्त नदीकांठच्या दलदलींत, लहान लहान बोळात आणि भांडणांतील दोन बाजू शब्दरूपानें उडवितील तेवढाच दिसतो. बाकी भांडणांतील चिखलफेक ही कांहीं एकट्या पुण्याची मिरास नाहीं. कोणत्याही शहरांत अगर खेड्यांत जेथें भांडखोर लोक असतील तेथें भांडणांतील चिखलफेक ऐन उन्हाळ्यांतसुद्धां दिसतें.

जुलई महिन्यातील पुण्याच्या मुक्कामांत महर्षि कर्वे, राजकवि यशवंत, पंडित महादेवशास्त्री जोशी, प्रा. क्षीरसागर, प्रा. माटे, प्रा. जोग, प्रा. डॉ. के. ना. वाटवे, प्रा. फडके, राजरत्न जोशी, प्रा. ग. ह. पाटील, श्री. य. गो. जोशी, श्री. वि. द. घाटे, म. म. पोतदार, श्री. कृ. भा. बाबर व कु. डॉ. सरोजिनी बाबर, प्रा. नी. श. नवरे, श्री. म. मि. कुलकर्णी व श्री. खंडोपंत कुलकर्णी वगैरे स्नेह्यांच्या व परिचितांच्या भेटी होऊन पूर्व स्नेहाला व परिचयाला उजळा मिळाला. श्री. के. ना. काळे व प्रा. अरविंद मंगरूळकर यांचाही अधिक परिचय याच मुक्कामांत झाला. पूर्व परिचितांपैकीं श्री. गोपीनाथ तळवलकर यांचा विशेष परिचय मीं दोन वेळा मुद्दाम त्यांच्या घरीं जाऊन करून घेतला.

## श्री. गोपीनाथ तळवलकर

श्री. गोपीनाथ तळवलकर १९३० सालीं किर्लोस्करवाडी येथें भरलेल्या लेखकसंमेलनांत प्रथम मला परिचित झाले. त्यावेळीं 'दूर्वांकुर' हा त्यांचा कवितासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला होता, व रविकिरणमंडळाच्या परंपरेंतील एक नवोदित कवि म्हणून मी त्यांना ओळखीत होतों. १९३६ सालीं स्फूर्तिलहरींच्या प्रकाशनसमारंभाच्या निमित्तानें त्यांचा व माझा अधिक परिचय झाला. त्यावेळीं त्यांचें काव्यलेखन मंदावलें होतें व गद्यलेखनांत त्यांची हळूहळू प्रगति होत होती. त्यानंतरच्या काळांत त्यांनीं बरेंच सकस गद्यलेखन केलें व वक्ते म्हणूनही त्यांनीं नांव मिळविलें. पण या दोन्हीपेक्षां त्यांच्या 'मालकंस' या कादंबरीनें मला अधिक आकर्षित केलें व त्यांचा विशेष परिचय व्हावा असें वाटूं लागलें. 'मालकंस' कादंबरीहून सरस अशा कितीतरी कादंबऱ्या मीं वाचल्या आहेत, तरीही 'मालकंस' मधील काव्यात्मतेबद्दल मला विशेष आकर्षण वाटतें. त्या कादंबरींत थोडेसें आत्म-निवेदन आहे, असाही माझा समज आहे. परवां गोपीनाथांच्या घरीं मी त्यांना भेटलों तेव्हां अत्यंत प्रेमळपणानें त्यांनीं माझें स्वागत केलें व आपल्या पत्नी सौ. निर्मलाताई यांचाही परिचय मला त्यांनीं करून दिला. साहित्य-विषयक आम्ही खूप बोललों व त्यावेळचें सर्व वातावरण मला 'मालकंस' कादंबरीं-तील वातावरणासारखें वाटलें. मालकंस कादंबरींत वाचकांना परिचित झालेला गोपीनाथांचा लाडका कुत्रा मोती आमचें सर्व भाषण जवळच पडून ऐकत होता. मालकंस कादंबरीचा उत्तरार्ध गोपीनाथांनीं लवकरच लिहावा व मालकंस मधील हजरतांचें वाचकांना पुनर्दर्शन घडवावें, अशी मीं त्यांना सूचना केली व गोपीनाथांनीं सहास्य मुद्रेनें या सूचनेला मान्यता दिली. पुण्याच्या याच मुक्कामांत श्री. बाबूराव जगताप, सौ. मालतीबाई बेडेकर, श्री. विश्राम बेडेकर, श्री. पां. र. अंबिके, श्री. र. के. खाडिलकर व गायनहिरा सौ. हिराबाई बडोदेकर यांचा नवीन परिचय मला घडला व नानावाडा हायस्कूल, सेवासदन संस्था, हिंगणे-स्त्री-शिक्षणसंस्था, महाराष्ट्र साहित्य परिषद व चित्रशाळा संस्था वगैरे पुण्यांतील नामवंत संस्थांचें प्रत्यक्ष कार्य मला पाहतां आलें.

## श्री. बाबूराव जगताप

पुण्यांतील एक थोर शिक्षणतज्ञ श्री. बाबूराव जगताप यांचा परिचय कविमित्र प्रा. ग. ह. पाटील यांनीं एका सायकाळीं शिवाजी मराठा हायस्कुलांतील बाबूरावांच्या निवासस्थानीं करून दिला. मी गेलों तेव्हां बाबूराव वाचनांत निमग्न होते. वयाची पांसष्टी गांठली असूनही बाबूरावांची तरुणासारखी वृत्ति व कार्यक्षमता पाहून त्याच्याबद्दल मला वाटत असलेला आदर दुणावला. बडोदें येथील पूर्व वर्षांतील आपल्या कांहीं आठवणी त्यांनीं सांगितल्या आणि बऱ्याच साहित्यिक व शैक्षणिक विषयांवर आमचें मनमोकळें बोलणें झालें.

## सौ. मालती बेडेकर व श्री. विश्राम बेडेकर

सन १९३० ते १९३५ या काळांत "कळ्यांचे निश्वास", "हिंदोळ्यावर", "विरलेलें स्वप्न" वगैरे बुरख्याआड लिहिलेल्या साहित्यकृतींनीं तेव्हांच्या समाजात खळबळ उडविणाऱ्या, आणि अलीकडे लिहिलेल्या 'बळी' या प्रभावी कादबरीनें विख्यात झालेल्या लेखिका सौ. मालती बेडेकर यांची भेट व्हावी, अशी मला उत्कट इच्छा होती व तसें मीं त्यांना पत्रानें कळविलेंही होतें. पुण्याच्या मुक्कामात एका सकाळीं त्यांच्या 'मनुस्मृति' बंगल्यावर जाऊन मी त्याना भेटलों. त्या सकाळीं मुसळधार पाऊस पडत होता आणि मनुस्मृतीचें नक्की ठावठिकाण मला माहीत नव्हते. तथापि कोसळणाऱ्या पावसांत सारा प्रभात रोड धुंडाळून शेवटीं मी 'मनस्मृति' बंगला शोधून काढला व मालतीबाईंना भेटलों वर उल्लेखिलेल्या पुस्तकाच्या लेखिकेंत मीं अपेक्षिलेली बुद्धिमत्तेची चमक मालतीबाईंशीं थोडा वेळ झालेल्या सभाषणांत मला दिसून आली. 'विरलेलें स्वप्न' या पुस्तकातील एका घटनेबद्दल माझें व त्यांचें थोडेसें बोलणें झालें व 'बळी' सारख्या आणखी कांहीं कादबऱ्या त्यांनीं लिहाव्या, असें मीं त्यांना सुचविलें. श्री. विश्राम बेडेकर तेथेंच होते व त्याचा व माझा थोडासा पूर्वपरिचयही होता. त्यानीं दिग्दर्शित केलेल्या "क्रांतिवीर वासुदेव बळवंत" या बोलपटांतील कांहीं घटनाबद्दल माझ्या शका मीं त्यांना विचारल्या व त्यांनींही

मोकळ्या मनानें माझें शंकानिरसन केलें. या सुविद्य पतिपत्नींच्या भेटीनें मला समाधान वाटलें.

## श्री. पां. र. अंबिके

महाराष्ट्र, माधुरी, माणिक व माया या मासिकांचे संपादक व यंदाच्या पत्रकार संमेलनाचे अध्यक्ष श्री. पां. र. अंबिके यांचा परिचय मला प्रा. माटे यांचे घरीं एका सकाळीं झाला. माटे यांचेकडे मी गेलों तेव्हां अंबिके तेथें बसलेले होते. पण प्रत्यक्ष परिचय नसल्यानें आम्ही एकमेकांस ओळखूं शकलों नाहीं. प्रा. माटे यानीं आमचा परस्पर परिचय करून देतांच आम्हांला आनंद झाला. त्यानंतर श्री. अंबिके यानीं स्वतः-बरोबर मला मासिकांच्या कार्यालयांत नेलें व मासिकांचें मुद्रण व संपादकीय कार्य याची सर्व माहिती करून दिली. " हल्लीं जागेच्या अडचणीमुळें मासिकांची छपाई एकीकडे व कार्यालय दुसरीकडे असा प्रकार आहे. आगस्टपासून एक नवी व प्रशस्त जागा मिळाली असल्यानें मासिकांची छपाई व संपादकीय कार्य एकाच ठिकाणीं होईल " असें अंबिके यांनीं सांगितलें.

## श्री. र. के. खाडिलकर

शेतकरी कामकरी पक्षाचे कार्यवाह श्री. रघुनाथराव खाडिलकर याची भेट त्यांच्या नारायण पेठेंतील निवासांत मीं मुद्दाम जाऊन एका सायंकाळीं घेतली. माझ्याबरोबर माझे आप्त श्री. आपटे इंजिनीयर हे होते आणि त्यांचा व खाडिलकरांचा खूप पूर्वपरिचय होता. मी मात्र रघुनाथरावांना प्रथमच भेटत होतों. आम्ही गेलों तेव्हां केसरीसाठीं चीनविषयक एक लेख लिहिण्याच्या गडबडींत रघुनाथराव होते. तथापि त्यांनीं आमचें मनःपूर्वक स्वागत केलें व आम्हां दोघांना लिंबाचें थंडगार सरबत दिलें. रघुनाथरावांचें बरेंच स्फुट लेखन मीं पूर्वीं वाचलेलें होतें व त्यांच्या पक्षाची मला सामान्यतः माहिती होती व अलीकडे त्यांनीं रशिया व चीन या देशांत प्रवास

केल्याचेंही मीं वाचलें होतें. त्यांच्याशीं झालेल्या मनमोकळ्या संभाषणांत कम्युनिझम व शेतकरी कामकरी पक्षाचीं मतें, यांतील मूलभूत भेद आणि रशिया व चीन या राष्ट्रांनीं गेल्या पाच वर्षांत केलेली प्रगति याची माहिती स्थूलमानानें मला मिळाली. ही माहिती मीं पूर्वीं वृत्तपत्रांत वाचली होती; पण रघुनाथरावाच्या तोंडून ती पुन्हां ऐकण्यांत वेगळेपणा होता. या सर्व संभाषणांत मी प्रश्न विचारीत होतों व रघुनाथराव त्याचीं त्रोटक उत्तरें देत होते. कम्युनिस्ट अगर शेतकरी कामगार पक्ष यांचीं सर्वच मतें मला पटत नाहींत. पण या पक्षातील पुढाऱ्याची चिकाटी, परिश्रम करण्याची तयारी, आणि मतप्रदर्शन करतेवेळीं दिसून येणारी निष्ठा इत्यादि गुणाचा मी चाहता आहें. मात्र उपरोक्त गुण दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांत दिसतात तसे सर्वच अनुयायात दिसत नाहींत. रघुनाथरावाशीं झालेल्या त्रोटक संभाषणानें माझें समाधान झालें नाहीं. ते पुन्हां सांगलीस येतील तेव्हां माझ्याकडे अगत्य येण्याचें मीं त्याना निमंत्रण दिलें व त्यांनीं तें स्वीकारलें.

## गायनहिरा सौ. हिराबाई बडोदेकर

अखिल भारतीय कीर्तीच्या गायिका सौ. हिराबाई बडोदेकर यांचा परिचय माझे आप्त श्री. आपटे यांच्या घरीं एका सकाळीं आपटे यांनींच करून दिला. हिराबाईची प्रत्यक्ष भेट होतांच माझी फार दिवसाची इच्छा पूर्ण झाल्याचें मीं त्याना सांगितलें आणि मराठी रंगभूमीबद्दल त्यांचें व माझें बरेंच बोलणें झालें. मीं विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें त्यानीं मोकळ्या मनानें दिलीं. गायन ही त्याच्यामध्यें जन्मजात असलेली व त्यांनीं परिश्रम करून जोपासलेली कला आहे, आणि ही कला त्यांनीं उत्कर्षाला नेली आहे. रंगभूमीची सेवा ही हिराबाईची हौस आहे. या हौसेपायीं त्यांनीं बरेंच आर्थिक नुकसान सोसलें आहे आणि पुढेंही तें सोसण्याची त्याची तयारी आहे. माझे मित्र श्री. स. अ. शुक्ल याचें 'संगीत मिराबाई' हें नाटक संक्षिप्त स्वरूपांत रंगभूमीवर आणण्याचा आपला विचार असल्याचें त्यानीं सांगितलें. "संगीत नाटकें रंगभूमीवर आणण्याचे बाबतींत तुम्ही आमचें आशास्थान आहात म्हणून रंगभूमीची सेवा करताना गायनाच्या

दृष्टीनें स्वतःला योग्य असा नायक निवडून जुनीं नवीं संगीत नाटकें रंगभूमीवर आणा " असें मीं त्यांना सुचविलें तें त्यांनीं मान्य केलें.

## नानावाडा हायस्कूल

पुणें महानगरपालिकेच्या नानावाडा हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रा. श्री. वा. किंकर यांच्या निमंत्रणावरून मीं त्या संस्थेस एका सायंकाळीं भेट दिली. पुण्यांतील या इतिहासप्रसिद्ध जागेंत माझें हें पहिलेंच पदार्पण होतें. प्रा. किंकर यांनीं कांहीं वर्गांत मला समक्ष नेऊन विद्यार्थ्यांना माझा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनीं मला काहीं साहित्यविषयक प्रश्न विचारले व त्याचीं उत्तरें मीं दिलीं. मीं माझी एक एक कविताही प्रत्येक वर्गांत म्हणून दाखविली व विद्यार्थ्यांनीं तात्काळ त्या कवितेचें सुंदर रसग्रहण केलें. संस्थेंतील सर्व विद्यार्थी एकत्र जमवून त्यांना पाहुण्याचें व्याख्यान अगर काव्यवाचन ऐकविण्यापेक्षां कांहीं प्रमुख वर्गांत पाहुण्याला नेऊन त्याचा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्याची या शाळेंतील पद्धत मला उपयुक्त वाटली. या शाळेचा आणखी एक विशेष मला आढळून आला, तो म्हणजे या संस्थेंत धनिक वर्गाचे विद्यार्थ्यांना प्रवेश नाहीं. पोटासाठीं अन्य व्यवसाय करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना सवलतीनें फी घेऊन या संस्थेंत शिक्षण दिलें जातें. विद्यार्थ्यांकडून त्यांच्या गृहस्थितीबद्दल माहिती देणारें आत्मनिवेदनही लिहून घेतलें जातें असें प्रा. किंकर यांनीं मला सांगितले आणि कांहीं विद्यार्थ्यांचीं करुणास्पद निवेदनें मीं वाचलीं. या पद्धतीमुळें विद्यार्थ्यांची गृहस्थिति चालकांना कळून येत असल्यानें मला ही पद्धति अभिनव, उपयुक्त व अनुकरणीय वाटली. पुण्यांतील या नमुनेदार संस्थेचें कार्य पाहून मला समाधान वाटलें.

## सेवासदन संस्था

सेवासदन संस्थेच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. पाठक यांच्या निमंत्रणावरून मीं त्या संस्थेला एका दुपारीं भेट दिली. मुख्याध्यापकांनीं

मला सर्व वर्गांचें प्रत्यक्ष काम दाखविलें. त्यानंतर इयत्ता १० वीच्या विद्यार्थिनींना मीं ' उत्तरेकडे ' ही माझी कविता विशद करून सांगितली व गाऊनही दाखविली. या इयत्तेच्या मराठी क्रमिक पुस्तकांत ही कविता असल्यानें मुख्याध्यापकांनीं वरील कार्यक्रम योजला होता. त्यानंतर सेवा-सदन संस्थेचे सहचिटणीस श्री. कुलकर्णी यांनीं संस्थेचे सर्व वर्ग, वसतिगृहें, वगैरे कार्याची मला माहिती दिली व सर्व संस्थेचें प्रत्यक्ष कार्य स्वतः मज-बरोबर हिंडून दाखविलें. संस्थेचे सर्व वर्ग व कार्य पाहणेस मला दोन तास लागले. एवढें विस्तृत कार्य संस्था सध्यां करीत आहे. कै. श्रीमती रमाबाईसाहेब रानडे व कै. गोपाळ कृष्ण देवधर या थोर व दिवंगत समाज-सेवकांनीं स्थापन केलेल्या पुण्यांतील या अत्यंत उपयुक्त स्त्रीशिक्षणसंस्थेचें व्यापक कार्य पाहून मला समाधान वाटलें. सेवासदनसंस्थेच्या सरचिटणीस कुमारी काशीताई आठवले यांच्या विनतीवरून सेवासदन हायस्कूलच्या वसतिगृहातील विद्यार्थिनी व शिक्षिका यांच्यासमोर एका रात्रीं माझें काव्यगायनही झालें.

## हिंगणे स्त्रीशिक्षणसंस्था

हिंगणे येथील स्त्रीशिक्षणसंस्थेचे चिटणीस श्री. भास्करराव कर्वे यांच्या निमंत्रणावरून मी एक दिवस हिंगण्यास गेलों होतों. माझे पूर्वपरिचित कविमित्र श्री. वि. के. महाबळेश्वरकर यांच्या घरीं माझा मुक्काम होता व त्यांनीं माझें अत्यंत प्रेमळपणानें स्वागत केलें. दुपारीं हिंगणें येथील अनेक शिक्षणसंस्थांतील शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थिनी यांच्यासमोर माझें जाहीर काव्यगायन झालें. ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य श्री. पालकर यांनीं स्वतः मजबरोबर हिंडून संस्थेचे सर्व वर्ग व इमारती मला दाखविल्या व संस्थेच्या व्यापक कार्याची मला माहिती दिली. महर्षि कर्वे यांच्या दिवंगत पत्नींच्या समाधीला भेट देऊन मीं आदरपूर्वक वंदन केलें. सुमारें तीस वर्षांपूर्वी कै. प्रा. वामनराव जोशी हिंगण्यास राहत असतांना मी या संस्थेंत, माझे मित्र व त्यावेळीं तेथें शिक्षक असलेले श्री. गो. रा. चोळकर यांचेकडे गेलों होतों. पुन्हा या वेळीं संस्थेच्या विस्तृत आवारांत संचार करीत असतांना

क. वामनरावांची साधी, सात्त्विक व हंसतमुख मूर्ति माझ्याबरोबर हिंडत असल्याचा मला भास झाला. महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनीं जुन्या प्रतिकूल काळांत स्थापन केलेल्या या थोर संस्थेचें आजचें व्यापक कार्य पाहून त्यांना समाधान वाटत असेल.

## महाराष्ट्र साहित्य परिषद

रविवार ता. १८ जुलई रोजीं सायंकाळीं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चालकांनीं एक अनौपचारिक समारंभ घडवून आणून पुण्यांतील कांहीं साहित्यिकांचा व परिषदेच्या नियामक मंडळांतील सभासदांचा मला परिचय करून दिला. या समारंभांत माझा परिचय करून देणारीं भाषणें माझे मित्र प्रा. क्षीरसागर, कवि गिरीश व प्रा. जोग यांनीं केलीं व माझ्या कांहीं कविता मी उपस्थितांसमोर म्हणून दाखविल्या. गेलीं पंधरा वर्षें मी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा तहहयात सभासद आहें व गेलीं सहा वर्षें मी परिषदेच्या सांगली शाखेचा अध्यक्ष आहे. पण परिषदेच्या कार्यालयांत माझें हें पहिलेंच पदार्पण होतें. संस्थेचें कार्य समाधानकारक रीतीनें चाललेलें पाहून मला समाधान वाटलें आणि त्याच वेळीं पुढील विचार माझ्या मनांत आले. साहित्याला सागराची उपमा देतात ती अगदीं यथार्थ आहे. सागरांत सुंदर मौक्तिकें सांपडतात त्याचप्रमाणें साहित्यसागरांतही अनेक सुंदर, पाणीदार व टपोरीं मौक्तिकें निर्माण होतात आणि सागरावर मधून-मधून वादळें होतात तशींच तीं साहित्यसागरावरही होतात. पण दोन्ही वादळांमधील फरक इतकाच कीं, सागरावरील वादळानंतर सागर पुन्हां प्रशांत व गंभीर होतो आणि साहित्यसागरावरील वादळानंतर केव्हांकेव्हां अकारण कटुता मागें राहते. तथापि असें होणें स्वाभाविकही आहे. सागर हें निसर्गाचें भव्य व उदात्त स्वरूप आहे आणि साहित्यनिर्माता मानव कितीही मोठा असला तरी तो शेवटीं भावनावश माणूस असतो. निसर्ग आणि मानव यांत थोडा भेद राहणारच. उपरोक्त समारंभाच्या निमित्तानें साहित्यपरिषदेचे कुशल कार्यवाह प्रा. वा. दा. गोखले यांचा प्रत्यक्ष परिचय मला झाला. परिषदेची नौका अनेक वादळांतून कुशलतेनें नेणारे कर्णधार

म्हणून त्यांचा लौकिक मीं ऐकला होता. प्रत्यक्ष भेटींत ते साधे असल्याचें माझ्या प्रत्ययास आलें.

अनुक्रम विभाग क्रमांक नों. दि

## चित्रशाळा संस्था

चित्रशाळा प्रकाशन म्हणून प्रसिद्ध होणार असलेल्या 'स्फूर्तिविलास' या माझ्या निवडक कवितांच्या संग्रहाची छपाई चित्रशाळेंत चालू होती. ती पाहण्याच्या निमित्तानें चालकाच्या निमंत्रणावरून मीं एका सकाळीं चित्रशाळेस भेट दिली. व्यवस्थापक श्री. जोशी व प्रकाशनविभागप्रमुख श्री. रानडे यांनीं चित्रशाळेच्या वेगवेगळ्या विभागांत चालू असलेलें कार्य मला दाखविलें तें पाहून समाधान वाटलें. कै. लोकमान्य टिळक व कै. काकासाहेब खाडिलकर यांचे स्नेही कै. वासूकाका जोशी यांनींच चित्रशाळेचें कार्य नांवारूपाला आणलें. ब्रिटिशांच्या दडपशाही राजवटींत राष्ट्रीय वाङ्मयाचें प्रकाशन करणारी संस्था म्हणून चित्रशाळेवर सरकारचा रोष होता. ती झळ सोसूनही टिकून राहून, जोमानें कार्य करणारी चित्रशाळा संस्था, हें कै. वासूकाका जोशांचें जिवंत स्मारक आहे.

जुलई महिन्यांत पुण्यात झालेल्या निवासानें माझ्या मनाला ताजेपणा व हुरूप आला व माझा दृष्टिकोन थोडासा विस्तृत झाला. हरिपूरसारख्या सनातनी खेड्यात माझें बालपण गेलें व बुधगांवसारख्या खेडेवजा व मागासलेल्या गावात माझी सारी उमेदीची हयात गेली. या सर्व काळांत वेगवेगळ्या ठिकाणीं व वारंवार प्रवास न घडल्यानें माझी वृत्ति संकुचित राहिली. प्रत्येक सभासंमेलनात हिरीरीनें भाग घेणाऱ्या व्यक्तींना व साहित्यिक मित्रांना मी मनांतून दूषणें देत असें. पुण्याच्या मुक्कामांत अनेक थोर व्यक्तींच्या भेटींनीं व अनेक थोर संस्थांचें कार्य पाहून माझ्या मनाचा व दृष्टीचा विकास झाला व मला कळून आलें कीं, सभासंमेलनांत निष्कारण पुढेंपुढें करणें हें जितकें दूषणीय आहे, तितकेंच सभासंमेलनापासून विन्मुख होऊन मागेंमागें राहणें, हेंही दूषणास्पद आहे. शिक्षण, साहित्य व कला यांचीं केंद्रें असलेल्या ठिकाणीं प्रवास न करतां एकाच ठिकाणीं डांबून राहणाऱ्या व्यक्तीची वृत्ति स्वयंकेंद्रित, अल्पसंतुष्ट व संकुचित बनते.

आपणासारख्याच एकाद्या सामान्य व्यक्तीला फार मोठे मानण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. दडोबाच्या डोंगरानें दानोळीच्या डोंगराला (सांगलीच्या पचक्रोशींतील दोन लहान डोंगर) श्रेष्ठ मानण्यासारखाच हा प्रकार होतो. कारण दोघानींही सह्याद्रीचीं उत्तुंग शिखरें अगर नगराज हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें पाहिलेलीं नसतात. पुणें, मुंबईसारख्या महत्त्वाच्या केंद्रातील थोर व्यक्तींची बौद्धिक उंची पाहिली म्हणजे आपलें व आपण ज्याना थोर मानीत आलों त्यांचें वास्तविक मोल कळून येऊन मौज वाटते. म्हणून आत्मविकासाची इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें शिक्षण, साहित्य व कला यांच्या अनेक महत्त्वाच्या केंद्राना वारवार भेटी देऊन आत्मोन्नति करून घेतली पाहिजे असें मला वाटतें. एका जुन्या आर्येंत देशाटनाची गायिलेली महति अगदीं सार्थ आहे.

ता. १५ ऑगस्ट १९५४ चा स्वातंत्र्यदिन भारतांतील इतर ठिकाणाप्रमाणेंच सांगलींतही थाटानें साजरा झाला. बारा वर्षांपूर्वी हिंदुस्थान लौकरच स्वतंत्र होणार असें भविष्य कोणीं वर्तविलें असतें तर त्यावर सहज विश्वास बसला नसता, इतकी ब्रिटिश सत्तेची पकड तेव्हां बळकट होती. दुसरें जागतिक महायुद्ध संपण्याच्या सुमारास जागतिक राजकीय वातावरणात महत्त्वाची उलथापालथ होऊन ब्रिटिश राजसत्ता खिळखिळी झाली व भारताची दीर्घकालीन तपस्या फळाला येऊन ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं ब्रिटिश सत्तेचें भारतांतून उच्चाटन होऊन भारत स्वतंत्र झाला. त्यानंतरच्या काळांत एकाहून एक अधिक उत्साहपूर्ण असे सात स्वातंत्र्यदिन मला पाहतां आले, याबद्दल मला धन्यता वाटते. लौकिक जीवनांतील माझ्या साठाव्या वर्षांतील यंदाचा स्वातंत्र्यदिन तर मला विशेष भाग्याचा वाटतो. म्हणून माझ्या वाङ्मयीन जीवनवृत्तांताचें कथन या शुभदिना-पर्यंतच करून मी हें कथन तूर्त स्थगित करतों.

—*—

प्रकरण ६ वें

# मागें पाहतांना

जीवनमार्गावरील एका विशिष्ट सीमेवरून गतायुष्याचें सिंहावलोकन करतांना मला संपूर्ण समाधान वाटत आहे. माझ्या लौकिक जीवनात अगर वाङ्मयीन जीवनांत गगनाला गवसणी घालण्याच्या आशाआकांक्षा मी केव्हाही बाळगल्या नाहींत आणि माझ्या दोन्ही जीवनांतील मर्यादित आशाआकांक्षा सफल झाल्याचें समाधान मला लाभलें आहे. वयाच्या पांचव्या वर्षी वडिलांच्या छत्राला मी पारखा झालों आणि माझ्या कष्टाळू मातोश्रींनीं माझें व माझ्या धाकट्या दोन भावांचें त्या कठिण काळात संगोपन केलें. माझे दिवगत चुलतआजे व हरिपुरांतील कांहीं परोपकारी साहाय्यक यांच्यामुळेंच त्या कठिण काळात आमचा निभाव लागला. घरची परिस्थिति अत्यंत निकृष्ट असल्यानें मला उच्च शिक्षण घेणें शक्यच नव्हतें, पण तें मिळावें अशी माझी उत्कट इच्छा होती; आणि मिरजमळा संस्थानचे अधिपति कै. श्रीमंत बाबासाहेब पटवर्धन यांच्या उदार मदतीनें ती पूर्ण झाली. बुधगांवसारख्या

लहान संस्थानांत माझी सारी उमेदीची हयात गेली असूनही, नोकरीचीं बंधनें माझ्या वाङ्मयीन जीवनाला रोधक झालीं नाहींत. लहानशा संस्थानांत स्वाभिमान गमावल्याशिवाय पेन्शनपर्यंत नोकरी निभावून जाणें त्या काळांत कठीणच होतें. तरीहि स्वाभिमान न गमावतां मी सेवानिवृत्त झालों आणि स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून मी गेलीं सात वर्षे सुखानें कालक्रमणा करून साठ वर्षांची सीमा गांठली आहे. केवळ परमेश्वरी कृपेमुळेंच हें सर्व होऊं शकलें. सामान्यत: यशस्वीपणें मी येथपर्यंत केलेला प्रवास पहावयास माझ्या पूज्य मातोश्री हयात आहेत, हें मी माझें थोर भाग्य समजतों.

सुमारें चाळीस वर्षांपूर्वी देवी शारदेच्या विस्तीर्ण व दिव्य मंदिराच्या भव्य प्रवेशद्वाराजवळ मी गेलों. द्वारांतून शारदेचा दरबार माझ्या संपूर्ण दृष्टिपथात येत होता. ब्रह्मकुमारी देवी शारदा स्फटिकाच्या उच्च सिंहासनावर विराजमान होऊन वीणावादन करीत होती आणि मधुर वीणा-झंकारानें दशदिशा निनादित होत होत्या. गुलाब, जाईजुई, मोगरा वगैरे पुष्पांचा सुगंध वातावरणांत दरवळत होता. शारदेचे पहिल्या श्रेणीचे सर्व मानकरी देवीच्या दोन्ही बाजूंना आपापल्या दर्जाप्रमाणें स्थानापन्न झाले होते. इतर देवतामंदिराप्रमाणें शारदामंदिराच्या द्वारांतही आपल्या बगल-बच्चांना प्रवेश मिळवून देणारे आणि इतराचा प्रवेश मंदिरात न व्हावा म्हणून धडपडणारे बडवे आणि पुजारी मार्ग आडवून उभे होतेच. द्वारातूनच मी देवी शारदेला अत्यादरपूर्वक वंदन केलें आणि आपला वरद हस्त किंचित् उंचावून देवीनें प्रसन्न मुद्रेनें माझ्या अभिवादनाचा स्वीकार केला. चाणाक्ष बडवे आणि पुजारी यांच्या हातांचे अडसर क्षणार्धांत दूर झाले आणि शारदेच्या विस्तीर्ण मंदिरात मीं भीतभीत प्रवेश केला. मंदिराच्या कोपऱ्यातील सोईची जागा मला शारदेच्या कृपेनें मिळाली आणि ती जागा मी आजतागायत सांभाळून आहें. देवी शारदेची सेवा सतत व निष्ठेनें केली, तर दरबारी मानकऱ्याचें आसन मिळो वा न मिळो, जेथून शारदेचें दर्शन सहज होऊं शकेल, अशी सोईची जागा शारदामंदिरांत खास मिळते असा माझा अनुभव आहे.

## देव आणि दैव

हरिपूरसारख्या एका सनातनी क्षेत्रांत माझा जन्म झाला. तेथील महान् भगवद्भक्त कै. राधाबाई भट यांचा मी मुलीकडून वंशज आहे, आणि घरच्या श्री गोपाळकृष्णाच्या मंदिरांत माझें बालपण गेलेलें आहे. यामुळें परमेश्वरावरील माझी श्रद्धा जन्मजात आहे. विद्यार्थीदशेंत वाचनानें आणि अभ्यासानें मी बुद्धिवादी बनलों. पण परमेश्वरावरील माझी श्रद्धा तिळमात्र कमी झाली नाहीं. मात्र विश्वाचें नियंत्रण करणारी जी विराट शक्ति तिला मी परमेश्वर मानूं लागलों. दिसेल त्या शेंदूर फासलेल्या दगडाला देव मानण्याइतका अंधश्रद्ध मी अर्थातच राहिलों नाहीं. देवाबद्दल अगर धर्माबद्दल कोणी भोंगळपणानें बोलूं लागला तर त्याला मी स्वाभाविक-पणेंच विरोध केला आहे आणि अद्यापही करतों. यामुळें देवधर्म वगैरे न मानणारा मी एक नास्तिक आहें अशी समजूत माझ्याबद्दल सामान्यत: आहे. बुधगांवसारख्या सनातनी व मागासलेल्या खेड्यांत माझीं तीस वर्षें गेलीं आहेत. लॉटरींत बक्षीस मिळावें म्हणून देवाला नवसाची लाच देणारे बहुसंख्य भाविक ज्या समाजांत होते तेथे माझीं परमेश्वराबद्दलचीं उपरोक्त मतें पटणें शक्यच नव्हतें. म्हणून मी बुधगावांत असेतोंपर्यंत मी एक देवधर्म न मानणारा नास्तिक आहें असाच छाप माझ्यावर कायमचा पडला होता. मीं वर नमूद केलेंच आहे कीं विश्वाचें नियंत्रण करणाऱ्या विराट शक्तीला मी देव मानतों. हा परमेश्वर नसता तर संपत्तीप्रमाणेंच सुख आणि शांति सान्या गरिबांना दुर्मिळ झाली असती. संपत्तीची वाटणी हें परमेश्वरी साम्राज्यांत सोपीव खातें आहे आणि सुखाची वाटणी हें खातें परमेश्वरानें राखीव म्हणून आपल्या स्वाधीन ठेविलें आहे. संपत्तीच्या वाटणीप्रमाणेंच हेंही खातें सोंपीव असतें तर धनिक लोकांनीं संपत्तीप्रमाणेंच सुखाचीही भरती बँकांमध्यें आपल्या खात्यावर केली असती आणि सुख गरिबांना दुर्मिळ झालें असतें. धनिक लोक हें करूं शकत नाहींत म्हणूनच कांहीं गरीब लोक सुखी दिसतात आणि पराच्या गादीवर लोळणारे कांहीं धनवान दुःखाचे उसासे सोडताना आढळतात.

व्यापोनियां विश्व स्वयंप्रकाशी
प्रकाशवी जो शशि-भास्करांसी
आणी निरोधी ग्रहमंडलासी
चैतन्य जगीं स्फुरवी तो देव माझा

हीच माझी देवाबद्दलची भावना आहे. देवाप्रमाणेंच दैवाबद्दलचा माझा दृष्टिकोनही बुद्धिवादी आहे. आंधळा दैववाद मला मुळींच मान्य नाहीं. प्रयत्नाची पराकाष्ठा करूनही अंगीकृत कार्यांत यश मिळालें नाहीं, तर निराश न होतां केवळ दैवयोग म्हणून अपयश आलें, असें समाधान मानून घेण्या-पुरतेंच मानवी जीवनांत दैवाला स्थान आहे.

" योजितो नर एक कांहीं दैव योजी दुसरें "

या पद्यपक्तींतील दैव आणि Man proposes and God disposes या वाक्यांतील God हीं दोन्हीं समानार्थी आहेत अशी माझी समजूत आहे.

## धर्म

धर्माबद्दलचीं माझीं मतेंही अशींच बुद्धिवादी आहेत. जगातील श्रेष्ठ धर्मांचीं मूलतत्त्वें सामान्यतः एकच आहेत. धार्मिक बाबतींत भेद अगर विरोध दिसतो, तो त्या त्या धर्मांच्या अनुयायांनीं आचाराच्या रूपानें घुसटलेला असतो. म्हणून गीता आणि उपनिषदें यांनीं पुरस्कारिलेल्या मानवताधर्मालाच मी खरा धर्म मानतों. तत्त्वविरहित केवळ आचारधर्म मला अर्थातच मान्य नाहीं. अंतःकरणांत उच्च तत्त्वांचा लवलेशही नसताना केवळ दिखाऊ आचारांच्या बळावर धर्मनिष्ठ म्हणविणारे लोक अज्ञानी अगर ढोंगी असतात, असें मला वाटतें. केवळ समाजात पोकळ प्रतिष्ठा मिळविण्यासाठीं हें आचरण असतें. उच्च तत्त्वावर अधिष्ठित असलेला सदाचार केव्हांही वंदनीयच आहे. स्वर्गस्थ महात्मा गांधीजींनीं उच्च तत्त्वावर अधिष्ठित असलेल्या मानवताधर्माचाच प्रसार आपल्या लेखनांतून, व्याख्यानातून आणि सायंप्रार्थनांतून केला आणि स्वर्गस्थ पूज्य साने गुरुजींनींही गांधीजींचेंच अनुकरण केलें. पूज्य विनोबाजी भावे याच मानवताधर्माचा आजही प्रसार

करीत आहेत. खरा धर्म न कळणाऱ्या अंध समाजांतच तत्त्वविरहित आचार-धर्मांचें स्तोम माजविलें आहे. खऱ्या मानवताधर्माप्रमाणें आचरण करणाऱ्या थोर विभूति सोडून सामान्य जनाबद्दल बोलावयाचें तर–

" तो धर्म सनातन सत्य दया शांतीचा
जाहला पदच्युत जगांतुनी केव्हांचा
तोतया बसवूनी तक्तावरती त्याचा
जग मरे तयाच्या जुलमी अमलाखालीं "

अशीच माझी समजूत आहे.

## जीवन

जीवनाबद्दलचा माझा दृष्टिकोन संपूर्ण आशावादी आहे. माझ्या बालपणांत आणि विद्यार्थीदशेंत आमची घरची स्थिति अत्यंत निकृष्ट होती, यामुळें मला अनेक अडचणींशीं झगडावें लागलें. बुधगावांतील नोकरीच्या काळांत माझी आर्थिक परिस्थिति थोडीशी बरी असली तरी वैचारिक कुचंबणा मला दीर्घकाल सहन करावी लागली. यामुळें माझी वृत्ति झुजार बनली आहे. जीवन म्हणजे गुलाब पुष्पांची शय्या असा अनुभव असलेले कांहीं भाग्यवान् असतीलही, पण मला मात्र जीवन म्हणजे एक संग्राम आहे असें वाटतें; आणि या संग्रामात संकटांना बगल देण्यापेक्षां संकटांबरोबर झुंज केली तरच निभाव लागतो, असा माझा अनुभव आहे. माझ्या जीवनात माझ्या सहनशक्तीचा अंत पाहणारीं दारुण संकटें माझ्यावर कोसळलीं नाहींत, ही केवळ परमेश्वरी कृपा आहे. माझा जीवनविषयक दृष्टिकोन याप्रमाणें आशावादी असल्यानें, तसेच आशावादी सूर माझ्या काव्यातही सामान्यतः प्रकट झाले आहेत. सामाजिक जीवनांत केवळ जन्मानें मिळालेलें मोठेपण मला मान्य नाहीं.

## कोणि नसे जन्मानें मोठा

'कर्तृत्वानें जो तो होई निज भाग्याचा जगिं निर्माता' अशीच माझी भावना आहे. केवळ सामान्य म्हणून जन्मास आलेल्य

काहीं व्यक्ती गुणांच्या व कर्तृत्वाच्या बळावर विभूतिपदाला चढल्याचीं कितीतरी उदाहरणें दाखवितां येतील. सेनापतीचा मुलगा गुणांच्या अभावीं सेनापति होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें केवळ राजवंशात जन्म झाल्या म्हणून शासनकर्तृत्वाच्या अभावीं कोणीही राजा होता कामा नये, असें माझें मत आहे, आणि हें मत आजच्या लोकशाहीच्या काळांत नवीन बनलेलें नसून १९२० सालीं मीं लिहिलेल्या "तुम्ही कोण?" या सवालात मीं हेंच मत प्रतिपादिलें आहे. आजचा काळ लोकशाहीचा आहे. राजेलोक आता नामशेष झाले असून, जगांतील काहीं देशांत राजे असले तरी ते शोभेची वस्तु म्हणून आहेत. जन्माच्या मोठेपणाप्रमाणेंच जातीचा मोठे-पणाही मला समत नाहीं. कोणत्याही जातींत जन्मलेली व्यक्ति कर्तृत्वाच्या बळावर जगात वद्य होऊं शकेल. देव, दैव, धर्म आणि जीवन याबद्दलच्या वर उल्लेखिलेल्या मताचा संबंध माझ्या वाङ्मयीन जीवनापेक्षा माझ्या लौकिक जीवनाशींच अधिक आहे. पण हीं सर्व मतें माझ्या अनेक कवितांतून व्यक्त झालेलीं असल्यानें माझ्या वाङ्मयीन जीवनवृत्तांतात तीं समारोपा-दाखल नमूद केलीं आहेत.

## काव्य

काव्याबद्दलची माझी कल्पना "**वाक्यं रसात्मकं काव्यम्**" अशी आहे. मात्र हें काव्याचें लक्षण आहे. काव्याचा उद्गम वेगळ्याच प्रकारें होतो. आंग्ल कवि वर्डस्वर्थ यानें काव्याची व्याख्या Spontaneous overflow of powerful feelings, recollected in tranquility अशी केली आहे आणि "माझी कविता" या कवितत वेगवेगळ्या भावनानीं काव्योद्गम कसा होतो हें सागतांना

**कविता स्फुरते सहजीं उद्रेक मनी होतां**

असेंच मींही म्हटलें आहे. माझ्या "स्फूर्ति" या कवितेंत स्फूर्ति म्हणजे कविहृदयावर लखलखणारी वीज असें मी स्फूर्तीचें वर्णन केलें आहे. काव्याची व्याख्या कोणतीही असली तरी काव्यविषय दृष्टीपुढें येताच मनावर कांहींतरी वेगळे सस्कार होऊन मन चिंतनशील होतें आणि मनाच्याया

अवस्थेंत कवितेची पहिली ओळ आपोआप सुचते, असा माझा अनुभव आहे. ही पहिली ओळ ज्या जातींत अगर चालींत असते, त्याच जातींत अगर चालींत माझी सर्व कविता तात्काल अगर कांहीं अवधीनंतर पुरी होते. चाल अगर वृत्त प्रथम ठरून नंतर काव्यकल्पना सुचली, असें माझ्या बाबतींत केव्हाही घडलेलें नाहीं. एकदा तयार झालेल्या कवितेवर मी संस्करण सहसा करीत नाहीं, अगदीं जरूर तेव्हांच करतों. अकारण संस्करणें केलीं तर कवितेंतील सहजता नष्ट होते, असें माझें मत आहे.

काव्याचें मोल माहीत नसलेले अगदीं व्यवहारी दृष्टीचे माझे कांहीं स्नेही मला नेहमीं विचारतात, कीं ' इतकीं वर्षें तुम्ही कविता लिहीत आहात, त्यापासून तुमचा कोणता फायदा झाला आहे ? " अशा स्नेह्यांना मी पुढील उत्तर आजवर देत आलों आहें. ' मी कविता लिहितों ती मनाच्या आनंदासाठीं लिहितों, आणि या आनंदाचें मोल रुपये आणे पैच्या व्यवहारी हिशेबानें करतां येण्यासारखें नाहीं. ' तथापि अगदीं व्यवहारी दृष्टीनें पाहिलें तरी माझ्या काव्यलेखनानें माझा पुष्कळ फायदा झाला आहे. सन १९२२ ते १९२५ या तीन वर्षांत सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजांत मराठीचा प्राध्यापक म्हणून माझी नेमणूक झाली होती, ती मी कविता लिहीत होतों म्हणूनच. बुधगांव संस्थानांत मी मामलतदार होतों म्हणून खास नव्हे. चार काव्यसंग्रह प्रसिद्ध करून मला झालेला फायदा बाजूस ठेवला तरी गेल्या चाळीस वर्षांत वेगवेगळ्या मासिकांतून आणि अलीकडे किर्लोस्कर, स्त्री व मनोहर या मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या माझ्या कवितांमुळें माझें नांव बृहन्महाराष्ट्रांतील व परदेशांतीलही हजारों वाचकांना परिचित झालें आहे. मी फक्त बुधगाव संस्थानांत अधिकारीच असतों तर म्युनिसिपालिटीच्या रजिस्टरापलीकडे माझें नांव फारसें गेलें असतें किंवा नाहीं याची मला शंकाच आहे. वडीलधारी माणसें आजवर नेहमीं सांगत आलीं आहेत कीं, प्रत्येकानें गावोगांव घरें करून ठेवावींत. माझ्यासारख्या निर्धनाला दगडचुन्याचें एकादेंसुद्धां मालकीचें घर बांधणें मुष्किलीचें आहे. तथापि मी आजवर लिहिलेल्या कवितांमुळें ज्या घरांत मला केव्हांही हक्कानें राहतां येईल, अशीं कितीतरी घरं मी बृहन्महाराष्ट्रांतील शहरांत आणि खेड्यांत निर्माण केलीं आहेत.

माझ्या काव्याकडे अगदीं व्यवहारी दृष्टीनें पाहूनसुद्धां एवढे फायदे स्थूलमानानें सांगतां येण्याजोगे आहेत.

माझ्या लौकिक व वाङ्मयीन जीवनमार्गावर प्रवास करताना परमेश्वराची कृपा हें माझ्यावरील छत्र होतें आणि माझ्या अनेक स्वभावदोषाकडे दुर्लक्ष करून माझ्यावर निर्व्याज लोभ करणाऱ्या आप्तांची व स्नेह्यांची सदिच्छा ही माझी शिदोरी होती. या सामुग्रीवर मी माझा आजवरचा प्रवास सुखासमाधानानें करू शकलों; आणि याच सामुग्रीवर माझा पुढील प्रवासही मी सुखानें करू शकेन, असा मला भरवसा आहे. माझ्या दोन्ही जीवनमार्गावरील उर्वरित प्रवासाबद्दल मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं,

“ जरि काया शिणली उत्साही मन अजुनी
देतसे प्रेरणा मज मार्गक्रमणास
आधार आजवरि झाला जो जगदीश
नेईल मला तो पुढतीं सांभाळोनी. ”

स्वातंत्र्यदिन
१५-८-१९५४

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 6223
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0008823

★ दा. ना. मोघे–प्रकाशन, कोल्हापूर. ★

## पुरवणी वाचनासाठीं मंजूर पुस्तकें

### दहावीसाठीं

● **पाकळ्या :** No. S. 66–B. S. 1953/L 1040

सुधारून वाढविलेली पांचवी आवृत्ति. या आवृत्तींत तीन नव्या गोष्टी घातल्या असून **खांडेकरांनीं** नवीन विस्तृत प्रस्तावना जोडली आहे. अभ्यासही वाढविले आहेत. तिरंगी सचित्र कव्हर. **किंमत १॥ रु.**

● **हिरवळ :** No S 66–B S. 1953/ L 1012

या पुस्तकांत **खांडेकरांच्या** चवदा निवडक लघुनिबंधांचा संग्रह केला असून प्रत्येक निबंधाच्या आरंभीं त्याचा **परिचय** दिला असून शेवटीं अभ्यासही दिला आहे. सचित्र कव्हर, आवृत्ति दुसरी. **किंमत १। रु.**

● **दौलत :** No S. 66–B. S. 1953/ L 1010

प्रो. फडके याच्या दौलत या नामांकित कादंबरीची विद्यार्थ्यांसाठीं मुद्दाम तयार केलेली शालेय संक्षिप्त आवृत्ति. **किंमत २ रु.**

● **तरंग :** No. S. 66–B. S. 1952/ L 911

या संग्रहांत **श्री. य. गो. जोशी** यांचीं सर्व वैशिष्ट्यें विपुलतेनें दाखविणाऱ्या अकरा लघुकथा आहेत. प्रत्येक गोष्टीच्या आरंभीं तिचा **परिचय** दिला असून शेवटीं **अभ्यास** दिला आहे. सचित्र कव्हर.

**किंमत १। रु.**

### आठवीसाठीं

● **त्रिवेणी :** No. S 66–B S 1953/ L 1011

‘ यज्ञ ’, ‘ शबरी ’ व ‘ त्यागांतील वैभव ’ या **साने गुरुजींच्या** तीन कथांचा संग्रह. सचित्र कव्हर, आवृत्ति दुसरी. **किंमत १। रु.**

★ स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर. ★

## दा. ना. मोघे–प्रकाशन, कोल्हापूर.

## मराठ्यांचीं संग्रामगीतें : कवि–कै. दु. आ. तिवारी

आठवी आवृत्ति, सचित्र कव्हर, पृ. २२५, किं. २ रु.

" या पुस्तकाची आज आठवी आवृत्ति निघत आहे हीच गोष्ट या गीताच्या लोकप्रियतेची साक्ष देत आहे... शिवशाहीपासून पेशवाईपर्यंतच्या ऐतिहासिक काळातील अनेक स्फूर्तिदायक घटना या पुस्तकांत कै. तिवारींनीं काव्यबद्ध केलेल्या आहेत... तिवारी यांनीं वाङ्मयदृष्ट्या हीं संग्रामगीतें रचून मोठेंच कार्य केलें आहे. विद्यार्थीवर्गाच्या वाचनांत येण्यास हें पुस्तक सर्वथैव योग्य आहे. कवितांची रचना प्रासादिक व प्रवाही आहे, प्रसंग रोमांचकारी आहेत आणि वर्णनें स्फूर्तिदायक आहेत. आजही, त्यांतील दोष लक्षांत घेऊन सुद्धां, हीं संग्रामगीतें अवश्य वाचनीय आहेत. "

– विविधवृत्त २२।८।५४.

## प्राची : कवि–प्रा. गो. म. कुलकर्णी, एम्. ए.

सचित्र कव्हर, लेजरपेपरवरील आकर्षक छपाई, पॉकेट साईज, किं. १॥

" प्रस्तुत ' प्राची ' हा श्री. कुलकर्णी यांचा पहिलाच कवितासंग्रह कवीची निरीक्षण शक्ति, कल्पनावैपुल्य व अनुभूति–समृद्धता यामुळें वाचकावर आपली वैशिष्ट्यपूर्ण छाप पाडणार आहे. या संग्रहांतील बहुतेक कविता मासिकांतून आधींच स्फुटपणें प्रसिद्ध झालेल्या असल्या तरी या कवीच्या कवित्वशक्तीचें मोजमाप करण्याला आणि कवीचें साकल्यानें दर्शन घडविण्याला या संग्रहामुळें मदत झाली आहे. या संग्रहांतील ' उकिरड्यांत ', ' ऊर्ध्वमल ', ' ताटी खोला ज्ञानेश्वरा ' वगैरे बऱ्याच कविता कवीविषयीं विशेष अपेक्षा निर्माण करणाऱ्या अशा आहेत. बहुतेक प्रत्येक कवितेंत कवि जीवनाशीं समरस झालेला दिसतो हें या कवीचें प्रकृतिवैशिष्ट्य उल्लेखनीय आहे. पुस्तकाचा कागद आणि छपाई सुंदर असून आकार आणि एकंदर सजावटही आकर्षक आहे. " – लोकसत्ता : १।८।५४.

● स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर. ●

विश्वविख्यात रशियन कादंबरीकार टुर्गेनिव्ह कृत
'Virgin Soil' या त्रिखंडकीर्ति
कादंबरीची मराठी प्रतिकृति

# झोंपी गेलेला देश

संपादक **वि. वा. हडप**

आजच्या वैभवशाली सोव्हिएट रशियातील कामगार–शेतकरी लोकराज्याला जन्माला घालणाऱ्या रशियन राज्यक्रांतीची बीजें टुर्गेनिव्हच्या वाङ्मयांत जोमदारपणें अंकुरलेलीं आढळतात 'व्हर्जिन सॉईल' ही त्याची अमर कादंबरी तर या क्रांतिबीजाचा भरघोस वाफाच होय. पुढे होऊं घातलेल्या रशियन लोकक्रांतीची पायाळप तयारी अत्यंत यथार्थतेनें टुर्गेनिव्हनें या कादंबरींत शब्दचित्रांकित केली आहे रशियातील शेतकरी क्रांतीच्या साम्यवादी उठावाची प्रत्यक्ष धडपड या शोककथेत जितक्या उठावानें दाखविली आहे, तितक्याच अगर त्याहून अधिक उठावानें तेव्हांच्या मध्यमवर्गीय क्रांतिकारकांचें क्रांतिप्रवण उज्ज्वल पण रम्य प्रेमजीवन विधात्याच्या हाताने या कादंबरींत रंगविलें आहे.

मुखपृष्ठावर चित्रकार दलालाचे सुंदर
दुरंगी चित्र **किंमत ३॥ रुपये**

● ● ●

**स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.**

# अल्प परिचय

●●●

**कवि काव्यविहारी** यांचा जन्म सांगलीनजीक क्षेत्र हरीपूर येथें दि. १५ नवंबर १८९४ रोजीं झाला. बुधगाव संस्थानच्या मदतीनें त्यांचें उच्च शिक्षण राजाराम कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज व मुंबईच्या लॉ कॉलेजांत होऊन १९१९ साली ते LL. B. झाले. सन १९१९ ते १९४८ बुधगाव संस्थानांत जबाबदारीचीं कामे करून सन १९४८च्या मार्च महिन्यात ते सेवानिवृत्त झाले. सन १९२२ ते १९२५ या काळांत बुधगावची नोकरी सांभाळून सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केलें. काव्यविहार, स्फूर्तिलहरी व स्फूर्तिनिनाद हे त्यांचे तीन कवितासंग्रह रसिकमान्य असून स्फूर्तिलहरी हा संग्रह मुंबई विद्यापीठानें M. A. साठीं नेमला होता. स्फूर्तिविलास हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

एक केशवसुतसांप्रदायी कवि म्हणून विद्यमान मराठी कवींत काव्यविहारी यांना मानाचें स्थान आहे. सुमारें चाळीस वर्षांच्या वाङ्मयीन जीवनांत काव्यविहारी यांचा महाराष्ट्रांतील अनेक थोर साहित्यिक, नाटककार, नट व संगीतज्ञ यांच्याशी संबंध आला असल्यानें त्यांचें प्रस्तुत आत्मचरित्र म्हणजे गेल्या चाळीस वर्षांतील दक्षिण महाराष्ट्राचा धावता वाङ्मयीन इतिहासच आहे.

कव्हर छपाई— आर्ट ब्यूरो, कोल्हापूर